

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई. शाखा – पंढरपूर आयोजित

९४ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन पंढरपूर

प्रकाशक -
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई
शाखा - पंढरपूर

संपादक -
विक्रम बिस्किटे

विशेष संपादन सहाय्य -
अशोक गोडगे

संपादक मंडळ -
विठ्ठलराव नागटिळक, सौ. स्वाती जोशी (आराध्ये)
नवनाथ पोरे, लक्ष्मीप्रसाद मोहिते, श्याम सावजी

मार्गदर्शक -
डॉ. मंदार सोनवणे

मुखपृष्ठ -
शिवाजी यादव, पंढरपूर
मो. ८२७५४४८७१८

छायाचित्रे -
उमेश टोमके, राहूल गोडसे,
सोमनाथ भादुले, सचिन झाडे

अक्षर जुळणी व छपाई -
सोमनाथ शिंदे
दर्लिंग ग्राफिक्स्, पंढरपूर
मो. ९६६५५८६१०१, ८९७५४६३८१२

स्मरणिकेतील लेखांत असलेल्या सर्व मजकुराशी व व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

भाळदेवी

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे

९४ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन

२०१४

पंढरपूर



|| श्री विठ्ठल प्रसन्न ||



|| श्री रुक्मिणी प्रसन्न ||

महाराष्ट्राचे आराध्य दैवत



॥ श्री संत ज्ञानेश्वर महाराज ॥



॥ श्री संत तुकाराम महाराज ॥



॥ श्री संत चोखामेळा समाधी ॥
मंगळवेढा



॥ श्री संत नामदेव महाराज ॥



॥ श्री संत एकनाथ महाराज ॥



कलेची देवता

।। भावपूर्ण श्रद्धांजली ।।



कै. विनय आपटे



कै. सुधीर भट


प्रमुख पाहुणे



मा. ना. शरदचंद्रजी पवार साहेब

कृषीमंत्री, भारत सरकार

संमेलनाचे उद्‌घाटक



मा. ना. सुशीलकुमारजी शिंदे साहेब

गृहमंत्री, भारत सरकार



मा. ना. पृथ्वीराज चव्हाण साहेब

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



मा. ना. अजितदादा पवार साहेब

उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



मा. श्री. विजयसिंह मोहिते-पाटील

माजी उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

प्रमुख उपस्थिती



मा. ना. संजय देवतळे साहेब

सांस्कृतिक कार्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



मा. ना. फौजिया खान

सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

प्रमुख उपस्थिती



मा. ना. दिलीपरावजी सोपल साहेब

स्वच्छता व पाणी पुरवठा मंत्री, महाराष्ट्र राज्य, पालकमंत्री, सोलापूर जिल्हा



मा. ना. श्री. हर्षवर्धन पाटील साहेब

सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य



मा. ना. श्री. उदय सामंत साहेब

न्याय विधी, नगरविकास राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

स्वागताध्यक्ष



मा. आमदार श्री. भारतनाना भालके साहेब


विधानसभा सदस्य, पंढरपूर-मंगळवेढा

९४ व्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष



मा. श्री. अरुण काकडे

९३ व्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष



पद्मश्री मा. डॉ. मोहन आगाशे



मा. श्री. मोहन जोशी

अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई



मा. श्री. दीपक करंजीकर

प्रमुख कार्यवाह, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई



मा. श्री. दिलीप कोरके

कार्यकारणी सदस्य, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई



मा. श्री. विनोद महाडीक

कार्याध्यक्ष, ९४ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन, पंढरपूर



मा. श्री. सागर यादव

प्रमुख कार्यवाह, ९४ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन, पंढरपूर

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई

पदाधिकारी

अध्यक्ष



मा. मोहन जोशी

उपाध्यक्ष



मा. प्रमोद भुसारी

प्रमुख कार्यवाह



मा. दीपक करंजीकर

कोषाध्यक्ष



मा. लता नार्वेकर

सहकार्यवाह



मा. भाऊसाहेब भोईर

सहकार्यवाह



मा. सुनील वणजू

कार्यकारी समिती सदस्य


मा. नवनाथ कांबळी


मा. प्रफुल्ल महाजन


मा. सतिश लोटके


मा. श्रीपाद जोशी


मा. सुनील ढगे


मा. दिलीप देवरणकर


मा. किशोर आयलवार


मा. विणा लोकूर

नियामक मंडळ सदस्य


मा. अरुण नलवडे


मा. आसावरी शेटे


मा. अशोक ढेरे


मा. अशोक हांडे


मा. भरत लोळगे


मा. चंद्रकांत कुलकर्णी


मा. दिलीप कोरके


मा. डॉ. गिरीष ओक


मा. किरण कामेकर

नियामक मंडळ सदस्य


मा. उदय सामंत


मा. नाथा चितळे


मा. निना कुलकर्णी


मा. पराग लुळे


मा. प्रभाकर सावंत


मा. राजन भिसे


मा. राजेंद्र जाधव


मा. रत्नकांत जगताप


मा. समीर हंपी

नियामक मंडळ सदस्य


मा. शफी नायकवडी


मा. शशीकांत मोरे


मा. श्रीकृष्ण दाळी


मा. स्मिता तळवळकर


मा. सुकन्या मोने


मा. सुनील महाजन


मा. सुशांत शेलार


मा. वंदना गुप्ते


मा. विजय केंकरे

पंढरपूर शाखा पदाधिकारी

अध्यक्ष



श्री. विनोद महाडीक

उपाध्यक्ष



श्री. सागर यादव

प्रमुख कार्यवाह



श्री. दिलीप कोरके

कोषाध्यक्ष



श्री. नानासाहेब जगताप

सहकार्यवाह



डॉ. मंदार सोनवणे

सहकार्यवाह



श्री. सुनील मोहिते

पंढरपूर शाखा सदस्य


श्री. नाना(मालक) कवठेकर


ॲड. श्री. विवेक चौंडवार


श्री. दत्तात्रय जगताप


श्री. राजाभाऊ गोसावी


श्री. राजाभाऊ उराडे


श्री. सुहास (बंटी) आष्टीकर


श्री. श्रीराम परदेशी


श्री. विनय बडवे


पद्मा दवे (सावजी)

मोलाचे योगदान

जिल्हाधिकारी



मा. प्रविण गेडाम सो.

प्रांताधिकारी



मा. बाबासाहेब बेलदार सो.

तहसिलदार



मा. सचिन डोंगरे सो.

नगरपालिका सी.ओ.



मा. शंकरराव गोरे सो.

विशेष सहकार्य

अध्यक्ष, जिल्हा परिषद सोलापूर



मा. डॉ. सौ. निशिगंधा कोल्हे (माळी)

नगराध्यक्ष, नगरपालिका पंढरपूर



मा. सौ. उज्वला भालेराव

उपाध्यक्ष, जिल्हा परिषद सोलापूर



मा. सुभाष गुळवे

उप नगराध्यक्ष, नगरपालिका पंढरपूर



मा. सुधीर धोत्रे

अनमोल सहकार्य

जिल्हा पोलीस प्रमुख



मा. राजेश प्रधान

अतिरिक्त जिल्हा पोलीस प्रमुख



मा. तुषार दोशी

उपविभागीय पोलीस अधिकारी



मा. प्रशांत कदम

वरिष्ठ पोलीस निरीक्षक



मा. बालासाहेब रेड्डी

स्मरणिका संपादक मंडळ

संपादक



श्री. विक्रम बिस्किटे

सदस्य



श्री. विठ्ठलराव नागटिळक

सदस्य



श्री. अशोक गोडगे

सदस्य



सौ. स्वाती जोशी (आराध्ये)

सदस्य



श्री. नवनाथ पोरे

सदस्य



श्री. लक्ष्मीप्रसाद मोहिते

सदस्य



श्री. श्याम सावजी



९४ व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचे
कल्पक आणि आकर्षक बोधचिन्ह बनविणारे आर्टिस्ट



श्री. शिवाजी यादव
(पंढरपूर)



श्री. सुनिल देवळेकर
(मुंबई)



९४ व्या अखिल भारतीय नाट्य मराठी नाट्य संमेलनाचे स्टेशन रोड, पंढरपूर येथील सुरवसे बिल्डींगमधील संपर्क कार्यालय.



अ.भा.मराठी नाट्य परिषद पंढरपूर शाखेच्या पदाधिकाऱ्यांशी हितगुज करताना मा. मोहन जोशी व भाऊसाहेब भोईर.



९४ व्या अ.भा. मराठी नाट्य संमेलनाच्या संपर्क कार्यालयात अध्यक्ष मोहन जोशी यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष विनोद महाडीक व पदाधिकारी.



९४ व्या अ.भा. मराठी नाट्यसंमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण करताना परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी, भाऊसाहेब भोईर व पंढरपूर शाखेचे पदाधिकारी.

अंतरंग

१	संपादकीय	-	-	३७
२	स्वागताध्यक्षांचे मनोगत	-	भारत भालके	३९
३	उद्घाटकांचे मनोगत	-	सुशिलकुमार शिंदे	४२
४	संमेलनाध्यक्षांचे भाषण	-	अरुण काकडे	४८
५	माजी संमेलनाध्यक्षांचे मनोगत	-	डॉ. मोहन आगाशे	६४
६	पंढरपूरचे सुपुत्र जेष्ठ साहित्यीक द.मा.मिरासदार यांचे मनोगत	-	-	६५
७	नाटक : संहिता ते प्रयोग	-	प्रा. कमलाकर सोनटक्के	७२
८	अभिनय - एक सर्जनशील कला	-	डॉ. दिलीप घारे	८२
९	नाटककारांच्या व्यथा	-	अशोक पाटोळे	८८
१०	रंगभूमीचे नाट्यमय पर्व	-	डॉ. किर्तीकुमार नाईक	९४
११	प्रा. वामन केंद्रे एक सव्यासाची नाट्यगुरू	-	प्रा. कमलाकर सोनटक्के	१००
१२	गिरीश कर्नाड एक नाटककार	-	प्रा. डॉ. संजय उपासे	१०८
१३	वारकऱ्यांच्या माहेरघरातील लोकपरंपरा आणि लोकप्रथा	-	प्रा. डॉ. द. ता. भोसले	११२
१४	सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी नाट्यकला आवश्यक (काळाची गरज)	-	यतिराज वाकळे	११८
१५	हौसी कलाकारांची ग्रामीण रंगभूमी	-	प्रा. नारायण घुले	१२६
१६	पंढरीभूषण जगविख्यात चित्रकार एम.एफ.हुसेन	-	भारत गदगे	१३४
१७	नाट्य पंढरीची वारी - नाबाद ५०	-	शशीकांत लावणीस	१३८
१८	नाट्य भक्ती	-	सौ. चंदाताई तिवाडी	१४०
१९	नटसम्राट-बालगंधर्व	-	प्रा. आर. डी. पवार	१४६
२०	सांस्कृतिक चेहऱ्यावर अपरिहार्यतेचा मुखवटा	-	राजीव मुळ्ये	१५०
२१	अभि'नेते' सुशिलकुमार शिंदे	-	-	१५६
२२	अकलूजच्या राज्यस्तरीय लावणी नृत्यस्पर्धेची वाटचाल	-	प्रा. सुभाष दळवी	१५७
२३	सोलापूरच्या रंगभूमीला समृद्ध वारसा	-	रजनीश जोशी	१५९
२४	पंढरीचा 'शतकी' कलारंग	-	अशोक गोडगे	१६५
२५	किस्से नाटकातले	-	-	१८०

संपादकीय

''जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर
जेव्हा नव्हती गोदा-भंगा,
तेव्हा होती चंद्रभागा''

अशा या चंद्रभागेच्या तिरावर वसलेल्या आणि साक्षात परब्रह्म पांडुरंगाच्या वास्तव्याने पावन आणि पुनित झालेल्या या पंढरी नगरीमध्ये ९४वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन भरत आहे. त्या निमित्ताने ''भांदियाळी''ही स्मरणिका प्रकाशित करीत असताना आम्हास अतिशय आनंद होत आहे. ''आनंदाचे डोही आनंद तरंग'' अशी आमची अवस्था झाली आहे.

चंद्रभागेच्या तिरावर सर्वदूर भागातून आलेले वारकरी अत्यंत श्रध्देने आणि भक्तीभावाने नाचत-नाचत ''ज्ञानोबा तुकाराम'' आणि विठ्ठल नामाचा गजर करतात, आषाढी-कार्तिकीला लाखो भाविकांची भांदियाळी या नगरामध्ये अवतरते त्याचप्रमाणे हजारो नाट्य कलाकारांची आणि रसिकांची भांदियाळी या नाट्य संमेलनाच्या निमित्ताने या नगरीमध्ये अवतरणार आहे आणि आत्मानंदाने बेहोश होऊन आपल्यातील रंगाविष्कार फुलविणार आहेत म्हणून तर या स्मरणिकेस ''भांदियाळी'' हे नाव देण्यात आले आहे.

प्रथमच पंढरपूरमध्ये हे नाट्य संमेलन होत असल्याने आम्हा सर्व पंढरीवासियांना अतिशय आनंद व अभिमान वाटत आहे. या नाट्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षाची धुरा पंढरपूर-मंगळवेढा तालुक्याचे लोकप्रिय आणि कर्तव्यदक्ष आमदार मा. भारत नाना भालके यांनी स्विकारल्यामुळे सर्व कार्यकर्ते आणि रसिकांच्या मनामध्ये एक नवचैतन्य निर्माण झाले आहे.

त्याचबरोबर आमच्या लोकसभा मतदार संघाचे खासदार देशाचे गृहमंत्री भा.ना. सुशिलकुमारजी शिंदे यांचा वरदहस्त आणि आशिर्वाद पाठीशी असल्याने एक वेगळाच उत्साह या संमेलनास प्राप्त झाला आहे.

पंढरपूर ही अध्यात्म नगरी आहे. या नगरीचा अध्यात्मिक वारसा आज जगाच्या कानाकोपऱ्यात पसरला आहे. परंतु कलेची पंढरी म्हणनूही या नगरीला फार मोठा उज्ज्वल वारसा आणि लौकिक आहे. स्वातंत्र्यपुर्व काळातसुध्दा पंढरीच्या कलारत्नांनी रंगभुमी गाजविली आहे. जागतिक किर्तीचे चित्रकार एम.एफ. हुसैन, नाट्य चित्रपट दिग्दर्शक जब्बार पटेल, भारदस्त व्यक्तीमत्वाचे कै. मधु टोमके, कै. सोनबा सासवडे, कै. भगवान मास्तर कुलकर्णी, जालिंदर वाडेगांवकर या रंगकर्मींनी पंढरपूरच्या नाट्य इतिहासात मोलाचे योगदान दिले आहे.

या स्मरणिकेचे अंतरंग नाट्य क्षेत्राच्या विविध अंगांनी खुललेले आहे. मराठी रंगभूमीचे व्यापक निरीक्षक, नाटकाची संहिता ते प्रयोग ही वाटचाल, एकपात्री ते भारूड अविष्कार, हौसी कलाकाराची ग्रामीण रंगभूमी, गिरीश कर्नाड यांच्या नाट्यशिल्पाचे थोडक्यात चिंतन, वामन केंद्रे यांची वैभवशाली कारकीर्द पंढरपूरची रंगभूमी, पडद्यामागील आणि पडद्यावरील अनेक रंजक किस्से अशा अनेकांनी सुंदर असलेल्या या स्मरणिकेत अभिनय, नाट्यनिर्मिती, कलावंत, रसिक अशा सर्वांचे प्रतिबिंब पडलेले आहे. नाट्यसंमेलनाच्या व्यापक आयोजनाने हे अंतरंग खुललेले आहे.

या स्मरणिकेच्या परिपूर्णतेसाठी मागील एक ते दीड महिन्यांपासून संपादक मंडळाने

स्मरणिकेच्या कार्यास वाहून घेतलेले आहे. स्मरणिकेसाठी अत्यंत कल्पक, अर्थसुचक कलात्मक मुखपृष्ठ करणारे प्रसिध्द डिझाईनर - शिवाजी यादव यांचे विशेष आभार. नाट्यसंमेलन संयोजन समितीचे आखुन दिलेल्या धोरणात्मक चौकटीत राहून संपादक मंडळाने लेखांची मांडणी केलेली आहे. संपादक मंडळाकडे आलेले सर्व लेख महत्वाचे आणि मंथनशील होते पण त्या सर्वांचा समावेश करण्यास मर्यादा होत्या, सर्वच लेखकांचे आभार मानण्यापेक्षा आम्ही त्यांच्या ऋणातच राहू. ही स्मरणिका संग्राह्य आणि संदर्भग्रंथ व्हावी असाच तिचा दर्जा ठेवण्याचा अटोकाट प्रयत्न केला आहे त्यामुळे निश्चितच आपणास ती कलात्मक आणि संग्राह्य वाटेल अशी आशा बाळगतो.

ही स्मरणिका सिध्द करण्यासाठी स्वागताध्यक्ष आमदार भारतनाना भालके, संयोजन समिती कार्याध्यक्ष विनोद महाडीक, कार्यवाह सागरदादा यादव, स्मरणिका समिती मार्गदर्शक डॉ. मंदार सोनवणे, नाट्य कलावंत अशोक (काका) मोडगे तसेच दौलतराव शिंदे या सर्वांचे बहुमोल मार्गदर्शन, सुचना आणि सहकार्य मिळाले. तसेच या स्मरणिकेसाठी आर्थिक हातभार लावणाऱ्या सर्व जाहिरातदारांचे आभार त्याचप्रमाणे संगणक अरेखक डिझायनर यांनी ही स्मरणिका आपलीच आहे असे समजून ती दर्जेदार व कलात्मक बनविली. त्याबद्दल दर्शिंग ग्राफिक्स् पंढरपूर चे मालक सोमनाथ शिंदे व त्यांचे सहकारी यांचेही मनापासून आभार! त्याचबरोबर हे संमेलन पंढरपूर येथे आणण्यासाठी आणि उत्कृष्ट पध्दतीने पार पाडण्यासाठी अहोरात्र कष्ट करणारे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पंढरपूर शाखेचे सदस्य आणि प्रांतीक सदस्य दिलीप कोरके यांचेही विशेष आभार! स्मरणिका सिध्द करण्यासाठी सहकार्य करणारे कार्यालयीन कर्मचारी जाधव, इंदापूरकर, घोडके यांचे ही आभार !

ही स्मरणिका तयार करण्यासाठी संपादक मंडळातील सहकारी प्रा. विठ्ठलराव नागटिळक, प्रा. स्वाती जोशी (आराध्ये), लक्ष्मीप्रसाद मोहिते, व पत्रकार नवनाथ पोरे या सर्वांचे मनापासून आभार व धन्यवाद!

शेवटी तुकाराम महाराजांच्या "बोलीले लेकुरे" या उक्तीप्रमाणे अनावधानाने काही चुका झाल्या असतील तर त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो आणि हा लेखन प्रपंच थांबवितो.

- विक्रम बिस्किटे
(बी.ए.बी.एड.)





स्वागताध्यक्षाचे मनोगत

उभ्या महाराष्ट्राचे अध्यात्मपीठ, भक्तिपीठ आणि संस्कारपीठ म्हणून ओळख असलेल्या 'बा... विठ्ठलाच्या' पावन नगरीमध्ये ९४वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन संपन्न होत आहे. ही एक आपणा सर्वांसाठी आनंदाची पर्वणीच म्हणता येईल. तेव्हा या संमेलनाच्या निमित्ताने या अध्यात्मनगरीमध्ये आलेल्या सर्व मान्यवर मंत्री महोदयांचे, कलावंतांचे, नाट्यरसिकांचे रंगदेवतेला विनम्र अभिवादन करून स्वागताध्यक्ष या नात्याने अंतःकरणपूर्वक हार्दिक स्वागत करीत आहे.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी, संमेलनाध्यक्ष अरूण काकडे, मावळते संमेलनाध्यक्ष डॉ. मोहन आगाशे, परिषदेचे सर्व पदाधिकारी यांनी ९४वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन पंढरपूर येथे घेण्याचा निर्णय घेतला आणि हे संमेलन वैभवशाली करण्यासाठी अमूल्य असे योगदान दिले. राजकारणातील आणि समाजकारणातील मान्यवरांचा सहयोग, जेष्ठ-श्रेष्ठ नाट्य, साहित्य, शिक्षण व कला आणि प्रसार माध्यम या विविध क्षेत्रातील अनेकांच्या सक्रिय सहभागातून आणि पंढरपूर शाखेतील पदाधिकाऱ्यांनी केलेल्या २-३ महिन्यांच्या अथक परिश्रमातून हे नाट्य संमेलन संपन्न होत आहे. त्याबद्दल सर्वांना मनापासून धन्यवाद!

स्वातंत्र्यपूर्व काळापासून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा अमूल्य ठेवा असलेल्या या नाट्यचळवळीने देशाच्या स्वातंत्र्याची चळवळ व स्वातंत्र्याची ज्योत समाजाच्या मना-मनात तेवत ठेवण्याची फार मोठी भूमिका पार पाडलेली आहे. धर्मवादाच्या, जातीयवादाच्या, प्रांतवादाच्या, भाषावादाच्या भिंती नष्ट करून समतेचे व एकात्मतेचे वातावरण निर्माण करण्याचे काम देखील या नाट्यक्षेत्राने केले आहे.

जग ही रंगभूमी आहे आणि आपण सारे त्यातील कलावंत आहोत आणि तो जगनियंता दिग्दर्शक आहे असे प्रसिध्द लेखक, नाटककार शेक्सपियरने भाष्य केले आहे. त्याप्रमाणे गेली १५ ते २० वर्षे राजकारण नावाच्या नाटकामध्ये विविध भूमिका पार पाडत असताना गाव, शहर व खेड्यापाड्यातील, वाडीवस्तीवरील अनेकांशी जवळचे नाते निर्माण झाले. व्यक्तीगत आणि सार्वजनिक श्रेत्रात, जीवनात अनेक विकासाची कामे केली. त्यामध्ये एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की मानवी जीवनात केवळ भौतिक समृध्दी आली तरी तो समाधानी होतोच असे नाही. मनाला, आत्म्याला सुखावणाऱ्या व शांती देणाऱ्या गोष्टी त्याला पाहिजे असतात. ही त्यांची वेगळी भूक असते. ती भागविण्यासाठीच नाट्यसंमेलनाचे आयोजन करून स्वागताध्यक्षपदाची जबाबदारी स्विकारली.

आपल्या मराठी रंगभूमीला १५० वर्षांचा समृध्द असा वैभवशाली इतिहास आहे. अगदी स्वातंत्र्यपूर्व काळातसुध्दा लोकजागृतीसाठी नाटकांच्या माध्यमातून लोकजागर आणि प्रबोधन केले. राम गणेश गडकरी, आचार्य अत्रे, विष्णूदास भावे,

केशवराव भोसले, अण्णासाहेब किर्लोस्कर, श्रीपाद कोल्हटकर, वसंत कानेटकर, विजय तेंडूलकर, काशीनाथ घाणेकर, नटसम्राट बालगंधर्व, पु. ल. देशपांडे, प्रभाकर पणशीकर, मामा वरेरकर इत्यादी. दिग्गज कलावंतांनी पुढाकार घेऊन मराठी रंगभूमीत संजीवनी ओतली. अशा या दैदिप्यमान रंगभूमीत भक्तीचा मळा फुलविणाऱ्या पंढरी नगरीमध्येही कै. विठ्ठलराव मोहोळकर, कै. मधुकर (दादा) टोमके, कै. भगवान मास्तर कुलकर्णी, कै. सोनबा सासवडे, कै. लकाप्पा गवळी, कै. अब्दुल देवळे, जालिंदर वाडेगांवकर, विनय बडवे, अशोक गोडगे, दिलीप टोमके, रूद्रमणी मिठारी इत्यादी रंगकर्मींनी पंढरपूरची रंगभूमी जिवंत आणि ज्वलंत तर ठेवलीच पण आपल्या अंगभूत कला कौशल्याने व्यावसायिक रंगभूमी, दुरदर्शन आणि चित्रपट क्षेत्रातही आपला वेगळा ठसा उमटविला.

पंढरपूर हे अध्यात्माचे पीठ, वारकऱ्यांचे माहेरघर असल्याने येथे नियमित कीर्तन, प्रवचन, भजन, भारूड चालू असतात यातून नाटकाचाच अविष्कार असलेला एक प्रकार म्हणजे ''भारूड'' हा या पंढरीनगरीमध्ये बहरला आणि भारूड सम्राज्ञी सौ. चंदाताई तिवाडी यांना दिल्ली येथील राष्ट्रपती भवनात महामहिम राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या समोर भारूड सादर करण्याची संधी मिळाली. राष्ट्रपती महोदयांच्या हस्ते त्यांचा झालेला सन्मान हा आमच्या पंढरपूरकरांसाठी एक मानाचा तुराच आहे. राष्ट्रीय किर्तीचे कलावंत चित्रकार एम. एफ. हुसेन, जेष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांचा जन्म आणि बालपण पंढरपूरात गेले. लावणी कला प्रकारात तर पंढरपूर नेहमीच अग्रेसर राहिले आहे. कै. ज्ञानोबा उत्पात यांची लावणी सातासमुद्राच्या पलीकडे पोहोचली. असा अतिशय वैभवशाली आणि संपन्न असा सांस्कृतिक वारसा माझ्या पंढरपूराला आहे.

आज विज्ञान युगात टेलीव्हिजन, केबल, इंटरनेटच्या काळातदेखील नाटक टिकून आहे. याचे श्रेय चोखंदळ अशा रसिक नाट्यप्रेमींना जाते. सिनेमा, सिरियलमध्ये रिटेकची संधी असते. पण नाटकाचे तसे नसते. बिनचूक-अचूकच अभिनय करावा लागतो. नाटकात जर कलाकार चुकला तर चोखंदळ असलेला रसिक प्रेक्षक त्या कलाकाराची टर उडवायला तयार असतो. त्यामुळे नाट्य कलावंताचा अभिनय हा बावन्नकशी सोन्यासारखा व त्याच्या अभिनयात जीवतंपणा असतो.

आज देशात महिलांवरील अत्याचाराच्या बातम्या वाचल्या व ऐकल्या की मन सुन्न होऊन जाते. अशा पिसाट नराधमांना आमच्या सोलापूरची नाट्य अभिनेत्री सरला येवलेकरांनी सादर केलेले **''जंगली कबूतर''** हे नाटक दाखविले पाहिजे. अशा नराधमांना त्यांच्या पुरुषत्त्वाला आवाहन देणारे काळजाला भिडणारे संवाद या नाटकात सरला येवलेकरांनी वापरले आहेत. त्यामुळे समाज प्रबोधनासाठी जंगली कबूतर सारखी नाटके पुन्हा रंगभूमीवर जोमाने आणली पाहिजेत.

कोणत्याही प्रकारच्या चळवळीला राजाश्रय असल्याशिवाय ती चळवळ तग धरू शकत नाही. ती मोठी होऊ शकत नाही. मराठी नाट्य चळवळीला अगदी कै. यशवंतरावजी चव्हाण साहेब, मा. ना. शरदचंद्रजी पवार साहेब, मा. ना. श्री. सुशीलकुमारजी शिंदे साहेब, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. पृथ्वीराजजी चव्हाण साहेब, व उपमुख्यमंत्री मा. ना. अजीतदादा पवार साहेब या नेत्यांनी नाट्य चळवळीला प्रचंड ताकद देण्याचे काम केले आहे. मराठी नाटक ही महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा असल्याने ती जपण्याची भूमिका महाराष्ट्रातील

नेतेमंडळींनी केली आहे.

''उद्याचा भारत घडविण्याची प्रचंड शक्ती युवकांत आणि बालकांत आहे. तेव्हा शालेय आणि महाविद्यालयातील जीवनापासून त्यांना नाट्य अभिनयाचे धडे मिळावेत. बालनाट्य चळवळ सदृढ आणि समृध्द करण्यासाठी शासन स्तरावरून प्रयत्न व्हावेत. नाटक आणि लोककलांना राजाश्रय मिळावा. वृध्द कलावंतांना पुरेसे मानधन देण्यात यावे. शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून धोरणात्मक निर्णय म्हणून प्रत्येक तालुकास्तरावर एक नाट्यगृह ही कल्पना अमलात आणावी'' एवढी माफक अपेक्षा या संमेलनाच्या निमित्ताने करीत आहे.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने आयोजित केलेल्या या नाट्यसंमेलनात उद्घाटन, नाट्यप्रयोग, अभिरूप न्यायालय, संगीत नाटके, एकपात्री नाटके, बालनाट्ये, मुक्त कलाविष्कार, लोकनाट्य इत्यादी तीन दिवस भरगच्च कार्यक्रमाचे नियोजन केले आहे. हे नाट्यसंमेलन पार पाडण्यासाठी मोठी आर्थिक तरतूद करणेही आवश्यकच होते त्यासाठी जाहिरातदार, देणगीदार, विविध संस्थांचे योगदान, विविध व्यक्तींचे सहकार्य यांच्याशिवाय ही भव्यता सिध्द होवू शकली नसती. अशा सर्व ज्ञात अज्ञात व्यतींचा शतशः ऋणी आहे. या संमेलनात सर्वांनी आपुलकीने सहभागी व्हावे आणि सर्व कलाप्रकाराचा आनंद घ्यावा. तीन-चार वर्षापुर्वीच पंढरपूर नाट्यपरिषद शाखेची निर्मिती झाली आहे. आमचे सर्व पदाधिकारी तसे या नाट्यक्षेत्रात नवागतच आहेत. आपण सर्वांनी श्री विठ्ठलाच्या दरबारात हे नाट्यसंमेलन व्हावे या भावनेने हे नाट्यसंमेलन पंढरपूरला दिले. आम्ही सर्वच मंडळी या क्षेत्रात अननुभवी असल्याने आमच्याकडून आपल्या सेवेत काही उणीवा राहिल्या असतील तर त्या आपण जाणतेपणाने पोटात घ्याव्यात. आमच्या परिने आम्ही हे संमेलन या पवित्रनगरीप्रमाणे पावन करण्याचा प्रयत्न केलाच आहे.

तुकाराम महाराजांच्या शब्दात एवढेच सांगतो की, ''जेथे जातो तेथे, तू माझा सांगाती। चालविसी हाती, धरूनिया।।''

आम्ही पंढरपूरकर जे काम हाती घेतो त्या कामात आमच्या साथीला ब्रह्मांडनायक श्री विठ्ठलाचे अधिष्ठान असते. तोच आम्हाला हाताला धरून चालवित असतो. आमची श्री विठ्ठल चरणी एवढीच प्रार्थना आहे की, ही नाट्य चळवळ यशाची उत्तुंग शिखरे चढू दे आणि या नाट्य चळवळीला हिऱ्या-माणकांचे मोल जडू दे.... पुनःश्च एकदा नवरसांनी भरभरून वाहणाऱ्या या नाट्यसंमेलनात आपले हार्दिक अंतःकरणपूर्वक स्वागत करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र!

- आ. भारत तुकाराम भालके
स्वागताध्यक्ष,
९४ वे अखिल भारतीय
मराठी नाट्यसंमेलन, पंढरपूर

उद्घाटकाचे मनोगत

आविष्कार नाट्य चळवळीचे प्रमुख व व्यासंगी रंगकर्मी माननीय अरुणजी काकडे, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष व माझे मित्र मोहन जोशीजी, नाट्य परिषदेच्या विविध शाखेचे प्रतिनिधी, समोर बसलेले माझे रंगकर्मी, नाट्य व चित्रपट व्यावसायिक, आदरणीय रसिक बंधू भगिनींनो.

भागवत धर्माचे संतपीठ असलेल्या या पंढरी नगरीत भरलेल्या नाट्य संमेलनात मला सहभागी करून घेऊन रंगदेवतेची पूजा करायची संधी दिली याबद्दल मी कृतज्ञ आहे. ही पंढरी जशी भागवत भक्त वारकऱ्यांची धर्मभूमी आहे त्याचप्रमाणे नाट्यप्रेमी वारकऱ्यांची कर्मभूमीही आहे. सोलापूर जिल्ह्यातील अनेक रंगकर्मींनी, आपल्या कलाविष्काराने राष्ट्रीय पातळीवरही आपले नाव रोशन केले आहे. आजचे हे जिल्ह्यातील तिसरे नाट्य संमेलन आहे. पहिले अखिल भारतीय नाट्य परिषदेचे ३१ वे अधिवेशन सोलापूरातील भागवत चित्र मंदिरात २२ व २३ डिसेंबर १९५७ रोजी पार्श्वनाथ आळतेकर यांच्या अध्यक्षतेखाली झाले होते आणि त्याचे उद्घाटन नटवर्य केशवराव दाते यांच्या हस्ते झाले होते. कै. नारायण काळे, नटवर्य बाबुराव पेंढारकर व आत्माराम भेंडे आदी मान्यवर त्या अधिवेशनास उपस्थित होते. स्वागताध्यक्ष उद्योगपती रतनचंद दोशी हे होते. जुन्या नाट्यप्रेमी मंडळींच्या दृष्टीने उल्लेखनीय अशा या नाट्य संमेलनानंतर दुसरे, ८८ वे नाट्य संमेलन आम्ही १८, १९ व २० जानेवारी २००८ साली सोलापूरात भरविले होते. सांगायला अभिमान वाटतो की, नाट्य परिषदेच्या इतिहासातील बादशाही संमेलन म्हणावे असे हे पहिलेच असावे. ज्याला राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील उद्घाटक म्हणून लाभल्या. सध्याचे नाट्य परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी व त्यांच्या सहकाऱ्यांच्या सहकार्याने आम्ही सर्व लहान मोठ्या रंगकर्मींनी स्वतःला झोकून देऊन नाट्य संमेलन पार पाडले. संमेलनासाठी भरपूर खर्च करूनही, राहिलेल्या रक्कमेतून आम्ही रंगकर्मींसाठी फडकुले मंदिर उभे केले.

मी भूतकाळात डोकावून जेव्हा माझ्या जीवनाकडे पाहतो तेव्हा मी स्वतःच चक्रावून जातो. सोलापूरच्या ढोर गल्लीत जन्मलेला, नाव, गाव नसलेला, एक धडपडणारा मुलगा. पण नियतीच्या मनात मात्र काही वेगळंच असावं. कासेगांवकर नावाच्या रात्र शाळेतील एका शिक्षकाने माझ्या गोऱ्या गोमट्या तोंडाला रंग लावून मला स्त्रीवेषात रंगमंचावर उभं केलं. त्याच दिवशी माझ्यातला अभिनेताही घडवला गेला. काहीही म्हणा पण नाटकाची नशा काही औरच असते, ज्याच्या चेहऱ्याला तो रंग लागला त्यालाच त्याचा आनंद माहीत! या संदर्भात मी मात्र थोडासा भाग्यवान आहे. कॉलेज जीवनात आणि नंतरही काही काळ मी 'लग्नाची बेडी', 'प्रेमा तुझा रंग कसा?', 'करायला गेलो एक', 'घराबाहेर', आणि 'मोरूची मावशी' या नाटकांमधून भूमिका केल्या, विशेष म्हणजे 'मोरूची मावशी' या नाटकात मला नटश्रेष्ठ बापूराव माने यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली. अजूनही त्या मंतरलेल्या दिवसांची आठवण जरी आली तरी अंगावर नकळत रोमांच फुलतात.

कालांतराने माझं क्षेत्र बदललं. रंगमंच बदलला आणि राजकीय मंचावर माझी कारकीर्द सुरू झाली तरी देखील जीवनात मिळेल त्या भूमिकेला न्याय देण्यासाठी आवश्यक असणारी ऊर्मी आणि जिद्दीचं बाळकडू त्या रंगमंचावर जे मिळालं ते आजतागायत कणभरही कमी झालेलं नाही. त्यामुळेच राजकीय मंचावरील कुठल्याही भूमिकेला मी शंभर टक्के न्याय देऊ शकलो. याचं संपूर्ण श्रेय मी मराठी नाटकाला देईन.

गमतीने मी असं म्हणेन की, मी जर राजकीय नाट्याकडे वळलो नसतो तर निश्चित रंगभूमी गाजविली असती आणि कदाचित आपल्या व्यवसायावर गदा आली असती. कधी कधी वाटतं, आपण जर अद्याप रंगभूमीवर

असतो तर नाट्य परिषदेच्या इतिहासात मोहन जोशी यांच्या विरुद्ध प्रतिस्पर्धी म्हणून उभा राहिलो असतो आणि नाट्य परिषदेचे अध्यक्षपदही मिळविलं असतं. नवीन रंगकर्मींच्या माहितीसाठी मी माझ्या कलाजीवनावर हा कटाक्ष टाकला.

या नाट्य संमेलनाच्या निमित्तानं ज्या सोलापूर जिल्ह्यात हे तिसरे नाट्य संमेलन होत आहे तेथील नाट्य चळवळीचा आपण थोडक्यात आढावा घेऊ.

सोलापूर हे नाट्यवेड्यांचे शहर आणि जिल्हा आहे यादी नोंद थेट १८७४ पासून मिळते. करवीरकरांची 'वत्सलाहरण' आणि 'रामजन्म' ही नाटकं सोलापूर शहरातील जुन्या विठ्ठल मंदिरात होत, तशीच छोट्याशा नाट्यगृहात झाल्याचीही महत्त्वपूर्ण नोंद आहे. इ.स.१८९५ ते १९०० या पंधरा वर्षांत तब्बल १७ नाट्यसंस्थांनी सोलापुरात मुक्काम ठोकून ३६ नाटकं सादर केली.

सोलापूर जिल्ह्याला नाट्यकलेची थोर परंपरा आहे. सोलापूरकरांच्या रसिकतेवर अनेक मान्यवरांनी पसंतीचे शिक्कामोर्तब केले आहे. रंगभूमीच्या वाईट काळात सोलापूरकर रसिकांनी व्यावसायिक नाटकांना मदतीचा हात देऊन जगविले आहे. १९५७ सालच्या आसपासच्या काळात गंधर्व नाटक मंडळी महिनाभर सोलापूरात होती आणि वृद्धावस्थेतील बालगंधर्वांची सुभद्रेची भूमिका रसिकांनी हळहळत पाहिली होती. त्याच काळात पृथ्वीराज कपूर यांच्या पृथ्वी थिएटरचा मुक्काम सोलापूरात होता. आणि शम्मी कपूरची भूमिका सोलापूरकरांना पाहायला मिळाली होती असे जुने रसिक आठवणीच्या स्वरूपात सांगतात. गणपतराव जोशी असलेल्या शाहू नगरवासी नाटक मंडळीचा मुक्कामही सोलापूरात होता. आणि एक दिवस गणपतरावांनी अंगावर हॅम्लेटचा ड्रेस असताना तुकारामाचे संवाद म्हणायला सुरूवात केली. आणि गणपतराव भूमिकेशी एवढे समरस झाले की, त्यांच्या हे उशिरा लक्षात आले. त्यांनी प्रेक्षकांची क्षमा मागून पैसे परत देण्याची तयारी दर्शविली. पण एकाही रसिकाने पैसे परत घेतले नाहीत. चाललेले नाटक शेवटपर्यंत प्रेक्षकांनी पाहिले.

सोलापूरच्या कामगार कल्याण केंद्राने सादर केलेल्या अ.वा.वर्टी लिखित 'राणीचा बाग' या नाटकाला प्रथम क्रमांक मिळाला आणि उमेच्या उत्कृष्ट भूमिकेचे प्रथम पारितोषिक सोलापूरच्या लक्ष्मण काटे या कामगार कलावंताला मिळाले. याच काळात लक्ष्मी विष्णू गिरणीचे इंजिनिअर नानासाहेब चक्रदेव यांनी 'स्वयंवर, संशयकल्लोळ, मानापमान' ही नाटके दमदारपणे सादर केली. स्वयंवर नाटकातील त्यांचा कृष्ण रसिकांना विशेष भावला होता असे म्हणतात. त्या काळात हरिभाई देवकरण प्रशालेने अनेक जुनी संगीत नाटके उत्तमपणे सादर केली आणि रसिकांच्या अपेक्षा वाढविल्या. त्या प्रशालेतील अभ्यासू शिक्षक पद्माकर देव यांनी १९६४ साली 'श्रुती मंदिर नाट्यसंस्था' स्थापन केली आणि संगीत नाटके परिश्रमपूर्वक बसवून स्पर्धेत ती सादर केली. श्रुती मंदिरची ती नाट्य आराधना आजही दमदारपणे सुरू आहे. डॉ. दिवाडकर व इंदुताई दिवाडकर या सुविद्य दांपत्याच्या 'अभिनय साधना मंदिर' या संस्थेने 'पतंगाची दोरी', 'दूरचे दिवे', 'उद्याचा संसार', 'खडाष्टक' ही नाटके उत्कृष्टरित्या सादर करून रसिकांची प्रशंसा मिळविली. प्राश्वनाथ आळतेकर यांनी ती दिग्दर्शित केली होती. पं.मा.कामतकर यांनी अनेक चांगली नाटके लिहिली आणि तत्कालीन व्यावसायिक नाट्यसंस्थांनी त्यांचे प्रयोग केले. सोलापूरचे कवी व नाटककार रा.ना. पवार यांचे 'राम जोशी' हे नाटक जयराम शिलेदार यांच्या मराठी रंगभूमीने व्यावसायिक रंगभूमीवर आणले आणि त्याचे अनेक प्रयोग झाले. ख्यातनाम समीक्षक त्र्यं.वि.सरदेशमुख यांची 'बखर एका राजाची' व 'थैमान' ही दोन नाटके रंगभूमीवर आली. पण या दर्जेदार नाटकाचे फारसे प्रयोग झाले नाहीत. पं. ना. कुलकर्णी यांच्या 'हिमगंगा नाट्य मंडळाने' नंतरच्या काळात कामगार नाट्य महोत्सवात अनेक नाटके सादर करून पारितोषिके मिळविली. सोलापूर शहराच्या पूर्व भागातील तेलुगू मंडळींनी बराच काळ मराठी नाटके परिश्रमपूर्वक सादर करून लौकिक संपादन केला होता. नागेश कन्ना, लक्ष्मीनारायण

बोल्ही, लक्ष्मीनारायण आकेन, विश्वंभर कन्ना यांचे कलेच्या क्षेत्रातील योगदान मोठे आहे. 'अपराध मीच केला' आणि 'देवमाणूस' ही नाटके अद्याप सोलापूरकरांच्या स्मरणात आहेत. रेल्वे कलावंतांनी स्थापन केलेली 'ललित कला मंदिर' ही संस्था गेली पन्नास वर्षे सातत्याने प्रयोग करीत आहे. आणि ही संस्था अद्याप कार्यरत आहे. बार्शीचे शाहीर अमर शेख यांनी 'पहिला बळी' हे विद्रोही नाटक लिहिले होते, हे तरी किती जणांना माहीत आहे? मी सांस्कृतिक मंत्री असताना सोलापूरला राज्य नाट्य स्पर्धेचे केंद्र दिले. नाटकांची संख्या व चुरस वाढली. 'नाट्य अराधना' व 'निशिगंधा' या नाट्यसंस्थांनी तर राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत अनेकवेळा विक्रमी यश मिळविले. 'निशिगंधा' संस्थेने प्रा. निशिकांत ठकार यांनी लिहिलेली अनेक नाटके स्पर्धेत सादर केली. चंद्रभूषण कुलश्रेष्ठ, पांडुरंग काळे, शिरीष देखणे, शरदकुमार एकबोटे, रजनीश जोशी, लक्ष्मीनारायण बोल्ही, जयप्रकाश कुलकर्णी, मुकुंद हिंगणे, शशिकांत लावणीस, आनंद खरबस ही नवी नाटककार मंडळी राज्य नाट्य स्पर्धेमुळे उजेडात आली. या आधी शशिकला जवळकर, डॉ. जब्बार पटेल, फैय्याज, सरला येवलेकर, दीनानाथ टाकळकर, अतुल कुलकर्णी, किशोर महाबोले तसेच आपल्या पंढरपूरचे अशोक गोडगे, विनय बडवे, वसंत उत्पात ही कलाक्षेत्रातील दिग्गज मंडळी नाटक व चित्रपटात आपलं श्रेष्ठत्व सिद्ध करून कलेच्या अत्युच्च शिखराकडे दमदारपणे वाटचाल करीत आहेत. या वाटचालीत वसंत सबनीस, वि.आ.बुवा यांनाही लौकिक मिळाला. पंढरपूरात वास्तव्य करूनही कलेचा वसा आणि वारसा त्यांनी सोडला नाही. मास्टर नरेश लोंढे यांची कन्या श्रीमती शालिनी पोतदार यांनी जवळजवळ तीनशे संगीत नाटकांतून भूमिका केल्या. रसाळ भक्तीच्या पंढरपुरच्या नगरीमध्ये एकीकडे भक्तीची दिव्यता होती तर दुसरीकडे उत्पातांची लावणी घुंगरू घेऊन टाळा बरोबर नाच करत होती. हाही नाट्याचाच भाग आहे, त्यामुळे मला येथे ज्ञानोबा उत्पातांना विसरता येणार नाही वा.नां.सहीत.

डॉ. दत्ता भगत यांचे आंबेडकर चळवळीच्या संदर्भातील विचार माझ्या वाचनात आले. आंबेडकर रंगभूमीला स्वत:चा प्रेक्षक वर्ग निर्माण करता आला नाही असं त्यांचं मत आहे. 'काळोखाच्या गर्भात', 'किरवंत', 'गांधी-आंबेडकर', 'बामणवाडा', 'खेळीया', 'कोण म्हणतो टक्कर दिली?' ही नाटकं शहरातील प्रेक्षकांपर्यंतही पोहोचू शकली नाहीत याबाबत त्यांनी खंत व्यक्त केली आहे. मुळात नाटक प्रेक्षकांपर्यंत नेण्याचे अनेक निकष आहेत. ते प्रेक्षकांपर्यंत गेलं नाही याचा अर्थ ती गुणवत्तेच्या दृष्टीने हिणकस आहेत असे समजण्याचे कारण नाही. एक वास्तव असे की, दलित कविता व कथा-कादंबऱ्यांचं लेखन दलित लेखकांनी मोठ्या प्रमाणात केलं आहे आणि त्यांचे स्वागतही झाले आहे हे विसरता येणार नाही.

आता मराठी रंगभूमीच्या वाटचालीकडे एक कटाक्ष टाकू या. १८४३ मध्ये सांगलीला विष्णुदास भावे यांनी नाटकाची परंपरा निर्माण केली. एक समृद्ध असा तो कालखंड होता. मास्टर दीनानाथ मंगेशकर, केशवराव भोसले, राम गणेश गडकरी, बाबूराव पेंढारकर, खाडिलकर, किर्लोस्कर, देवल यांनी प्रारंभीच्या काळात नाटकाची परंपरा समृद्ध करण्यात मोठा हातभार लावलेला आहे. खरं तर, या बुजुर्ग आणि ध्येयवादी कलाकार-नाटककारांनी आपल्या तेजस्वी प्रतिभेने मराठी रंगभूमीचा पाया भक्कम केला ही गोष्ट निर्विवाद!

सामाजिकदृष्ट्या मराठी नाटकांच्या योगदानाचा विचार करताना या काही चिरंजीव नाटकांचा आपल्याला विचार करावाच लागेल. गोविंद बल्लाळ देवलांच्या 'शारदा' नाटकाने त्या काळातल्या अनिष्ट बालविधवा-जरठ विवाह पद्धतीवर कारडे ओढले. राम गणेश गडकऱ्यांच्या 'एकच प्याला' ने दारुमुळे उद्ध्वस्त झालेल्या संसाराचं विदारक दर्शन घडवलं. आचार्य प्रल्हाद केशव अत्र्यांच्या 'लग्नाची बेडी' या धमाल विनोदी नाटकाने महाराष्ट्राला पन्नास-साठ वर्षं खदखदा हसवलं. वि. वा. शिरवडकरांच्या 'नटसम्राट' मधील, पोरा-बाळांना सर्वस्व देऊन बसलेल्या

हतबल म्हाताऱ्याची, नटसम्राटाची जीवघेणी कहाणी रसिकांच्या डोळ्यांच्या कडा ओलावून गेली. वसंत कानेटकरांच्या 'रायगडाला जेव्हा जाग येते' नाटकातील छत्रपती शिवाजी महाराज आणि शंभूराजे यांच्यातील संघर्ष आणि ताण-तणाव मराठी माणसाला अंतर्मुख करून गेला. तेंडुलकरांच्या 'सखाराम बाईंडर' ने आणि चि. त्र्यं. खानोलकरांच्या 'अवध्य' या बोल्ड नाटकांनी मराठी नाटक 'वयात आल्याची' जाणीव करून दिली. जयवंत दळवी यांच्या 'पुरूष' नाटकातील नायिकेने खलप्रवृत्तीच्या नराधमाचा अहंकार ठेचून काढला. वसंत सबनीस आणि दादा कोंडके यांच्या 'विच्छा माझी पुरी करा' या लोकनाट्याने रसिकांना हास्यसागरात डुंबत ठेवलं...

अशा कितीतरी अजरामर नाटकांनी मराठी रंगभूमीवर इतिहास घडवलेला आहे. प्रायोगिक रंगभूमीने देखील फार मोठं योगदान मराठी नाटकाच्या जडणघडणीत दिलेले आहे. विशेष म्हणजे व्यावसायिक रंगभूमीच्या प्रयोग करण्याच्या क्षमतेस मर्यादा पडताहेत असं ज्या ज्या नाटककारांना, कलाकारांना, दिग्दर्शकांना वाटलं त्यांनी प्रायोगिक रंगभूमीवर नवे नवे प्रयोग करायला आरंभ केला. आणि बघता बघता प्रायोगिक रंगभूमीने स्वत:ची एक नवी पायवाट तयार केली.

कुठल्याही समाजरचनेत काय किंवा कलेच्या क्षेत्रात काय, प्रयोगाचं महत्त्व अनन्यसाधारण असतं. प्रयोगात धडक देण्याची आणि काही घडवण्याची क्षमता असते. प्रायोगिक रंगभूमीमुळे पारंपरिक विचार करण्याच्या धारेत बदल होत गेला हे आपल्याला मान्य करावंच लागेल. अभिजात मराठी नाटकांनी नि:संशय महत्त्वाची कामगिरी केली असली, तरीही रंगभूमी समाजाच्या सर्व घटकांना सामावून घेण्यात कमी पडली आहे. मनोरंजनाच्या नादात त्यातून समकालीन संस्कृतीचं दर्शन घडत नाही असं वाटलं तेव्हाच मुंबई-पुण्यात प्रायोगिक रंगभूमीचा जन्म झाला. विजया मेहता, माधव वाटवे, अरविंद देशपांडे, डॉ. श्रीराम लागू, भालबा केळकर, सत्यदेव दुबे, अमोल पालेकर, विजय तेंडूलकर, खानोलकर, महेश एलकुंचवार, दिलीप कोल्हटकर अशांनी सारं जीवन खर्ची घालून ही प्रायोगिक रंगभूमी आकाराला आणली आणि ती व्यावसायिक रंगभूमीवर आणून सोडली.

भारताचा खरा शिल्पकार म्हणजे कामगार! दिवस-रात्र यंत्रांशी झगडणारा हा कामगार नुसताच घाम गाळीत नव्हता तर अभिनयाचं, लेखणीचं आव्हान देखील झेलत होता.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळांच्या माध्यमातून कामगारांच्या या अलौकिक अशा कलागुणांना खत-पाणी घातलं गेलं. विशेष म्हणजे १९५३ साली कामगार कल्याण मंडळाने त्यांच्या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धांना सुरूवात केली. त्यानंतर जवळजवळ सात वर्षांनी राज्य नाट्यस्पर्धांची सुरूवात झालेली आहे. याच स्पर्धांनी असंख्य कलाकार-नाटककार नंतरच्या काळात मराठी रंगभूमीला बहाल केलेले आहेत. त्यामध्ये यशवंत दत्त, मोहन जोशी, रोहिणी हट्टंगडी, रमेश भाटकर, सदाशिव अमरापूरकर असे असंख्य कलाकार मिळाले. 'वस्त्रहरण' या गंगाराम गवाणकर आणि मच्छिंद्र कांबळींच्या नाटकाने १९७९ साली कामगार कल्याण मंडळाच्या नाटकात प्रथम क्रमांकाची बाजी मारली. त्यानंतरच व्यावसायिक रंगभूमीवरील त्यांची घोडदौड सुरू झाली हे या ठिकाणी विशेष नमूद करावंसं वाटतं.

बाल रंगभूमीचा विचारही इथे करावा लागणार आहे. काही काळ का होईना बाल रंगभूमीवर अनेक चांगली नाटके आली. सई परंजपे, रत्नाकर मतकरी, सुधा करकमकर यांची नावे त्यात प्रामुख्याने घेता येतील. पण दुर्दैवाने उन्हाळ्याच्या सुटीपुरतीच बाल रंगभूमीची नाटके मर्यादित राहिली, असे खेदाने म्हणावे लागते. कारण काही का असेना पण वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही.

दलित रंगभूमीने काही चांगली नाटके दिली. दत्ता भगत, प्रेमानंद गज्वी, भि.नी. शिंदे, टेक्सास गायकवाड, रामनाथ चव्हाण यांची नावे सांगता येतील.

क्षेत्र कुठलंही असलं तरी देणाऱ्यांचे हात हे तसे कमीच असतात. या संदर्भात एका हरहुन्नरी कलाकाराला मला दाद द्यावीशी वाटते, तो कलावंत

म्हणजे प्रशांत दामले!

गतवर्षीची गोष्ट आहे. हृदयविकारामुळे प्रशांत दामले यांच्या तीन नाटकांचे मे-जून मधील वीस प्रयोग अचानक रद्द झाले. त्यांच्या नाट्यसंस्थेत काम करणाऱ्या अकरा रंगमंच कामगारांसमोर आर्थिक अडचणी उभ्या राहिल्या. पण दामले यांनी रंगमंच कामगारांची ती समस्या जाणून माणुसकीच्या दृष्टीकोनातून त्या सर्व अकरा कामगारांना वीस प्रयोगांचे मानधन दिले आणि अनोखा असा आदर्श रंगभूमीसमोर ठेवला. त्याबद्दल मी दामले यांचं मनापासून अभिनंदन करतो.

हाच धागा पकडून तमाम नाटकवाल्यांचे एका गोष्टीकडे मला लक्ष वेधावंसं वाटतं. रंगमंचावर, चेहऱ्यावर रंग लावून कलाकार नेहमीच चमकत असतात! वेगवेगळ्या भूमिका सफाईने रंगवत असतात. प्रेक्षकांच्या टाळ्या आणि दाद मिळवत असतात. एखादा भरत जाधव 'सही रे सही' मध्ये कपडे आणि गेटअप बदलून अगदी क्षणार्धात गलगलेच्या भूमिकेतून दुसऱ्या भूमिकेत लीलया प्रवेश करत असतो. प्रभाकर पणशीकर 'तो मी नव्हेच' मध्ये, लखोबा लोखंडेसह अनेक भूमिका करत असत. पण या कलाकारांच्या अदाकरी मध्ये किंवा त्यांना मिळणाऱ्या 'टाळी' मध्ये, पडद्यामागे अंधारात वावरणाऱ्या त्या रंगमंच कामगारांचा देखील 'खारीचा वाटा' असतो हे आपल्याला विसरता येणार नाही.

सव्वाशे वर्षांची भरजरी परंपरा असलेलं मराठी नाटक दिवसेंदिवस समृद्ध होतंय. तंत्रज्ञानामुळे त्यामध्ये क्रांतीकारी बदल झालेला आहे. पूर्वी फक्त नाटकातला मागचा पडदा बदलला जायचा. दिवाणखाना, राजमहाल किंव वनराई यांचे पडदे बदलून नाटकातला प्रसंग आणि स्थळ बदललं आहे याची जाणीव प्रेक्षकांना व्हायची. पण नाट्यसंपदाच्या 'अश्रूंची झाली फुले' या नाटकापासून रंगभूमीवर सरकत्या आणि फिरत्या रंगमंचाचा वापर सुरू झाला.

त्यामुळे आता 'बॅक स्टेज' वर्करची जबाबदारी आणखी वाढली. पूर्वी दिवाणखान्यातून नाटक राजमहालात नेताना फक्त मागचा पडदा टाकून तो रंगमंच कामगार मोकळा होत होता. पण होता चार-पाच रंगमंच कामगारांना योग्य वेळी संवादाच्या 'पंच' वर रंगमंच सरकवायचा किंवा फिरवायचा होता आणि तो देखील हळूवारपणे... मला अजून आठवतं, 'अश्रू' मध्ये विद्यानंदाच्या घरातून जेव्हा एअर पोर्टवरचा लाल्याचा सीन काळोखातून उजेडात यायचा तेव्हा प्रेक्षक उत्स्फूर्तपणे टाळी देत असत. पूर्वीच्या काळी उत्कृष्टपणे रंगवलेल्या पडद्याला टाळी मिळायची. पण काळ बदलला... इतका बदलला की, सरकता रंगमंच देखील 'टाळी' घ्यायला लागला. त्यामुळे आता रंगमंच कामगारांचं योगदान हे अधिकच महत्त्वाचं झालेलं आहे.

आजच्या नाट्यसंमेलाचे अध्यक्ष जेष्ठ रंगकर्मी श्री. अरुण काकडे यांनी देखील चेहऱ्याला रंग न लावता 'आविष्कार' या नाट्यसंस्थेच्या माध्यमातून सूत्रधार या नात्याने असंख्य नट, नाटककार घडवलेले आहेत. अनेक प्रायोगिक नाटकं रंगभूमीला दिलेली आहेत. विशेष म्हणजे त्यांच्या या योगदानाला रसिक आणि कलाकारांनी दादही दिलेली आहे.

९४ व्या नाट्यसंमेलनाच्या व्यासपीठावरून एक वेगळा विचार आज मला तमाम रंगकर्मींसमोर ठेवावसा वाटतो. आजवर आपण नट, नाटककार, निर्माते यांची नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली. त्यांच्या कलाकर्तृत्त्वाला मानाचा मुजरा केलात. ते योग्यच झालं. पण यापुढे कधीतरी तुमचं नाटक रंगवण्यासाठी कायम अंधारात धडपडणाऱ्या एखाद्या रंगमंच कामगाराला नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाच्या 'सिंहासनावर' विराजमान होण्याचा मान आपण जरुर द्यावा... असं स्वप्न जर मी बघितलं तर ते दिवास्वप्न ठरू नये....!

तुम्ही निवडलेला रंगमंच कामगार कदाचित भारावून टाकणारं प्रभावी भाषण करू शकणार नाही. अर्थात भाषणांनी प्रश्न सुटतातच असं नाही. पण एक मात्र नक्की की, कायम अंधारात धडपडणाऱ्या रंगमंच कामगारांच्या समस्यांना, प्रश्नांना प्रकाश मिळाल्याशिवाय राहणार नाही!

'बॅकस्टेज वर्कर्स्' मध्ये नेपथ्य सांभाळणारे,

प्रॉपर्टीचं नियोजन करणारे रंगभूषाकार, कपडेपट सांभाळणारे, ध्वनी संयोजक, प्रकाश संयोजक यांच्यापासून नाटकांच्या जाहिरातीचं 'आर्टवर्क' करणाऱ्या आर्टिस्टपर्यंत सगळ्यांचा समावेश करता येईल. अर्थात् आपण सर्व ज्येष्ठ रंगकर्मी जाणकार आहात... आपण योग्य तो निर्णय घ्यालच...

मराठी रंगभूमीकडे एक कलाकार आणि रसिक या नात्याने पाहात असताना माझ्या मनातली एक सल किंवा खंत मी आज आपल्यासमोर मांडणार आहे. विशेष म्हणजे माझ्या मतदार संघात हे संमेलन होत असल्यामुळे आवर्जुन मला हे बोलावंसं वाटतं. अगदी गडकरी, खाडिलकर, देवल यांच्यापासून कानेटकर, शिरवाडकर, कालेलकर, कोल्हटकरांपर्यंत सर्वांच्या मराठी नाटकांना एक भाषेचं सौंदर्य होतं, वैभव होतं. खटकेबाज संवाद नाटकांची गोडी वाढवत होते. एखादा घनश्याम, शंभूराजे किंवा नटसम्राट गणपतराव बेलवलकर बोलायला लागले की प्रेक्षकांच्या अंगावर रोमांच फुलायचे. हश्या-टाळ्यांचा पाऊस पडायचा. नाट्यगृहात एक नवचैतन्य खेळायचं. एक थरारून टाकणारा अनुभव बरोबर घेऊन रसिक प्रेक्षक समाधानाने नाट्यगृहाबाहेर पडायचा.

रंगकर्मींना प्रांजळपणे एक गोष्ट सांगावीशी वाटते. नाटकाने हलकी फुलकी करमणूक केली पाहिजे. मनोरंजनाच्या फुलबाज्या उडवल्या पाहिजेत. पण नाटकाचे अंतिम उद्दिष्ट किंवा ध्येय मात्र ते असता कामा नये. मराठी नाटकांची ती परंपराही नाही. संस्कृती आणि संस्काराचं सोनं देखील नाटकाने लुटलं पाहिजे. इतकं की प्रेक्षकांच्या हजारो ओंजळीत भरूनही ते उरलं पाहिजे. पुढच्या प्रयोगात येणाऱ्या प्रेक्षकांसाठी!

पण हे कसं होणार? हा चमत्कार काही एका रात्रीत होणार नाही. त्यासाठी पुन्हा एकदा नाट्य चळवळ उभी करावी लागेल. मराठी रंगभूमीवर नवीन टॅलेंटचा, प्रतिभाशाली नाटककारांचा, कलाकारांचा, नेपथ्यकारांचा आणि निर्मात्यांचा शोध घ्यावा लागेल. उद्याच्या रंगभूमीवर एन्ट्री घेणारी नव्या उमेदीची तरुण पिढीच आपल्या प्रतिभेच्या सामर्थ्यावर कदाचित याचं उत्तर देऊ शकेल...! किंवा याचं उत्तर ठरू शकेल!!

त्यासाठी गावपातळीपासून कामाला सुरूवात करायला पाहिजे. विविध ठिकाणी होणाऱ्या नाट्यस्पर्धांचे नाट्यसंगीताच्या स्पर्धांचे, नाट्यलेखन शिबीरांचे दरवाजे ठोठावण्यासाठी नव्या पिढीला तुम्ही-आम्ही उद्युक्त केलं पाहिजे. खेडोपाडी तुम्ही जेव्हा नाटकांच्या निमित्ताने जाता तेव्हा तरुण पिढीशी नाटकावर चर्चा केली पाहिजेत. त्यांना मार्गदर्शन केले पाहिजे. त्यांच्या प्रश्नांना उत्तरं दिली पाहिजेत आणि मुख्य म्हणजे त्यांना नाटकाकडे वळविण्यासाठी निकराचे प्रयत्न केले पाहिजे. तेव्हाच अशा प्रकारच्या या नाट्यसंमेलनाचे खऱ्या अर्थाने चीज झाले असे आपल्याला म्हणता येईल.

महाराष्ट्रातील रंगकर्मींसाठी आणि नाटकांवर प्रेम करणाऱ्या प्रेक्षकांसाठी मी विठुरायाला साकडं घालणार आहे.

हे विठ्ठला... पांडूरंगा... महाराष्ट्रातील रंगकर्मींच्या हातून चांगल्या कलाकृतींची निर्मिती होऊ दे... रंगभूमीवर येणाऱ्या तमाम नाटकांना घसघशीत आर्थिक यश मिळू दे... नाटकवाल्यांची भरभराट होऊ दे... आणि नाटकांना मायबाप प्रेक्षकांची दादही मिळू दे... सोन्यासारखी नाटकं प्रेक्षकांना पाहायला मिळू देत आणि पुन्हा एकदा मराठी रंगभूमीला तिचं पूर्वीचं वैभव आणि श्रीमंती मिळू दे....!

अखेरीस या ठिकाणी उपस्थित असलेल्या तमाम रंगकर्मींना माझा मानाचा मुजरा!

जय हिंद! जय महाराष्ट्र!!

सुशीलकुमारजी शिंदे
संमेलनाचे उद्घाटक,
९४वे अखिल भारतीय
मराठी नाट्यसंमेलन, पंढरपूर

संमेलन अध्यक्षांचे भाषण

- श्री. अरुण काकडे

६ ऑक्टोबर, २०१३ रोजी अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदने ९४व्या नाट्यसंमेलनाध्यपदी माझी एकमताने निवड केली त्याबद्दल परिषदेच्या विषय नियामक मंडळाचा मी आभारी आहे. तसेच सांगली, पुणे व नागपुर येथील नाट्यपरिषदेच्या पदाधिकाऱ्यांचेही आभार मानतो.

ही निवड झाल्यानंतर महाराष्ट्रातून व जगभरातून आलेल्या रसिकांच्या भरभरून प्रतिक्रियांमुळे मी भारावून गेलो आहे. म्हणूनच आज या व्यासपीठावरून सर्व रंगकर्मींचा व नाट्यरसिकांचाही प्रतिनिधी म्हणून तुमच्या समोर उभा आहे. माझ्याकडून रसिकांनी खूप अपेक्षा बाळगल्या आहेत. तसे त्यांनी बोलूनही दाखविले आहे. तसे पाहिले तर नाट्यसंमेलनाध्यक्षाला काहीच अधिकार नसतात, तरीही रसिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न मी या एक वर्षाच्या कालावधीत करणार आहे व तशा प्रकारचे काही प्रस्ताव मी नाट्यपरिषदेला व महाराष्ट्र शासनाला देणार आहे व त्याचा पाठपुरावाही करणार आहे व त्या सर्वांचा अहवाल ९५व्या नाट्यसंमेलनाच्यावेळी आपल्यासमोर ठेवणार आहे.

कुतुहलाने मी आतापर्यंतच्या नाट्यसंमेलनाध्यक्षांच्या नावांची यादी पाहिली थोर लेखक, नाटककार, दिग्दर्शक, अभिनेते, गायक कलाकार, समिक्षक अशा दिग्गजांची नावे आहेत. पण रंगभूमीच्या सर्वांगिण विकासासाठी सहा दशकं काम करणाऱ्या माझ्यासारख्या नाट्यधर्मी रंगकर्मीची निवड प्रथमच होत आहे. मला वाटतं सकारात्मक परिवर्तनाची ही नांदी असू शकते.

प्रथम मी नाट्यसंमेलने कोणत्या उद्देशाने भरवली जातात हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. १९०५ पहिल्याच नाट्य संमेलनात हे उद्देश ठरविण्यात आले आहेत.

१) नाट्यकलेचे पाऊल कशा रितीने पडते. उत्तम नाटककार नट कशा रितीने उदयास येतील. त्या संबंधाने विद्वानांनी व सर्व नाटक मंडळांनी एकत्र बसून चर्चा करणे.

२) नविन नाटककारांना उत्तेजन मिळावे, आपद्ग्रस्तांना सहाय्य मिळावे यासाठी नाटक मंडळींनी मदत करून फंड जमविणे.

त्याचप्रमाणे नाट्यपरिषदेचे उद्देश जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

मराठी नाट्यवाङमय, नाट्यकला, नाट्यशास्त्र, रंगभूमी व तदनुविषयक सांस्कृतिक कार्य ह्यांच्या सर्वांगिण अभिवृद्धीसाठी प्रयत्न करणे, उपाय योजणे, त्यासाठी झटणे व

त्यासाठीच्या अभ्यासास व संशोधनास प्रोत्साहन देणे.

परिषदेच्या कार्यासाठी नाट्यचळवळीशी व नाटकव्यवसायाशी संबंधीत अशा व्यक्तींची व संस्थांची संघटना बांधणे.

रंगभूमीच्या उत्कर्षासाठी सर्वांगीण विकासासाठी नाट्यपरिषदेचे व्यापक उद्देश आहेत व ते साध्य करण्यासाठी सध्याची कार्यकारिणी कटीबध्द आहे असे मला वाटते. म्हणूनच नाट्यपरिषद व मी, आम्ही मिळून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करणार आहोत. प्रथमच महत्त्वाचा प्रश्न समोर मांडतो. सहा वर्षांपूर्वी १४ जून २००७ रोजी भर पावसात नाट्यपरिषदेच्या विरूद्ध यशवंत नाट्यसंकुलात प्रायोगिक व बालरंगभूमीला जागा मिळावी यासाठी आम्ही लढा दिला होता. आमचे नेते विजय तेंडूलकर व दामू केंकरे हे आज हयात नाहीत, पण आमचा लढा थांबलेला नाही. या लढ्यातील मी एक महत्त्वाचा साथीदार, असं असूनही परिषदेच्या मध्यवर्ती शाखेने अध्यक्षपदासाठी माझे नाव सुचविले. माझी संमती घेण्यासाठी आलेल्या नाट्यपरिषदेच्या प्रतिनिधीने या लढ्याची आठवण करून दिली तरीही परिषदेने आपला हात पुढे केला तो मी स्वीकारला, एवढ्याचसाठी, की आमच्या मागण्यांचा सकारात्मक विचार परिषद व आम्ही करू व ही समस्या एकत्र बसून सामंजस्याने सोडवू.

पुढच्या वर्षीच्या नाट्यसंमेलनापर्यंत आमच्या मागण्या मार्गी लागाव्यात अशी आशा आहे. दुर्दैवाने तसे नाहीच झाले तर मी त्याची कारणं आपल्यापुढे ठेवीन. मी आशावादी आहे. शेवटपर्यंत प्रयत्न करीत राहीन.

रसिकहो, मराठी रंगभूमीवर निरनिराळ्या स्तरांतून सृजनकार्य घडते आहे. त्याची आजची स्थिती काय आहे हे जाणून घेणे महत्त्वाचं आहे. महाराष्ट्रात जेवढे सृजनकार्य होत आहे तेवढे इतरत्र दिसत नाही. बालरंगभूमी, हौशी, प्रायोगिक, व्यावसायिक सर्व स्तरांवर नाट्यनिर्मिती व प्रयोग होतात. मी या सर्व स्तरांवर कार्य करणाऱ्यांना भेटून आजची स्थिती, त्यांचे विचार, त्यांच्या अडचणी, मागण्या, तक्रारी जाणून घेण्याचा प्रयत्न केला व तो इथे मांडणार आहे. दोन दिवसांच्या या संमेलनात यांचा ऊहापोह व्हावा मला वाटते संमेलनाचे हेच उद्दिष्ट असते.

बाल रंगभूमी :-

रसिक हो, मी पायापासून सुरवात करतोय, शालेय व बालरंगभूमी हा पाया आहे. पाया मजबूत तर इमारत पक्की; पण या पायाकडेच आम्ही दुर्लक्ष करतोय. बालरंगभूमीला दुय्यम समजतो आणि म्हणूनच हा महत्त्वाचा प्रस्ताव मांडतो. शासनाने शालेय रंगभूमीचा विचार करून नाट्यकलेचा.शालेय अभ्यासक्रमात समावेश करावा. यासाठी तज्ज्ञांकडून अभ्यासक्रम ठरवावा लागेल. महापालिकेच्या व खाजगी शाळांमधून हा विषय शिकविला गेला पाहिजे अशी योजना तयार करावी. त्यासाठी पहिले पाऊल म्हणजे शिक्षकांना नाट्यकलेचे शिक्षण द्यावे लागेल किंवा आज निरनिराळ्या विद्यापीठातील नाट्यविभागातून प्रशिक्षित होऊन बाहेर पडलेल्या कलाकारांच्या अशा शाळांतून नियुक्त्या करण्याचा विचार करावा लागेल. संस्कारक्षम वयात विद्यार्थ्यांना नाट्यकलेचे शिक्षण मिळाले तर त्यांच्याकडून भावी काळात रंगभूमी उजळून निघेल.

शालेय स्तरावर नाट्यस्पर्धा आयोजित करत असतातच. चार दशकांपूर्वी कुमार कला केंद्राच्या शालेय नाट्यस्पर्धा आयोजित होत असत. गेली छत्तीस वर्षे वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठान शालेय नाट्यस्पर्धा आयोजित करीत आहे. महाराष्ट्र शासनाची बालनाट्य स्पर्धा चालू आहेच. त्यातही बहुतांश शाळांचा सहभाग असतो. शासकीय पातळीवर बालनाट्यस्पर्धा सुरू आहेच. त्यातही बहुतांश शाळांचा सहभाग असतो. शासकीय पातळीवर बालनाट्यस्पर्धा सुरू आहेत. त्यात आज बरीच सुधारणा झाली आहे. स्थानिक शिक्षणाधिकाऱ्यांना विनंती करून त्या विभागातील शालेय विद्यार्थ्यांना मुक्त प्रवेश दिला जातो त्यामुळे बाल प्रेक्षकांची गर्दी होते हे चित्र उत्साहदायी आहे. ह्याच्याबरोबरीने शासनाने जिल्हा पातळीवर बालनाट्य महोत्सवाचे आयोजन करावे त्यामुळे तेथील बालप्रेक्षकांना चांगली बालनाट्ये पहायची सवय लागेल.

नाट्यकलेचा शालेय अभ्यासक्रमात समावेश झाल्यावर या बालनाट्य स्पर्धा व शालेय नाट्यस्पर्धा दर्जेदार स्वरूपात पहायला मिळतील असे मला वाटते. प्रशिक्षण देऊन शालेय स्तरावर बालनाट्यांची निर्मिती होते

ती दर्जेदार होते. याची दोन उदाहरणे देतो.

* कोकणात शिरगाव सारख्या एका खेड्यात एक झपाटलेला डॉक्टर - डॉ. राजेंद्र चव्हाण, तेथील शाळेतील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन बालनाट्यस्पर्धेत एकांकिका सादर करतो. या एकांकिकेचा दर्जा व बालकलाकारांचा अभिनय पाहिला की प्रशिक्षणाच्या महत्त्वाची प्रचिती येते.

* दुसरे उदाहरण महाराष्ट्रात मूक, बधीर, अंध, अपंग अशा मुलांसाठी शाळांतील शिक्षकांना व विद्यार्थ्यांना कांचन सोनटक्के यांच्या रंगशाला या संस्थेतर्फे आधी प्रशिक्षण दिले जाते व राज्यस्तरावर या विद्यार्थ्यांसाठी एकांकिका स्पर्धा आयोजित केल्या जातात. अशा स्पर्धातून या मूक,बधीर, अपंग कलाकारांचा अभिनय पाहून आपण थक्क होतो.

* म्हणूनच शालेय स्तरावर अभ्यास क्रमात नाट्यकला/नाटक/प्रयोगकला यांचा समावेश होणे फार महत्त्वाचे आणि गरजेचे आहे. आज बालरंगभूमीवर कार्य करणाऱ्या संस्था फार कमी आहेत. कारण एकतर त्यांची बालनाट्ये दिवाळीच्या किंवा उन्हाळ्याच्या सुट्टीतच सादर करावी लागतात. बाल प्रेक्षक याच वेळी प्रयोग पाहू शकतात.

* बालनाट्याच्या कल्पनाही वेगवेगळ्या आहेत. बालकलाकारांनी बाल व प्रौढ प्रेक्षकांसाठी, प्रौढ कलाकारांनी बाल प्रेक्षकांसाठी सादर करण्याचे नाट्यप्रयोग डॉ. मोहन आगाशे ग्रिप्स थिएटर सारखी कल्पना मांडली आहेच.

गेली २५ वर्षे बालरंगभूमीवर कार्य करणाऱ्या संस्थाचालकांशी मी बोललो. आज बालनाट्याचे प्रयोग आर्थिकदृष्ट्या न परवडणारे झाले. त्यांचे विचार समजून घेतले पाहिजेत. नाट्यगृहाचे भाडे भरमसाठ वाढले आहे. काही ठिकाणी नाट्यगृहाच्या भाड्यात सवलत मिळते पण तिकीट दर रू. ६०/- लावला पाहिजे अशी सक्ती केली जाते. परंतू प्रयोगासाठी लागणारा, जाहिरात, वाहतुक नेपथ्य, प्रकाश, चहा फराळ यांचा खर्च मात्र तेवढाच असतो. म्हणजे नाट्यगृहाच्या सवलतीच्या भाड्यात प्रयोग केला तर तीन ते चार हजार रूपये वाचतात पण साठ रूपये तिकीट लावले तर पैसे वाचण्यापेक्षा दुप्पट तोटा होतो. तेव्हा नाट्यगृहाच्या भाड्यात सवलत देऊन साठ रूपये तिकीट लावा म्हणणे योग्य नाही. अहो, नाट्यगृहाच्या भाड्यात सवलत मिळाली पाहिजे. पण नेहमीच्या तिकीटाच्या दरात प्रयोग व्हायला हवेत. म्हणजेच किमान प्रयोगाचा खर्च तरी त्यातून निघू शकेल.

बालनाट्य संस्था बालनाट्याचे प्रयोग करून श्रीमंत झालेल्या पाहिल्यात का? स्वप्नात तरी? आमच्या दुर्गा झाली गौरी या नाट्यप्रयोगाचे प्रयोग अर्थिक तोटा सहन करत २९ वर्षे चालू ठेवले. कर्जबाजारी झालो तेव्हा नाईलाजाने प्रयोग बंद करावे लागले. एक अभिजात नृत्यनाट्य बंद करावे लागणे क्लेशदायक होते. पण त्या शिवाय गत्यंतर नव्हते.

तरीही काही बालनाट्य संस्था दिवाळीच्या आणि उन्हाळ्याच्या सुटीत प्रयोग करीतच असतात. शासन नाट्य संस्थेच्या व्यावसायिक नाट्यप्रयोगांना अनुदान देते पण बालनाट्य स्पर्धा आयोजित करण्यापलिकडे बालरंगभूमीकडे पहातही नाही. रजिस्टर्ड नाट्यसंस्थांना जसे अनुदान मंजूर होते तसेच रजिस्टर्ड बाल नाट्यसंस्थांना तसेच बालनाट्यप्रयोगांनाही अनुदान द्यावे. तसा अध्यादेश निघाला तर बालरंगभूमीचे आजचे स्वरूप नक्की बदलू शकेल. तसे कालानुरूप ते बदलते आहेच. मुलांसाठी कार्टून्स व इतर चॅनल्स मुलांना बारा महिने घरबसल्या पहायला मिळतात. बालप्रेक्षकांना आता अशीच नाटकं रंगभूमीवर पहायला आवडतात. तसे प्रयोग बालनाट्यसंस्थाही करू पाहतात पण यापुढेही जाऊन बाल प्रेक्षकांच्या कल्पनाशक्तीशी खेळायला लावणारे वास्तव, काल्पनिक अशा बालनाट्यांचे प्रयोग करून बघायला हवेत.

आणखी एक सुचना : शाळेच्या वार्षिक परिक्षेच्या गुणात जसे प्राविण्याबद्दल अधिक गुण मिळवले जातात त्याचप्रमाणे रंगभूमीवर प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वार्षिक गुणात अधिक गुण मिळवावेत.

तरूणाई रंगभूमी :-

तरूणाई रंगभूमीला आपण महाविद्यालयीन स्पर्धामधूनच अनुभवतो. रंगभूमीच्या प्रगतीच्या दृष्टीने या महाविद्यालयीन नाट्यस्पर्धा मोलाच्या आहेत. पुण्यातील पुरूषोत्तम करंडक स्पर्धा सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करते. एवढ्या सातत्याने व निष्ठेने स्पर्धा चालविणे सोपे नाही.

मुंबईतील आय.एन.टी. सवाई व इतरत्र महाराष्ट्रात अशा अनेक स्पर्धांचे निरनिराळ्या संस्थांतर्फे वर्षभर आयोजन होते. नुकतीच राज्य पातळीवर नाट्य संपदेने महाविद्यालय पातळीवर स्पर्धा आयोजित केली होती. यातूनच मराठी रंगभूमीला तरूण उर्जा मिळत रहाते. 'कल्पना एक, अविष्कार अनेक' साररख्या स्पर्धातून लेखक-दिग्दर्शकांची कसोटी लागते. अशा लेखकांना उत्तेजन देणे गरजेचे आहे. व्यावसायिक व प्रायोगिक रंगभूमींना अशा उमलत्या लेखकांच्या शोधात असायला हवे. त्यासाठी नाट्यनिर्माता संघाने दीर्घांक स्पर्धा आयोजित केली आहे. यातूनच काही नवीन नाटककार हाती लागतात का, हे कळून येईल. नाट्यपरिषदेच्याही सर्व शाखांवर एकांकिका स्पर्धेचे आयोजन होत आहे. त्याबरोबर नाट्यलेखन स्पर्धाही आयोजित होते. सर्वोत्कृष्ट नाट्यलेखकाला बक्षीसही दिले जाते. माझी अशी सुचना आहे की, या स्पर्धेतील तीन उत्कृष्ट नाटकांची निर्मिती परिषदेच्या शाखांनी करावी व नवोदितांना कार्यप्रवण करावे. थोडक्यात नाटककारांच्या शोधात अनेक संस्थांच्या विविध नाट्यस्पर्धा !

हौशी रंगभूमी :-

हौशी रंगभूमीवर काही कारणपरत्वे नाट्यप्रयोग सादर केले जातात. वार्षिक महोत्सवच असतो. महाराष्ट्र राज्य हौशी राज्य नाट्यस्पर्धेच्या निमित्ताने दरवर्षी नाट्यनिर्मिती होते ती बहुतांश बँक, महापालिका किंवा इतर निरनिराळ्या कार्यालयांतील कला विभागाकडून. हल्ली हौशी नाट्यसंस्थांची संख्या वाढली आहे, असे शासनाकडून समजते. हौसेखातर नाट्यनिर्मिती करणाऱ्यांना संस्था हौशी नाट्यसंस्था म्हणावे. शासनाची ही हौशी नाट्यस्पर्धा आता साठ वर्षांची होईल. एवढी प्रदीर्घ काळ चालणारी नाट्यस्पर्धा भारतातील एकमेव स्पर्धा आहे. सुरवातीच्या काळातील स्पर्धेतून रंगभूमीला अनेक नाटककार, दिग्दर्शक, अभिनेते, तंत्रज्ञ लाभले. त्यावेळच्या स्पर्धेतील प्रयोगांना प्रेक्षकांची तुडुंब गर्दी होत असे. आता काय चित्र दिसते? स्पर्धेसाठी शेकडोंनी प्रवेश अर्ज येतात. कुठलेही नाटक स्पर्धेमध्ये सादर होते. त्याचा दर्जा पाहिला जातो का? स्पर्धेच्या प्रयोगाला प्रेक्षक असतो का? तेव्हा शासनाने पहिल्याप्रमाणे नवीन नाटकाची अट घालावी म्हणजे नवीन संहिता लिहील्या जातील.

बोलकं उदाहरण - औरंगाबाद केंद्रांचे, किमान सात प्रवेशिका आल्या तरच त्या केंद्राला मान्यता मिळते कमी आल्या तर अशा संस्थांचे प्रयोग शेजारच्या केंद्रावर करावे लागतात. पण औरंगाबादच्या विद्यापीठातील नाट्यशास्त्रेच्या प्रमुखाने पुढाकार घेऊन सात नवीन नाटकांचे प्रयोग सादर केले. औरंगाबाद केंद्रावर या नाटकांचा महोत्सव होतोय. निरनिराळ्या केंद्रात स्पर्धेची व्यवस्था समाजकल्याण खात्यातर्फे केली जात होती. आता या केंद्राची व्यवस्था स्थानिक नाट्यसंस्थेवर किंवा नाट्यपरिषदेच्या स्थानिक शाखेवर सोपवली जाते किंवा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्रेतून उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना निरनिराळ्या केंद्रात व्यवस्थापनाची जबाबदारी दिली जाते. प्रयोग संपल्याक्षणी संस्थाना धनादेश दिला जातो. तिकीटविक्रीतील अर्धी रक्कम दिली जाते. शासनाच्या या सुधारणांचे स्वागत!

नाट्य परिषदेची संलग्न 'हौशी रंगमंच संघटना' वर्षभरात मराठी रंगभूमीसाठी काय कार्य करते हे कोणालाच माहित नाही. म्हणून या संघटनेचा मी विचार करीत नाही. ती फक्त कागदोपत्री आहे इतकेच.

प्रायोगिक रंगभूमी :-

आपण पहाल प्रायोगिक नाटकाची व्याख्या कुणीच केलेली नाही. शासनाने व्यावसायिक नाटकाची व्याख्या केलेली आहे. पण प्रायोगिक नाट्यप्रयोगांना अनुदान देण्याच्या अध्यादेशात व्याख्या न देता बुसतेच प्रायोगिक नाटक असे म्हटले आहे. शासनाची व्यावसायिक नाटकाची व्याख्या पाहिली तर त्या व्याख्येप्रमाणे काही प्रायोगिक नाट्यसंस्थानाही ही व्याख्या लागू पडते.

नाट्य परिक्षण मंडळ प्रायोगिक नाटकांना प्रमाणपत्र देते, ते कोणत्या आधारावर? नाटककाराने, 'माझे नाटक प्रायोगिक' असे अर्जात नमूद केले आहे म्हणून ? कालचे यशस्वी प्रायोगिक नाटक आजचे व्यवसायिक नाटक होते. मग त्यासाठी प्रमाणपत्र मिळविले जाते. पुर्वी व्यावसायिक किंवा प्रायोगिक अशी वेगवेगळी प्रमाणपत्र मिळत नसत. केवळ महसूल वाढावा म्हणून हे भेद केले गेले आहेत का?

नाट्यपरिनिरीक्षण मंडळाचे अध्यक्षापासून सभासद व कार्यालयातील कर्मचारी बदलले आहेत.

प्रमाणपत्रे वेळेवर मिळत नाहीत. एखाद्या चांगल्या नाटकाचा प्रयोग नाट्यमहोत्सवात असेल तर पूर्वी तात्पुरते प्रमाणपत्र मिळत असे आता तेही मिळत नाही. कारण संहिता वाचून शिफारस करणारे बहुतेक सभासद मुंबई बाहेरचे आहेत. म्हणून निर्मात्यांना वेळच्यावेळी प्रमाणपत्रे मिळत नाहीत अशा तक्रारी ऐकू येतात.

आपण पाहिलेत बालनाट्य स्पर्धा होतात. हौशी नाट्यस्पर्धा होतात, व्यावसायिक नाटकांच्या स्पर्धा होतात. पण प्रायोगिक नाटकांच्या स्पर्धा होत नाहीत. प्रायोगिक नाटकांची त्रिशंकूसारखी अवस्था होते. पण आजपर्यंत व्यावसायिक नाटकाला प्रगतीपथावर नेण्यात प्रायोगिक नाटकांचा फार मोठा वाटा आहे. प्रायोगिक नाटकांनी व्यावसायिक रंगभूमीला नव्या दमाचे नाटककार, दिग्दर्शक, नेपथ्यकार व अभिनेते मिळवून दिलेले आहेत. या वस्तुस्थितीकडे कानाडोळा करता येत नाही. काहींचे म्हणणे असे की प्रायोगिक रंगभूमी व्यावसायिक रंगभूमीला पूरक आहे. काही म्हणतात समांतर आहे. मी म्हणतो दोन्ही असूनही ती स्पर्धक आहे.

''सध्या महाराष्ट्रात प्रायोगिक नामक चाललेलं नाही आहे ते सगळं नॉन प्रोफेशनल अमॅटर थिएटर आहे''. ज्यांनी कुणी हे विधान केले आहे ते प्रायोगिक नाट्यप्रयोग न पहाता केले आहे.

१९७४ साली छबिलदास सुरू झाल्यानंतर कुत्र्याच्या छत्रीप्रमाणे उदयास आलेल्या नाट्यसंस्था आज कुठे आहेत? महाराष्ट्रात प्रायोगिक नाट्यसंस्था किती आहेत? एके काळी जिल्हापातळीवर कार्य करणाऱ्या प्रायागिक नाट्यसंस्था आज अभावानेच कार्यरत असलेल्या दिसतात. प्रायोगिक नाटकाची व्याख्या करता येत नाही कारण ती व्यक्तीसापेक्ष आहे असे मला वाटते. पण लक्षणं आपण सांगू शकतो. तिच्या कार्याप्रणाली बद्दल आपण बोलू शकतो.

माझी कल्पना मांडतो - आज आपण जगात पाहतो कोणत्याही क्षेत्राचा विकास, प्रगती व्हायची असेल तर अशा क्षेत्रासाठी औद्योगिक किंवा कोणत्याही व्यवसायात एक स्वतंत्र विभाग असतो. याचं नाव आर. ॲन्ड डी. - रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेन्ट व त्यासाठी आवश्यक त्या पैशाची तरदूत केली जाते. म्हणूनच रंगभूमी या कलामाध्यमाचा विकास करावयाचा असेल तर आर. ॲन्ड डी.ची कास धरली पाहिजे. प्रायोगिक रंगभूमीचे हेच कार्य आहे. त्यासाठी माझी चतुःसूत्री आहे - संशोधन, प्रयोगशीलता, प्रशिक्षण व नाट्यानुभव ही प्रायोगिक रंगभूमीच्या कार्याची व्याप्ती.

* संशोधनातून प्रगती
* प्रयोगशीलतेतून चहुअंगांनी सर्व घटकांचा विकास
* प्रशिक्षणाने आत्मभान
* नाट्यानुभवातून प्रगल्भता

उदाहरण द्यायचे झाले तर आमच्या तरूण लेखिकेचे इरावती कर्णिकचे, तिने गुरूकडून प्रशिक्षण घेतले, नाट्यलेखनाचा दिग्दर्शनाचा अनुभव घेतला आणि चेतन दातारबरोबर रंगनृत्यशैली सादरीकरणासाठी संशोधन केले. आज तिचं व्यावसायिक रंगभूमीवर आलेलं नवीन नाटक याची साक्ष देईल.

प्रायोगिक नाटकांचे प्रयोग करण्यासाठी आम्हाला सर्व सोयींनी युक्त २५० आसनापर्यंतची छोटी नाट्यगृहे हवी आहेत. आमचा लढा त्याचसाठी आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक धोरणात जिल्हापातळीवर अशी छोटी नाट्यगृहे बांधण्याचा प्रस्ताव आहे. अजून तो कागदावरच आहे. तो लगेच कार्यान्वित करावा आणि पहिले नाट्यगृह महाराष्ट्राच्या राजधानीत-मुंबईत-मध्यवर्ती ठिकाणी उभारावे. शासनाने नाहीतर महापालिकेने हे काम हाती घ्यावे. दीनानाथ नाट्यगृहाच्या दुरूस्तीसाठी करोडो रूपये खर्च करूनही ते अजूनही बंदच आहे. दादर - माहिम या मध्यवर्ती विभागात म्युनिसिपालिटीच्या अनेक शाळा आहेत. अशा शाळात असे छोटे नाट्यगृह बांधता येऊ शकते. नाहीतरी सध्या आम्ही माहिमच्या म्युनिसिपालिटीच्या शाळेतच आमचे सृजनकार्य, प्रशिक्षणकार्य करतो आहोत. काहीजण याला खुराडा म्हणतात तरीही प्रेक्षक नाटक पाहायला येतात, तेही सर्व अडचणी लक्षात घेऊन.

आता शासनाने नव्याने बांधलेले रविन्द्र नाट्यमंदिर म्हणजेच पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी इथे तिसऱ्या मजल्यावर छोटे थिएटर आहे. पण खऱ्या अर्थाने ते नाटकासाठीचे नाही. हे थिएटर चित्रपटासाठी आहे. तरीही आम्ही इथे नाट्यप्रयोग करतो. त्यासाठी रस्त्यावरून तिसऱ्या मजल्यावर सेट व इतर सामान पायऱ्या चढून

घेऊन जातो. कारण ते मध्यवर्ती ठिकाण आहे. सगळ्या गैरसोयी सोसून तिथे प्रयोग करतो.

दुसरं महत्त्वाचं, ही कला अकादमी आहे. कारण अकादमी म्हणजे कलेचं शिक्षण देणारी संस्था किंवा कलेला उत्तेजन देणारी संस्था. पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी सुरू झाल्यापासून तिथे कोणत्या कलांचे शिक्षण दिले गेले किंवा दिले जात आहे?

जुन्या रविंद्र नाट्यमंदिरात निवासासाठी १० खोल्या होत्या त्यामुळे आम्हाला बाहेरच्या राज्यातून चांगली नाटकं मुंबईकर प्रेक्षकांना दाखवता यायची आज तिथे काही सूटस आहेत ते कुणासाठी?

पु.ल. देशपांडे कला अकादमी कलेचे माहेरघर नाही असे दुर्दैवाने म्हणावं लागते. कला अकादमी बद्दल पु.लं.नी काय स्वप्न पाहिलं असेल आणि आज काय परिस्थिती आहे? रसिकांनी विचार करावा.

मला सांगण्यात आले की, प्रायोगिक नाटकांसाठी पु.ल. देशपांडे कला अकादमीच्या चौथ्या मजल्यावर ब्लॅक बॉक्स बांधायचा प्रस्ताव आहे. पण चौथ्या मजल्यावर सेटचे सामान नेणार कसे? अन प्रयोग करणार कसा? पणजीला दामू केंकरे यांनी गोवा कला अकादमीत तळमजल्यावर ब्लॅक बॉक्स बांधून घेतला आहे. आज एवढे मराठी उद्योगपती आहेत. काही बांधकाम क्षेत्रातही आहेत यांची कलेकडे बघण्याची दृष्टी काय आहे? टाटांनी एन.सी.पी.ए. संकुल बांधले. बिर्लानी बिर्ला मातोश्री सभागृह व बिर्ला क्रिडी मंदिर बांधले. शशी कपूरनी पृथ्वी थिएटर उभं केलं. तर डॉ. अ.ना. भालेराव यांनी साहित्यसंघ.

मुंबईतील विलेपार्ले साठ्ये कॉलेजसारखी एक शैक्षणिक संस्था आम्हाला असे छोटे नाट्यगृह उपलब्ध करून देते. तर परिषदेला, महापालिकेला, शासनाला ते का जमू नये? किंवा एखाद्या मराठी उद्योजकालाही?

कामगार रंगभूमी :-

गिरणगांव जसं उद्ध्वस्त होऊ लागले. तसे गिरणी मालकांनी गिरण्या बंद करून मॉल उभे केले त्यामुळे गिरणी कामगार गिरणगावातून हद्दपार झाले. सशक्त कामगार रंगभूमीची ऊर्जा संपत आली. तळागाळातल्या लोकांच्या समस्यांना तोंड फोडणारे लेखक कमी झाले. नाट्यसंस्था राहिल्या नाहीत अशी आज अवस्था आहे. मुंबईतील कामगार नाट्यस्पर्धा बंदच झाल्यात. पुण्यात धुकधुकीने चालू आहेत.

लोक रंगभूमी :-

दादा कोंडके, काळू बाळू, विठ्ठल उमप या महान कलाकारानंतर लोकनाट्य पाहायला मिळेनासे झाले महाराष्ट्रात काही विभागात ते अजून टिकून आहे. मराठवाड्यात भारूडी परंपरा अजून जिवंत आहे. कोकणात दशावतार विदर्भातही खडी गम्मत. काही वर्षांपूर्वी संगीत नाटक ॲकॅडमी नवी दिल्ली या संस्थेने एक योजना यशस्वीरित्या राबवली होती. Use of folk form in modern plays. शासनाने अशा पद्धतीने स्पर्धा किंवा महोत्सव सुरू केल्यास लोककलेला नव्या स्वरूपात पाहता येऊ शकेल. महाराष्ट्रात तमाशा अजून खेडोपाडी चालू आहे. पण त्याचे स्वरूप बदलले आहे. मुंबईत हनुमान थिएटर बंद झाल्यापासून संगीत बाऱ्याही कमी झाल्या. पण आता काही स्त्री कलाकारांनी ही कला नवीन स्वरूपात कमानी रंगमंचावर आणली आहे. प्रतिसादही चांगला आहे. लावणी महोत्सवही काही ठिकाणी आयोजित होतात.

याच पंढरपूरात काही वर्षांपूर्वी होळीच्या दिवशी उत्पांतांच्या शृंगारीक लावण्या पहाटपर्यंत आम्ही ऐकत होतो. त्यांनी संशोधन करून या जुन्या लावण्या शोधून काढल्या. त्या लिहिल्या कोणी माहीत नाही. या लावण्या ध्वनिमुद्रित केल्या की नाही याची कल्पना नाही. मात्र हा लोकसंगीताचा ठेवा जपायला हवा.

संगीत रंगभूमी :-

पारंपारिक संगीत नाटकांची मधून मधून पुनर्निर्मिती होते आहे. त्यांचे प्रयोगही प्रेक्षकांना आवडत आहेत; पण या पलीकडे नवीन संगीत नाटक रंगभूमीवर येत नाही.विद्याधर गोखले यांनी संगित नाटकाच्या संहिता लिहून काही काळापुरती आशादायक परिस्थिती निर्माण केली होती. आज अशा संहिता लिहिल्या जात नाहीत. निर्मात्यांनाही संगीत नाटकाची निर्मिती करण्याचे धाडस होत नाही. मी ''मी संगीत बयादार उघड'' या नाटकाची निर्मिती केली, शंभराहून जास्त प्रयोग केले पण जमाखर्चाची तोंडमिळवणी होत नाही. संगीत नाटकांची निर्मिती करायचा धीर हवा त्यासाठी पाठपुरावा करायला

हवा. असे संगीतकार पुढे यायला हवेत.

अशा सगळ्या समस्यांतून संगीतनाटक एका नव्या स्वरूपात कोणीतरी धाडसी निर्मात्याने रंगभूमीवर आणावे अशी वाट पहाण्यावाचून आपण सध्यातरी दुसरे काही करू शकत नाही अशी संगीत नाटकाची आजची परिस्थिती आहे. मी रामदास कामत यांच्याशी बोललो त्यांचे प्रयत्न चालू आहेत. महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री श्री संजय देवतळे यांनी संगीत नाटकाच्या प्रसंगाना रू. ३०,०००/- चे अनुदान मिळेल असे जाहिर केले. यावर्षी संगीत नाटक रंगभूमीवर येईल अशी अशा करूया.

बोधी नाट्य परिषद :-

बोधी कला संगिती ....

बोधी नाट्य परिषदेचे संस्थापक प्रेमानंद गज्वी यांची मते जाणून घेतली. ते म्हणतात ही ज्ञानाची रंगभूमी आहे. त्यासाठी स्वतंत्रपणे नाट्यलेखन कार्यशाळा आयोजित होतात. मला असं वाटतं बोधी कला संगीताने मुळ धारेत यावे. म्हणजे सगळ्याच प्रेक्षकांना एक नवीन विचार करणारे नाटक पहाण्याचा योग येईल. मी बोधी नाट्यलेखन कार्यशाळेत सामील झालेल्या सिध्दार्थ तांबे यांचे 'जाता नाही जात' हे नाटक मूळ धारेतच सादर केलं. प्रेक्षकांचाही त्याला चांगला प्रतिसाद लाभला. डॉ. लागूनीही गज्वीचे नाटक 'किरवंत' केलच ना? बोधी नाट्य परिषद अ.भा. मराठी नाट्य परिषदेला संलग्न करावी. किंवा तसे न करताही मुख्य धारेत तुमची नाटके सादर करा. प्रेक्षकांनाही. Theatre & knowledge ची नाटके पाहण्याची सवय लागेल.

तसं विद्रोही रंगमंच-विद्रोही नाटकही मूळ धारेत येऊ द्या. तुमच्या व्यथा, आकांक्षा, राग प्रेक्षकांना कळू द्या. मला असे वाटते की, मनातला विद्रोह नाट्यरूपात बाहेर पडला तर मन शांत होऊ शकेल. विद्रोहाची धार बोथटही होऊ शकेल. कोणतीही कला जात-पात, धर्म टक्केवारी मानीत नाही. एकसंघ समाजाचे स्वप्न एकसंघ कलेच्या माध्यमातून साकारू शकते. आपली राजकीय विचारप्रणाली काहीही असली तर ती मतपेटीतून व्यक्त करावी. कोणताही धर्म असो तो उंबरठ्याच्या आत ठेवावा म्हणजे तुम्हाला मुक्तपणे सृजनकार्य करता येऊ शकते Theatre should not be dogmatic but pragmatic and progressive आपली बांधीलकी असलीच तर ती रंगभूमीच्या विकासाशी असावी कोणत्याही राजकीय तत्त्वप्रणालीशी नसावी.

व्यावसायिक रंगभूमी :-

आता व्यावसायिक रंगभूमी कुणाला म्हणावे याची सरकारी व्याख्या आहे तीच आपण गृहीत धरू.

व्यावसायिक नाट्यसंस्था याचा अर्थ '' नाट्यनिर्मीती करणे, त्याचे व्यावसायिक प्रयोग करणे व पूर्ण वेळ व्यवसाय आहे अशी संस्था'' माझ्या पिढीतील निर्मात्यांच्या अशा संस्था होत्या. प्रभाकर पणशीकरांची 'नाट्यसंपदा', मोहन वाघांची 'चंद्रलेखा' आणि मोहन तोंडवळकरांची 'कालवैभव'. आज असे निर्माते व अशा संस्था किती? पूर्णवेळ व्यवसाय करणारे किती व पार्टटाईम व्यवसाय करणारे किती? याचा शोध घ्यावा लागेल. मुख्य व्यवसायात कमावलेल्या नफ्यातून नाट्य व्यवसाय गुंतवणूक होते आहे. कार्पोरेट सेक्टर असे स्वरूप नाट्य व्यवसायाला येऊ पाहते आहे. आज व्यावसायिक नाटकाचे स्वरूप बदलते आहे, मन्वंतर घडते आहे. हसणूक कमी होताना दिसतेय. एरव्ही विनोदी नाटकांनी धुमाकूळ घातला होता. आज आटघन, वैचारिक, समस्याप्रधान नाटकांची निर्मिती होते आहे. नवीन आशयाची, नवीन मांडणीची व मुख्यत्वेकरून सेलीब्रिटी अभिनेते/अभिनेत्री यांना घेऊन ही नाटके सादर होत आहेत. कालचे स्ट्रगलर आज सेलीब्रिटी झाले आहेत. प्रेक्षकही या नाटकांना गर्दी करताना दिसताहेत. सेलीब्रिटी कलाकारांचे कौतुक करायला हवे. त्यांच्या काळ काम वेगाचे वेळापत्रक योग्य तऱ्हेने ते तयार करताना दिसतात निर्मातेही या वेळापत्रकानुसार प्रयोगाचे आयोजन करताना दिसतात. मी या बदलाचे स्वागत करतो. मी स्वागत करतो ते या व्यवसायात काही अभिनेत्रींनी प्रवेश केला आहे. त्यांच्याकडून नवीन जाणीवा, नवीन समस्या घेऊन दर्जेदार नाट्यनिर्मिती होत आहे. या अभिनेत्रींचे मी मनापासून अभिनंदन करतो, आणि म्हणतो ! यशस्वी भव! अजून एक बदल घडलेला आपल्याला दिसून येईल व्यावसायिक रंगभूमीवर सहकारपर्व सुरू झाले आहे. अनेक निर्माते एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर नाट्यनिर्मिती करताहेत. यात सहकारमहर्षि कोण असेल ते येणारा काळ ठरवेल.

आज मराठी रंगभूमीवर एकाच वेळी पन्नासहून अधिक नाटकांचे प्रयोग सुरू आहेत. ही माझ्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे. एवढे सृजनकार्य आज महाराष्ट्रात चालले आहे. आता एवढ्या नाटकांचे मुंबई-पुण्यातलेच प्रयोग घेतले तर वर्षाला किमान सहा हजार प्रयोग होताना दिसतील. याची आर्थिक उलाढाल किती असेल याचा जाणकरांनी हिसाब करावा. किती कोटींच्या घरात जाते ते कळून येईल. म्हणजे महाराष्ट्रापुरता विचार करायचा तर ह्या जिवंतकलेचा कॉर्पोरेट सेक्टरमध्ये समावेश होऊ शकतो. बघा गणित करून. थोडक्यात आपण एवढे पाहिले. आता दुसरं चित्र काय दिसतं? मी नाट्यनिर्मिती संघाचे अध्यक्ष श्री. प्रशांत दामले यांना भेटलो व त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न केला. प्रशांतनी अडचणींचा पाढाच वाचला. पण या अडचणींना तोंड देत रंगभूमीचा प्रवास चालू आहे.

अनुदानासाठी सहा महसूल विभागात प्रयोग करावे लागतात. तिथल्या नाट्यगृहांच्या अवस्थेबद्दल खूप नाराजी आहे. ही नाट्यगृहे महापालिकेची, शासनाची व इतर संस्थांची आहेत. महाराष्ट्रात साठ नाट्यगृहे जमेतेम बऱ्या अवस्थेत आहेत असा प्रशांतचा अनुभव. त्याने काही नाट्यगृहाची भाडी सांगितली, मी चकित झालो धुळे, नंदुरबार येथे ४२,000/- व रू. २७,000/- एवढे भाडे आकारले जाते. प्रशांतने सूचना केली की, नगर विकास खात्याकडे ही नाट्यगृहे सुपूर्त करावीत. पाच कोटी अनुदानातून या नाट्यगृहाची डागडूजी, स्वच्छता करावी. भाड्याची रक्कम समान करावी. सूचना चांगली आहे पण ती कितपत कार्यान्वित होईल याची मला शंका आहे. दुसरी सूचना दौऱ्यावर असताना हॉटेलचा खर्च फार असतो. नाटकाच्या प्रयोगाचे दिवशी विश्रामगृहे मोकळी असतील तर ती उपलब्ध करून द्यावीत. आणखी एक सूचना की सर्व परवाने मिळविण्यासाठी एक खिडकी योजना शासनाने तयार करावी. म्हणजे हे सर्व परवाने मिळविताना निरनिराळ्या सरकारी खात्यात चकरा माराव्या लागणार नाहीत. नाट्यपरिषदेने व नाट्यनिर्माता संघाने याचा पाठपुरावा करावा.

प्रशांतचा एक अनुभव अतिशय खेदजनक आहे. एका ठिकाणी जिल्हाधिकारी यांनी नाटकाच्या तिकीटावर करमणूक कराची मागणी केली. महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर यशवंतराव चव्हाण यांनी करमणूक कर रद्द केला होता. आज पाच दशकानंतर ह्या कराची पुन्हा मागणी होते. करमणूक कर रद्द झाल्याचा पुरावा म्हणून अध्यादेशाची प्रत मागण्यात येते व ती सादर करू असे प्रतिज्ञापत्र प्रशांतला द्यावे लागते, दुर्दैव! अशाप्रकारे करमणुक कर मागण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना आहे का? संमेलनात याचा विचार व्हावा.

यशवंतरावांनी करमणूक कर रद्द केला पण त्यांच्याच नावाच्या नाट्यगृहात प्रयोग करायचा झाला तर प्रत्येक प्रयोगाला रू. १,000/- अधिक द्यावे लागतात. कारण नाट्यगृहाला पी.डब्लू.डी.चे completion certificate नाही. व्यावसायिक निर्माते यावर काही बोलतच नाहीत. प्रायोगिक नाट्यसंस्थांना हा कर देणे अशक्य होते.

रंगमंच कामगार संघटना :-

नाट्यप्रयोग ज्याच्या जीवावर उभा होतो तो रंगमंचकामगार backstage worker. एक चांगली गोष्ट झाली आहे ती म्हणजे नाट्यनिर्माता संघ व रंगमंच कामगार संघटना दोन वर्षांचा करार झाला आहे. त्याप्रमाणे प्रत्येक backstage worker. ला प्रत्येक प्रयोगाचा ठराविक मोबदला द्यावा लागतो. मग ते नाटक कोणत्याही निर्मात्याचे असो. व्यावसायिक असो वा प्रायोगिक पण होते काय महिन्यतून किमान १० प्रयोग तरी त्यांना मिळावेत म्हणजे दरमहा किमान रू. ४,000/- मिळू शकतील. पण वस्तूस्थिती उलटी आहे. त्यांची उपजीविका या कामावरच अवलंबून आहे. महिन्याला १० प्रयोग मिळाले नाही तर हे कामगार काम मिळेल तिकडे निघून जातात. म्हणूनच backstage worker चा काही वेळा तुटवडा भासतो. काही निर्मात्यांचे स्वत:चे रंगमंच कामगार आहेत. बाकीच्यांना ठेकेदारांकडून हे काम करून द्यावे लागते. ठेकेदाराच्या पदरी अनेक रंगमंच कामगार काम करतात. ठेकेदारानांही ठरलेली रक्कम देणे आवश्यक असते. आज मराठी रंगभूमीवर नऊ ठेकेदार आहेत ते देखील करतात. काही निर्माते ठेकेदाराकडून नेपथ्य तयार करून घेतात व प्रत्येक प्रयोगासाठी ठरलेली रक्कम देतात. म्हणजे सुरवातीला नेपथ्यसाठी खर्च करावा लागत नाही. किंवा गोडाउनही

ठेकेदाराचेच असल्याने काही निर्मात्यांना ही सोय परवडते. थोडक्यात व्यावसायिक नाटकांचे प्रयोग अशा पध्दतीने सादर होताना दिसतात.

रंगमंच कामगार संघटनेच्या काही फार महत्त्वाच्या मागण्या आहेत. त्याचा विचार करू.

* रंगमंच कामगाराला काम करताना मोठे अपघात होतात, तातडीचे उपचार करावे लागतात त्यासाठी परिषदेने एक ठराव मंजूर करावा व अशा रंगमंच कामगाराला 'म्युनिसिपालिटीच्या हॉस्पिटलमध्ये तातडीने मोफत उपचार करून घेण्याची सुविधा असावी' त्यासाठी महापौरांना भेटून अशी व्यवस्था करावी.

* या रंगमंच कामगारांना स्वत:ची घरे नाहीत ते एकतर ट्रकमध्ये किंवा गोडाऊनमध्ये झोपतात. रंगमंच कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी असे सुचवले आहे की, गिरणगावात अनेक इमारती उभ्या रहाताहेत अशा इमारतीमध्ये रंगमंच कामगारांसाठी काही खोल्या राखीव ठेवाव्यात. त्यासाठी परिषदेने राज्यशासनाला भेटून ही सुविधा मिळवून द्यावी.

* परिषदेने जेष्ठ रंगमंच कामगारांना पेन्शन सुरू केली आहेच. त्यांच्याशिवाय अजून काही जेष्ठ कामगार आहेत पण ते आता वयोमानाने कष्टाचे काम करू शकत नाहीत. अशा कामगारांना शासनाकडून पेन्शन मिळवून देण्याचा प्रयत्न करावा. अशी विनंती मी परिषदेला करतो.

* परिषदे तर्फे सर्वांचा सन्मान होतो तसाच सन्मान रंगमंच कामगारांचा व्हावा. कारण त्यांचे योगदान फार महत्त्वाचे आहे. त्यांच्याशिवाय प्रयोग उभा रहात नाही. निष्ठेने हे काम रंगमंच कामगार करीत असतो. रंगमंच कामगार संघटनेने अशा जेष्ठ कामगारांची दरवर्षी निवड करावी व १४ जून रोजी दरवर्षी आयोजित होणाऱ्या कार्यक्रमात त्यांचा सन्मान करावा.

* रंगमंच कामगार संघटनेने अजून एक इच्छा दर्शविली आहे. परिषदेच्या विषय नियामक मंडळात त्यांचा प्रतिनिधी आहे तसाच एक प्रतिनिधी परिषदेच्या कार्यकारणीवर असावा. परिषदेने याचा विचार करावा असे मी परिषदेला सुचवीन.

प्रेक्षक :-

रंगभूमीचे वर्तुळ प्रेक्षकांशिवाय पूर्ण होऊ शकतच नाही. प्रेक्षक हा तर फार महत्त्वाचा घटक, प्रयोग होतो तो भिन्न भिन्न अभिरूचीच्या प्रेक्षकांसाठी. सर्व समाजाची एकच अशी अभिरूची असत नाही, पण सध्याची वस्तुस्थिती अशी आहे की प्रेक्षकांना थोडा विरंगुळा हवा आहे. धकाधकीच्या व गतीमान आयुष्यात त्यांना थकवा घालवण्यासाठी थोडेसे रिलॅक्स व्हायचे आहे आणि मानसशास्त्रीयदृष्ट्या ते योग्यही आहे. मग अशा विनोदी नाटकांचा भडिमार होतो. हे दुष्ट चक्र आहे.

पण समाजात असाही टक्का प्रेक्षक आहे, ज्यांची बौद्धिक भूक आहे अशा प्रेक्षकांसाठी वैचारीक, समस्या प्रधान, चर्चा नाटक व जीवनातील अनेक अंगे दाखविणारी नाटके रंगमंचावर यायला हवीत. ती येतातही. आज विरंगुळा प्रधान नाटकांची संख्या थोडी कमी झाली आहे व इतर उत्कृष्ट नाटकांचे प्रयोग वाढत चालले आहेत. हा शुभशकून आहे आणि अशा नाटकांनाही प्रेक्षक गर्दी करताना दिसतात.

निर्माते नाटकांची प्रसिद्धीही फार खुबीने करतात. प्रेक्षकांना आकृष्ट करून घेतात. वृत्तपत्रात अभिनेत्यांचे फोटो देऊन मोठमोठी जाहिरात करणे हा त्यांच्या व्यवसायाचा भाग आहे. प्रश्न पडतो एवढ्या मोठ मोठ्या जाहिराती देऊन प्रयोगाच्या जमाखर्चाची तोंडमिळवणी कसे करत असतील? जाहिरातीमध्ये मोठमोठ्या कलाकारांची प्रयोग आवडल्याची, समिक्षकांना प्रयोग आवडण्याची ओळ टाकून प्रेक्षकांना आकृष्ट करण्याचा प्रयत्नही करतात. पण प्रेक्षकांनी असे दुसऱ्याच्या मनाने जाणे याचा अर्थ प्रेक्षकांचा स्वत:च्या अभिरूचीवर विश्वास नाही असा होतो. पूर्वी प्रेक्षक संस्थेचे नाव पाहून नाटक बघायला यायचा. आज सिलिब्रीटी कलाकारांची नावे पाहून येतो. अजून एक प्रेक्षकांची मानसिकता म्हणजे सर्व समिक्षकांनी स्तुतीसुमने वाहिलेल्या नाटकाच्या प्रयोगाला विचार न करता येतो व समीक्षकाने थोडेसे अप्रिय लिहिले की प्रेक्षक त्या नाटकाचा विचारही करत नाही. तोंडातोंडी झालेली प्रसिध्दी प्रेक्षक मान्य करतो व प्रयोग पाहतो.

नाटककार :-

प्रयोगकलेच्या प्रवासात पहिला घटक म्हणजे नाटककार व त्यांनी लिहिलेली संहिता. संहिता ते प्रयोग हा सृजन प्रवास म्हणजे आत्मशोध. या आत्मशोधातील सर्व

घटकांची आजची स्थिती पहायला हवी. आज रंगभूमीवर पन्नासहून अधिक नाटकांचे प्रयोग चालू आहेत. डॉ. राजीव नाईक यांनी नाटकांचे प्रकार सांगितले आहेत. सततची, आत्ताची आणि या दोहोंच्या आधली मधली आज रंगभूमीवर आताचीच नाटके अधिकांशाने दिसतात. आताच्या समस्या मांडणारी नातेसंबंधा विषयी असे ढोबळ मनाने म्हणता येऊ शकते. सततची नाटकेही सादर होताहेत. त्यांची पुननिर्मिती होते आहे.

वि.वा. शिरवाडकारांपासून ते शफाअत खान पर्यंतच्या नाटककारांनी मराठी रंगभूमीला समृध्द केले. आजचा एक नाटककार डॉ. विवेक बेळे ३/४ वर्षांनी एक सकस नाटक लिहितो. तो बहुप्रसवा नाही. तसेच सुरेश चिखले, संतोष पवार, संजय पवार, चिन्मय मांडलेकर, रत्नाकर मतकरी, सतीश आळेकर, प्रशांत दळवी, राजीव नाईक, शफाअत खान सारखे नाटककार अजून लिहितच आहेत.

स्त्री नाटककारांमध्ये इरावती कर्णिक, मनस्विनी लता रविंद्र व सुषमा देशपांडे यांचा उल्लेख जरूर करायला हवा. डॉ. आनंदा नाडकर्णी मानसशास्त्रज्ञ आहेत त्यांचीही मानसशास्त्रीय नाटके प्रयोगात आहेत. शिवाय धर्मकीर्ती सुमंत हा तरूण नाटककार नव्या सामाजिक विषयाला भिडतो आहे.

आजचे तरूण नाटककार जस जसे अनुभवाने समृध्द होत जातील तसतसे त्यांच्या नाट्यकृतीत सकसपणा व विविधता येईल अशी आशा आहे. उद्याचे नाटककार फक्त शहरी विभागातून येणारे असतील असे नाही ते ग्रामीण भागातूनही येऊ शकतात. उदाहरण अगदी ताजे आहे. शिवाजी अंडरग्राऊंडचे

ग्रामीण भागातील तरूणांना नाट्यलेखनासाठी प्रवृत्त करावे लागेल. मार्गदर्शनही करावे लागेल. त्यासाठी आमचा प्रयत्न चालू आहे. अशा तरूणांचा शोध घेऊन नाट्यलेखन कार्यशाळा आम्ही घेणार आहोतच. आशा आहे की अशा प्रयत्नातून हा महत्त्वाचा घटक भावी रंगभूमीला मिळणार आहे.

दिग्दर्शक :-

या प्रयोग कलेचा सुकाणू म्हणजे दिग्दर्शक, दिग्दर्शकाला प्रयोग कलेचा अनुभव असायला हवा. अभ्यास केलेला असावा आत्मविश्वास असायला हवा, दिग्दर्शकाला नटाकडून चांगला अभिनय करून घ्यायची हातोटी असावी लागते. काही भडकणारे दिग्दर्शक पाहतो, काही समजावून देणारे दिग्दर्शक आहेत. त्यांचे हे उपजीवेकेचे एकमेव साधन आहे. निर्मात्याबरोबर झालेल्या करारातून जेवढी आर्थिक प्राप्ती असेल. तेवढ्यात ते गुजराण करतात. रंगभूमीची नाळ तोडायची नाही असे त्यांनी ठाम ठरविले आहे. या दिग्दर्शकांचे मी अभिनंदन करतो. तरूण दिग्दर्शकांनीही असा दिग्दर्शकांचा आदर्श ठेवावा. फार कठिण आहे. थोडा धीर धरावा. स्वत:ला establish करायला वेळ लागेल. पण एकदा का यशस्वी दिग्दर्शक म्हणून तुमची ओळख झाली की तुम्हीही नाट्यदिग्दर्शन हा पूर्ण वेळ व्यवसाय कराल. असे घडावे अशी मी इच्छा करतो.

तंत्रज्ञ :-

आज मराठी रंगभूमी वर जे प्रयोग सादर केले जातात त्यांचे दृश्यरूप आपण पाहिले तर नेपथ्यकारांनी नाटकाच्या आशयाचा, विषयाचा स्थळांचा विचार करून नेपथ्याची रचना केलेली आढळेल. आज प्रदीप मुळे हा असा नेपथ्यकार आहे तो सर्व निर्मात्यांना हवा असतो. असे चित्र भारतात इतरत्र कुठेही दिसत नाही. हा नेपथ्यकार नुसताच नेपथ्यकार नाही तर प्रकाश योजनाकार वेशभूषाकार आणि दिग्दर्शक सुद्धा आहे. नाट्यमाध्यमाचा सखोल आणि सर्वांगिण विचार करणारा असा हा नेपथ्यकार मराठी रंगभूमीला लाभलाय. दुसरे अनेक नेपथ्यकार आणि प्रकाशयोजनाकारकही करतात. म्हणूनच मराठी रंगभूमीवर आज नाट्यप्रयोगांचा दर्जा खूप उंचावला आहे.

अभिनेता :-

हा फार महत्त्वाचा घटक आहे. अभिनेत्यांमुळेच प्रयोग जीवंत होतो. आजच्या व्यावसायिक आणि प्रायोगिक रंगभूमीवरील बहुतांश अभिनेते आणि अभिनेत्रींची मानसिकता पाहिली की धसका बसतो. सतरा डगरींवर पाय ठेवणारे हे अभिनेते आहेत. अशांच्या बाबतीत मी म्हणेन, एखाद्या डगरीवरून घसरलात तर कपाळमोक्ष होईल. ह्यातल्या काहींना असे वाटते की आपणाशिवाय नाट्यप्रयोग होऊच शकणार नाही. असा विचार करणाऱ्या

अभिनेत्यांना मी विचारतो की, बाबांनो तुमचे प्रेम कुणावर आहे? रंगभूमीवर, नाट्यसंस्थेवर की स्वत:वर? असे आढळून येईल की असे अभिनेते स्वत:शिवाय दुसरा कुठला विचारच करत नाहीत. असे अभिनेते आणि अभिनेत्री रंगभूमीचा उपयोग करून घेतात. नाट्यसंस्था Steping Stone म्हणून वापरतात. निष्ठा बांधिलकी हे शब्द अशा कलाकारांना शून्य किंमतीचे. आज अशा कलाकारांना घेऊन नाटक करायचे म्हणजे भिंतीवर डोके आपटून घेण्यासारखे आहे. म्हणूनच की काय, निर्माते कमीत कमी पात्रांच्या नाटकांना प्राधान्य देतात.

काही व्यावसायिक नाटकात मात्र बरेच अभिनेते दिसतात पण निर्माते व अभिनेते यांनी मिळून प्रयोगाचे आयोजन केलेले पहायला मिळते. तीन तीन महिने आधी वेळापत्रक तयार असल्यामुळे हे शक्य होतं. शिवाय, व्यावसायिक नाटकासाठी अभिनेत्यांना प्रत्येक प्रयोगाचे मानधन मिळणार असते. असे घडताना प्रायोगिक रंगभूमीवर दिसत नाही. एकतर हे अभिनेते कुठल्या ना कुठल्या ऑफिसात नोकरी करीत असतात शनिवार, रविवार शिवाय ते प्रयोग करायला तयार नसतात. त्यामुळे एखाद्या यशस्वी प्रायोगिक नाटकांचे दौरे होताना दिसत नाही.

काही वेळा ठरलेला प्रयोग असतानाही कोणी अभिनेता ''मला शुटिंग आलय'' म्हणून निर्मात्यांना तोंडघाशी पाडतात. रसिकहो, ही वस्तुस्थिती आहे. हे सगळं लक्षात घेऊन नवीन नाटकांच्या निर्मितीचा विचार करावा लागतो. किंवा नवीन अभिनेते आणि अभिनेत्री तयार करावे लागतात. कित्येकदा एका पात्रासाठी दोन कलावंत तयार करावे लागतात. तरी ही अधून मधून निर्मात्यांची गोची होतेच.

समीक्षा :-

पूर्वसुरींच्या संमेलनाध्यक्षांनी नाट्य समीक्षेबद्दल नाराजी व्यक्त केलेली आढळते समीक्षकांवर त्यानंतर खूप तोंडसुख घेतलेले आहे. ते माझ्या वाचनात आले आहे. मला वाटते की कोणतीही समीक्षा करण्यासाठी एक फुटपट्टी असत नाही. एकाच barmeter असत नाही. त्यामुळे कलेची समीक्षा व्यक्तिसापेक्ष असते, समीक्षकांची अभिरूची, माध्यमाची जाण, अभ्यास, विचारांची बांधिलकी यातूनच समीक्षा लिहीली जाते. त्यामुळे एकाची समीक्षा किंवा परीक्षण दुसऱ्या समीक्षकासारखे नसते, मराठी दैनिकातून दर आठवड्याला एका नाटकाची समीक्षा/परिक्षण येते म्हणजे वर्षात ५० च्या आसपास. पण रंगभूमीवर वर्षात ५० पेक्षा जास्त नाटकांची निर्मिती होते. म्हणजे वर्षभरातील सर्वच नाटकांची दखल घेतली जात नाही. काही वेळा नाटक बंद पडता पडता समीक्षा लिहिलेली आढळेल. पूर्वीसारखे शुभारंभाच्या प्रयोगाना समिक्षक हजर असत नाहीत. त्यांना वेळ मिळेल तेव्हाच ते प्रयोग पाहतात.

समीक्षेचा नाट्यप्रयोगावर परिणाम होतो का? एखादा निर्माता चांगल्या परिक्षणाचा/समीक्षेचा अत्यंत कौशल्याने जाहीरात करून प्रेक्षकांना नाट्यप्रयोग बघण्यासाठी आकर्षित करतो. प्रायोगिक नाटकाची समीक्षा करताना काही समीक्षक जास्त कडक समीक्षा करतात. ते प्रायोगिक नाटकाचा दर्जा वाढावा या हेतूने पण हेतू चांगला असला तरी निर्मात्यांची अवस्था केविलवाणी होते. या कडक टीकेमुळे प्रेक्षक नाटकाच्या प्रयोगाकडे फिरकतच नाही. प्रेक्षकांची मानसिकता अशी आहे. यातून मार्ग काढण्यासाठी पूर्वी नाट्यकलेला वाहिलेली मासिके, नियतकालिके प्रसिद्ध होत होती विनायक पडवळ (भरतशास्त्र), सरोज तेलंग (नांदी) शिवाय शं. ना. अंधृटकर, अरूण नाईक यांनीही मासिके प्रसिध्द केली. पण ती बंद पडली एन.सी.पी.ए.ने काही काळ मासिक प्रसिध्द केले पण तेही बंद पडले.

असे होऊ नये म्हणून कणकवली येथील वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठान ही संस्था पुढे आली आहे. त्यांनी एक योजना आखली आहे. प्रत्येकी रू. १,०००/- ची ठेव ठेवणारे ५०० सभासद त्यांना मिळाले की त्यावरील येणाऱ्या व्याजावर ते मासिक चालवू शकतात. संपादक मंडळाची जुळवाजुळव चालू आहे. म्हणून या व्यासपीठावरून मी रसिकांना आवाहन करतो की, आपण रू. १,०००/- च्या ठेवी संस्थेत ठेवा. तुमच्या ठेवी सुरक्षित राहतील व तुम्हाला दर महिन्याचा हा अंक घरपोच मिळू शकेल.

शेवटी समीक्षकांच्या बाबतीत मी म्हणेन तुम्ही मुक्तपणे समीक्षा लिहा त्यातले चांगले वाईट आम्ही

समजून घेऊ तुम्ही या रंगभूमीच्या व्यवहारातील एक भाग आहात. असे मी मानतो.

विकेंद्रीकरण :-

व्यावसायिक रंगभूमी मुंबईत केंद्रीत झाली तर प्रायोगिक रंगभूमी मुंबई व पुण्यात पूर्वीसारखे आठवडेच्या आठवडे दौरे करणे निर्मात्यांना व स्थानिक संस्थानाही आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. त्यामुळे मुंबई- पुण्याबाहेर फारसे प्रयोग होऊ शकत नाहीत. मग ही नाटके महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात कशी पोहोचणार? प्रभाकर पणशिकर यांनी जसा अरब्खा महाराष्ट्र पिंजून काढला तसे आता शक्य दिसत नाही. यासाठी नाट्य परिषद व अविष्कार यांनी एक प्रयोग करून पाहिला, आमच्या 'दुर्गा झाली गौरी' या नृत्य नाट्याचे प्रयोग महाराष्ट्रात काही ठिकाणी करण्याचा प्रयत्न केला. जो सतत करत रहाणेही न परवडणारे होते. म्हणून 'दुर्गा झाली गौरी' च्या व्हिडिओ व ऑडिओ कॅसेटस् नाट्यपरिषदेच्या शाखांना पाठविल्या. स्थानिक बाल कलाकारांना नृत्यांचे प्रशिक्षण देऊन व्हिडिओ कॅसेटस् प्रमाणे नृत्ये, नाट्य स्थानिक दिग्दर्शकाने दिग्दर्शित करावे आणि याचे प्रयोग त्या त्या नाट्यशाखेच्या परिघात सादर करावे. तसा प्रयोग आम्ही करून पाहिला. प्रामाणिकपणे स्थानिक कलाकारांनी मेहनत घेतली, पण मूळ दुर्गा झाली गौरीच्या प्रयोगाचा दर्जा मिळू शकला नाही. आम्ही प्रयोग विकेंद्रीकरणाचा प्रयोग म्हणून करून पाहिला. हा प्रयोग फसला तरी मी निराश नाही. नाट्यपरिषदेकडे ती प्रस्ताव मांडतो की, त्या त्या वर्षाच्या उत्कृष्ट प्रायोगिक नाटकाचे प्रयोग स्थानिक दिग्दर्शक व कलाकार यांच्याकडून करून घ्यावेत आणि त्या त्या शाखेच्या परिघात याचे प्रयोग करावेत म्हणजे त्या त्या शाखेत सृजनकार्य सुरू होईल. पुण्यातील यशस्वी प्रायोगिक नाटक तिथवर पोचणार नाही. पण स्थानिक दिग्दर्शक व कलाकारांकरवी सादर होणारे प्रयोग तेथील प्रेक्षकांना पाहता येतील. परिषदेने तशी आर्थिक तरतूद करावी किंवा काही श्रीमंत शाखा आहेत त्यांच्याकडून त्यासाठी निधी जमवावा. परिषदेच्या उद्दिष्टांमध्ये असा निधी जमवता येतो.

रंगभूमीवर सत्ता कुणाची ?

मध्यंतरी या विषयाला तोंड फुटले होते. मला सत्ता हा शब्द खटकतो. सत्ता आली की राजकारण आले. एकमेकांवर कुरघोडी करणे आले, एकमेकांचे पाय ओढणे आले. सत्ता या शब्दा ऐवजी रंगभूमीवर महत्त्व कुणाला? असे फारतर आपण म्हणू शकतो. मला असे वाटते की ही समूहकला आहे. प्रत्येक घटकाला यात तितकेच महत्त्व आहे. प्रत्येक घटकाचे कार्य काय आहे? ते हवे तेवढेच होते आहे का? संपूर्ण कलाकृतीत ते बिघाड निर्माण करत नाही ना? याचा विचार व्हावा.

कलाकृतीतील सर्व घटक जेव्हा एकजिनसी homogenious होतात तेव्हा ती कलाकृती उच्च दर्जा प्राप्त करते आणि एक सुविहीत प्रयोग आपल्यासमोर सादर होतो. संमेलनात यावर साधक बाधक चर्चा व्हावी हे अपेक्षित आहे.

शासकीय अनुदाने :-

आता महत्त्वाच्या विषयाकडे वळतो. महाराष्ट्र शासनातर्फे नाट्यसंस्थांना निरनिराळ्या कारणांसाठी अनुदान दिले जाते. संस्थांना अनुदान - रजिस्टर्ड नाट्य संस्थाना किंवा सांस्कृतिक कार्य करणाऱ्यांना असे अनुदान तीन वर्षांनी मंजूर होते माझी सूचना आहे की महाराष्ट्रातील सांस्कृतीक क्षेत्रात कार्य करणाऱ्या ज्या संस्थांनी अनुदानासाठी अर्ज केला असेल. अशा संस्थांचा गेल्या तीन वर्षाचा आर्थिक ताळेबंद व कार्याचे अहवाल पाहावे. ज्या संस्था सातत्याने कार्य करतात त्यांचा प्रथम विचार करावा आणि अशा संस्थांना एक वर्षाआड अनुदान मंजूर करावे. त्यामुळे अशा सातत्याने भरघोस कार्य करणाऱ्या या संस्थांचा भार कमी होईल व हे सातत्य टिकून राहील.

प्रयोगासाठी अनुदान -

नांदेड येथील नाट्यसंमेलनात अनुदान देण्याचा प्रस्ताव होता त्यावेळी मी प्रथम जाहिरपणे सांगितलं की, हे अनुदान प्रायोगिक नाटकांच्या प्रयोगांना मिळायला हवे. त्याची आवश्यकता प्रायोगिक नाट्यसंस्थांना आहे. विजय केंकरे यांनीही व्यावसायिक नाट्यप्रयोगांना अनुदानाची गरज नाही असा विचार मांडला.

आज आमचे म्हणणे मान्य झालं आहे आणि प्रायोगिक नाट्यसंस्थांच्या प्रयोगातून अनुदान देण्याचा अध्यादेश निघाला आहे, पण त्यात बऱ्याच त्रुटी आहेत आणि तो बदलून घेणे आवश्य आहे. आज राष्ट्रीय

पातळीवर दोन अंकी नाटकांपेक्षा सलग दीड ते पावणे दोन तासांची नाटके सादर होतात. हाच न्याय प्रायोगिक नाटकाला लावावा. शासनाला नाट्यव्यवसायाला आर्थिक हातभार लावायचा आहे. त्याबद्दल शासनाच्या सांस्कृतिक खात्याचे आभार मानतो. जरी शासनाच्या योजना चांगल्या असल्या तरी त्याची अंमलबजावणी योग्य रितीने होत नाही याची खंत आहे.

उदाहरण देतो - २५ प्रयोग केल्यानंतर अनुदानासाठी अर्ज केल्यावर ते लगेच मिळायला हवे. पण ते तसे घडत नाही. होते काय की, तुमच्या अर्जाची छाननी होण्यात काही महिने जातात, त्यानंतर ती फाईल मंत्रालयात सांस्कृतिक खात्यात जाते, तिथून ती अर्थ खात्यात जाते व नंतर या फायलीचा परतीचा प्रवास सुरू होतो. अशी तुमची फाईल लाल फितीच्या गुंडाळ्यात गुरफटली जाते. अन् सहा ते आठ महिने तुम्हाला अनुदान मिळत नाही. एका वर्षात ५० किंवा १०० प्रयोग करायचे तर हे अनुदान वेळेवर मिळायला हवे. अर्थ संकल्पात ही योजना मंजूर झाल्यानंतर संचालक, सांस्कृतिक कार्य यांना कागदपत्रे पडताळून लगेच अनुदान देण्याचे अधिकार दिले पाहिजेत. पुन्हा अर्थखात्याकडून मंजूरी घेण्याची गरज नाही असे मला प्रमाणिकपणे वाटते.

प्रायोगिक नाट्यसंस्थेची ५ प्रयोगात दमछाक होते, पुढचे ५ प्रयोग केल्यावर अनुदान मिळणार आहे या आशेवर पुढचे ५ प्रयोग करतात. पण असे १० प्रयोग झाल्यानंतर अनुदानासाठी अर्ज केल्यावर वरील प्रमाणे ती फाईल लालफितीच्या गुंडाळ्यात अडकली तर ती अवस्था प्रायोगिक नाट्यसंस्थेची होईल ते चित्र विदारक असेल. म्हणूनच अनुदानासाठी अर्ज केल्यावर सांस्कृतिक कार्य संचालकांना संबंधित कागदपत्रांची पडताळणी करून लगेच ते मंजूर करण्याचा अधिकार दिला तरच ही योजना यशस्वी होईल. अन्यथा या योजनेच्या अपयशाची जबाबदारी शासनाची असेल.

शासनाची अजून एक चांगली योजना जाहीर झाली आहे. मराठीतील जुन्या उत्कृष्ट व अभिजात नाटकांची निर्मिती करून अशा नाटकांचे चित्रीकरण करून ते एक सांस्कृतिक ठेवा म्हणून जतन करून ठेवायचे लवकरच ही योजना कार्यान्वित होईल.

सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने अनेक स्तरावर चांगले उपक्रम चालविले जातात. पण मला असे दिसून आले आहे की, यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयात कर्मचाऱ्यांचा तुटवडा आहे. ६० साली सांस्कृतिक कार्य संचालनालयात जेवढ्या योजना कार्यान्वित होत्या त्याच्या अनेक पटीने आज योजना कार्यान्वित कराव्या लागतात. पण ६० साली जेवढा कर्मचारी वर्ग व जागा होती तेवढीच आजही आहे. मी सांगेन तुम्ही job evaluation करून बघा. आहे याच्या दुप्पट कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे असे शासनाला दिसून येईल व आहे याच्या तिप्पट जागा यासाठी उपलब्ध करून द्यायला हवी तरच या सगळ्या योजना योग्यरितीने कार्यान्वित करता येतील व माझा विचार योग्य आहे असे शासनाला पटेल आणि त्याप्रमाणे शासन पाऊल उचलेल अशा भाबडी आश आहे.

राष्ट्रीय स्तरावरील मराठी रंगभूमी :-

आता शेवटी महत्वाचा प्रश्न महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली त्यावेळी भारताच्या राजधानीत महाराष्ट्र परिचय केंद्राची स्थापना झाली. उद्देश फार महत्त्वाचा होता. महाराष्ट्राची सर्व थरातील प्रगती देशाला कळावी. महाराष्ट्रातील सांस्कृतिक घडामोडींना राष्ट्रीय पातळीवर योग्य रीतीने प्रसिद्धी देण्यात यावी यासाठी दरवर्षी रंगभूमी दिनानिमित्त राजधानीत मराठी नाटकांचे महोत्सव भरवावेत १ मे या दिवशी महाराष्ट्र स्थापना दिवसाच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करावे तसेच वसंत नाट्य महोत्सव आयोजित करावा आणि राष्ट्रीय पातळीवर मराठीचा झेंडा फडकत ठेवावा.

मित्रांनो, यातले आज काहीही घडत नाही. महाराष्ट्र परिचय केंद्र हल्ली या बाबतीत काय करतेय कुणालाच ठाऊक नाही. २००० सालापासून हे महोत्सव बंद पडलेत. महाराष्ट्र परिचय केंद्रातर्फे कोणतेही सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित होत नाही.

शासनातर्फे नाही तर दिल्लीतील स्थानिक संस्था सार्वजनिक उत्सव समिती तर्फे हा रंगभूमी दिनाचा नाट्य महोत्सव, १ मे रोजी महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाचे कार्यक्रम, गणपती उत्सव अशा सर्व कार्यक्रमांचे आयोजन करते. त्यासाठी पैशाची जमवाजमव करते. शासनाने

करावयाचे काम ही संस्था करीत आहे. शासनाने रंगभूमी दिनानिमित्त हा नाट्यमहोत्सव पुन्हा सुरू करावा म्हणून मी आणि सार्वजनिक उत्सव समीतीचे कार्याध्यक्ष श्री. रा.मो. हेजीब यांनी सांस्कृतिक कार्य संचालनालयाला मागच्या वर्षी म्हणजे २०१३ च्या जुलैमध्ये विनंती अर्ज केला की शासनाने या महोत्सवासाठी आर्थिक सहाय्य द्यावे. २०१३ साली ते शक्य झाले नाही पण २०१४ च्या रंगभूमी दिनानिमित्त आयोजित होणाऱ्या नाट्य महोत्सवासाठी अर्थ सहाय्य देऊ असे आश्वासन आम्हाला मिळाले आहे.

रसिक हो, आपण सारे म्हणतो की आमची मराठी रंगभूमी देशात आघाडीवर आहे. त्याचा अभिमान बाळगतो पण प्रत्यक्ष राष्ट्रीय पातळीवर मराठीचा कुणी विचारच करत नाही. दुर्दैवाने मराठी सांस्कृतिक लॉबीच नाही.

राजधानीत महाराष्ट्रातील ५० हून अधिक लोकप्रतिनिधी आहेत. यातील किती लोकप्रतिनिधींना मराठी कलेचे, नाटकांचे, दिल्लीत होणाऱ्या मराठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे महत्व कळतं? मी २६ वेळा ३६ नाटकांचे प्रयोग दिल्लीत केले आहेत आणि मराठी रंगभूमीचा झेंडा भारताच्या राजधानीत फडकवत ठेवण्याचा प्रयत्न केला. दिल्लीत मराठी नाटकांचे प्रयोग याच निमित्ताने होतात. भारत रंग महोत्सव आणि META अशा संस्थाही राष्ट्रीय पातळीवर महोत्सवाचे आयोजन करतात. त्यात मराठी नाटकांची निवड होते का? ही निवड केवळ तुम्ही पाठविलेल्या डी.व्ही.डी. पाहून करतात. सुरवातीला मी यावर आक्षेप घेतला होता. प्रयोग पाहून निवड करा. त्यासाठी प्रत्येक राज्यात निवड समीतीची स्थापना करा. पण तसे होताना दिसत नाही. दिल्लीत बोलबाला आहे ईशान्यकडील आणि दक्षिणेकडील नाटकांचा कारण या नाटकात दृश्यात्मकतेला जास्त महत्त्व दिले जाते. संहिता काही पानांचीच असते, पण त्याचे दृश्यरूप तुम्हाला रिझवून ठेवते. मराठी नाटकात शब्दाला महत्त्व पर हल्लीची नाटके दोन्हीचा चांगला समन्वय साधून सादर होतात, पण तरीही दिल्लीपर्यंत पोहोचत नाहीत.

साहित्य संमेलनाध्यक्षांना वर्षभर अभ्यास दौऱ्यासाठी काही रक्कम दिली जाते. त्यात त्यांनी महाराष्ट्रभर फिरून साहित्यिक उपक्रमांचा अभ्यास करावा आणि वर्षाअखेरच्या साहित्य संमेलनाच्या वेळी अभ्यासाचा अहवाल व खर्चाचा हिशोब सादर करावा अशी योजना आहे.

अशाच प्रकारची योजना नाट्यसंमेलनाध्यक्षांसाठी असावी असे मला वाटते. विषय नियामक मंडळाच्या सभेत या योजनेला मंजूरी मिळवावी. सुरवातीला मी परिवर्तनाच्या नांदी बद्दल बोललो. आता भरत वाक्य म्हणतो, रंगभूमीवरून आपण जेव्हा सृजनप्रवासाला निघतो तेव्हा आपण आत्मशोधाच्या प्रवासाला निघतो. अंगभूत प्रेरणातून आपल्याला प्रेक्षकांना काही दाखवायचे आहे, सांगायचे आहे, त्यांच्याशी रंगसंवाद साधायचा आहे. आपल्यातल्या ऊर्मींना आविष्कृत करायचे आहे आणि अशा आविष्कारातून प्रेक्षकांना अंतर्मुख करावयाचे आहे. आपला हा आत्मशोध शेवटच्या श्वासापर्यंत चालू असतो. माझ्या बाबतीत असेच घडणार आहे.

रसिक हो, माझ्या अल्पबुध्दीनुसार समग्र रंगभूमीच्या व्यावहारीक स्वरूपाचे मला जे आकलन झाले ते आपणासमोर मांडले. संमेलनात व संमेलनाबाहेरही यावर साधक बाधक चर्चा व्हावी ही अपेक्षा व्यक्त करून आपली रजा घेतो.

धन्यवाद !



संमेलनाध्यक्ष श्री. अरूण काकडे यांचा परिचय व कार्य.

महाराष्ट्रातील प्रायोगिक नाट्यचळवळीत साठ वर्षे सक्रीय सहभाग असलेले 'प्रायोगिक नाटक' हाच एकमेव जिवीत हेतू मानणारे एक झपाटलेले व्यक्तिमत्व म्हणजे अरूण काकडे.

नाट्यजगतात अरूण काकडे हे त्यांच्यावरील प्रेमामुळे 'काकडे काका' या नावाने ओळखले जातात. 'रंगायन' (सन १९५६-१९७०) आणि 'अविष्कार' (१९७१ ते आजतागायत) अशा दोन प्रायोगिक नाट्यसंस्था यशस्वीपणे चालविणारे 'काकडे काका' म्हणूनच, प्रायोगिक नाट्य चळवळ चालविणारी 'एक सैनिकी फौज' 'One Man Army' आहेत असे म्हटले तर वावगे ठरू नये.



स्वत:मधील दडलेल्या उत्स्फूर्त अभिनेत्याला स्वेच्छापूर्वक रंगमंचावरील झगमगाटापासून दूर ठेऊन प्रायोगिक नाटकांच्या पडद्यामागे राहून काकडे काकांनी सातत्याने काम केले. सृजनांच्या अपूर्व नवनवोन्मेषांना, कल्पनांना आणि विचारांना अभिव्यक्त करण्यासाठी एक पवित्र असा रंगमंच हवा या प्रबळ इच्छेपोटी विजय तेंडूलकर, अरविंद आणि सुलभा देशपांडे यांच्या बरोबर १९७१ साली त्यांनी 'अविष्कार' या नाट्यसंस्थेची स्थापना केली. 'अविष्कार' ही 'मातृनाट्य संस्था' म्हणून ओळखली जाते. काकडे काका याच आघाडीवरून समांतर नाट्य चळवळीचे नेतृत्व करीत आहेत. पन्नासच्या दशकपूर्वार्धात पुण्याच्या वाडिया कॉलेजमध्ये शिकत असताना प्रा. भालबा केळकर यांच्या रूपाने काकडे काकांना सुयोग्य शिक्षक लाभला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली काकांनी रंगभूमी संदर्भातील कामाचे पहिले धडे गिरविले. यातूनच काकांच्या कार्याचा पाया घातला गेला आणि रंगभूमीच्या संदर्भातील श्रध्दाही सबळ बनल्या.

साठ वर्ष रंगभूमीशी संबंधीत असूनही काका अकारण भूतकाळात न रमता वर्तमान काळात जगत असतात आणि नेहमी भविष्यकाळाचा विचार करीत असतात. भारतातील प्रायोगिक रंगभूमीच्या प्रवासातील मैलाचा दगड मानली जाणारी 'रंगायन' नाट्यसंस्था स्थापन करणारे जे काही समविचारी साठीच्या दशक पूर्वार्धात एकत्र आले होते त्यापैकी 'काका' एक होते. सर्व ललित कलावंतांच्या प्रयोगशीलतेला वाव देणारी 'छबिलदास चळवळ' सत्तरीच्या दशकमध्यात जन्माला आली. या चळवळीच्या संयोजनात आणि संगोपनात 'काका' अठरा वर्षे सहभागी होते.

१९७४ ते १९९२ या कालावधीत काकांच्या भक्कम आधारावर आणि मार्गदर्शनाखाली ५० पेक्षा अधिक प्रायोगिक नाट्यसंस्थांनी छबिलदासच्या रंगमंचावर २००० पेक्षा जास्त नाट्यकृतींचे सादरीकरण केले.

मराठी रंगभूमीच्या इतिहासात २०० हून अधिक नाविन्यपूर्ण कल्पक प्रायोगिक नाट्यकृतींची निर्मिती व त्यांचे ७००० हून जास्त प्रयोग करणारे काकडे काका एकमेव व्यक्तिमत्व आहेत. ""Creativity if rightly pampered and moulded, can create wonders!" यावर काकांचा ठाम विश्वास आहे. संगीत नाट्य आणि पपेट्रीया क्षेत्रातील तज्ञांचा सहभाग व मार्गदर्शनाखाली अविष्कारने आतापर्यंत तरूण कलावंतांसाठी ६३ हून अधिक नाट्य प्रशिक्षण शिबीरे तसेच मुलांसाठी ६७ शिबीरे आयोजित केली आहेत. संशोधन व प्रयोगशीलतेने काकांनी लहान मुलांसाठी ३५ हून अधिक नाटके, पपेट शोज, नृत्यनाटिकांची निर्मिती

केली. दरवर्षी बदलणाऱ्या ३ ते ३० वयोगटातील जवळपास ५० कलावंतांचा समूह सादर करीत असलेल्या दुर्गा गौरी या नृत्यनाटिकेला गेल्या ३० वर्षांपासून प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

विजय तेंडूलकर, महेश एलकुंचवार चिं. त्र्य. खानोलकर, शंकर शेष, सत्यदेव दुबे यांसारख्या प्रस्थापित नाटककारांबरोबर चेतन दातार, चं. प्र. देशपांडे, इरावती कर्णिक, सुषमा देशपांडे यांसारख्या नवोदित लेखकांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या नाटकांची निर्मिती करण्यातही काकांनी पुढाकार घेतला.

काकांनी नाट्य दिग्दर्शनात विविध प्रयोग करण्यासाठी ज्यांना प्रोत्साहित केले अशा दिग्दर्शकांमध्ये पं. सत्यदेव दुबे, अरविंद देशपांडे, सुलभा देशपांडे, जयदेव हट्टंगडी, चेतन दातार, नीलकांती पाटेकर, प्रतिमा कुलकर्णी, अजित भगत, विजय केंकरे, दीपक राजाध्यक्ष, गिरीश पतके, विश्वास सोहोनी आणि अनेकांचा समावेश होतो.

काकांनी महेश एलकुंचवारांच्या वाडा चिरेबंदी, मग्न तळ्याकाठी, आणि युगान्त या नाटकांची एकत्रित साडे आठ तासांची त्रिनाट्य धारा ही अभिनव निर्मिती करून त्याचे ५० प्रयोग केले.

काकांनी बादल सरकार यांच्या अबूहसन या नाटकाचा अनुवाद करून त्याची निर्मिती केली.

अविष्कारमधून काकांनी प्रकाशीत केलेले साहित्य :

* रंगभूमीच्या दृष्टीने महत्त्वाची दोन पुस्तके :-
  * रंगनायक
  * तें आणि आम्ही
* दोन विशेषांक
  * आविष्कार – तिशी
  * आविष्कार – चाळीशी
* पाच नाटके
  * सावल्या – लेखक चेतन दातार
  * राधा वजा रानडे – लेखक चेतन दातार
  * ढोलताशे – लेखक चं.प्र. देशपांडे
  * बुद्धीबळ आणि झब्बू – लेखक चं.प्र.देशपांडे
  * बया दार उघड – लेखिका सुषमा देशपांडे

काकांच्या नेतृत्त्वाखाली आविष्कारने २६ महोत्सवांचे आयोजन केले ज्यात नाट्य प्रेमींना २०५ नाविन्यपूर्ण नाट्यकृतीची मेजवानी मिळाली. यात १५ तरुण दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेल्या विजय तेंडूलकरांच्या नाटकाचे दोन महोत्सव व महेश एलकुंचवारांच्या नाटकांचा महोत्सव यांचा समावेश होतो. नाविन्यपूर्ण कलाकृती आणि कलात्मकता यांना सफेद सतत उत्तेजन देण्याचा आपला ध्यास पुर्ण करताना काकांनी कुठलेही शिखर गाठायचे शिल्लक ठेवलेले नाही. काकांना मिळालेले काही महत्त्वपूर्ण मानसन्मान

* ९४ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष – २०१४
* नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार – २०१३ (महाराष्ट्र शासन)
* संगीत नाटक अकाडेमी पुरस्कार – २०१२ (नाट्य कलेच्या क्षेत्रातील सर्वांगीण योगदानासाठी)
* जीवन गौरव पुरस्कार – २०११ (झी टी.व्ही.)
* सह्याद्री नाट्य रत्न पुरस्कार – २००७ (सह्याद्री टी.व्ही.)
* महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कार – २००५ (महाराष्ट्र शासन)
* उत्तुंग गुणी जन पुरस्कार – १९९९ (उत्तुंग प्रतिष्ठान)
* गणेश सोळंकी स्मृती पुरस्कार – १९८४ (नाट्य दर्पण प्रतिष्ठान)

म्हंटली होती. पण श्रोता वर्ग प्रचंड असायचा फार गर्दी असायची. आणखी एक गोष्ट मला फार स्पष्ट आठवते आताचं तुमचं जिजामाता उद्यान आणि टिळक स्मारक आहे ना, तेव्हा टिकळ स्मारक नव्हतं. तिते फक्त असा चढ उंचवटा होता.

३० डिसेंबर ते १९५१ ते १ जानेवारी १९५६. अगदी स्पष्ट आठवतंय मला, साहित्य संमेलन झालं होतं. बाबुराव जोशी स्वागताध्यक्ष होते. त्या संमेलनात भरत नाट्य मंदिराच्या मंडळींनी 'कीचकवध' नाटक सादर केलं होतं. बाबुराव विजापुरे त्या नाटकात एका म्हाताऱ्याची भुमिका करत होते. काय प्रचंड गर्दी होती म्हणून सांगू, फुकट होतं ना, तिकीट वगैरे भानगड नसायची त्यामुळे प्रचंड गर्दी. पंढरपूरात तेव्हा गणेशोत्सवाच्या आसपास मेळे व्हायचे, ज्यांना पेटी, बँजो, तबला वाजवायला यायचा अशी हौशी मंडळी लहान मुलांना गोळा करायची आणि मग त्यांची लेझीम, टिपऱ्या, छान छान गाणी बसवायची या मुलांना एकसारखा असा गणवेश असायचा आम्हाला भारी हेवा वाटायचा त्यांचा. तेंव्हा कुठले असले छान छान कपडे आणि असा एकसारखा गणवेश! हां, त्यामुळे या मुलांबद्दल भारी हेवा वाटायचा. त्यांना छान आवरून मग बँडच्या तालावर वाजत गाजत कार्यक्रमापर्यंत आणायचे हे मात्र पहायला फार गर्दी व्हायची.

या नाच-गाण्याचं आकर्षण वाटल्यमुळे मी एकदा गेलो होतो गाणं शिकायला, अजुनसुध्दा स्पष्ट आठवतय पहा ते गाणं त्यांनी शिकवलं होतं चल माझ्या मावळ प्रांतात, हुरडा खायला शेतात.


पण मला काही ते नीटसं तेव्हा जमलंच नाही. आणखी एक गोष्ट मला आठवतीय पंढरपूरात 'महाराष्ट्र संगीत मंडळ' नावाच एक मंडळ होतं. जगन्नाथबुवा पंढरपूरकर, दामूआण्णा मंगळवेढेकर आणि बरेच चांगले कलाकार होते. त्यांचा वार्षिक कार्यक्रम असायचा. नाच,गाणी, संगीताचा हा कार्यक्रम कुठे व्हायचा सांगू! आता आपला पांडूरंगाचा रथ उभा असतो ना, त्याच्यासमोर पूर्वी खाजगीवाल्यांचा वाडा होता. फार मोठी जागा होती तिथे. आता तो वाडाही राहिला नाही आणि जागाही रिकामी दिसत नाही. पण तेंव्हा फार मोठी जागा होती तिथे. तिथे यांचे वार्षिक कार्यक्रम फार सुंदर व्हायचे. हे मात्र आम्ही आवर्जून पहायला जायचो अणि आता बोलण्याच्या ओघात आठवलं पंढरपूरचे रूक्मिणी मातेचे पुजारी आहेत ना उत्पात ही मंडळी सुध्दा भारी हौशी. ज्ञानोबा उत्पात तर इतके प्रतिभावान स्वत: लावणी तयार करायचे, स्वत: म्हणायचे, तमाशातील साऱ्या कलावंतांना शिकवायचे या साऱ्या कलावंतांना ज्ञानोबांचा भारी आदर वाटायचा.


अकलूजला तमाशा महोत्सव व्हायचा. मला एकदा तिथे पाहुणा म्हणून बोलावले होते. तिथे ज्ञानोबा आले होते. आणि काय सांगू? जेवढी म्हणून तिथे कलाकार मंडळी उत्सवासाठी आली होती ना, ती सारी बायका, पुरूष दोघेही ज्ञानोबाच्या पायाला हात लावून नमस्कार करायची, आशिर्वाद घ्यायची. फार मोठा कलावंत ज्ञानोबा. नंतर मी पुण्याला स्थायिक झालो अन् पंढरपूरशी माझा फारसा संबध नाही राहिला. पण पंढरपूरचा सांस्कृतिक वारसा फार मोठा आहे. आता तर नाट्यसंमेलन होत आहे. या निमित्ताने पुन्हा एकदा कलाकारांना संधी मिळेल, काही नवीन माहिती मिळेल. कलाकारांनी पुन्हा एकदा एकत्र येऊन नाट्यचळवळ सुरू करावी. नाटकांच्या स्पर्धा भरवाव्यात अगदी छोटी-छोटी १५-२० मिनिटांच्या एकांकिका. अशा सर्व स्पर्धा आयोजित करून छोट्यांमधला उत्साह वाढवता येईल. ते तयारच असतात शिकायला. तुम्हा मंडळींना नाट्यसंमेलनाच्या पुर्वतयारीसाठी खूप खूप शुभेच्छा!





गाढवाचं लग्न
नाट्यप्रयोग सादर
करताना


प्रदूषण
टाळा
पर्यावरणाचे
रक्षण करा


जल्लोष
नाट्यदिंडीचा


जल्लोष
नाट्यदिंडीचा


नाट्याविष्कार
सादर करताना
कलाकार

नाटक : संहिता ते प्रयोग

- प्रा. कमलाकर सोनटक्के

१. नाटक, चित्रपट आणि प्रसारमाध्यमांची रेलचल :

आज नाटयक्षेत्र, दूरदर्शन, चित्रपटमाध्यम आणि एकंदरीतच प्रसारमाध्यमाचे स्थान आमच्या सामाजिक जीवनाचा आणि जगण्याचा अविभाज्य भाग बनला आहे ही वस्तुस्थिती आहे. गेल्या दशकापासूनच्या चित्रपटांच्या संख्येत झालेली वाढ, त्यांचे चित्रपटगृहातील खेळ, तसेच दूरचित्रवाहिन्यांवरून अहोरात्र होणारे जुन्या नव्या चित्रपटांचे प्रसारण या साऱ्यामुळे प्रेक्षक संख्येत जाणता अजाणता वाढ झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या लोकप्रिय अनुदानाच्या धोरणांमुळे चित्रपटांच्या निर्मिती संख्येत वाढ झाली आहे. दूरदर्शन वाहिन्यांवर मालिकांची रेलचेल आहे. आणि विशेष म्हणजे खाजगी वाहिन्यांमध्ये नवनवीन चेहऱ्यांना प्रमुख भूमिकांमधून उतरावयाची चढाओढ सुरू आहे. दूरदर्शनवरील एका मालिकेत २ महिन्यात प्रेक्षकांसमोर आलेल्या कलावंतांना स्टार स्टेटस बहाल करण्यात प्रसारमाध्यमांना काहीच संकोच वाटत नाही. तो प्रसिद्धी स्ट्रॅटिजीचा मिलाजुला व्यवहार म्हणून आज मान्य झालेला आहे. समाजही या क्लुप्त्यांनी भुरळून जातो आणि कलावंतांवर प्रेम दाखवत स्वतःची प्रसिद्धी करून घेतो.

२. व्यावसायिक नाटकांची सद्यस्थिती :

व्यावसायिक नाटकांच्या प्रयोग संख्येचा अंकुश आला, नाटकांना बुकिंग नसते अशी ओरड असली तरी प्रत्येक महत्त्वाच्या दैनिकात दररोज दोन दोन पानांच्या नाटकांच्या जाहिराती सतत येत असतात. दिवसाकाठी मुंबई पुण्यात मिळून व्यावसायिक नाटकांचे २० २५ प्रयोग होत असतात. आता नाही तर पुढे तिकीट खिडकीवर प्रेक्षक वाढतील अशा आशेवर प्रयोग खेचले जातात. सरासरी ४०% बुकिंग असलेले नाटक चालणारं मानलं जातं. ही किमया महाराष्ट्र शासनाच्या लाखोंच्या अनुदानाच्या पॅकेजची आहे हे उघड सत्य सा-यांनाच माहीत आहे. खर तर व्यावसायिक नाटकांचे प्रयोग महाराष्ट्राच्या सहा महसुली विभागात पोचावेत हा सुष्ठ रसिकोपयोगी महत्त्वाचा उद्देशही बऱ्याच नाटकांच्या प्रयोगातून दुर्लक्षिला जातो. परंतु यावर अंकुश ठेवणारी यंत्रणा आज शासनाकडे नाही, ती अस्तित्वात आणली गेली तरी ती अमलात आणण्याचं कुणाचं नीतिधैर्य होणार नाही.

व्यावसायिक नाटकांच्या अनुदान योजनेत नाटयसंस्थांच्या प्रवास साधनांसाठी अनुदाने दिली जायला हवीत. महाराष्ट्रातील जवळपास सर्वच शहरातील नाटयगृहांची अवस्था, तेथील व्यवस्थापन हे अतिशय निकृष्ठ दर्जाचं असल्याच्या चर्चा संबधित करतात, परंतु त्यावर ठोस उपाय योजना मात्र अभावानेच होताना दिसतात. कारण यात कुणालाही अर्थस्वारस्य नसतं असंही बोललं जातं. ही रंगमंदिरे उभारताना असलेला स्थानिक संस्था सदस्यांचा उत्साह या कामात का दिसत नाही असे प्रश्न पडतात.

३. हौशी नाट्यस्पर्धांचं पुनरुज्जीवन

महाराष्ट्र राज्याच्या हौशी नाटयस्पर्धेचा एकेकाळी खूप दबदबा असायचा. अगदी १९९० च्या दशकापर्यंत प्राथमिक फेरीतील छोट्या शहरातील केंद्रावर ६०% पर्यंत प्रेक्षक संख्या असायची. मुंबईतील अंतिम फेरीला प्रेक्षागारं भरून जायची. संस्थांमधील चुरस, स्पर्धेतील नाटकांचे कल्पक विषय-आशय, अभिनय, तसेच तंत्राचा दर्जाही लक्षणीय असायचा. व्यावसायिक निर्मातेही या नाटकांना आवर्जून हजेरी लावायचे. कलात्मक आदानप्रदान व्हायचे. बरेचसे कलावंत, तंत्रज्ञ, नाटककार या स्पर्धांनी व्यावसायिक रंगभूमीला दिले. आज या स्पर्धांचा दर्जा, सादर होणाऱ्या नाटकांची गुणवत्ता आणि अत्यल्प प्रतिसाद यामुळे ह्या स्पर्धांचं आयोजन सर्वांसाठी चिंतेचा विषय बनलाय.

या स्पर्धांच्या आयोजनात आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. तद्वतच प्रत्येक केंद्रावर उत्तम नाटय निर्मितीसाठी प्रशिक्षण शिबिरं, परिसंवाद, चर्चा, रसिक मंडळाची स्थापना असे उपक्रम स्थानिकांच्या पुढाकारानं निरंतर राबवावे लागतील. अशा मूलगामी उद्देशांना शासनाचं प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य मिळायला हवं. हौशी नाटय चळवळीचा पाया छोटया शहरांपासून बांधला गेला तर या योजनेला पुन्हा झळाळी मिळेल, नव्या उद्देशांना शासनाचं प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य मिळायला हवं. हौशी नाटय चळवळीचा पाया छोटया शहरांपासून बांधला गेला तर या योजनेला पुन्हा झळाळी मिळेल, नवी उर्जा मिळेल आणि अप्रत्यक्षरित्या प्रायोगिक आणि व्यावसायिक रंगभूमीला तसेच चित्रपट, दूरचित्रवाणी आणि प्रसारमाध्यांना नव्या उमेदीचे, प्रादेशिक संवेदन आणि विशेष म्हणजे प्रादेशिक संस्कार आणि बोलीभाषांचा गोडवा घेऊन आलेले कलावंत मिळतील आणि व्यावसायिक नाटकांचा प्रेक्षक वाढण्याची शक्यताही निर्माण होईल. अशा नाटय चळवळीची उभारणी करण्यात नाटय परिषद, शैक्षणिक आणि सामाजिक संस्था, महिला मंडळं यांना या प्रक्रियेत त्यांच्या स्थानिक शाखा सक्रियपणे योगदान देता येणेही शक्य आहे.

४. प्रायोगिक रंगभूमी :

प्रायोगिक रंगभूमीवरचे प्रयास आणि प्रयोग हे दुर्दैवाने आज मुख्यत्वे मुंबईच्या आविष्कार आणि पुण्याच्या सुदर्शन भोवतीच रेंगाळताना दिसतात. त्यांच्या प्रयोगांचं मोल अर्थातच आहे पण त्यांच्या लक्षणीय नाटकांचे प्रयोग हे जिथं जिथं हौशी स्पर्धांची केंद्रे आहेत, किमान तिथं तरी अगत्यानं घडायला हवेत. शासनाच्या अनुदान योजनेचा १/४ भाग जरी यासाठी खर्ची पडला तरी ५ वर्षात त्याचे परिणाम सर्वदूर दिसून येतील.

५. कलावंताचं समाजातील स्थान :

कलेचा प्रांत हा तसा खूप संवेदनक्षम. कलाक्षेत्रानं नेहमीच समाजाच्या रंजनाबरोबरच उद्‌बोधनाचं, समाज घडवण्याचं मोलाचं काम केलं आहे. कलावंत हा नेहमीच समाजाच्या चार पावलं पुढे असतो. तो जीवन जगण्याचे, जीवनाला सामोरं जाण्याचे नवनवीन मानदंड निर्माण करीत असतो. जीवनातील सर्वसामान्य वाटणाऱ्या घटना, नातेसंबंध, जीवनातील समस्या, ताणतणाव उलगडून दाखवून, त्यातून तरून जाण्यासाठी, त्यावर मात करण्यासाठी प्रेरक ठरत असतो. कलावंत आपल्या कलानिर्मितीद्वारे समाजाचं प्रतिबिंब त्याच्या समोर ठेवत असतो आणि त्याबरोबरच किंमत आदर्शांचं चित्रणही करीत असतो. उत्तम कलाकार हा तसा समाजाचा मार्गदर्शक, मित्र आणि गुरू देखील असतो.

कलावंत मग तो कुठल्याही कलाक्षेत्रातला का असेना त्यांच्याकडून याच अपेक्षा असतात. दृक्कला

प्रत्येक नाटकात केला जातो. उद्देश एकच एका नाटकातून समग्र जीवनानुभवाचा प्रेक्षकांना अनुभव देणे.

११. लेखक - दिग्दर्शक संबंध :

व्यावसायिक स्तरावर लेखक-दिग्दर्शक-निर्माता ही त्रयी नाटकाच्या निवडीत प्रमुख असते.

काही नाटककार हे विशिष्ट नाट्यसंस्थेला आणि नट संचाला समोर ठेवून नाटकांची बांधणी करायचे. पूर्वीच्या नाटक कंपन्यांच्या काळात प्रत्येक कंपनीचे आपले नाटककार असायचे. वसंत कानेटकरांनी प्रभाकर पणशीकरांच्या नाट्यसंपदेसाठी अधिक नाटकं लिहिली. काही नाटककार विशिष्ट नट आणि नट्यांना समोर ठेवून नाटक लिहायचे. तर कधी नाट्यसंस्थांचा विचार न करता नाटककार नाटकं लिहित असत.

एक मात्र खरं प्रस्थापित नाटककारानं दिलेला नाटकाचा गोषवारा आणि साधारणतः एक अंदाजित आराखडा या स्वरूपात नाटक प्रथम स्वीकारलं जातं आणि नंतर लेखक-दिग्दर्शक-निर्माता ही त्रयी त्याला आस्ते आस्ते अंतिम स्वरूपाकडे नेत असते. कधी कधी ही प्रक्रिया काही महिन्यात घडते तर काही नाटकांच्या बाबतीत २-३ वर्षांचा अवधीही जातो. मराठी रंगभूमीवर आपल्या प्रयोगांच्या गुणवत्तेच्या आणि प्रयोग संख्येच्याबाबत इतिहास घडवणारी किमान ८-१० नाटकं अनेक निर्मात्यांचा नकार घेऊन पुन्हा काही वर्षानंतर प्रकाशात आणली गेली आणि विक्रमी ठरली ही पण वस्तुस्थिती आहे.

१२. प्रायोगिक रंगभूमीचं योगदान :

प्रायोगिक आणि हौशी रंगभूमीवर उपलब्ध संच हेच नाट्यनिर्मितीचं मुख्य भांडवल असंत. निवडीला इथं खूपच मर्यादित वाव असला तरी मर्यादित अर्थानंच तो प्रत्यक्षात उतरतो. सामान्यप्रमाणे इथं दिग्दर्शक संस्थाचालकच असतो. प्रगल्भ प्रायोगिक नाट्यसंस्था मात्र वेगवेगळ्या दिग्दर्शकांना मुक्तहस्त देतात. यामुळे नव्या दमाचे नाटककार शोधून घडवले जातात. तसेच नव्या दमाचे कलावंत, तंत्रज्ञ यांनाही प्रयोगात सहभागी करून घेतलं जातं. प्रयोगांच्या यशापयशाच्या ठोकताळ्यांपेक्षा, गणितांपेक्षा नव्या ऊर्जेचा, नव्या विषय आशय तसंच सादरीकरणाच्या पद्धतींचा शोध घणं हा इथं प्रधान हेतू असतो; अर्थकारणाची जुळवाजुळव करीत मर्यादित प्रेक्षकांसाठी, मर्यादित प्रयोगसंख्येचं लक्ष ठेवून एका समर्पित भावनेनं, निष्ठेनं ही मंडळी झपाटून काम करीत असतात. मर्यादित असली तरी ही मंडळी रंगभूमीच्या भवितव्याच्या दृष्टीने अतिशय मोलाचं योगदान देत असतात. प्रायोगिक चळवळीतून व्यवसायिक रंगभूमीला गेल्या २५ वर्षांत जवळपास ५०-६०% लेखक, दिग्दर्शक, तंत्रज्ञ आणि नाट्य कलावंतांची कुमक पोचवली गेली हे वास्तव आहे.

१३. व्यावसायिक नाटकांचं आर्थिक नियोजन :

आता दिग्दर्शक आणि निर्माता आर्थिक गणिताला नाटकाच्या यशापयशाच्या पारड्यात टाकून निर्णय घ्यायला सुरूवात करतात. गणित स्वच्छ असतं. प्रत्यक्ष नाट्यनिर्मिती आणि ३ महिन्यातील पहिल्या २५ नाट्यप्रयोगांसाठी निर्मात्याला जवळपास २०-२२ लाखांची तरतूद करावी लागते. ही केलेली तरतूद ज्यांच्या भरवशावर परतीची, वसुलीची आशा असते असा नटसंच आधी निश्चित करावा लागतो. यात ज्यांना 'फेस व्हल्यू' आहे, ज्यांना तिकिटबारीवर नाव आहे, ज्यांचा एक प्रेक्षकवर्ग आहे असे किमान २-३ कलावंत नाटकात असणं अपरिहार्य ठरतं. दुर्य्यम फळीत ३-४ सक्षम नट आपल्याला पाहिजे त्या तारखा देण्याच्या बोलीवर घेतले जातात. प्रधान नटांबरोबर किमान वर्षभर महिन्याला १२-१५ तारखा परस्पर सोईने देण्याचे अलिखित करार होतात आणि त्यानंतर नाटकाच्या तालमींच्या तारखा ठरतात. ही प्रक्रिया सामान्यपणे ३ महिने चालते. याच काळात नेपथ्यकार, संगीत दिग्दर्शन, आजकाल वेशभूषाकार ही सारी योजना सिद्ध होते.

१४. व्यावसायिक नाटकांच्या तालमी ते प्रयोग :

नाटकाच्या तालमींसाठी साधारणतः ३ महिन्यांचा कालावधी ठेवला जातो. आधीच्या दीड-दोन महिन्यात नटाच्या उपलब्धतेनुसार प्रत्येक दिवशी ३-४ तास

तालमी होतात. शेवटच्या महिन्यात सलग १५ दिवस तालमी, नंतर रंगीत तालमी आणि मुहूर्ताचे ५ प्रयोग असं गणित बांधलं जातं.

निर्मात्याची प्रतिष्ठा, आर्थिक तरतुदी यांच्या बळावर तसंच नाटकाची प्रकृती ध्यानात घेऊन कल्पकपणे जाहिरात केली जाते. एकावेळी कमाल ५ प्रयोगांची आणि किमान ३ प्रयोगांची जाहिरात व्यावसायिक दृष्ट्या किफायतशीर ठरते.

नाटकाच्या प्रत्यक्ष तालमींपूर्वी प्रधान नटनट्यांना त्यांच्या पात्रांची, नाटकाच्या विषय-आशयाची, चरित्रचित्रणाची अगदी तपशीलांसह जाणीव करून दिली जाते. तालमींच्या सुरूवातीला प्रत्येक अभिनेता हा आपल्या मनानं मानसिक तयारीनं भूमिकेच्या जवळ पोचलेला असतो.

जवळपास सारेच दिग्दर्शक आणि अभिनेतेही शब्दांच्या रंगभूमीवरील सामर्थ्याला खूप महत्त्व देतात. ते द्यावेच लागते. नाटकाची आणि नाट्यार्थाची समज अधिक समृद्ध करण्यासाठी नाटकाच्या एकल आणि सांघिक वाचनाला खूप महत्त्व दिलं जातं. नाटकाच्या प्रयोगाची प्रेक्षकांवरील श्राव्यमोहिनी आजच्या तंत्रमाध्यमांच्या बडेजावातही तीळमात्र कमी झालेली नाही. दूरचित्रवाणी, प्रसारमाध्यमं, चित्रपट, डबिंग अन्य व्यावसायिक यशस्वीतेत नटाच्या वाचिक, कायिक, सात्त्विक अभिनयाचा पूर्ण कस अभावानेच लागतो याची मनोमन जाणीव सर्व अभिनेत्यांना आणि रंगभूमीवरच्या साऱ्या घटकांना असते. याच एका जाणीवेनं आणि श्रद्धाभावनेनं कलावंत तालमींना अधिकाधिक सलग वेळ देण्याचा प्रयत्न करतात. तालमीच्या शेवटच्या पंधरा दिवसात कुठलंही शारीरिक, मानसिक दडपण न ठेवता ताज्यातवान्या उत्साहानं दिवसाचे ८-१० तास सारे केवळ नाटकाच्या तालमींना देतात. एकजिनसी संच आणि कल्पक दिग्दर्शक असेल तर प्रत्येक दिवसाची तालीम आदल्या दिवसाच्या कामाची औपचारिक उजळणी न ठरता प्रत्येक तालमीचं प्रत्येक सत्र नवनव्या गोष्टी शोधण्याची, उत्स्फुर्तपणे करून बघण्याची एक कार्यशाळा, एक प्रयोगशाळा ठरते आणि प्रत्येक जण आपापल्या परी काहीतरी वेगळं देत त्यात भर घालत असतो. ही नवनवीन पडत गेलेली भर मग बोललेल्या अभिनित केलेल्या शब्दांना, नाट्यघटनांना आणि पर्यायाने नाटकाला एक वेगळी सृजनशील उंची बहाल करीत असते. उत्तरोत्तराच्या सरावानं मग 'बसवून घेतलेल्या, ठरवून केलेल्या नाटकातील युक्त्या-क्लुप्त्यांनाही उत्स्फुर्ततेचा आणि सहजतेचा तजेला लाभतो. दहा-दहा तासांच्या रिआजामुळे नटांची दमछाक होऊन त्याची मौखिक, शारीरिक, मानसिक क्षमता वाढते. या प्रक्रियेमुळे आणि सलग रिआजामुळे त्याची क्षमता विनासायास अडीच-तीन तासाच्या प्रयोगात नव्या जोमाने अभिव्यक्त होत असते.

१५. नाट्यतंत्राची जोड :

विषय-आशयाच्या दृष्टीनं नाविन्यपूर्ण नाट्यसंहिता, जाणता दिग्दर्शक आणि सशक्त सक्षम अभिनेत्याची फळी ही जेवढी नाट्यप्रयोगाच्या दृष्टीनं महत्त्वाचे घटक असतात तेवढेच महत्त्वाचे घटक ही नाट्यप्रयोगाच्या उभारणीत महत्त्वाचे असतात आणि नाटक सुकरपणे, प्रभावीपणे, अर्थपूर्ण करून प्रेक्षकांपर्यंत पोचवण्यास उपकारक असतात.

१६. नाट्य प्रयोगातील नेपथ्याचं स्थान :

नाटक मग ते कुठल्याही शैलीचं असो, नाट्यघटना जिथं घडतात तो अवकाश नेपथ्यातून उभा केला जातो. अगदी वास्तववादी स्थळांपासून तो सूचक आणि प्रतिकात्मक अभिनय स्थळे उभी करून दिग्दर्शका एवढाच नेपथ्यकारही आपल्या कल्पकतेनं नेपथ्य उभारत असतो. दिग्दर्शका प्रमाणेच नाट्यसंहितेतील प्रत्येक घटनास्थळ, त्यांचा परस्परसंबंध, प्रधान आणि गौण रंगस्थळी याचे संकल्पित आराखडे तो दिग्दर्शकापुढे मांडतो. एकाच वेळी किमान ५-६ रंगस्थळीची निर्मिती ही त्याला करावीच लागते. नाटकाच्या आवश्यकतेनुसार काही दृष्यानंतर छोटे बदल तर मध्यंतरानंतर मोठे बदल अशी साधारण रचना केली जाते. पडदा उघडताच दिसणारं नेपथ्य हे नाटकाचं दृश्यरूप अविष्करण म्हणून मनावर ठसायला हवं असं मानलं जातं. ३५'×२०'×१४' च्या चौकटीत त्याला सारं

रंगस्थळ विश्व उभं करायचं असतं.

विशिष्ट स्थळकाळाचं विशिष्ट वर्गाचं, बांधणीचं, घाटाचं वास्तुरचनेचं वास्तववादीपासून ते काल्पनिक, कल्पनारम्य, तरल अमूर्त काव्यमयी विषयांसाठीचं नेपथ्य हे नेपथ्यकाराला कलात्मक आव्हान असतं. मात्र नेपथ्य साकारताना त्याला चित्रकार किंवा शिल्पकाराचं मुक्त स्वातंत्र्य असत नाही. त्याच्यासाठी कमानी रंगमंचाची तसंच वेगवेगळ्या नाट्यगृहातील मर्यादित रंगमंचाची, डाव्या-उजव्या बाजूच्या अपुऱ्या जागांची आणि दुसऱ्या बाजूला प्रेक्षक दीर्घांमधील शेवटच्या रांगेतील प्रेक्षकाच्या दृष्टी रेषांची काळजी घ्यावी लागते. दुसऱ्या बाजूला नाटकाच्या दौऱ्यात नाटकाच्या बसच्या टपावरच सारी नेपथ्य सामग्री केवळ दीड फूट उंचीच्या आत बसणारी आणि बसच्या १२'×६' टपावर बसणारीच सामग्री नेता येते हे आणखी बंधन. त्यानंतरचं बंधन असतं ते निर्मात्याच्या अर्थकारणाचं. हे सारं असूनदेखील आजकाल व्यावसायिक रंगभूमीवरील नेपथ्यकार स्वतः प्रशिक्षित असल्यानं, उत्तम इंटेरियर डिझायनर्स असल्यानं तसंच रंगप्रयोगाच्या प्रत्येक अंगांचा अभ्यास आणि व्यासंग असणारे असल्यानं 'स्थळ दिवाणखाना' साररूप्या अपेक्षांना ही ते अतिशय कल्पकतेनं आणि उत्सुकतेनं घडवताना दिसतात. बाहेरचा दरवाजा, तिथलं लँडिंग, नंतर खाली उतरणाऱ्या पायऱ्या, त्याचं रिलिंग लगेच व्यक्तिगत सचिवाचं कार्यालयीन टेबल-खुर्ची, पुढे भव्य दिवाणखाना, वरच्या बाजूची बेडरूम, डाव्या बाजूची टेरेस, फ्रेंचविंडो आणि साऱ्यांना रंगमंचापासून दिलेल्या वेगवेगळ्या पातळ्या, दरवाजे, भिंती काही सघन तर काही पारदर्शी, दरवाजे, पार्टिशन्स काही सघन तर काही पारदर्शी ठेवून खूप विविधता निर्माण केली जाते. द्विमितीतील नेपथ्यात जाड्या, चौकटी, छतांचे भाग, खांब, कपाटं, दारं-खिडक्यांच्या बाजबा अशा साधनांनी त्रिमितीचा भास निर्माण केला जातो. नंतर रंगसंगतीचं प्रभावी माध्यम; त्यातून तसंच वेगवेगळ्या रंगांचे गालिचे, कार्पेटस आणि सर्वात शेवटी सुयोग्य आसनव्यवस्था, टेबल, खुर्च्या, मोढे, सोफे, दीवाण आणि बैठका आणि त्यावरील टेपेस्ट्रीजची डिझाईन्स, रंग, पडद्यांचे रंग, सजावटीसाठी वापरेल्या वस्तू, दिवे, तावदानं या साऱ्यातून एक प्रगल्भ आणि अभिनयाला पोषक आणि उपयुक्त दृश्यबंध निर्माण केला जातो.

हा दृश्यबंध दिग्दर्शक, नेपथ्यकार आणि निर्माता यांच्या वारंवार होणाऱ्या चर्चांचा परिपोष असल्यानं दिग्दर्शक हा साऱ्यांचा नाट्यगत दृकसंगती आणि आर्थिक तरतुदी सांधे जोड करण्याचा प्रयत्न करतो.

नाटकाच्या तालमी उभ्या राहिल्यानंतर नटांच्या सराव आणि सोईसाठी प्रत्यक्ष रंगमंचाच्या मापानुसार नेपथ्याच्या आराखड्याची तंतोतंत मांडणी रंगीत टेप्सच्या सहाय्याने केली जाते. ४ इंच उंचीच्या चौथऱ्यापासून दुसरा मजला दाखवण्यासाठी ६ फूट उंचीचे चौथरे वापरून त्या खालून येण्याजाण्याचे दरवाजे आणि वरच्या मजल्यावरील पात्रं, पायऱ्यावरील पात्रं, दूरवरून बाहेरच्या दरवाजामधील पात्रं, गच्चीवरील पात्रं हे सारं विश्व खूप प्रभावी आणि नाट्यपूर्ण वाटतं, प्रेक्षकांना गुंगवून ठेवणारं सिद्ध होतं.

१७. प्रकाशयोजना :

नाटक जरी प्रेक्षकांना कमानी रंगमंचाच्या कमानीतून एकाच कोनातून दिसत असलं तरी दिग्दर्शक आपल्या समुहांकनाच्या पात्राचं दर्शन घडवत असतो. यात सामान्यपणे वेगवेगळ्या पात्रांच्या दृष्टीकोनातून त्यांच्याशी पात्रं ज्या रोखानं बघतात, बोलतात, त्यांच्या समीप किंवा दूर जातात. मध्येच विराम घेतात, वळतात, बसतात, उठतात, या साऱ्या क्रिया-प्रक्रियातून चित्रसंगतीचा अर्थानुसार समूह मेळ साधत असतो. जणू अनेक वेगवेगळ्या सघन, अर्थपूर्ण छायाचित्र प्रवाहित होतात, किंवा नाट्यकृती प्रवाहाला वेगवेगळ्या निश्चित छायाचित्रांत बांधलं जातं.

या समुहांकनात चित्रपट तंत्राचा जाणीवपूर्वक मोठ्या चतुराईने वापर केला जातो. हे चांगल्या नाट्यप्रयोगात अगदी शारदा, भाऊबंदकी, रणदुंदुभीपासून तो राजसंन्यास, श्रीमंत, जयजय गौरीशंकरसारख्या, शांतता कोर्ट चालू आहे, तो मी नव्हेच, वाडा विरेबंदी, नटसम्राट, रायगडाला जेव्हा जाग येते तसेच अलिबाबा आणि चाळिशीतले चोर आणि ठष्ठ नाटकांमधूनही दिसून यायचं. दूरस्थ दृश्य, मध्य दृश्य,

समीप दृश्य ते अगदी अती समीप. या रचनाकौशल्यात, या रचनेनुसार प्रत्येक पात्राचा आवाज, हातवारे, चेहऱ्यांवरील समीप दृश्यातील भावभावनांचे बारीक बारीक तपशीलही अधोरेखित केले जातात. कुणावर राग काढण्यासाठीचा थयथयाट व्यक्त करण्यासाठी घरातील कर्ता लांब लांब पावलं टाकत, हातवारे करीत गुन्हेगारांच्या समीप जातो. आणखी समीप, अगदी त्याच्या चेहऱ्यांवर वाकून त्याला शेवटचं निर्वाणीचं सांगतो या दृश्यात आवाज टिपेपासून सुरू होऊन सामान्य पट्टीत येऊन खर्जापर्यंत जाऊन, गुन्हेगाराला भीतीनं भिजवून टाकतो असा भाव प्रेक्षकांपर्यंत पोचवला जातो. नेपथ्याच्या योग्य जागा, नटाच्या वाचिक आणि कायिक अभिनयाबरोबर, चेहऱ्याचे सूक्ष्म भाव, डोळ्यांची बुबुळं आणि हाताच्या बोटातील अंगठ्यांपर्यंत समीप दृश्याच्या बांधणीत आणि अधोरेखित करण्यात प्रकाशयोजना खूप प्रभावीपणे साथ देते. याच दृश्यात पूर्ण प्रकाशमान रंगमंचापासून केवळ घरातील कर्त्याला प्रकाशित ठेवून अपराधी आणि कर्ता यांचे केवळ चेहरे त्रिमितीत केंद्रित करणारी प्रकाशयोजना नाटकात चित्रपटमाध्यमाचे किंवा एखाद्या उत्तम पेंटींग आणि चित्रा सारखे रंग भरते. यात फ्लड लाईट्स, पार लाईट्स, स्पॉट लाईट्स ते मिरर स्पॉट यांचा कल्पक कोनांमधून वापर केला जातो. दृश्यातील बदलत्या भावनांबरोबर नकळत प्रकाशयोजनाही बदलते. यात प्रकाशाचा फैलाव, घनता, तीव्रता आणि विविध रंगछटांचाही आणि सघन ते अंधुक छटांचाही वापर केला जातो. शिवाय प्रकाशयोजना घटनेची वेळ, भावदशा, त्या अभिनय स्थळाचं पोत आणि सामाजिक-आर्थिक स्तरही अधोरेखित करून मनावर ठसवते.

१८. पार्श्वसंगीत :


प्रकाशयोजनेप्रमाणेच नाटकाचं संगीत आणि पार्श्वसंगीत नाटकांचा स्वतंत्र घटक म्हणून महत्त्वपूर्ण योगदान देतं. संगीत नाटकांमध्ये प्रत्यक्ष साथसंगत करणारे नाटकाला प्रत्यक्ष, सजीव साथ देऊन कमीत कमी वाद्यांमधून अधिकाधिक उठाव देतात. यात पायपेटी, तबला, मृदंग, सारंगी किंवा व्हायोलिनचा वापर केला जातो. लोकधाटणीच्या नाटकात गायकवादकांचा वेगळा संच असतो आणि स्वर आणि तालाच्या किमान साधनांचा कल्पक वापर केला जातो.

व्यावसायिक गद्य नाटकात मग ते सामाजिक नाटक असो, विनोदी सुखात्मिका असो की प्रहसन असो, सामान्यपणे पूर्वमुद्रित संगीताचाच पार्श्वसंगीतासाठी वापर केला जातो. प्रत्येक संगीतकार दिलेल्या नाटकावर नाट्यदिग्दर्शक, नेपथ्यकार यांच्याप्रमाणेच सखोल अभ्यास करून आपली संगीतसंहिता तयार करतो. रेकॉर्डिंग करण्यापूर्वी तुकड्यातुकड्यांनी पार्श्वसंगीत ऐकलं जातं, तालमीत वाजवलं जातं, त्यावर गंभीर चर्चा होऊन एकदा सर्वसामान्यता मिळाल्यावर फायनल ट्रक स्टुडिओत तयार केले जातात. मिक्स्ड ट्रॅकबरोबरच अनमिक्स्ड ट्रॅकचाही स्वतंत्रपणे वापर काही महत्त्वाकांक्षी संगीतकार करतात.


नाटककाराचे वेगवेगळे आराखडे तयार होऊन त्यातून अंतिम आराखडा निवडला जातो. अगदी तांत्रिक तालमीपर्यंत, किंबहुना पहिल्या पाच प्रयोगांपर्यंत सर्व विभागात छोटे-मोठे बदल घडत असतात. कित्येक वेळा नटाच्या आगमन-निर्गमनासाठी, कपडे बदलण्यासाठी लागणारा वेळ यामुळे सुद्धा १०-१५ सेकंदांचा वेळ वाढू-घटू शकतो. मात्र हे सारे बदल बहुशः सामंजस्यानं, संघभावनेनं, अहंकार, रागलोभाविना केले जातात. अंतिम लक्ष असतं ते उत्तम नाट्य प्रयोगाचं आणि त्याला मिळणाऱ्या प्रेक्षकांच्या पावतीचं.

१९. नाट्य आणि कला प्रशिक्षणाचं स्थान :

रंगभूमी आणि नाटकाच्या निर्मितीप्रक्रियेचं ओझरतं दर्शन घेतल्यानंतर ह्या क्षेत्राच्या जबाबदाऱ्यांची जाणीव व्हावी. या क्षेत्रात येणाऱ्या ग्रामीण नागरी युवकांसाठी आज व्यावसायिक प्रशिक्षण, पारंगतता अभ्यासक्रम तसंच अनुभवी मातब्बर व्यक्तीच्या सोबत प्रत्यक्ष कार्यानुभव घेण्याची नितांत गरज आहे. अंगभूत गुणवत्ता, प्रज्ञा असली तरी तिला वळण देण्यासाठी प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष कार्यानुभवाची अत्यंतिक गरज आहे. हा विषय स्वतंत्र लेखाची अपेक्षा करणारा आहे.



उदघाटन प्रसंगी संमेलनाध्यक्ष
श्री. अरुण काकडे आणि
परिषदेचे अध्यक्ष मा. मोहन जोशी



उदघाटन प्रसंगी माजी संमेलनाध्यक्ष
पद्मश्री डॉ. मोहन आगशे आणि
स्वागताध्यक्ष मा. आ. भारतनाना भालके

अभिनय - एक सर्जनशील कला

- डॉ. दिलीप घारे, औरंगाबाद

एखादा अनुभव, समग्र अनुभूती सुनियोजीत पद्धतीनं, अभिव्यक्तीचं योग्य माध्यम निवडून मानवी भावभावना योग्य रीतीनं व परिणामकारकतेनं मांडली जाते तेंव्हा तिला कलेचं रूप प्राप्त होतं.

संगीत, चित्र, शिल्प, नृत्य, नाट्य आदि महत्त्वाच्या कला मानल्या गेल्या आहेत. अभिनयकलेचा समावेश प्रामुख्यानं नाट्यकलेत केला जातो. नाटक ही रंगमंचीय कला आहे. रंगमंच आणि रंगभूमी यात मूलभूत फरक आहे. रंगमंच नाटकाचं स्थूल रूप व्यक्त करतो तर रंगभूमी नाटकाचं सूक्ष्मरूप व्यक्त करते.

नाट्यकलेच्या पूर्णत्त्वात अभिनय, नेपथ्य, प्रकाश, रंगभूषा वेशभूषा, पार्श्वसंगीत तसेच प्रेक्षकांची सामूहिक मन:स्थिती या सगळ्यांचा सक्रिय सहभाग असतो, रंगमंचावर उभी केलेली सृष्टी आपल्या जीवनाप्रमाणे स्थिर नसून गतीशील असते. आयुष्य जसं विविध प्रसंगातून, घटनाक्रमातून पुढे सरकत शेवटाकडे जातं तसंच नाटकाचा घटनाक्रम एका स्थितीतून दुसऱ्या स्थितीपर्यंत विकसीत होत पुढे जातो. या प्रक्रियेतही आयुष्याप्रमाणे गेलेला क्षण परत येत नाही. नाटकात सर्वकांही वर्तमानातच घडतं. आधी घडलेलं, भविष्यात घडणारं महत्त्वाचं असलं तरी सर्व कार्यव्यापार वर्तमानात घडत असतो. ज्याप्रमाणे कला स्थिर असते पण रंगमंच गतिशील असतो. नाटकाच्या निर्मितीत इतर कलांचा वापर होत असला आणि नेपथ्य, प्रकाश, वेशभूषा आदि घटकांचाही वापर होत असला तरी नाटकांतून जे सांगायचे आहे तसेच ज्या पद्धतीने सांगायचे आहे त्या विशिष्ट पद्धतीनेच सर्व कला व घटक वापरले जातात. थोडक्यात रंगमंचाची ही कला ना अभिनयात आहे, ना दृष्यात, ना नृत्यात, तर या सर्व कलांमधील तत्त्वांचा समन्वय असतो ज्या तत्त्वातून या कलांची निर्मिती होते.

नटाचे शरीर हाच रंगमंचाचा मूळ गाभा आहे. पण तरीही नाट्यतज्ञांनी नटाच्या अभिनयापेक्षा, शब्दोच्चारांपेक्षा, शरीराच्या गतिमानतेला अधिक महत्त्व दिले आहे. नाटकाची स्वत:ची एक भाषा तयार होते ती म्हणजे रंगभूषा, रंगमंच व्यापून टाकणारे जे कांही असेल जे दृष्ट्यरूपात व्यक्त करता येईल आणि ज्याचे आवाहन मनाऐवजी संवेदनांना असेल अशा सर्व गोष्टींची मिळून रंगमंचाची भाषा बनते. ही भाषा शब्दांशिवायची असते. ती मूकाभिनयाची, प्रतिकात्म चिन्हांची, आविर्भाव व भाववृत्ती यांची असते.

अभिनय कला

नटाची कला किंवा अभिनयकला ही सर्जनशील कला आहे, कारण नट हा अमूर्त स्वरूपात असलेले पात्र मूर्त स्वरूपात रंगमंचावर उभे करतो. नट नाटककाराने उभ्या केलेल्या भूमिकेत किंवा पात्राच्या आत उतरून त्याच्या शब्दांना स्वत:चे शरीर, आवाज, विचार देऊन जिवंत करतो. नट संवाद केवळ बोलत नाही तर अभिनीत करतो. नट मानसिक पातळीवर देखील समरस होऊन शब्दांच्या अर्थमयी विश्वात प्रवेश करतो आणि श्राव्य विश्व, संवाद यांचं दृश्यरूप बनण्याची किमया करून दाखवतो. नट रंगमंचावर जे बोलतो ते ऐकण्यापेक्षा अधिक डोळ्यांनी पाहण्यासाठी असते. खरं तर लिखित शब्दांपेक्षा बोललेल्या शब्दांची शक्ती जास्त असते आणि ही शक्ती रंगमंचावर नटच देतो. ही बाब इतर सर्जनशील कलावंतांपेक्षा नटाच्या वेगळ्या आणि भिन्न क्षमतेला प्रकट करते. नट नाटककाराचे शब्द आणि

दिग्दर्शकाकडून गतिशीलतेसंबंधी सूचना घेऊन या दोघांनी निर्धारित केलेल्या सीमारेषेच्या आत दृश्य आणि श्राव्य प्रतिमा उभी करतो. नट नाटककाराचे संवाद अशा रीतीने बोलतो की जणू ते लिहिले गेलेले नाहीत. तसेच संवादबरोबरच हातवारे, कार्यव्यापार, रंगभूषा, वेशभूषा यांच्या सहाय्याने असे चित्र निर्माण करतो की तो ते विशिष्ट पात्र वाटू लागतो. नट हावभाव, मुद्रा आणि गतिशीलता यांचा अशाप्रकारे कलात्मक उपयोग करतो की रंगमंच सतत प्रवाही राहील. नट आंगिक अभिनय, वाणी, रंगभूषा, वेशभूषा यांच्या माध्यमातून पात्र उभे करतो आणि प्रेक्षकांना रसास्वादाकडे घेऊन जातो. खऱ्या अर्थाने नट हाच रंगमंचाचा प्रमुख सर्जनशील कलावंत असून तोच नाट्यभिव्यक्तीचं मुख्य माध्यम असतो. भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात अभिनयाची व्याख्या खालील प्रमाणे करण्यात आली आहे. अभि+नय=अभिनय 'अभि' म्हणजे 'कडे' आणि 'नय' म्हणजे 'नेणे'. लेखकाच्या आशयाकडे प्रेक्षकांना घेऊन जाणे. आधुनिक नाट्यतत्रज्ञानं हाच धागा पकडून नवीन व्याख्या केली आहे - ती अशी, ''लेखकाच्या आशयाकडे प्रेक्षकांना घेऊन जाणे आणि हे करताना त्या विशिष्ट भूमिकेसारखं दिसणं, बोलणं, चालणं, वागणं आणि वृत्ती ठेवणं म्हणजे अभिनय.'

अभिनयकलेत दोन तत्त्व प्रामुख्यानं दिसून येतात. मूकाभिनय आणि वाणी (आवाज). मूकाभिनयात हावभाव, रंगभूषा, कार्यव्यापार गती यांचा सामवेश होतो आणि वाणी किंवा संवाद हे मानवी आवाज, ध्वनी यांची वैशिष्ट्ये यांच्याशी संबंधित मानले जातात. या दोन्ही गोष्टींचा संयोग रंगमंचावर जीवनाची अभिव्यक्ती करतो. नट शरीर आणि वाणी (आवाज) या त्याच्या साधनसमाग्रीचा उपयोग करतो.

नटाची व्यक्ती म्हणून स्वत:ची एक बैठक असणे पण अभिनय करताना तो स्वत:च्या व्यक्तीत्त्वाची तसेच व्यक्तीमत्त्वाची वैशिष्ट्ये बाजूला काढून ठेवून कच्च्या मडक्याप्रमाणे स्वत:ला भूमिकेच्या स्वाधीन करतो, म्हणजेच नटाची दोन रुपं असतात. एक तो स्वत: आणि दुसरा स्वत:वर आरोपित केलेलं व्यक्तित्त्व. नट प्रथम बुद्धिच्या सहाय्याने मनात भूमिकेच्या व्यक्तित्त्वाचं चित्र निर्माण करतो. विशिष्ट भूमिकेच्या व्यक्तित्त्व तसेच 'व्यक्तिमत्त्व निर्मिती' आरोपीत करण्याच्या किंवा संक्रमणाच्या अवस्थेतच तो अभिनय करतो. पहिल्या व्यक्तित्त्वाचे दुसऱ्या व्यक्तित्त्वात संक्रमण ही गोष्ट, क्रिया नटाला सर्जनशीलतेच्या पातळीवर नेत आणि अभिनयाला कलेच्या उंचीवर घेऊन जाते. स्वत: निर्माण केलेली ही अजब सृष्टी मात्र नट स्वत: पाहू शकत नाही.

रंगमंचाची कला किंवा अभिनयकला ही सत्याभास निर्माण करण्याची कला आहे त्याचप्रमाणे वास्तववादापेक्षा वास्तवाचा आभास निर्माण करणे हेच अभिनय कलेचे उद्दिष्ट आहे. अभिनय करताना भावभावना महत्त्वाच्या असल्या तरी सादर करताना परिणामकारकतेसाठी एक सुनियोजित बाह्य गोष्टींचे प्रदर्शन अत्यावश्यक असते. प्रत्येक भावना विशिष्ट शारीरिक अंगविक्षेपातून व्यक्त होते. म्हणून कोणत्यावेळी शरीराचे कोणते अंग कशा रीतीने वापरायचे याची नटाला उत्तम जाण असायला हवी. नट स्वत:वर आरोपित केलेल्या काल्पनिक संवेदना, भावभावनांची आंगिक अभिव्यक्ती करून सृष्टी निर्माण करतो, जी प्रेक्षकांना वास्तववादी वाटते. पण नट मात्र आविष्कार करताना अति समरस न होता शरीराच्या किंवा बाह्य संकेतांच्या, चिन्हांच्या सहाय्याने कलेचा अविष्कार करतो. हीच गोष्ट अभिनयकलेला सर्जनशीलतेच्या पातळीवर नेते. इतर कला प्रकारात अभिव्यक्तीचे वेगवेगळे साधनद्रव्य असते. अभिनयकलेत नटाचे शरीर हेच त्याचे साधनद्रव्य असते. शरीर हेच नटाचे वाद्य असते. ते सुरातच असले पाहिजे. नट अंत:प्रेरणा आणि यांत्रिकता अशा दोन्ही पद्धतीने अभिनय करतो. दोन्ही पद्धतीत गुण आहेत तसेच दोषही आहेत. यांत्रिक पद्धतीत वास्तवाचा आभास निर्माण करण्याच्या नटाच्या कार्याला जास्त उठाव मिळतो. कांही नट आंगिक अभिनयाकडून आंतरिक अनुभूतीपर्यंत पोहोचतात तर कांही नट आंतरिक अनुभूतीकडून बाह्य तसेच आंगिक अंगविक्षेपाकडे जातात. पण तरीही योग्य परिणाम साधण्यासाठी दोन्ही पद्धतींचा समन्वय जास्त योग्य ठरतो.

शरीर, आवाज ही नटाची आयुधं आहेत आणि कल्पनाशक्ती, निरीक्षणशक्ती आणि एकाग्रता हे गुण आहेत.

नट स्वत:च्या आयुधं, गुण आणि अभिनयतंत्राच्या

सहाय्याने भूमिकेची निर्मिती करतो आणि रंगमंचावर एक नवीन सृष्टी निर्माण करतो.

भूमिकेची निर्मिती

भूमिका सादर करताना नट संपूर्ण नाटक वाचून काढतो. नाटकातून काय सांगायचे आहे. तसेच हे करताना कथावस्तू विविध प्रसंगातून कशी मांडले आहे, त्यात आपले स्थान काय आहे याचा विचार करतो. नाटकाच्या मूळ कल्पनेवरून तसेच नाटककाराने पुरविलेल्या माहितीवरून आपण करणार असलेले पात्र, भूमिका कशी दिसत असेल. त्याचं बोलणं, वागणं कसं असू शकेल याविषयी नट स्वत:ची टिपणं तयार करतो. नाटकात पात्राविषयी सर्वच माहिती तपशीलवार दिलेली असते. वर्तमानात ते पात्र कोण, काय, कसे आहे याविषयी थोडीफार माहिती दिलेली असते. उपलब्ध माहितीचा उपयोग करून नट कल्पनाशक्तीच्या आधारे त्या पात्राच्या जीवनातील तर्कशुद्ध आणि सलग प्रसंग शोधण्याचा प्रयत्न करतो आणि अशा सलग प्रसंगांची मालिका, साखळी शोधण्यात त्याला यश आल्यावर भूमिकेच्या पूर्वायुष्यातील अनुभवांचा आधार घेऊन भूमिकेचे रूप व स्वरूप ठरवतो. आपल्या भूमिकेचे नाटकातील स्थान काय? कोणते कार्य करण्यासाठी ही भूमिका नाटककाराने निर्माण केली आहे. त्याला पूरक हालचाली, हावभाव असायला हवेत, वातावरण आणि इतर पात्र यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट झाले तरच नटाची रंगमंचावरील कृति समर्थनीय ठरते. सर्वात महत्त्वाची बाब ही की या सर्जनशील प्रवासात अंत:स्फूर्ती महत्त्वाची असली तरी पात्राची बांधणी केवळ स्फूर्तीच्या आधारे करणे कठिण आहे. पात्ररुपात स्वत:ला विसरून जाऊन केलेली कृति सर्जन ठरत नाही. कारण तिथं नट व्यक्ति म्हणून न उरता पात्र झालेला असतो. त्यामुळे पात्र, भूमिका नटाचा ताबा घेते. नट एखादी भूमिका, पात्र उभे करताना ते स्वाभाविक वाटेल, त्याच्या कृतीत उत्स्फूर्तता असेल अशा पद्धतीने करतो. ती कृती खरी वाटली पाहिजे आणि हे सर्व तेव्हाच शक्य होते जेव्हा पात्राच्या विविध व्यवहारावर नटाचा ताबा असेल.

नटाने मानसिक साधनांबरोबर, शरीर, आवाज या साधनांचा उपयोग आंतरिक अनुभवाच्या अभिव्यक्तीसाठी केला तरच अभिनयकलेचा हेतू साध्य होईल.

माझ्या प्रितीच्या फुला SSS !

स्वा. सावरकर साहित्य संमेलन पंढरीत भरलं होतं, त्यानिमित्तानं सावरकर लिखित काही नाटकं अथवा त्यातील प्रवेश सादर करण्याची कल्पना अमलात आणली होती.. पंढरीतील अनेक नाट्यसंस्थांनी आपापले प्रयोग सादर केले होते. आम्ही 'सागरा प्राण तळमळला' या नाटकाच्या आधारे 'मृत्यूंजय' हे सारांश नाटक सादर करीत होतो. सावरकरांची भूमिका बंडोपंत महाजन हे मोठ्या हौसेने करीत होते. मी ब्रिटीश वॉर्डनची भूमिका करीत होतो. सावरकर साहित्य संमेलनात प्रत्यक्ष सावरकरांची व्यक्तीरेखा पहायला मिळणार याचं प्रेक्षकांनाही अप्रुप होतं. गर्दीही तुंबळ झालेली होती पण या प्रेक्षकांत सावरकर प्रेमी आणि सावरकर अभ्यासक अधिक होते. असे प्रेक्षक पुढे असले की नाही म्हटलं तरी काहीसं दडपण असतंच..!

मा. गोविंद भातलवंडे यांनी अंदमानाचा सुंदर सेट लावलेला होता. हातात बेड्या, पायात साखळदंड अशा अवस्थेत सावरकरही सजले होते, त्यांना चांगलंच स्फुरण चढलं होतं.. नाटकही मस्त रंगात चाललेलं होतं. ब्रिटीश जेलर बारी आणि सावकार यांच्यातील जुगलबंदी जोरात सुरू होती. पायातील साखळदंडाचा एक हुक अचानक निघाल्यांनं लोखंडाची एक पट्टी महाजन यांच्या जांघेत रूतत होती पण ते हिमतीने काम करीत होते. ते एवढ्या जोशात आले की त्यांच्या हातातील बेडी तुटून प्रेक्षकांत जावून पडली. महाजन यांना ते जोशपुर्ण वाटलं खरं पण प्रेक्षकातून आवाज आला, 'सावरकरांनी कधी बेड्या तोडल्या होत्या होऽऽ'

एक प्रसंग कसाबसा निभावला पण नंतर मात्र जी चूक झाली ती केवळ अक्षम्यच! अंदमानच्या तुरुंगवासात सावरकर कोलू (घाणा) फिरवतात आणि मध्येच थांबून म्हणतात, 'ने मजशी ने परत मातृभूमीला... सागरा प्राण तळमळला...' आणि या नंतर याच गाण्याची रेकॉर्ड सुरू होते. सावरकर कोलू फिरवतात. प्रसंग अगदी हृदय हेलावणारा... प्रेक्षकही रममाण झालेले... सावरकर झालेल्या महाजनाचे संवाद संपले आणि रेकार्ड वाजू लागली, 'माझ्या प्रितीच्या फुला..' आतमध्ये टेक्नीशियननं रेकार्ड काढून ठेवली होती पण आयत्या वेळी तिची दुसरी बाजू सुरू झाली... लक्षात येऊन हे थांबेपर्यंत व्हायचं ते झालं होतं... बेअरिंग सोडून महाजन आत आले आणि प्रेक्षकांत एकच गलका झाला... ! सावरकरांच्या तोंडी हे गाणं कुणाला रुचणार आहे?

– अशोक गोडगे

९४ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!

ISO 9001:2008 CERTIFIED



कै. आण्णासाहेब सोनवणे हॉस्पिटल

(ऑर्थोपेडिक्स ॲण्ड ट्रॉमा सेंटर)

कर्नल भोसले चौक, पंढरपूर. फोन : २२३७५५



डॉ. मंदार सु. सोनवणे

एम.बी.बी.एस.,डी.आर्थो.
(अस्थिरोग तज्ञ)
वेळ : स. १२ ते दु. ३ व सायं. ६ ते ९

डॉ. सौ. ऋचा मं. सोनवणे

एम.बी.बी.एस.,डी.ए.
(भूल तज्ञ)
वेळ : स. ११ ते दु. ३ व सायं. ६ ते ८



*** उपलब्ध सुविधा ***

* मणक्याचे विकार * हॅन्ड सर्जरी * संधीवात * न जुळलेले फॅक्चर * इलीझारो * ऑर्थोस्कोपी पोलीओ
* जन्मजात अपंगत्व * फिजिओथिरपी सेंटर * डिजिटल एक्स-रे * सेंट्रल ऑक्सिजनची सुविधा.



९४ व्या अ.भा. मराठी नाट्य संमेलनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत माहिती देताना अध्यक्ष मोहन जोशी, स्वागताध्यक्ष आ. भारतनाना भालके आणि कार्याध्यक्ष विनोद महाडिक व पदाधिकारी.



९४ व्या अ.भा. मराठी नाट्य संमेलनाच्या निमित्ताने प्रशासकीय अधिकाऱ्यांशी हितगुज करताना अध्यक्ष मोहन जोशी, कार्याध्यक्ष विनोद महाडिक, डॉ. मंदार सोनवणे व दिलीप कोरके.



९४ व्या अ.भा. मराठी नाट्य संमेलनासाठी उभारण्यात येणाऱ्या भव्य दिव्य अलिशान मंडप उभारणीचे उद्घाटन करताना अध्यक्ष मोहन जोशी, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत कदम, तहसिलदार सचिन डोंगरे आणि परिषदेचे पदाधिकारी.



९४ व्या नाट्य संमेलनाच्या स्वागतासाठी आकर्षक वेशभुषेत बंजारा नृत्याची तयारी करताना शालेय विद्यार्थिनी.

९४ व्या अ.भा. मराठी नाट्य संमेलनाच्या विनय आपटे रंगमंचाचे उद्घाटन करताना परिषदेचे श्रीपाद जोशी आणि पंढरपूर शाखेचे सर्व पदाधिकारी.





९४ व्या अ.भा. मराठी नाट्य संमेलनासाठी उभारण्यात आलेला भव्य दिव्य अलिशान मंडप व बैठक व्यवस्था.

९४ व्या अ.भा. मराठी नाट्य संमेलनात 'गाढवाचे लग्न' हे नाटक सादर करताना परिषदेचे कलावंत.





९४ व्या अ.भा. मराठी नाट्य संमेलनात 'गाढवाचे लग्न' या नाट्य प्रयोगात अभिनय करताना परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी व कलावंत.



नाटककारांच्या व्यथा

- अशोक पाटोळे, मुंबई

मला कुणी नाटककार समजतं की नाही माहिती नाही. पण मी ''आई रिटायर होतेय'', ''चार चौघांच्या साक्षीने'', ''देखणी बायको दुसऱ्याची'', ''मी माझ्या मुलांचा'', ''हीच तर प्रेमाची गंमत आहे'', वगैरे नाटकं लिहिलीयत. ती लोकांनी शेकडो प्रयोगांपर्यंत चालूही दिली त्या अर्थी मी कदाचित नाटककार असेनही. आणि जर मी नाटककार असेन तर इतर रंगकर्मींप्रमाणे एक नाटककार म्हणून माझे काही प्रश्न आहेत. ते प्रश्न ह्या पंढरपूरच्या नाट्यसंमेलनाच्या निमित्ताने विठ्ठलाच्या साक्षीने मांडायचा मी प्रयत्न करतो. पुढे मागे कधी नाट्यरसिकांना किंवा नाट्यपरिषदेला किवा चुकून शासनाला सद्‌बुद्धी झालीच तर ह्या प्रश्नांची दखल घेतली जाईल अशी आशा आहे.

माझा पहिला प्रश्न आहे, नाटककाराला लोक साहित्यिक समजतात का? आणि समजत असतील तर मग साहित्यसंमेलाच्या अध्यक्षपदासाठी नाटककारांची वर्णी का लागत नाही? आणि नाटककार हा जर साहित्यिक नसेल तर मग नाटक हा काय प्रकार आहे? साहित्य ह्या प्रकारात नाटक बसत नाही का ? नाटककार हा लेखक आहे हे समाजाला मान्य नाहीय का? मला तरी वाटतं नाटककाराला हल्ली कुणी लेखक मानत नसावं. कारण तसं नसतं तर साहित्य संमेलनच काय नाट्यसंमेलनातसुद्धा नाटककार अभावानेच सहभागी करून घेतला गेलेला दिसतो. व्यासपीठावरील सन्माननीय व्यक्तींच्या मांदियाळीत नाटककार सोडून सगळेच सहभागी झालेले दिसतात. नाटककार हा जर रंगभूमीचा मुख्य घटक असेल तर नाटककारांसाठी बसण्याची तरी सोय संमेलनात असायला हवी. पण संमेलनाच्या ठिकाणी नाटककारांसाठी योग्य ते स्थान दिलं जात नाही असं माझं निरीक्षण आहे. (पंढरपूरचं संमेलन ह्याला अपवाद असेल तर गोष्ट वेगळी) हे झालं संमेलनाचं. आता जी नाटकं रंगभूमीवर येतात त्यांच्या भवितव्याचा विचार करू. आज दर वर्षी शंभरएक तरी नाटकं रंगभूमीवर येतात. त्यातली काही गाजतात काही पडतात. पण नाटकं कितीही गाजली तरी ती छापायला कुणी प्रकाशक तयार होत नाही. त्याचं कारण सांगताना बहुतेक प्रकाशक रडतात की नाटकं कुणी विकत घेत नाही. ती वर्षानुवर्षे धूळ खात पडतात. आणि त्यांच्या छपाईवर झालेला खर्च फुकट जातो. पण हे नाटक नावाचं साहित्य फुकट जातं त्याचं काय ? महाराष्ट्रात राज्य नाट्यस्पर्धा होतात. असंख्य एकांकिका स्पर्धा होत असतात. त्या निमित्ताने शेकड्यांनी एकांकिका आणि पूर्ण लांबीची नाटकं लिहिली जातात. असंख्य चमकदार कल्पना आणि माणसाच्या सध्याच्या प्रश्नांचा व समस्यांचा मागोवा असलेल्या ह्या एकांकिका आणि नाटकं स्पर्धेनंतर रद्दीत जातात. हे आपल्या नाट्यरसिकांना आणि नाटकवाल्यांना मान्य आहे? प्रकाशकांनी पाठ फिरवल्यामुळे ही नवी नाटकं आणि हे नाटककार

काळाच्या ओघात गडप झालेली आपल्याला चालतात? तरुणाईच्या भाव-भावनांचा अविष्कार असलेली ही नाटकं कुणीतरी जतन करणं गरजेचं आहे. ते कसं करायचं ते ह्या संमेलनाच्यानिमित्ताने चर्चेत आलं तर बरं होईल.

आजच्या घडीला नाटकं लिहिणं म्हणजे आयुष्य फुकट घालवण्यासारखं आहे. कित्येक दिवस कदाचित कित्येक महिने मनात खदखदत असलेला विषय नाटककार पोडतिडिकेने नाटकात मांडतो. ते त्याच्या सुदैवाने व्यावसायिक रंगभूमीवर येतं. जर ते चाललं तर त्याचं श्रेय स्टार कलाकारांना (कारण हल्ली मालिकांमध्ये चमकणाऱ्या स्टार्सना घेतल्याशिवाय निर्माते नाटकच काढत नाहीत) किंवा दिग्दर्शकाला दिलं जातं. समीक्षक बहुतेकवेळा नाटककारालाच अगदी व्यक्तिगत पातळीवर जाऊन झोडपतात. त्याला दुसऱ्या दिवशी घरातून बाहेर पडायची सोय ठेवत नाहीत. नातेवाईक आणि मित्र त्यादिवशी मुद्दाम फोन करून सांगतात की तुझ्या नाटकाचा रिपोर्ट वाचला. कधी चुकून चांगला आलाच रिपोर्ट तर मात्र ह्यांचे फोन येत नाहीत. पण समीक्षकाने झोडल्याबरोबर त्या परिस्थितीत नाटक लिहायचं तरी कशाला असा विचार गेंड्याची कातडी असलेल्या नाटककारालाही पडतो तर नवीन नाटककारांचं काय होत असेल ?

नाटककाराला पिडणारा आणखी एक घटक म्हणजे सेंसॉर (रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळ अशा दमछाक करणाऱ्या नावाचं मंडळ). ह्या मंडळाबद्दल बोलावं तितकं थोडंच आहे. ह्यावर असलेले सदस्य कोणत्या निकषावर घेतले जातात हे मायबाप सरकारलाच ठाऊक. पण हे सगळे सदस्य नाटक लिहिल्याबद्दल नाटककाराला पश्चाताप करायला लावण्यासाठीच नियुक्त झालेले असतात. अशी माझी ठाम समजूत आहे. एकतर त्यांच्याकडे पाठवलेलं नाटक ही मंडळी महिनोंन् महिने वाचतच नाहीत. बरं नाटक एकाने वाचून चालत नाही. त्यामुळे सेंसॉर सर्टिफिकेट नाटककाराला तात्पुरत्या स्वरूपात दिलं जातं. व्यावसायिक रंगभूमीच्या अडचणी तिथल्या अधिकाऱ्यांना माहीत नसल्यामुळे तात्पुरत्या प्रमाणपत्रामुळे नाट्यगृह मिळण्यात काय अडचणी येतात हे त्यांना कळतच नाही. त्यामुळे आजमितीला असंख्य नाटकं कायमस्वरुपी प्रमाणपत्र मिळण्याच्या प्रतीक्षेत आहेत. बरं कायमस्वरुपी प्रमाणपत्र पुन्हा मंडळाच्या अध्यक्षांच्या सहीवर अवलंबून असतं आणि अध्यक्ष महाशय असतात कुठेतरी बीडमध्ये किंवा औरंगाबादमध्ये. ते मुंबईत आले तरच कायमस्वरुपी प्रमाणपत्रावर सही करणार. नाटककार घालतोय खेटे - घर ते सेंसॉर. म्हणजे सेंसॉरसाठी हजार रुपये मोजायचे आणि परत स्वखर्चाने सेंसॉरच्या ऑफिसचे उंबरठे झिजवायचे. ह्या सगळ्या प्रकारामुळे नाटककारावर 'अरे, संसार संसारच्या' चालीवर 'अरे, सेंसॉर सेंसॉर' म्हणायची पाळी येते.

हे आणि किती तरी प्रश्न नाटककारांच्या पाचवीला पुजलेले आहेत. पण तूर्तास ह्या दोनतीन प्रश्नांवर नाटकवाल्याने किंवा संबंधित अधिकाऱ्याने नुसता विचार जरी केला तरी ह्या लेखाचं सार्थक झाल्यासारखं होईल.

धन्यवाद!



नाट्यसंमेलन दिंडीचे हवेमध्ये फुगे सोडून उद्घाटन करताना मोहन जोशी आणि कलावंत.



पारंपारिक वेशभुषेत नाट्यदिंडीत सहभागी झालेले कलावंत.



नाट्यदिंडीत नटराज मुर्तीचे पूजन करून विविध रंगी फुगे सोडताना नाट्यपरिषदेच्या महिला कलावंत.



नाट्यदिंडीची पालखी खांद्यावर घेऊन संमेलनस्थळी प्रवेश करताना मोहन जोशी, डॉ. गिरीष ओक व राजाभाऊ उराडे इ.



सुमधूर सनई वादनाने मंगलमय वातावरण निर्माण करताना नाशिकचे शहनाई सनई वादन ग्रुप



प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ यांच्याशी कार्यक्रमाची चर्चा करताना निवेदक विक्रम बिस्किटे, विठ्ठल नागटिळक व श्वेता हुल्ले.



९३ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाची नाट्यज्योत रंगमंचावर घेऊन येताना बारामती शाखेचे पदाधिकारी.



९३ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाची नाट्य ज्योत रंगमंचावर ९४ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनास सुपूर्द करताना बारामती शाखेचे पदाधिकारी.



९४ व्या अ.भा.मराठी नाट्य संमेलनानिमित्त
प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेस आमच्या

हार्दिक शुभेच्छा!

गतिमान नेतृत्व



मा. आ. श्री. भारत तुकाराम भालके
चेअरमन

खंबीर साथ



मा. श्री. लक्ष्मण नामदेव पवार
व्हा. चेअरमन

आमची ठळक वैशिष्ट्ये -

* सन २००३-२००४ सालाकरिता उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमतेबद्दल नवी दिल्ली येथील नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑप शुगर फॅक्टरी यांचेकडून राष्ट्रीय पुरस्कार तसेच पुणे येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट यांचेकडून राज्यस्तरीय पदकाने गौरविलेला कारखाना. * सहकार क्षेत्रात पारदर्शी व्यवस्थापन करून उज्वल भवितव्याकडे वाटचाल करण्याचा प्रयत्न. * सभासदांचे आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उन्नतीसाठी सर्वांगीण प्रयत्न. * सहकाराच्या माध्यमातून पंढरपूर तालुक्याच्या विकासात महत्त्वाचा सहभाग. * दुष्काळजन्य परिस्थितीतून शेतकऱ्यांना सहकार्याच्या भुमिकेतून नॅशनल बँकांकडून ८.५% व्याजदराने ऊस शेती मशागतीसाठी १० कोटी पर्यंत कर्ज पुरवठा झालेला आहे. सभासदांना बेसल डोस, सेंद्रीय खते, सुक्ष्मद्रव्ये, बेणे इ. साठी १० कोटी पर्यंत रक्कमेचे वाटप तसेच लोकाभिमुख धोरणाने सुरू केलेल्या विकासात्मक अनेक योजना कार्यान्वीत * सभासदांसाठी अपघात विमा योजना * सभासदांना घरबांधणी, संकरित गाय, पाईप-लाईन, मोटारसायकल इ. करिता कर्जाकरिता हमीपत्रे देऊन विकासात हातभार. * ऊस विकासाच्या अनेक योजना यशस्वीपणे राबवून कार्यक्षेत्रातून गाळप क्षमतेप्रमाणे ऊस उपलब्धतेबाबत स्वयंपूर्ण कारखाना. * कारखाना माध्यमातून सभासदांसाठी ऊस पिकासाठी रु. ५.०० कोटींची ठिबक सिंचन योजना. * अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दैनंदिन ३०,००० लिटर क्षमतेचा डिस्टलरी प्रकल्प यशस्वीरित्या कार्यान्वित. भविष्यात ६०,००० लिटर क्षमतेची विस्तारवाढ * नियोजित ३० मे. वॅट सहवीज निर्मिती प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील १० मे. वॅट प्रकल्प कार्यान्वीत. * दि महाराष्ट्र राज्य सह. बँक लि., मुंबई यांचेकडून सन २००८-०९ सालासाठी उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापनाबद्दल पुरस्कार आंतरराष्ट्रीय पातळीवरील सेंचुरी इंटरनॅशनल क्वॉलिटी ईआरए अॅवॉर्ड.

श्री विठ्ठल म्हणजे पांढरी शुभ्र दाणेदार साखर व शेतकरी कामगारांचा कल्पवृक्ष.

* शुभेच्छुक *

श्री. एम. सी. आतकरे (कार्यकारी संचालक)

सर्व संचालक, सभासद व कर्मचारी वर्ग

श्री विठ्ठल सह. साखर कारखाना लि. वेणुनगर

गुरसाळे ता. पंढरपूर जि. सोलापूर

९४ व्या अ.भा.मराठी नाट्य संमेलनास सर्व सेवकांच्या वतीने **हार्दिक शुभेच्छा!**



डॉ. द. ता. भोसले
जिव्हाळा परिवार



सेवाभावी संस्था, पंढरपूर
भोसले हॉस्पिटल, पंढरपूर

९४ व्या अ.भा.मराठी नाट्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!

टकले हॉस्पिटल

लॅपरोस्कोपिक ॲण्ड जनरल सर्जिकल सेंटर

दुर्बिणीतून पोटाच्या सर्व शस्त्रक्रिया

- पंढरपूर भागातील सुसज्ज हॉस्पिटल व लॅपरोस्कोपी
- आधुनिक जर्मन लॅपरोस्कोपी मशिनरी
- ई. सी. जी. रेकॉर्डर
- एन. आय. बी. पी.
- कार्डिॲक मॉनिटर
- सेंट्रल ऑक्सिजन लायनिंग
- एक्स-रे मशिन
- गॅस्ट्रोस्कोपी व कोलॉनोस्कोपी
- एअर कंडीशन ऑपरेशन थिएटर्स
- लॅबोरेटरी

डॉ. एम. आर. टकले
M.S.(Gen. Surgeon) F.M.A.S.
लॅपरोस्कोपिक व जनरल सर्जन

नवीन कराड नाका, पंढरपूर. फोन : २२३४६७/२२६०४०

९४ व्या अ.भा.मराठी नाट्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!

गायत्री
हायटेक हॉस्पिटल । रिसर्च

स्त्री-पुरूष वंध्यत्व
टेस्ट ट्युब बेबी सेंटर

डॉ. सुरेंद्र श्रीप्रसाद काणे
M.D.DGO (BOM).
Dip. In Reprod, Med. & Embryology (Germany)

डॉ. सौ. वर्षा सुरेंद्र काणे
M.S.F.IAGES.

- सोनोग्राफी
- गायनॅक एन्डोस्कोपी
- व्हिडीओ लॅपसरोस्कोपिक सर्जरी
- दुर्बिणीतून अपेंडीक्स, पित्ताशय, गर्भपिशवी काढणे
- युरॉलॉजी-दुर्बिणीतून मुतखडे काढणे व प्रोस्टेट तसेच इतर मूत्रविकारांवर दुर्बिणीतून तपासणी व उपचार

स्टेशन रोड, पंढरपूर. मो. ९४२३५९१९९५

रंगभूमीचे नाट्यमय पर्व...

- डॉ. किर्तीकुमार नाईक

२०१३ हे वर्ष मराठी नाट्यक्षेत्रासाठी सर्वार्थाने नाट्यमय ठरले. नाट्यप्रयोगांची मुबलक संख्या, नाट्य परिषदेची निवडणूक, राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार आणि निवडीच्या माध्यमातून घेतलेली ठळक दखल, दिग्गज नटांची अकाली एक्झिट, स्त्री दिग्दर्शक आणि स्त्री निर्मात्यांची नवी फळी, सामाजिक आशयाच्या टोकदार नाटकांचे आगमन अशा अनेक घटना घडल्या.

मराठी रंगभूमीच्या संदर्भात २०१३ मध्ये एक बाब प्रकर्षाने समोर आली ती म्हणजे, तिकीटबारीवर तुमचे नाटक चालायचे असेल तर नाटकात वलयांकित कलावंत असणे गरजेचे आहे; मग ते व्यावसायिक असो की प्रायोगिक. तसे पाहिले तर चित्रपट, मालिकेत लोकप्रिय ठरलेल्या कलाकारांना घेऊन नाटक सादर करण्याची मोठी परंपरा आपल्याकडे आहे. गेल्या तीन-चार वर्षात तर मोठ्या संख्येने अनेक ज्येष्ठ श्रेष्ठ रंगभूमीवर परतले; पण त्यांच्या नाटकांबरोबरीनेच नव्या रंगकर्मींचीही नाटके यशस्वी होत होती. त्यांची प्रसारमाध्यमांमधून, पुरस्कार सोहळ्यातून दखल घेतली जात होती. आता मात्र व्यावसायिक नाटकात वलयप्राप्त कलावंत नसेल तर निर्मातेही रिस्क घेताना दिसत नाहीत, हाच काहीसा प्रकार प्रायोगिक नाटकांमध्येही दिसून येत आहे. सचिन खेडेकर, चंद्रकांत कुलकर्णी, रोहिणी हट्टंगडी, सोनाली कुलकर्णी, गिरीश कुलकर्णी यांपासून ते अतिशा नाईक, मानसी कुलकर्णी, पुर्वी भावे, रसिका आगाशे, राधिका आपटे, अमेय वाघ यांसारखी चलनी नाणी असल्याशिवाय प्रायोगिकच्या प्रयोगांना पुन्हा प्रयोगाची संधी मिळणे कठीण होत चालले आहे. याचे सुस्पष्ट कारण असे आहे, की आता 'प्रयोग' करणे ही संकल्पना मागे पडत चालली असून किती लोक नाटक बघायला येतात, भाडे वसूल होते की नाही, याकडे निर्मात्यांचे आणि या प्रायोगिक नाटकांना संधी देणाऱ्या उपक्रमांचे लक्ष्य असते. नव्या रंगकर्मींसाठी ही धोक्याची घंटा आहे. आता यापुढे आधी सिनेमा, सीरियल आणि मग नाटक, असा उलटा प्रवास सुरू झाला, तर आश्चर्य वाटायला नको.

याचा अर्थ, नव्या रंगकर्मींना घेऊन नवे प्रयोग झाले नाहीत, असे नाही; पण त्यांना पाच-दहा प्रयोगांत अपेक्षित किमान गल्ला मिळवता आला नाही. निर्मात्यांकडे सहनशीलता नाही. त्यामुळे प्रयोग नाहीत, या दुष्टचक्रात ते अडकले.

सुदैवाने, हे चक्र भेदण्यात प्रसाद खांडेकर दिग्दर्शित 'पडद्याआड' आणि मदन देशमुख लिखित विशाल जाधव दिग्दर्शित 'टल्लीन झाले सारे' या दोन नव्या नाटकांना यश मिळाले. विशेष म्हणजे, 'पडद्याआड'चा निर्माता पहिल्या प्रयोगाआधीच पडद्याआड गेल्यावर नाटकाची धुरा हाती घेतली ती कलाकारांनीच. कोणतंही मानधन न घेता स्विशातला पैसा टाकून तर कधी पैसे उधार घेऊन ह्यांनी या नाटकाला रौप्यमहोत्सवी टप्प्यावर नेले. सकारात्मक

समीक्षेचा फायदा नवख्या नाटकांना होतो, हे 'टल्लीन झाले सारे'च्या यशाने दाखवून दिले.

फार्स हा नाट्यप्रकार यंदा पुन्हा एकदा मराठी रंगभूमीवर बहरला. बबन प्रभू यांचा 'घोळात घोळ', 'पळा पळा कोण पुढे पळे तो' हे दोन फार्स यंदा दणक्यात पुनुरूज्जीवीत झाले; तर नाटककार प्रदीप दळवी यांची 'वासूची सासू' हा फार्ससुद्धा सध्या प्रेक्षकांच्या पसंतीला उतरताना दिसतो आहे. अर्थात, त्यात 'दुनियादारी' चित्रपटामुळे प्रसिद्धीच्या झोतात आलेला प्रणव रावराणे आणि 'उंच माझा झोका' फेम विक्रम गायकवाड यांचे फॅन फॉलोइंग दुर्लक्षित करून चालणार नाही. यंदाच्या वर्षात चर्चेत असलेल्या नाटकांपैकी विशेष चर्चेत आले, लता नार्वेकरांचे श्री चिंतामणी निर्मित 'ती गेली तेव्हा'. आक्रमक जाहिरात, नाटक सतत चर्चेत राहील या अनुषंगाने पेरलेल्या बातम्या (उदा. मराठी रंगभूमीवर वास्तुशास्त्रानुसार पहिल्यांदाच नाटकाचा सेट बदलण्यात आला) आणि किरण माने या नटाचे लताबाईंनी लार्जर दॅन लाइफ केलेले प्रोजेक्शन यामुळे या नाटकाने काही काळ रंगभूमीवर खळबळ माजवली होती. समीक्षकांच्या धारदार टीकेला हे नाटक बळी पडले, तरी 'मायलेकी'तल्या वैशिष्ट्यपूर्ण भूमिकेनंतर किरण मानेच्या अभिनयपटुत्वावर ठळकपणे या नाटकाने शिक्कामोर्तब केले. नाटककार संजय पवार यांचे 'ठष्ट' यंदाच्या वर्षातले सर्वात जास्त चर्चेत असलेले नाटक ठरले. 'लग्न ही मुक्तीच्या मार्गातली मुलीच्या पायातली बेडी आहे', हे धाडसी विधान मांडणारे नाटक स्वत: पवारांनी दिग्दर्शित केले. हे नाटक आग्रही आणि आक्रमक असले तरी कलाकारांच्या उत्स्फुर्त अभिनयाविष्काराने या नाटकाच्या आशयाशी प्रेक्षक जोडले गेले. विशेषत: हेमांगी कवी - धुमाळ या अभिनेत्रीने या नाटकाला दिलेला एक स्वतंत्र आश्वासक आयाम हा यंदाच्या वर्षातला सर्वोत्तम अभिनयाविष्कार म्हणावा लागेल. मराठीत मुख्य धारेच्या रंगभूमीवर शोषितांच्या प्रश्नांवर विचारांच्या अंगाने जाणाऱ्या नाटकांची परंपरा नसतानाही हा विषय मांडण्याचं, सादर करण्याचं धाडस यंदा 'धांदांत खैरलांजी' या नाटकाच्या निमित्ताने झाले. मुळात लेखिका प्रज्ञा पवारांच्या संहितेतला आशय तसा गुंतागुंतीच्या नाटकाची प्रत्यक्ष मांडणी सोप्या पद्धतीने करण्याचा प्रयत्न दिग्दर्शक शिवदास घोडके यांनी केल्याने हे नाटक काहीसे भरकटले.

महाराष्ट्र - कर्नाटक सीमावादाच्या पार्श्वभूमीवर प्रदीप राणे लिखित संतोष पवार दिग्दर्शित 'झालाच पाहिजे' हे नाटक निर्माते नितीश राणे आणि अनंत पणशीकर यांनी प्रसिद्धीच्या मोठ्या दणक्यासह सादर केले. पहिल्या पानावर पूर्ण पानभर जाहिरात दिलेले हे पहिलेच मराठी नाटक होते; मात्र प्रत्यक्ष नाटकात सीमा प्रश्नाचे व्यापक स्वरूप, त्यामागचे राजकारण आणि या प्रश्नाचे आजचे मूल्यमापन यातल्या कशालाच स्पर्श न करता केवळ बतावणी आणि वगाच्या मसाल्यापासून मनोरंजन करण्याचा प्रयत्न झाल्यामुळे नाटक फसले. संभाजी भगत लिखित नंदू माधव दिग्दर्शित ''शिवाजी अंडरग्राऊंड इन भीमनगर मोहल्ला'' या नाटकाने यंदा २०० व्या प्रयोगाचा पल्ला गाठला.

विवाहसंस्थेची बदलती रूपं मराठी नाटकांतून प्रतिबिंबित झालेली वारंवार दिसतात. यंदा गोव्याच्या राजीव शिंदे लिखित 'थोडंसं लॉजिक थोडंसं मॅजिक' आणि पुण्याच्या योगेश सोमण लिखित 'एकदा पाहावं न करून' या नाटकांमधून याचा प्रत्यय आला. अतिशा नाईक या अभिनेत्रीने यंदा 'गिधाडे' मधून दिग्दर्शनाचा श्रीगणेशा केला आणि त्याचेच पुढचे पाऊल म्हणून तिने सुषमा देशपांडे लिखित 'प्रकरण पहिले' या नाटकाचेही दिग्दर्शन केले. तिच्या निमित्ताने बऱ्याच कालावधीनंतर नाट्यसृष्टीला आणखी एक दिग्दर्शिका-अभिनेत्री मिळाली आहे. यंदा दोन अभिनेत्री निर्मात्यांच्या भूमिकेत उतरल्या असून सोनाली कुलकर्णीने 'व्हाईट लिली आणि

नाईट रायडर' तर मुक्त बर्वेने 'छापाकाटा' या नाटकांची निर्मिती केली आहे. सध्या अनुराधा वाघ (सुखांत, वासूची सासू), कल्पना विलास कोठारी (प्रपोजल) ही नावेसुद्धा लता नार्वेकरांच्या बरोबरीने यशस्वी निर्मात्यांमध्ये गणली जात आहेत. प्रशांत दळवी आणि चंद्रकांत कुलकर्णी या लेखक-दिग्दर्शक जोडीने बऱ्याच वर्षांच्या गॅपनंतर दिलेले 'गेट वेल सून' हे नाटकही अभिनेता स्वप्निल जोशीचे रंगभूमी पदार्पण म्हणून गाजले. बेइमान, व्यक्ती आणि वल्ली, पांडगो इलो रे बा इलो, हसवाफसवी, लेकुरे उदंड जाहली आदी जुनी दर्जेदार नाटके नव्या कलाकारांच्या संचात पुन्हा रंगमंचावर आणण्याची परंपरा यंदा कायम राहिली. स्त्री आणि पुरुषाच्या लिंगनिरपेक्ष सहवासाची गोष्ट सांगणाऱ्या राजन खान यांच्या 'एका रात्रीची बाई' कथेवर आधारित किरण पोत्रेकर दिग्दर्शित याच नावाचा नाट्यप्रयोग त्याच्या आक्रमक प्रसिद्धीमुळे विशेष चर्चेत राहिला. चित्रीकरण तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष नाटकात वापर यंदा अस्लम परवेझ लिखित 'मिस्टर अँड मिसेस' नाटकाच्या निमित्ताने करण्यात आला. या नाटकाच्या नेपथ्यामध्ये एकूण सहा कॅमेरे लावण्यात आले, जे नाटकाचं लाईव्ह फुटेज घेतात आणि तेच फुटेज एकत्र करून नंतर स्क्रीनवर दाखवले जाते, ज्यातून नाटकातले रहस्य उलगडते. स्क्रीन्स, प्रोजेक्टर्सना सरावलेल्या मराठी नाटकाला तंत्रज्ञानातल्मकदृष्ट्या पुढे नेण्याचे काम या नाटकाने केले.

सेलिब्रिटी नाटक ही संकल्पना अधिक विस्तारणारा हृषीकेश जोशी यांचा 'नांदी' हा विविध नाट्यप्रसंगांचा गुच्छ असलेला नाट्यप्रकार यंदा मराठी रंगभूमीवर सादर झाला. या नाटकाला भरघोस बुकींग आहे. जे सेलिब्रिटी नाटकांची संकल्पना बळकट करणारे आहेत. या सेलिब्रिटी नाटकांचा महत्वाचा फायदा म्हणजे पुर्वी सुट्टीच्या दिवशी बुकींग होणारा, पावसाळ्यात बंद असणारा हा व्यवसाय बारमाही झाला आहे. सेलिब्रिटींच्या तारखांप्रमाणे प्रयोग लागू लागले आणि प्रेक्षकही नाट्यगृहाकडे वळले. सध्या सेलिब्रिटी नाटकाच्या एका प्रयोगाचा खर्च पन्नास हजाराच्या घरात गेला असून सरासरी साठ हजार ते एक लाख रूपयांपर्यंत बुकिंग मिळू लागल्यामुळे निर्मातेही समाधानी आहेत. (....दै. दिव्य मराठी मधून साभार)

लाईटवाला रंगला नाटकात !

कोणत्याही नाटकाच्या प्रयोगावेळी कलाकार जितका महत्त्वाचा असतो तितकाच, नव्हे, त्यापेक्षाही अधिक महत्वाचे असतात पडद्यामागून काम करणारी मंडळी... सगळं त्यांच्याच हातात असतं. त्यांची जर काही चूक झाली तरी रंगमंचावर असलेल्या कलाकाराच्या हाती काहीच उरत नाही आणि मग सामना करावा लागतो त्या कलाकाराला! 'तरूण तुर्क, म्हातारे अर्क' या मधुकर तोरडमल यांच्या नाटकाचे अनेक प्रयोग अनेक ठिकाणी आम्ही केले. या नाटकांत मी मुकुंदा ही बायकी तरूणाची भूमिका करीत होतो. तसं ते आव्हानच होतं पण त्यासाठी मला बरेच परिश्रमही घ्यावे लागलेले होते.

'तरूण तुर्क, म्हातारे अर्क' हे नाटक म्हणजे एकदम इरसाल धम्माल.. प्रत्येक वाक्याला हशा वसूल होणार हे ठरलेलंच..! आमचा प्रयोग रंगात आलेला... प्रेक्षक हशा आणि टाळ्यांनी उत्तम प्रतिसाद देत होते. थत्तेकाका म्हणजे मा. गोविंद भातलवंडे आणि मी रंगमंचावर नाटकाच्या पुस्तकात लिहीलेले आमचे संवाद बोलून संपवले पण प्रकाशयोजना करणारा लाईट काही बंद करेना... काय करायचं म्हणून आम्ही पदरची वाक्ये फेकत राहिलो तरी दिवे काही बंद होईना... लाईटवाला अगदी हसत नाटक पाहतोय आणि आम्ही केविलवाणे त्याच्याकडे पाहतोय. मी रंगमंचावरून वरच्या लाईटकडे पहात त्याला नजरेनं खुणाऊ लागलो. त्याला वाटलं वरचा लाईट सुटलाय की काय ! तो खालून मान उंचावत वर पहायला लागला. काही केल्या आमची सुटका होत नव्हती. काही करून आत जावून दिवे बंद करण्याची सूचना द्यावी असं मनात आलं आणि मी लाडीकपणे म्हणालो, 'थत्तेकाका, मी जरा कॉलेजकडे फिरून येतो...' तू गेलास तर मी एकट्यानं काय करायचं इथं?' आली की पंचाईत ! त्यांचंही खरं होतं पण करायचं काय ? नाटकात नसलेली सगळी वाक्य आमच्या तोंडून यायला लागली तेव्हा अचानक प्रकाश योजना करणारा दचकला आणि त्याने भराभर डिमर फिरवून रंगमंचावर अंधार केला. तेंव्हा कुठं आमची सुटका झाली... !! – **अशोक गोडगे**



मराठी नाट्य सृष्टीतील दिवंगत झालेल्या कलावंतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना मान्यवर.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलनाचे उद्घाटक देशाचे गृहमंत्री मा. ना. सुशिलकुमार शिंदे साहेब यांचा सत्कार करताना परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी व इतर.



सांस्कृतिक मंत्री मा. ना. संजय देवतळे साहेब यांचा मानचिन्ह देऊन सन्मान करताना परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी, कार्यवाह दीपक करंजीकर व इतर.



आर.पी.आय.चे राष्ट्रीय अध्यक्ष व माजी मंत्री मा. रामदास आठवले साहेब यांचा मानचिन्ह देऊन सन्मान करताना परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी व इतर.


सन्मान स्थानिक कलावंतांचा



समारोप प्रसंगी मंत्रीमहोदय
मा. ना. दिलीपराव सोपल, मा. ना. उदयजी सामंत
मा. लक्ष्मणराव ढोबळे .





प्रा. वामन केंद्रे एक सव्यासाची नाट्यगुरू

- प्रा. कमलाकर सोनटक्के

मित्रवर्य वामन केंद्रे यांच्या सन्मानार्थ आयोजित या गुरूगौरव सन्मान सोहळ्यासाठी केवळ मुंबई पुण्यातूनच नाहीतर संपूर्ण महाराष्ट्रातून आलेले वामन केंद्रे यांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष विद्यार्थी, मराठी, हिंदी, गुजराती आणि अन्य भारतीय भाषांमधून काम करणारे रंगकर्मी, वामनचे परिवारजन, हितचिंतक आणि रसिक मित्रहो!

आजचा हा गुरूगौरव सन्मान सोहळा अनेक दृष्टीनं महत्त्वपूर्ण आहे. तसं बघायला गेलं तर नृत्याच्या, संगीताच्या अगदी मल्लविद्येच्या क्षेत्रात देखील गुरू गौरवाचं अनन्यसाधारण स्थान, महत्त्व आणि त्याची अभिव्यक्ती हा परंपरेचा एक महत्त्वाचा भाग आहे. या क्षेत्रांमध्ये गुरूपौर्णिमेला तीन तीन पिढ्यांचे विद्यार्थी, छात्र आणि शागिर्द आपल्या गुरूंची षोडषोपचारे पूजा करतात, गुरूचं अभिष्टचिंतन करतात आणि गुरूचे आशीर्वाद घेऊन पुढचा मार्ग सुकर करण्यासाठी, वृद्धिंगत करण्यासाठी नव्या प्रेरणेनं सिद्ध होतात.

नाट्यक्षेत्रात गुरू पूजन, गुरू गौरवाचं स्थान नेहमीच गौण मानलं गेलं आहे. त्यांची कारणे परंपरा नाट्याच्या वाटचालीत भिन्न भिन्न स्वरूपात शोधता येतील. एकमात्र खरं नाटक ही कलाच मुळात आपल्या प्रश्नकर्त्या वृत्तीमुळे कुठलेही स्थिर स्वरूपाच्या परंपरा किंवा आदर्श मानत नाही, मग हा नियम कादाचित गुरूपूजनासारख्या पारंपारिक प्रथेबाबतही असावा. म्हणून नाट्यक्षेत्रात गुरूपरंपरेचं स्थान गौण राहिलं असावं.

सर्वांच्या साक्षीनं सार्वजनिक स्वरूपात आज वामन केंद्रे यांचा गुरूगौरव सन्मान सोहळा संपन्न होत आहे ही आम्हा सर्वांच्या दृष्टीनं मोठ्या समाधानाची बाब आहे.

विशेष म्हणजे आज पाहा - वामन केंद्रे यांचा हा गुणगौरव सोहळा त्यांच्या आजी माजी विद्यार्थ्यांनी स्वयं प्रेरणेनं, एकोप्यानं, एक दिलानं आणि निरपेक्ष भावनेनं साकारला आहे. अगदी प्रवेशद्वारापासून लावलेली भव्य छायाचित्रं, पताका, रांगोळ्या, फुलांची तोरणं, रंगमंचाची नेटकी आणि सौंदर्यपूर्ण सजावट आणि विशेष म्हणजे नाट्यशास्त्राच्या परंपरेनुसार जर्जर ध्वजासह केलेलं रंगपूजन आणि 'आरंभात' सादर केलेले अर्थपूर्ण श्लोकांचं नाट्यधर्मी मंचन विलोभनीय होतं.

लोकधर्मी आणि पारंपरिक नाट्यधर्मी पद्धतीनं ढोल-

ताशांच्या गजरात, गुरूजनांवर केलेली पुष्पवृष्टी या साऱ्यात एक व्यावसायिक शिस्त, नजाकत आणि दिमाखदारपणा दिसून आला. ही केंद्रे यांच्या प्रशिक्षण दृष्टीची पावती होती.

खरं तर या सोहळ्याला एक प्रेक्षक म्हणून उपस्थित राहून कार्यक्रमाचा मनसोक्त आनंद घेण्याची इच्छा होती. कारण आपल्या नितांत प्रिय, आत्मीय व्यक्तीबद्दल बोलताना अडचण होण्याचा संभव असतो.तटस्थपणे त्याच्या कार्यकर्तृत्त्वाबद्दल,गुणवत्तेबद्दल, व्यक्तीमत्त्वाबद्दल बोलणं कठीण असतं.

वामनच्या रंगभूमी वरील कार्यकर्तृत्त्वाबद्दल, त्यानं अहर्निशी जपलेल्या जागरूक, सतर्क, अभ्यासू विद्यार्थी वृत्तीबद्दलच बोलयचं झालं तर अगदी त्याच्या दरडवाडी या एक शिक्षकी शाळेपासून औरंगाबादच्या नाट्यशास्त्र विभाग, दिल्लीच्या राष्ट्रीय नाट्य विद्यालयातील अभ्यासक्रम, कॅलिकत विद्यापीठ नाट्यशास्त्र विभागातील अभ्यासवृत्ती, केरळातील थिय्यम आणि अन्य लोककलांचा अभ्यास या साऱ्या प्रवासात वामनमधील जागरूक, जिज्ञासू विद्यार्थी हा सतत ज्ञानसाधनेसाठी भुकेला असायचा. वरवरच्या गोष्टींनी त्याचं कधीच समाधान होत नसे. प्रत्येक कलाप्रकाराचा, ह्या संबंधीच्या सर्व घटकांचा, संस्कारांचा, सादरीकरणाचा संबंध त्या त्या कला प्रकाराच्या सभोवतालाशी, माणसांच्या जगण्याशी, ते जीवन संपन्न-समृद्ध करण्याशी पूर्वीच्या काळी कसा होता, आज कसा आहे आणि भविष्यात तो कसा राहील याचा अन्वय त्याच्यातला अस्वस्थ विद्यार्थी लावण्यात व्यग्र असायचा. राष्ट्रीय नाट्यविद्यालयातील वामनचे बी. व्ही. कारंथ, जी. शंकर पिल्लई आणि केरळातील थिय्यम आणि कुडीयाट्टमचे बरेच गुरूजन त्याच्यातल्या या अस्वस्थ आस्वादक वृत्तीचे चाहते बनले. पुढे वामनच्या या जिज्ञासू वृत्तीला बहर आला तो १९८६ ते ९५ एनसीपीएतील कालखंडात. वामनच्या पूर्वानुभवाला, जिज्ञासेला सैद्धांतिक वळण देण्यात, आपली कलाविषयक, नाट्यविषयक मतं तपासून पाहण्यात इथं मदत झाली. त्या काळात एनसीपीएचे संचालक पु.ल. देशपांडे आणि संशोधन विभागप्रमुख डॉ. अशोक रानडे हे त्याचे मार्गदर्शक कमी त्याचे चाहते अधिक होते. वामनला त्या काळात,नाट्यनिर्मिती,नाट्य प्रशिक्षण करण्यास त्यांनी भरभरून प्रोत्साहन दिलं. पुलंनी 'एक झुंज वाऱ्याशी' सारखं वेगळ्या धाटणीचं नाटक लिहून दिलं तर डॉ. रानडे त्याच्या या आणि अन्य अनेक नाटकांचे संगीत दिग्दर्शक झाले. गुरूजनांनी आपल्या सहकाऱ्याचं सहाय्यक बनण्याची अशी उदाहरणं कला आणि नाट्यक्षेत्रात खूप विरळा.

एम.ए.ला प्रवेश घेताना आपल्या पीएच.डी. ची तयारी सुरू करणाऱ्या आणि एम.ए. झाल्यावर लगेच दोन वर्षांत कुठल्या का होईना विषयात पीएच.डी. होण्याच्या काळात वामनला मात्र पीएच.डी. चा कधीच मोह झाला नाही. कारण त्याला आपल्यातल्या जिज्ञासेला पुस्तकबंद करून विराम देणं गरजेचं वाटलं नसावं. त्यानं नाटक शिकवताना आणि सादर करतानाही आपली जिज्ञासू विद्यार्थी वृत्ती सतत जागृत ठेवली.

वामन हा जसा निरंतर विद्यार्थी आहे तसाच तो

राष्ट्रीय नाट्य विद्यालय, नवी दिल्ली ही केवळ भारतातीलच नाही तर आशिया खंडातील नाट्य प्राशिक्षण देणारी सर्वोच्च संस्था मानली जाते. गेल्या ६०-६५ वर्षात या संस्थेतून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनी नाटक, चित्रपट, दूरदर्शन, प्रसार माध्यमं आणि सांस्कृतिक क्षेत्रात एक नवी जागृती निर्माण केली आहे. आपल्या कर्तुत्त्वाने विविध क्षेत्रात नवनवे मानदंड निर्माण केले आहेत. या संस्थेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदी श्रीमती विजया मेहता, सई परांजपे, श्री. विजय तेंडुलकर, प्रा. कमलाकर सोनटक्के आदींनी काम केलं.

ग्रामीण भागातून आलेले प्रा. वामन केंद्रे हे महाराष्ट्रातील पहिले रंगकर्मी आहेत; ज्यांची दिल्लीच्या राष्ट्रीय नाट्य विद्यालयाच्या संचालकपदी निवड झाली. ही बाब मराठी रंगभूमी आणि महाराष्ट्रासाठी निश्चितच भूषणावह आहे.

मुंबई विद्यापीठाच्या थिएटर अकादमीच्या स्थापनेपासून गेली १० वर्षे संचालक असलेले प्रा. वामन केंद्रे यांची दिल्लीच्या प्रतिष्ठीत राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. गेल्या महिन्यात रवींद्र नाट्य मंदिरात प्रा. वामन केंद्रे यांचा भव्य सत्कार झाला. त्या प्रसंगी गुरूवर्य प्रा. कमलाकर सोनटक्के यांनी त्यांच्या विषयी व्यक्त केलेल्या भावना आणि शुभेच्छा पंढरपूर येथील नाट्य संमेलनाच्या निमित्ताने तरुण रंगकर्मी आणि रसिकांना निश्चितच प्रेरणादायी ठरतील हा विश्वास.

वृत्तीनं एक उत्तम शिक्षक आहे. सक्षम नेतृत्त्वाचे गुण त्याच्यात वंशपरंपरेनंच आले असावेत. वामनचे वडील उत्तम भारूडकार होते, आई सुरात ओव्या म्हणायची, स्वानुभवातून नव्या रचायची आणि त्यांना सुमधूर चालीही द्यायची. वामनच्या वडिलांच्या भारूड पथकाची पंचक्रोशीत आणि तालुक्यात मोठी ख्याती होती. त्याच्या संचाचे कार्यक्रम पाच वर्षापूर्वीपर्यंत मुंबईच्या अनेक महोत्सवात सादर व्हायचे. वामनचं छोट्या खेड्यातलं घर म्हणजे पै-पाहुण्याला येणाऱ्या-जाणाऱ्याला, अडीअडचणीत असलेल्या आयाबायांना आधार वाटायचं. साऱ्यांना सोबत घेऊन जाणं जणू देवाचं कार्य आहे अशी त्याच्या घराची ख्याती. वयाची १०५ वर्षापर्यंत वामनची 'आई' म्हणून आशीर्वाद देणारी आजी ही शेवटपर्यंत धडधाकटपणे गावआजी म्हणून जगली, साऱ्यांच्या उपयोगी पडली.

वामनला अभिनेता म्हणून व्यावसायिक रंगभूमीवर आपला दबदबा सहज निर्माण करता आला असता. पण वामनच्या अंतरातला प्रशिक्षक, मार्गदर्शक, संघचालक हा त्याचा आपसूक नाट्य दिग्दर्शनाच्या वाटेवर घेऊन गेला.

वामननं दिग्दर्शित केलेली नाटकं मला खूप महत्त्वाची वाटतात. १९८७ साली दिल्ली येथील संगीत नाटक अकादमी महोत्सवात त्यानं सादर केलेलं 'झुलवा' आजही विषयआशय, क्रांतीकारी विचार, सामूहिक अभिनय, अंगावर शहरे आणणाऱ्या नाट्यप्रसंगांसाठी आणि अंधश्रद्धा आणि परंपरांना आव्हान देऊन मूठमाती देणाऱ्या प्रगत प्रबोधनासाठी तसंच सुघड मनोरंजन आणि अजोड लोकसंगीतासाठी सर्वांच्या ध्यानात आहे.

वामनमधील जागरूक दिग्दर्शक आणि हाडाच्या शिक्षकाला पुन्हा एकवार 'रणांगण'च्या निमित्तानं स्वत:ला सिद्ध करण्याची संधी मिळाली. इथं त्यानं मोहन वाघ यांच्यासोबत सहा महिने पूर्णवेळ निवडचाचण्या, तालमी घेऊन एक वेगळी रंगभाषा, अभिनय शैली, डोळस समसामईक अभिनय, अर्थघटन, संगीत मेळ आणि एका प्रायोगिक स्वरूपाच्या नाटकाला लोकमान्य रंगभूमीवर प्रतिष्ठा आणि लोकमान्यता मिळवून दिली हे विशेष.

प्रसाद ओक, अतिशय पाटील, देशपांडेपासून तो अशोक समर्थपर्यंतच्या अनेक चौकस अभिनेत्यांची एक नवी फळी या नाटकानं रंगभूमीला दिली.

यानंतर वामनचं महत्त्वाचं नाटक म्हणजे 'मुंबई विद्यापीठाच्या थिएटर अकादमीच्या विद्यार्थ्यांचं 'मध्यमं वियोग'. अनेक प्रकारच्या भाषीय, नाट्यगत अपरिपक्व जाणीवा आणि विभागात शिकण्याच्या ओढीनं आलेल्या युवा विद्यार्थ्यांना वामननं केरळच्या कलरीच्या तोडीचं अंगचलन, लयबद्ध नृत्यचलन, शैलीबद्ध गद्यपद्य संवाद वहन आणि नाट्यधर्मी आणि लोकधर्मी प्रयोगसिद्धीचा सुमेळ साधणारी अभिनय शैली याचं अतिशय मनोहारी, अर्थपूर्ण आणि रंजक दर्शन घडवलं.

वरील तीन नाटकांप्रमाणेच वामनचं 'जानेमन' हे तृतीय पंथीयांच्या जगण्या-मरण्याची जीवघेणी कहाणी उलगडून दाखवणारं वेगळ्या धाटणीचं, मानवी समाजाचं उघडंवाघडं जीवन उलगडणारं नाटक. दिल्लीच्या राष्ट्रीय नाट्य विद्यालयातील रंगमंडळाबरोबर सादर केलेलं अर्थपूर्ण आणि तरीही रंजक नाटक. भारतभरातील रुण रंगकर्मीनं जोपासलेल्या आणि पुढे लोकरंगभूमीच्या व्यावसायिकतेच्या पाऊलखुणा हिंदी रंगभूमीवर प्रस्थापित करणारं वेगळ्या रंगभाषेची जाणीव करून देणारं नाटक ठरलं.

वामननं आपल्या अंगभूत आणि अनुभवातून मिळविलेल्या, अंगीकारलेल्या चौकस वृत्तीतून आपले बहुतेक निर्णय घेतले, आपली व्यावसायिक रंगभूमीवर बहुतेक नाटकं निवडली. व्यावसायिक रंगभूमीवरील त्यानं दिग्दर्शित केलेल्या नाटकांच्या यादीवरून नजर टाकली तरी त्याच्या निवडीतील हे वैविध्य, वैशिष्ट्यावरून ध्यानात येतं.

२००० च्या वर प्रयोग करणारं त्याचं रसिकप्रिय नाटक चार दिवस प्रेमाचे, राहिले दूर घर माझे, एक झुंज वाऱ्याशी, नातीगोती, दुसरा सामना, Tempt me not, प्रेमपत्रं. या प्रत्येक नाटकात वामननं संहितेला जेवढं महत्त्व दिलं तेवढंच महत्त्व त्यानं अभिनेत्यांच्या सुयोग्य निवडीला दिलं. व्यावसायिक नाटकांची निर्मिती करताना त्याला नवीन प्रशिक्षित केलेल्या कलावंतांचा

खोटा कळवळा आला नाही. तो मोह त्यानं जाणीवपूर्वक दूर ठेवला. त्यानं व्यावसायिकता, प्रशिक्षण, लोककल्याण यांची कधीच गल्लत होऊ दिली नाही. मला वाटतं या निरक्षीरविवेक बुद्धीत याचं ग्रामीण भागात जोपासलेलं आणि अजूनही मातीशी नातं सांगणारं सच्चेपण आणि चाणाक्षपण त्याला मार्गदर्शक ठरत असावं.

वामननं आपल्या कलागत प्राधान्यक्रमात नेहमीच खऱ्याचा, सत्याचा पाठपुरावा केला. पक्षोपक्षांमध्ये वामनचे अनेक चाहते आहेत. अगदी उच्चपदस्थांशी त्याचे व्यक्तिगत संबंध आहेत तरीही वामनने स्वत:साठी तर सोडा, आपल्या परिचितांसाठीही कधी शब्द टाकल्याचं ऐकिवात नाही. याच्या याच संयत आणि तटस्थ वृत्तीमुळे. त्याच्या समर्पित निरपेक्ष कार्यपद्धतीमुळे त्याचा सर्वत्र एक दबदबा आहे.

वामन हा सामाजिक चळवळीशी जवळीक ठेवून त्यांचा वेध घेणारा विचारी रंगकर्मी आहे. इप्टाचा तो सक्रीय सदस्य आहे पण डाव्या विचारसरणीचा त्यानं कधीच बडेजाव मिरवला नाही. आपल्या व्यावसायिक रंगकार्यात आणि कला प्रशासनात नेहमीच संयत आणि तटस्थ राहिल्याचं दिसतं. त्यानं युत आणि अडीच्या शासनाच्या विशेष कला प्रकल्पांचं आणि 'इव्हेंटस्च' तेवढ्याच कौशल्यानं आयोजन केलं.

वामनचं माझं नातं तसं आणखी घरगुती आहे. वामनची अर्धांगिनी विदर्भकन्या गौरी ही आमची मानसकन्या आहे. आमच्या अनेकांप्रमाणे सारं जग बघून झाल्यावर लग्नासाठी मात्र वामननं या आपल्या लोभस विद्यार्थिनीचीच निवड केली. एक उत्तम अभिनेत्री, बालनाट्य प्रशिक्षक आणि कुशल संघटक असलेल्या गौरीनं वामनच्या कलागत जीवनात आणि व्यक्तिगत संसारात, वामनला फार भक्कम साथ दिली. वामनच्या घरातील आणि गावाकडील तीन पिढ्यांची वास्तपुस्त गौरी आजही आईच्या मायेनं ठेवते.

गावातला पहिला शिक्षित वामन आज आपल्या साऱ्या एकत्र परिवाराचा कर्ता पालक आहे. प्रत्येकाला त्यानं सन्मार्गाला लावलं. आपल्या वडिलांची कलेची आणि लोककल्याणाची गादी आपल्या गावात आज तो पुढे चालवीत आहे ही माझ्या दृष्टीनं खूप भूषणावह गोष्ट आहे.

वामननं १० वर्षांपुर्वी भारतातील अग्रगण्य मुंबई विद्यापीठाच्या अकादमी ऑफ थिएटर आर्ट्सची जबाबदारी सांभाळल्यानंतर तो आता दिल्लीच्या राष्ट्रीय नाट्य विद्यालयाच्या संचालकपदी विराजमान झाला आहे.

आतापर्यंत राष्ट्रीय नाट्य विद्यालयाच्या संचालकपदी इब्राहिम अलकाझी यांच्या ७ विद्यार्थ्यांची निवड झाली होती. वामन केंद्रे हे त्यांच्या विद्यार्थ्यांचे विद्यार्थी म्हणून निवडले गेलेले पहिले संचालक आहेत हे विशेष. बाबा कारंथ आणि रामगोपाल बजाज या दोन्ही संचालकांचे वामन केंद्रे हे अतिप्रिय विद्यार्थी. आपल्या राष्ट्रीय नाट्य विद्यालयातील विद्यार्थ्यांचेही ते प्रिय संचालक ठरतील असा मला विश्वास वाटतो.

महाराष्ट्रातील नेतृत्त्व वेगवेगळ्या क्षेत्रात दिल्ली काबीज करताना सामान्यपणे कच खातं. वामननं मात्र नाट्यक्षेत्रातील हे उच्चपद निर्धोकपणे स्वकर्तृत्त्वावर पादाक्रांत केलं हे विशेष. मला विश्वास आहे की दिल्लीचं राष्ट्रीय नाट्य विद्यालय केवळ दिल्लीस्थित न ठेवता त्याच्या शाखा भारतातल्या प्रत्येक राज्यात पोचवण्याचा वामन केंद्रे प्रयत्न करतील आणि त्यांच्यासारख्या तळागाळातल्या होतकरूंना त्यांच्या प्रांतात हक्काची नाट्य प्रशिक्षणाची दालनं उघडून देतील.

दिल्लीचं राष्ट्रीय नाट्य विद्यालय हे काही निवडक उच्चभ्रू नागरी लोकांची विरासत न राहता तळागळातील हौशी रंगकर्मींचीही मात्र संस्था म्हणून प्रचलित करण्यात पुढाकार घेतील असा विश्वास ठेवूया. दिल्लीच्या राष्ट्रीय नाट्य विद्यालयातील वामन केंद्रे यांची कारकिर्द तेजोमयी ठरो अशी शुभेच्छा देतो. प्रशासनातून वेळ काढून ते आपल्या पहिल्या प्रेमाला, नाट्यप्रशिक्षण आणि दिग्दर्शनाला आग्रक्रम देतील असा विश्वास व्यक्त करतो. वामन, गौरी आणि ऋत्विकच्या भविष्यासाठी आणि भवितव्यासाठी व्यक्तिश: आणि परिवाराच्या वतीनं या प्रसंगी शुभेच्छा व्यक्त करतो.

नमस्कार!


908


ऐतिहासिक दृष्यात
नाट्यकलावंत

९४ व्या अ.भा.मराठी नाट्य संमेलनानिमित्त प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेस सर्व सेवकांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा!

बोरावके हॉस्पिटल

अतिदक्षता विभाग (ICU)

पॅथॉलॉजी लॅबोरेटरी

ब्लड स्टोरेज सेंटर

भक्ती मार्ग, उपलप नगर, ब्लड बँकेजवळ, पंढरपूर फोन : ०२१८६-२२४०५४ आय.सी.यु. ८८०५१२९९००

* एक्स-रे * आय.सी.यु. * व्हेन्टिलेटर * सेंट्रल ऑक्सिजन * इकोकार्डियोग्राफी * बायपॅप व्हेन्टिलेटर
* कॉम्प्युटराईज्ड इ.सी.जी/ट्रेड मील टेस्ट * कार्डियाक ॲम्ब्युलन्स * ब्लड स्टोरेज सेंटर

डॉ. गिरीष बोरावके
एम.डी.(मेडिसीन)
कन्सल्टींग फिजिशियन

डॉ. सौ. सुरेखा बोरावके
एम.डी.(पॅथॉलॉजी)
कन्सल्टींग पॅथॉलॉजीस्ट

९४ व्या अ.भा.मराठी नाट्य संमेलनानिमित्त प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेस सर्व सेवकांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा!

गणपती हॉस्पिटल व नेत्रालय

डॉ. सुनील कारंडे
एम.डी.(मेडिसीन)
हृदयरोग, मधुमेह, मेंदू व छातीचे विकार तज्ञ

डॉ. सौ. सुनीता कारंडे
एम.बी.बी.एस. डीओएम.एस.(मुंबई)
नेत्र रोग यम

सोनोग्राफी
२ डी इको
कलर डॉपलर
एक्स-रे
टी.एम.टी.

असाध्य व गंभीर रोगांवर उपचार उपलब्ध.

अद्यावत यंत्र सामुग्री व सुविधा.

सर्व्हे नं. ४७७६, प्लॉट नं. ११८, दतनगर, उमा कॉलेज समोर,
पंढरपूर, जि. सोलापूर. फोन : (०२१८६) २२९८९०

सहकार शिरोमणी




वसंतदादा काळे

९४ व्या अ.भा.मराठी नाट्य संमेलनानिमित्त
प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेस आमच्या

हार्दिक शुभेच्छा

चेअरमन



वसंतराव काळे सहकारी साखर कारखाना लि. चंद्रभागानगर

मा. श्री. कल्याणराव वसंतराव काळे

मार्गदर्शक - सिताराम महाराज सा.का.खर्डी
चेअरमन - निशिगंधा सह. बँक पंढरपूर
सदस्य - पंढरपूर विकास प्राधिकरण समिती

कारखान्याची वैशिष्ट्ये -

* पंढरपूर तालुक्याच्या पश्चिम क्षितीजावरील नामांकित साखर उद्योग. * सन २००७-०८ सालातील उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता द्वितीय पुरस्कार प्राप्त. * सन २००८-०९ सालातील उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापनेचा पुरस्कार प्राप्त. * मागील १२ सिझनमध्ये पांढऱ्या शुभ्र दाणेदार साखरेचे उत्पादन. * जिल्ह्यातील इतर साखर कारखान्याचे बरोबर ऊस दर देण्याची परंपरा कायम. * प्र.दिनी ३०,००० ब.लि. क्षमतेचा अत्याधुनिक आसवणी प्रकल्पातून यशस्वीपणे आर.एस.ई.एन.ए.एस.डी.एस. इथेलॉन उत्पादन. * १८ मेगावॅट क्षमतेचा सहवीज निर्मिती प्रकल्प लवकरच कार्यान्वीत. * कारखाना कार्यस्थळावर कामगार व ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मुलांना अद्यावत इमारतीसह वसंतराव काळे विद्यामंदिर प्रशालेची शैक्षणिक सुविधा.

व्हा. चेअरमन	संचालिका	संचालक	संचालक	संचालक	संचालक	संचालक	संचालक
							
श्री. गोरख ताड	श्रीम.मालनबाई काळे	श्री. राजेंद्र शिंदे	श्री. मोहन नागटिळक	श्री. गोरख जाधव	श्री. संभाजी बागल	श्री. तुकाराम माने	श्री. अण्णा शिंदे
संचालक	संचालक	संचालक	संचालक	संचालक	संचालक	संचालक	संचालक
							
श्री. भारत कोळेकर	श्री. तानाजी जाधव	श्री. दिलीप हिंगमिरे	श्री. सुभाष यादव	श्री. पांडुरंग कौलगे	श्री. राजसिंह माने	श्री. राजाराम पाटील	श्री. दिनकर कदम
संचालक	संचालक	संचालक	संचालिका	संचालिका	का.प्र.	का.प्र.	कार्यकारी संचालक
							
श्री. अंगद पवार	श्री. भारत भुसे	श्री. इस्माईल मुलाणी	सौ.वत्सला भोसले	सौ. सुनीता चव्हाण	श्री. बंडू पवार	श्री. रावसो पवार	श्री. पी.के.पवार

सर्व सभासद व कर्मचारी वर्ग

स. शि. वसंतराव काळे सह. साखर कारखाना लि. चंद्रभागानगर

पो. भाळवणी ता. पंढरपूर जि. सोलापूर

गिरीश कर्नाड एक नाटककार

- प्रा. डॉ. संजय सिद्राम उपासे
उमा महाविद्यालय, पंढरपूर

भारतीय नाट्यसृष्टीतील एक बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणून गिरीश कर्नाड यांना ओळखले जाते. ते एक नामांकित नाटककार आहेत. 'ज्ञानपीठ' व 'कालिदास नाट्य सन्मान' या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या नाटकाचे प्रयोग जागतिक रंगभूमीवरून सादर झाले व होत आहेत. त्यांच्या नाटकाचे प्रयोग मराठी व हिंदी भाषेतून अनुवादित झाले आहेत. ययाति, तुघलक, हयवदन, नागमंडल, तलेदण्ड, अग्निवर्षा, टिपु सुलतानांची स्वप्ने, बली, वेडिंग अल्बम ही त्यांची नाटकं आहेत. फ्लॉवर्स व ब्रोकन इमेजिस ह्या त्यांच्या नाट्यछटा आहेत. त्यांचा मराठी नाटकराशी अत्यंत घनिष्ठ असा संबंध आहे. ते विजय तेंडूलकरांना आपले आदर्श मानतात. त्यांनी नऊ नाटकं व दोन नाट्यछटा लिहलेल्या आहेत.

कर्नाडांचं लेखन जरी इंग्रजीतून असलं तरी ते भारतीय संस्कृतीचे प्रकर्षाने दर्शन घडवणारे आहे. कारण त्यांच्या नाटककलेची साधनं व स्त्रोत् ही भारतीय इतिहास, पुराण, दंतकथा व मौखिक कथा ही आहेत. भूतकाळातील घटना व प्रसंग वर्तमान काळाच्या संदर्भातून सादर करण्याची एक वेगळी हातोटी कर्नाडांच्या नाट्यलेखनातून दिसून येते. उदा. तुघलकांच्या मनमानी व लहरी स्वभावाच्या ऐतिहासिक पात्रातून लेखक सर्वकालीन शासकवर्गाच्या कार्यप्रणालीचं दर्शन घडवितात. भूतकाळ व वर्तमानकाळाचा सुरेख सुसंवाद कर्नाडांच्या नाट्यकलेतून प्रत्ययास येतो. अपर्णा धारकवाडकर म्हणतात, ''कर्नाडांच्या नाट्यसृष्टीत टी.एस.एलियट यांच्या मते ट्रॅडिशन व इंडिविज्युअल टॅलेंट या सिध्दांताचे प्रतिबिंब दिसून येते असे प्रतिपादन केले आहे.'' (अपर्णा धारवाडकर, कार्नाड्स प्लेज, प्रस्तावना)

आशय साधनाप्रमाणेच नाट्यकलाकुसरतेच्या बाबतीत कर्नाडांचे वेगळेपण निश्चितच त्यांच्या कलेतून दिसून येते. भारतीय अभिजात नाट्यसंस्कृती व पाश्चिमात्य नाट्य यांचं त्यांना पुरेसं ज्ञान असल्याने त्यातील अत्यंत निवडक अशा पैलूंचा वापर त्यांनी आपल्या नाटकांमध्ये केलेला आहे. उदा. तुघलक या नाटकात पारशी नाट्यतंत्र वापरले. हयवदन मध्ये यक्षगान या कानडी लोकनाट्यतंत्राचा वापर केला, तर अग्निवर्षा या नाटकात भारतीय अभिजात नाट्यतंत्राचा वापर केलेला आहे.

ओस्कीलसच्या पात्र रेखाटन व कथावस्तूचा प्रभाव अग्निवर्षा या नाटकातून दिसून येतो.

कर्नाडांच्या नाट्यसाहित्यातून प्राचिन व आधुनिक भारतीय नाट्यपरंपरेचे व पाश्चिमात्य नाट्य परंपरेचेही दर्शन घडते. त्यांच्या कलाकुसरतेचे एक ठळक वैशिष्ट म्हणजे त्यांनी अत्यंत समर्पक व योग्य नाट्यतंत्राचा वापर करून आपल्या नाट्यकेलेची अभिव्यक्ति वाढविण्याचा विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येते. याबाबतीत पी. राममूर्ती या समिक्षकाने कर्नाडांचे नाटक म्हणजे भारतीय लोकनाट्य परंपरा व पाश्चिमात्य नाट्य परंपरा यांचा सुरेख संगम होय. असे म्हटले आहे. (राममूर्ती, पृ. १,२)

नाट्यकलाकुसरतेप्रमाणेच त्याच्या नाटकांच्या भाषेच्याबाबतीत कर्नाड अत्यंत संवेदनशील असल्याचे दिसून येते. रंगभूमीला अभिप्रेत असणारी अत्यंत समर्पक अशी भाषा त्यांनी आपल्या नाट्यसंवादासाठी वापरली. त्यांची भाषा अत्यंत समृध्द् असल्याने त्यांच्या नाटकातील संवाद अत्यंत तजेलदार व उठावदार असे आहेत. त्यांच्या नाटकाची भाषा अत्यंत मधूर, लयबद्ध अशा स्वरूपाची असून विविध अन्वयार्थ देणारी आहे. त्याचबरोबर लेखकांच्या काव्यप्रतिभेचे दर्शन घडविणारी आहे. उदा. ''राज्यकारभार हे कायक, काया कष्टानं करावयाचं काम आहे. ती काही जन्मजात हक्कानं मिळणारी गोष्ट नव्हे. हा अधिकार स्वतः मिळवायला पाहिजे आणि नंतर श्रध्देने तो वापरायला पाहिजे.''(तलेदण्ड, सुगवा प्रकाशन, पृ. २७)

उपरोक्त नाट्यसंवाद कर्नाडांच्या विलक्षण काव्यप्रतिभेचे दर्शन घडवितो. तसेच प्रस्तुत संवाद नाट्यसंवादाला अभिप्रेत असणाऱ्या लयबध्द बोलिभाषेच्या वापरास पुष्टी देतो.

नाट्यभाषेइतकेच महत्व लेखक नाट्यमय उपरोधाला दिल्याचे दिसून येते. हे त्यांच्या नाटकलेखनाचे विशेष म्हणता येईल. उदा. तुघलक आपल्या राज्याचं एक उत्कृष्ठ उद्यान बनविण्याचे स्वप्न पाहतो. परंतू प्रत्यक्षात ते प्रेताचं स्वयंपाकघर बनतं. अशा अनेक नाट्यमय उपरोधामुळे कार्नाडांची नाटकं अत्यंत संस्मरणीय ठरतात. कार्नाडांच्या अप्रतिम नाट्य कलाकुसरतेमुळे त्यांची नाटकं रंगभुमीवर यशस्वी ठरली आहेत. त्यांच्या नाट्यलेखन कलेची समर्पक अशी समीक्षा पी. धानवल या समिक्षकाने केलेली आहे. ते म्हणतात, ''कर्नाड एक नाटककार म्हणून खास कालिदास पासून बादल सरकार व विजय तेंडूलकर पर्यतच्या प्रतिभाशक्तीचे उत्खनन करून, शेक्सपिअरच्या दुहेरी कथानक, मॉलिअरची विनोदबुद्धी, इबसेन्ची सामाजिक समस्या, ॲन्टन चेकावची नाट्योत्कटता, जॉन स्ट्रींडबर्गचा नैसर्गिकवाद, युजिन ओ'निल्चा प्रतिकात्मक अभिव्यक्तिकरण, ब्रेच्ट यांची कथनशैली (एपिक थिएटर) टि. एस. एलियट यांची आध्यात्मिक ओढ, जिन् अनओल्हा यांच्या ऐतिहासिक दंतकथांचे पुनर्मुल्यांकन व अन्य अशा वैविध्यपूर्ण नाट्यगुणांचा अप्रतिम सुरेख संगम साधून जागतिक नाटक व रंगभूमीचे नभोमंडल उंचाविले.'' (धानवल पी., पृ. १६)

पी. धानवल या समिक्षकाने कर्नाडांच्या नाट्यलेखनाचे अत्यंत समर्पक असे वर्णन केलेले आहे.

एकंदरीत कर्नाड हे एक दिग्गज भारतीय इंग्रजी नाटककार असून ते भारतीय नाट्यपरंपरा समृध्द व किर्तीमान करण्याचा प्रयत्न करत आहेत. भारतीय नाट्यसृष्टीत त्यांचे स्थान अजरामर स्वरूपाचे आहे.

संदर्भ सूची-

१) पी. धानवल, दि इंडियन इमॅजिनेशन ऑफ गिरीश कर्नाड, एसेज ऑन हयवदना. (न्यु दिल्ली, प्रेस्टिव्ह बुक्स् २०००)

२) राममूर्ती पी., थिएटर इन बिटविन्नेस, द प्लेज ऑफ गिरीश कर्नाड: अ क्रिटिकल ॲसेसमेंट, संपा. सुब्रमनिअम डी. आर. (मदुराई, गोकुळ राधीका प्रकाशन, २००१)

३) कार्नाड, तलेदण्ड मराठी अनुवाद उमा कुलकर्णी, (मुंबई, सुगावा प्रकाशन)

४) धारवाड अपर्णा, प्रस्तावना, कलेक्टेड प्लेज, व्हॉल्युम - १ : गिरीष कर्नाड (नवी दिल्ली, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस २००५)

मा. सौ. उज्वलाताई शिंदे यांना मानचिन्ह देऊन सन्मान करताना.





पंढरपूर नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सौ. उज्वलाताई भालेराव यांचा मान देऊन सन्मान करताना लता नार्वेकर व इतर मान्यवर.

९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष मा. अरुण काकडे यांना अध्यक्षपदाची पगडी परिधान करताना ९३ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष मा. डॉ. मोहन आगाशे व इतर मान्यवर.





९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष मा. अरुण काकडे यांना अध्यक्षपदाचा शेला परिधान करताना ९३ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष मा. डॉ. मोहन आगाशे व इतर मान्यवर.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाचे दीपप्रज्वलन करताना देशाचे गृहमंत्री मा. ना. सुशिलकुमार शिंदे साहेब व इतर मान्यवर.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाचे दीपप्रज्वलन करताना आर.पी.आय.राष्ट्रीय अध्यक्ष मा. रामदास आठवले साहेब, पद्मश्री डॉ. मोहन आगाशे साहेब व इतर मान्यवर.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाचे दीपप्रज्वलन करताना संमेलनाध्यक्ष मा. अरुण काकडे साहेब व इतर मान्यवर.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाचे दीपप्रज्वलन करताना मा. आ. भारतनाना भालके साहेब व इतर मान्यवर.

वारकऱ्यांच्या माहेरघरातील लोकपरंपरा आणि लोकप्रथा

- प्रा. डॉ. द. ता. भोसले
ग्रामीण साहित्यीक

लोकसंस्कृतीच्या अपरिहार्य घटक असलेल्या प्रथा आणि परंपरा या साऱ्या समाजाच्या असतात किंवा विशिष्ट भूप्रदेशाच्या एखाद्या वेगळ्या समाजगटाच्या अशा त्या असतात. आणि अशा या प्रथा परंपरा नंतर सर्व समाजात पसरतात. मान्यता पावतात. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे त्या हस्तांतरीत होत जातात. त्यामुळेच त्या एखाद्या जिल्ह्यापुरत्या, एखाद्या तालुक्यापुरत्या नसतात. अशा साऱ्या समाजाने स्वीकारलेल्या आणि आचरणात आणलेल्या प्रथा परंपरांबरोबरच काही प्रथा आणि परंपरा मात्र एखाद्या छोट्याशा भूभागापुरत्याच नांदत असलेल्या आढळतात. अवघ्या समाजात प्रस्तुत होण्याअगोदरची कदाचित ही प्राथमिक अवस्थेतील स्थिती असावी. या प्रकारची स्थिती म्हणजे छोट्याशा भूभागामध्येच आढळणाऱ्या प्रथा आणि परंपरा पंढरपूर नगरी आणि त्या भोवतीचा परिसर या ठिकाणी देखील आपणास पहावयास मिळतात. अशा या छोट्याशा भुप्रदेशात नांदणाऱ्या प्रथा आणि परंपरांची धावती ओळख आपणास करून घ्यावयाची आहे.

पंढरपूरचा विठोबा हा अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत, भक्तीचे आदिम पीठ मानले जाते. इ.सनाच्या सातव्या शतकापासून श्री. विठ्ठलाची भक्ती मनी मानसी खोलवर रूजलेली आढळते. महाराष्ट्रीय समाजाच्या अन्य काही ज्या श्रध्देय देवदेवता आहेत, त्यांच्या उपासनेसाठी चैत्रातील आष्टमी भैरवनाथासाठी, चैत्र पौर्णिमा ज्योतिबा देवासाठी, भाद्रपदातील चतुर्थी ही गणेशासाठी, पौष महिन्यातील एक मंगळवार यल्लमा देवीच्या दर्शनासाठी अशा प्रथा समाजात रूढ झालेल्या आहेत. मान्यता पावलेल्या आहेत. पंढरीच्या विठोबासाठी मात्र चार मोठ्या एकादशी आहेतच. पण दरमहा येणाऱ्या आणि दर पंधरा दिवसांनी असणाऱ्या एकादशीवेळीही महाराष्ट्रातला वारकरी विठ्ठलदर्शनासाठी येत असतो व त्यादिवशी आधी चंद्रभागा स्नान, नंतर नगरप्रदक्षिणा, कळसाचे वा मुर्तीचे दर्शन हा त्याचा वारीचा परिपाठ ठरलेला आहे. या विठ्ठलाच्या दर्शनाला शुध्द मनाने जावे, शुध्द देहाने जावे या भावनेतून अगदी प्राचीन काळी वारकऱ्यांमध्ये हलकासा अल्पोपहार घेण्याची प्रथा रूढ झाली. आकंठ गिळलेल्या मिष्टान्नामुळे आणि गच्च झालेल्या पोटामुळे विठुरायाचे दर्शन मनाची एकाग्रता

करून घेता येत नाही. या भावनेपोटी हलका व मित आहार घेण्याची प्रथा रूढ झाली असावी. एकादशीलाच असा हा आहार घेतला जात असल्याने एकादशीला उपास, उपवास असे त्याला संबोधले जाऊ लागले, पंढरपूर पुरता हा असलेला उपवास बघता बघता साऱ्या भक्तांमध्ये प्रस्तुत झाला. गावोगावच्या भक्तांमध्ये साऱ्या महाराष्ट्रभर पसरला आणि आजवर 'माझा उपवास आहे' असे म्हणण्याऐवजी 'आज माझी एकादशी आहे' असे उपवास करणारे परस्परांना सांगत असतात. याचा अर्थ असा की, विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरीत आलेला भाविक विठुरायाची मूर्ती मनोमन रूजविण्यासाठी त्या दिवसापुरता आणि त्या शहरापुरता जो अल्पोपहार घेत होता, त्याचीच एक अलिखीत परंपरा तयार होऊन त्याची एकादशी व्रतामध्ये परिणती झालेली आढळते या नगरीपुरती असलेली ही प्रथा कालांतराने महाराष्ट्राची प्रथा झाली, असेच आपणास म्हणता येईल.

लोकपरंपरा आणि लोकप्रथा

आणखी एक प्रथा मूळ पंढरीत निर्माण झालेली असली तरी ती सर्वत्र पसरली आहे. ती महाराष्ट्रभर मान्य झालेली आहे. ती प्रथा म्हणजे वारकरी होण्यासाठी भक्ताने गळ्यात घातलेली तुळशी माळ! एखादा भक्त एखाद्या महाराजाचा शिष्य होतो, त्यांचा अनुग्रह घेतो, त्यांच्या हातुन गळ्यात माळ घालून घेतो आणि वारकऱ्यांची म्हणून सांगितली जाणारी कपाळी गोपीचंद आणि बुक्का, गळ्यात तुळशीमाळ न चुकता करावयाची वारी, प्रभातकाळी म्हणावयाचे भजन या गोष्टी निष्ठेने आचरणात आणण्याचे कबूल करून तो माळ घालतो. खरे तर ही माळ घालण्याचा विधी फक्त पंढरपुरी केला जातो, कुठलाही भक्त येथे येऊनच अशी विधीपूर्वक माळ घालून घेत असतो. आता मात्र पंढरीत येऊन माळ घालण्याची ही प्रथा प्रथम कोणत्याही स्थळी, कोणत्याही तीर्थक्षेत्री केली जाते ही बदललेली प्रथाही समाजाने आणि वारकरी भक्ताने आता मान्य केलेली आहे. मनापासून स्वीकारलेली आहे.

तीर्थक्षेत्र असलेल्या पंढरपूर येथे आणखी एक लोकपरंपरा काल-परवापर्यंत समाजात दिसून येत होती. ती म्हणजे ओल्या देहाने लोटांगण घालण्याची. मराठी भाविक भक्त एखादा रोग व आजार उद्‌भवला, एखादे विलक्षण संकट कोसळले, दीर्घकाळ अपेक्षिलेल्या एखाद्या स्वप्नाची पूर्तता झाली की, देवाला लोटांगण घालत येण्याचा दिलेला शब्द पाळण्यासाठी पंढरपूरच्या चारी दिशांना असलेल्या विसाव्यापासून हातात एक दोन फूट लांबीची काठी-काटकी घेऊन कंबरेला गच्च वस्त्र बांधून तेथून मंदिरापर्यंत जमीनीवर लोटांगण घालत विठ्ठलाच्या दर्शनाला येत असे. आधी पंढरीकडे तोंड करून उभ्या विठोबाला हात जोडून तो नमस्कार करतो, मग उजव्या हातात काटकी घेऊन चक्क रस्त्यावर कपाळ टेकवून पालथा झोपतो. त्याच अवस्थेत मनोमन पुन्हा एकदा विठ्ठलाला पुकारतो. मग हातातल्या काठीने रस्त्यावर आडवी रेघ ओढतो आणि त्या रेघेवर उभे राहून पुन्हा नमस्कार करतो, असे विसाव्यापासून हा भक्त अगदी मंदिराच्या पायरीपर्यंत दिलेल्या शब्दाला जागण्यासाठी प्रदक्षिणा पुरी करतो. नंतर तो चंद्रभागेत स्नान करून आपले नेहमीचे कपडे घालून विठ्ठलाच्या पायांना स्पर्श करून दर्शन घेतो, अशा प्रकारची ही प्रथा आता यल्लमा देवीची जी ठाणी आहेत, तिथेही पहावयास मिळते. पण ही मूळ पंढरीची प्रथा आहे. साठ सत्तर वर्षापूर्वी असे लोटांगण घालत येणारे अनेक भक्त पहावयास मिळत होते. काही भक्त असे होते की, आपल्या मूळ गावापासून पंढरपूरापर्यंत सलग दोन-तीन दिवस (थोडीशी विश्रांती घेऊन) लोटांगण घालत येणारे अनेक भक्त अनेकवेळा मी माझ्या कुमारवयात पाहिलेले आहेत. खास पंढरीची म्हणूनच या प्रथेचा उल्लेख केला पाहिजे.

या लोटांगण प्रथेविषयी लिहताना विसावा स्थळाचा नुकताच मी उल्लेख केला. हा विसावा देखील खास विठुरायाच्या पंढरीचीच एक वेगळी प्रथा म्हणावी लागेल. पंढरपूरला येऊन मिळणाऱ्या चारी दिशांच्या रस्त्याला हे विसावे पहावयास मिळतात. पंढरीकडे प्रवास करताना जेथून मंदीराच्या कळसाचे तृत्त दर्शन घडते, तेथे असलेल्या एखाद्या झाडाभोवती गोलाकार चौथरा बांधला जातो. पंढरीला जाणाऱ्या वारकऱ्यांनी थकलेल्या पायांना विसावा मिळावा म्हणून केलेली सोय असते. पूर्वीच्या काळी या विसाव्याच्या ठिकाणी थंडगार पाण्याचे माठ किंवा रांजणही ठेवलेले असायचे. चालून थकलेल्या वारकऱ्याने क्षणकाल येथे विश्रांती घ्यावी.

सोबत्याबरोबरच चार गोष्टी कराव्यात, या हेतूबरोबरच बसल्या जागेवरून दिसणाऱ्या कळसामुळे त्याच्या मनात भक्तीभावनाही निर्माण व्हायची. कळस दर्शनाला वारकरी संप्रदायात विशेष महत्व असल्याने ते झाल्याने त्याला चालण्याचे आणि स्वतःच्या जीवनाचे सार्थक झाले असेही वाटून जात असावे. विठ्ठलाचे स्मरण करण्यासाठी देखील मनाला हवा असणारा विसावा या विसाव्यामुळे मिळत असे. अंतर्मुख होण्यासाठी असे विसावे आवश्यकच म्हणावे लागतील. ही आवश्यकता फक्त प्रथेच्या रूपाने फक्त पंढरपूरच्या मार्गावरच आढळते यात शंका नाही. पांथस्थांसाठी अशा प्रकारचे विसावे अन्य कोणत्या तीर्थक्षेत्री नसावेत असे वाटते. ही खासियत केवळ पंढरपूरची म्हणावी लागेल. कोल्हापूर, तुळजापूर, आळंदी, नाशिक, वाई, वणी, जेजुरी, अक्कलकोट, गाणगापूर या तीर्थक्षेत्रांपैकी एकाही ठिकाणी म्हणजे त्यांच्या मार्गावर अशा प्रकारचे विसावे तुम्हाला दिसणार नाहीत.

पंढरपूर परिसराबरोबरच आसपासच्या भागामध्येही आढणारी आणखी एक प्रथा म्हणजे हात गहाण टाकणे ही. मनात धरलेल्या एखाद्या गोष्टीची मनासारखी परिपूर्ती झाली की, ग्रामीण भागातील स्त्रिया त्यापोटी आधी कबूल केल्याप्रमाणे आपला एक हात देवाच्या नावाने गहाण टाकतात. म्हणजे त्या हाताने कोणतेही काम करावयाचे नाही. आणि करणे अत्यावश्यक असेल तर निदान जेवताना तरी आपला उजवा हात त्या वापरत नाहीत. म्हणजे उजव्या हाताने त्या जेवत नाहीत. तो हात न वापरता तसाच ठेवला की तो गहाण ठेवला अशी या स्त्रियांची समजूत असते.

खास पंढरी नगरीची प्रथा-परंपरा म्हणून तिचा उल्लेख करायला हवा अशी प्रथा म्हणजे सजवलेल्या म्हशीची थाटामाटात मिरवणूक काढणे, चंद्रभागेच्या वाळवंटात त्यांना पळविणे ही म्हणता येईल. पंढरपूरात दुग्ध व्यवसाय करणारा गवळी समाज हा बराच मोठा आहे. या समाजाची अनेक वर्षापासून चालत आलेली एक प्रथा अशी की, दिवाळी पाडव्याच्या दुसऱ्या दिवशी हा समाज आपल्या म्हशींना स्वच्छ करतो. त्यांना रंग, गोंडे, तोडे बांधून सजवितो आणि मग त्यांना चंद्रभागेच्या वाळवंटी थाटामाटात घेऊन जातो. तेथे त्याचा एक सगर नावाचा पुजारी गवळी समाजाचा देव घेवून येतो. त्या देवासमोर साऱ्या म्हशींना उभे केले जाते. देवाचे कुंकू म्हशीच्या कपाळी लावले जाते. आशीर्वाद मागितला जातो आणि कुलदेवतेला प्रसन्न करण्यासाठी जमलेल्या साऱ्या म्हशी (त्यांची एकूण संख्या शेकड्यात असते) सवाद्य पळवितात. त्यांची मिरवणूक काढतात. त्याच दरम्यान या म्हशींना विठोबा मंदिराभोवती महाद्वारापर्यंत पळवितात. कदाचित विठोबाला घातलेली ही प्रदक्षिणा असावी. अशाच प्रकारची मोठी मिरवणूक ज्येष्ठ महिन्याच्या पौर्णिमेलाही साजरी केली जाते. आपल्या समाजात सर्वात उपेक्षित प्राणी म्हणजे गाढव आणि रेडा! हा प्राणी ताकदवान, कष्टाळू, शांत आणि आज्ञाधारक असूनही त्याची उपेक्षा झालेली असते. नाही म्हणायला मरिआईला बळी देण्यासाठी रेड्याचा वापर केला जातो. पण पंढरपूरच्या गवळी समाजाचे वैशिष्ट्य असे की, ते रेड्याचीही मनोभावे पूजा करतात. त्याचीही मिरवणूक काढतात. त्यांनाही दिवाळीत पुरणपोळीचा नैवेद्य म्हशीबरोबर खाऊ घातला जातो. यादृष्टीने मला ही प्रथा एक कृतज्ञतेचा भाग म्हणून विशेष मोलाची वाटते. वर्षातून अशा तीन मिरवणूकीइतकी असेल, असे वाटत नाही.

पंढरपूर शहर आणि परिसर एक लोकप्रिय तीर्थक्षेत्र असल्याने, भक्तीभावनेचा येथे नेहमी जागर होत असल्याने या शहरात व शहराजवळच्या ग्रामीण भागात आणखी सांगण्यासारख्या बऱ्याच प्रथा-परंपरा काल परवापर्यंत नांदत होत्या. त्यांची ओळख विस्तार भयास्तव करून दिलेली नाही.

तसा विचार केला तरी लोकसंस्कृतीमधील प्रथा - परंपरा या सर्वाधिक स्वरूपाच्या असतात. सर्वमान्य झालेल्या असतात. सर्वाधिक होण्यापुर्वीचे उगमस्थान म्हणून पंढरपूरमधील या प्रथा-परंपराकडे पाहावयास हरकत नाही, असे म्हणावेसे वाटते.

९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलन उद्घाटन कार्यक्रमाचे निवेदन करताना प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ व पुष्कर क्षोत्री.





९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाच्या 'मांदियाळी' या स्मरणिकेचे प्रकाशन करताना मान्यवर.

९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाचे अध्यक्ष मा. अरुण काकडे यांच्या 'अमका' या पुस्तकाचे प्रकाशन करताना मान्यवर.






९३ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाचे अध्यक्ष पद्मश्री मा. डॉ. मोहन आगाशे यांचा सन्मान करताना मा. ना. सुशिलकुमार शिंदे साहेब व इतर मान्यवर.



नाट्यसृष्टीतील घडामोडींवर हितगुज करताना मा. ना. सुशिलकुमार शिंदे साहेब व पद्मश्री मा. डॉ. मोहन आगाशे.



'मांदियाळी' स्मरणिकेचे वाचन करताना मा. ना. सुशिलकुमार शिंदे साहेब.



'मांदियाळी' स्मरणिकेचे वाचन करताना सहकारमंत्री मा. ना. हर्षवर्धन पाटील साहेब.



उदघाटन प्रसंगी उपस्थित असलेले मान्यवर व नाट्यकलावंत.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलनाचे मानचिन्ह स्विकारताना पद्मश्री डॉ. मोहन आगाशे.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलनाच्यावेळी मा. ना. हर्षवर्धन पाटील यांचा सत्कार करताना मा. मोहन जोशी व इतर मान्यवर.



महाराष्ट्र शासनाच्या वतीने अ. भा. मराठी नाट्य परिषदेस देण्यात येणाऱ्या निधीचा धनादेश सुपुर्द करताना सांस्कृतिकमंत्री मा. ना. संजय देवताळे साहेब.



अ.भा.मराठी नाट्य परिषद मुंबईचे कार्यकारणी सदस्य आणि पंढरपूर शाखेचे कार्यवाह मा. दिलीप कोरके यांचा सन्मान करताना पद्मश्री डॉ. मोहन आगाशे व इतर मान्यवर.

सर्वांगीण व्यक्तीमत्त्व विकासासाठी नाट्यकला आवश्यक! (काळाची गरज)

- श्री. यतिराज वाकळे
मंगळवेढा

पहिल्यांदा आपण नाटक म्हणजे काय ते पाहू... नाटक म्हणजे नुसता अभिनय नव्हे, नाटकामध्ये गीत गायन आणि संगीत यांचाही समावेश होत असतो. ज्या ज्या कलांचा संबंध समुदायाशी येतो, त्या सर्व कलांचा समावेश नाटकामध्ये होऊ शकतो. म्हणून नाट्यकला म्हणजे नुसती अभिनय कला नव्हे, हे पहिल्यांदा आपण लक्षात घेतलं पाहिजे.

नाट्यकलेचा संबंध अगदी ऋग्वेद काळापासून भारतीय संस्कृतीत आहे. हे आपल्या लक्षात येते. जसे चार वेद आहेत... ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद! तसाच एक पाचवा वेद त्या काळात निर्माण झाला! त्या पाचव्या वेदाला पंचमवेद असे म्हणतात! या पंचमवेदालाच नाट्यवेद असेही म्हटलेलं आहे!

या नाट्यवेदाची निर्मिती कशी झाली, तर ती अशी झाली मानतात... ऋग्वेदातून पाठांतर कला, यजुर्वेदातून अभिनय कला, सामवेदातून गीत-गायन-संगीत कला, आणि अथर्ववेदातून नवरस कला घेऊन हा नवीन पंचमवेद निर्माण करण्यात आला. या पंचमवेदालाच नाट्य वेद असे म्हटलेले आहे.

याचा अर्थ असा होतो की, नाट्यकला ही ऋग्वेदकाळातच निर्माण झालेली कला आहे. या कलेला फार मोठा प्राचीन इतिहास आहे. अशी अख्यायिका आहे की, नाट्यवेद निर्माण करण्याची आवश्यकता निर्माण झाली त्या पाठीमागे एक प्राचीन पूर्वपिठीका आहे. ती अशी....

वेदोषवैदैः सम्बद्धो नाट्यवेदो महात्माना।
एवम् भागवता सृष्टो ब्रह्मणा सर्वेदिनी।।

म्हणजे याचा अर्थ असा होतो की, पृथ्वी, स्वर्ग व पाताळ येथे देवदेवतांचे रक्षण करण्यास, राजेलोकांना (लोकपालांना) विलक्षण त्रास घ्यावे लागत होते, हे पाहून राजर्षी इंद्रानी पितामह ब्रह्मदेवाची भेट घेतली. आम्हा स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळवासियांसाठी मनोरंजनाचं असं कोणतं तरी माध्यम तुम्ही शोधून काढा, कि जे पाहण्यासाठी योग्य असेल आणि ऐकण्यासाठीही योग्य असेल'. अशी विनंती साक्षात इंद्रानी करताच, भगवान ब्रह्मदेवाने चारही वेदांचे स्मरण करून एका नव्या वेदाची, पंचमवेदाची निमिर्ती करण्याचा संकल्प सोडला. हा नवा वेद म्हणजे पंचमवेद! हा पंचमवेद म्हणजे नाट्यवेद!

अवस्था या तु लोकस्य सुखदुःख समुद्भया ।
नानापुरुषसंचारा नाटकेऽ सौ विधीयते ।।

म्हणजे भगवान ब्रह्मदेव एवढ्यावरच थांबले नाहीत, तर या नाट्यवेदाचा सर्वदूर प्रचार करण्याची जबाबदारी त्यांनी राजर्षी इंद्रावर टाकली. पण नाटकाविषयीचं त्यांचं चिंतनही तपशिलवार लिहून ठेवलं. आदर्श नाटक कसं असावं? नाटकात मानवी सुखदु:खाचं, विविध जीवन अवस्थांचं सुंदर चित्रण असावं, हजारो लोकांसमोर सादर झाल्यानंतरही त्यातून भावभावनांचे यथार्थ प्रकटीकरण व्हावं; नाटकात नाही असं कोणतंही ज्ञान, असं कोणतंही शिक्षण, अशी कोणतीही विद्या, अशी कोणतीही कला, असं कोणतंही कर्म, असा कोणताही योग शिल्लक राहणार नाही, असे नाटक असावं हे ही त्यांनी सूचित केलं...

यावरून एक गोष्ट लक्षात येते की, नाट्यकला ही फारच महत्त्वाची कला आहे. याचा विचार करून गेल्या कांही वर्षांपूर्वी महाराष्ट्र सरकारने नाट्यकला हा विषय ८वी, ९वी आणि १०वीच्या पाठ्यक्रमात आणावा असा विचार सरकारी पातळीवर केला. परंतु पुढे घोडं कुठं आडलं (थांबलं) काही समजत नाही.

नाट्यकलेत सर्वप्रकारचं ज्ञान, शिक्षण, विद्या, कला, कर्म, योग इत्यादी गोष्टी समाविष्ट झालेल्या आहेत. म्हणून आजच्या तरुण पिढीला नाट्यकलेची फारच आवश्यकता आहे. नाट्यकला ही विज्ञानयुगातही कशी उपयुक्त आहे ते आपण पाहणार आहोत. परंतु त्याबरोबरच नाट्यकलेमुळे व्यक्तीचा विकास कसा होतो ते पाहणे महत्त्वाचे आहे...

नाट्यकलेमुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो. तो येणेप्रमाणे, तो असा...

१) वक्तृत्व, सभाधीटपणा निर्माण होतो. नाट्यकलेमुळे व्यक्तीचे वक्तृत्व आपोआपच विकसित होते. नाटकाच्या पाठांतरामुळे उच्चार शुद्ध निर्माण होतात. आवाजात नेमका चढउतार करण्याचे कौशल्य त्यांच्यामध्ये येते. बऱ्याचवेळा आपण पाहतो; ज्यांच्याकडे नाट्यकला आहे, त्यांच्याकडे भाषेतील शब्दांचे उच्चारतंत्र आणि शब्दांच्या उच्चारांना चढउतारपणा आपोआपच येतो. शिवाय तो नाट्यकला हजारो लोकांच्या समोर सादर करीत असतो. त्यामुळे सभाधीटपणाही त्याच्याकडे आपोआपच येतो. चांगले 'सूत्रसंचालन', हे नाट्यकलेचेच लक्षण आहे.

२) राहणीमानात टापटीपपणा - नाट्यकलेमुळे पोशाख व मेकअपचे ज्ञान प्राप्त होते. त्यामुळे पोशाख पद्धतीत व राहणीमानात टापटीपपणा येतो.

३) जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो. बऱ्याचवेळा मनुष्य जीवनाकडे निराशेने पाहातो. जीवन एक दु:ख आहे हे समजतो. कुटुंबाच्या सुखदु:खात फारच बुडून जातो. कुटुंबाशिवाय तो बाकीचा कांही विचारच करीत नसतो. परंतु ज्यांनी नाट्यकला आत्मसात केली आहे. त्यांचा 'जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन आनंदी व समाधानी असतो. कलाकार हा नेहमी प्रसन्न असतो. सुखदु:खाकडे पाहण्याच्या कल्पना त्याच्या अधिक विस्तृत होतात. त्यामुळे तो आपल्या कौटुंबिक सुखदु:खात कधीच बुडून जात नाही! तो फक्त आपल्या कुटुंबापुरते न पाहता त्याचा दृष्टीकोन सामाजिक बनतो. माझे स्वत:चे एक उदाहरण इथे द्यावे, असे मला वाटते. 'माझे वडिल वारले तेव्हा मी एक नाट्यप्रयोग सादर करणार होतो. नाटकाची प्रॅक्टीस चालू होती. वडिल वारले! फक्त ६ दिवस प्रॅक्टीस बंद ठेवली! ७ व्या दिवशी मी प्रॅक्टीसला आलो आणि १८ व्या दिवशी प्रयोग सादर केला. यातून सांगायचा मुद्दा असा की, मी माझ्या कुटुंबाच्या दु:खात बुडून गेलो नाही. कलाकारामध्ये संकुचित दृष्टीकोन राहात नाही. तो सामाजाचा, विश्वाचा विचार करीत असतो.

४) संवादकौशल्य वाढते - नाट्यकलेमुळे कलावंतात संवाद कौशल्य निश्चितच वाढते. समोरच्या व्यक्तीशी संवाद करताना आपल्या आवाजाची पातळी कशी ठेवावी, समोरच्या व्यक्तीकडे बोलताना कसे बघायचे? समोरच्या व्यक्तीला आपणाशी बोलताना कसे वाटते? समोरच्या व्यक्तीला आपले बोलणे पटते का? त्याला आपल्याशी संवाद साधणे आवडते का? या व इतर अनेक गोष्टींचे ज्ञान नाट्यकलेमुळे विकसित होते. समाजात नेहमी आपणाला पाहायला मिळते की, जिल्ह्याचा अधिकारी किंवा एखाद्या खात्यातील अधिकारी लोकांशी नीट संवाद साधू शकत नसतो. लोकांशी त्याला नीट बोलता येत नसते. परंतु त्याच्या कडे नाट्यकला असेल तर तो निश्चितपणे इतरांशी फार चांगल्या पद्धतीने संवाद साधू शकतो. सर्व व्यवसायात नाट्यकला उपयुक्त आहे. व्यवसाय कुठलाही असो तो व्यवसाय समाजाभिमुख बनवायचा असेल तर त्याच्याकडे नाट्यकलेचं शिक्षण असणं महत्त्वाचं व गरजेचं आहे. समाजात चांगला डॉक्टर, चांगला वकील, चांगला

शिक्षण, चांगला अधिकारी, चांगला उद्योगपती, चांगला व्यापारी किंवा कुठल्याही क्षेत्रात उत्तम कामगिरी करण्यासाठी आपल्या मूळ व्यवसायाच्या जोडीला नाट्यकला असेल, तर तो मनुष्य समाजात इतरांपेक्षा आप आपल्या क्षेत्रात सरस, वरचढ ठरतो. त्याची कामगिरी उठावदार दिसते. समाजाशी संवाद साधण्यासाठी कला नाट्यकलेममधूनच निर्माण होत असते. शिक्षकासाठी तर नाट्यकला फारच आवश्यक आहे.

५) संवेदनशीलता प्राप्त होते - अलीकडे समाजात दिवसेंदिवस संवेदनशीलता नष्ट होताना दिसत आहे. फक्त आपल्या व आपल्या कामातच माणूस बुडून गेलेला आहे. समाजातील कुटुंबाच्या सुखदुःखाशी काहीही त्याचे घेणे-देणे नसते, यालाच असंवेदनशीलता असे म्हणतात. परंतु ज्यांच्याकडे नाट्यकला आहे असा माणूस समाजातील सुखदुःखशी समरस होतो. समाजाचे दुःख, राष्ट्राचे दुःख हेच आपले दुःख असे मानण्याची प्रवृत्ती नाटकामुळे त्याच्यात आपोआपच निर्माण होत असते. नाटकात मानवी सुखदुःखाचं विविध जीवन अवस्थांचं सुंदर चित्रण करण्याची सवय त्याच्यात नाटकांच्या सरावामुळे निर्माण झालेली असते. त्यामुळे कलावंताकडे संवेदनशीलता इतर लोकांपेक्षा (अकलावंतांपेक्षा) अधिक असते असे आमचे ठाम मत आहे.

६) साहित्य कलेची आवड निर्माण होते - नाट्यकला ही साहित्यातीलच एक कला आहे. साहित्य हे एक अतिविस्तृत क्षेत्र आहे. त्यातच नाट्यकला येते. त्यामुळे नाट्यकलावंतांना साहित्याची आवड निर्माण होते. साहित्यामध्ये अनेक रस आहेत. त्या प्रत्येक रसाचा आस्वाद घेण्याची आवड नाट्यकलावंतांना निर्माण होत असते. नाट्यकलावंताला वाचनाची आवड असते. त्यामधूनच लेखनाचीही आवड त्यांच्यात निर्माण होऊ शकते. चांगला नाट्यकलावंत एक चांगला साहित्यिक असू शकतो. नाट्यकलावंतामधूनच बरेच नाटककार निर्माण झाले आहेत. बरेच दिग्दर्शक निर्माण झाले आहेत. नाटककार, दिग्दर्शक हे तर साहित्यिकच असतात.

६. टीममध्ये काम करण्याची सवय निर्माण होते - बऱ्याच वेळी काही माणसांना टीममध्ये काम करता येत नाही, एकट्यानेच काम करण्याची सवय असते. परंतु एकट्यानेच काम करण्यामुळे कामाला पुर्णत्व प्राप्त होत नाही. कामामध्ये कुठली तरी त्रुटी राहते. परंतु नाटकात काम करण्याची ज्यांना सवय असते अशा लोकांना टीममध्ये काम करण्याची सवय विकसित होत असते. बरीचशी कामे टीमशिवाय यशस्वी होत नसतात. क्रिडा, नाट्य, उद्योग, व्यवसाय, इत्यादी सर्व क्षेत्रात टीमवर्क करण्याची सवय असावी लागते. ती सवय त्याला नाट्यकलेमुळे प्राप्त होते.

७. छंदामुळे माणूस आनंदी राहतो - ज्येष्ठ नागरिकांमध्ये बरेचशे ज्येष्ठ नागरिक एकटे पडलेले असतात, त्यामुळे ते दुःखी, कष्टी असतात. परंतु एखाद्या व्यक्तीकडे नाट्यकलेसारखा छंद असेल, तर तो मरेपर्यंत एकटा कधी पडत नाही. त्याचे मित्र, त्याचे त्याच्या कलेचे भक्त, त्याचे प्रेक्षक, कलेमुळे इतर क्षेत्रातील त्याच्या ओळखीच्या व्यक्ती, अशा अनेक व्यक्ती, अनंत संस्था, अनेक प्रेक्षक यांचा व त्याचा सारखा संबंध येत असतो. त्यामुळे तो जीवनात एकटा कधी राहात नाही व एकटेपणा कधी त्याच्या जीवनात येत नाही. त्यामुळे इतर व्यक्तींपेक्षा कलावंत साहित्यिकाचे सरासरी वय अधिक असते. त्याचे कारणच हे आहे! जीवनावर कलावंत अधिक प्रेम करतो.

८) जीवन समाधानी व आनंदी असते -

काही लोक जीवनात दुसरे काहीही न करता नुसता पैसा मिळवितात. पैसा मिळविण्यातच त्याला आनंद मिळत असतो. परंतु नुसते पैशाच्या मागे लागलेला मनुष्य समाधानी व आनंदी कधीच होत नाही.

परंतु कलावंत हा नेहमीच समाधानी असतो. कलावंताने कला सादर केली आणि प्रेक्षकांनी टाळ्या वाजवून त्याच्या कलेला दाद दिली की, कलावंत अक्षरशः आपण, स्वर्गीय अनुभव घेत आहोत असा भास होतो. कलेच्या सादरीकरणामुळे तो नेहमीच समाधानी व आनंदी असतो.

व्यक्तीमध्ये खऱ्या अर्थाने व्यक्तीविकास व्हायचा असेल, तर त्याला नाट्यकलेचा फारच उपयोग होतो. कलावंत हा कधीही पैशाला किंमत देत नसतो. म्हणूनच नटसम्राट नाटकात वि. वा. शिरवाडकरांनी अप्पासाहेब बेलवलकरांच्या तोंडी एक वाक्य घातले आहे, ते इथे नमूद करणे फारच आवश्यक आहे असे वाटते.... आपल्या मुलीला उद्देशून, आप्पासाहेब बेलवलकर म्हणतात... 'लक्षावधी रसिकांच्या आशीर्वादाने, कुबेराहून श्रीमंत आणि इंद्राहून भाग्यवान ठरलेला रंगदेवतेचा पुजारी मी! त्याची तू विटंबना करतेस... तुझा बाप झाला म्हणून...

एका नाटककाराने एका नाटकात म्हटलेले आहे, चंद्र आपला कलंक आपल्याजवळ ठेवून जगाला चांदणे वाटून देतो. त्याप्रमाणे कलावंत आपले दुःख आपल्या जवळ ठेवून आपल्या कलेचा आनंद दुनियेला वाटून देतो.

विज्ञान आणि नाट्यकला याचा संबंध –

नाट्यकलेमुळे व्यक्तीमध्ये विज्ञाननिष्ठा निर्माण होते आणि त्याच्या मनातील अंधश्रद्धा दूर होतात. कारण कुठल्याही नाटकामध्ये नाटककार अंधश्रद्धेला थारा देत नाही. नाटककार हा मोठा साहित्यिक असतो. साहित्यिकाला किंवा नाटककाराला असा एक दृष्टीकोन प्राप्त झालेला असतो की, तो कुठल्या चमत्कारावर किंवा थोतांडावर विश्वास ठेवत नसतो. त्यामुळे कुठल्याही नाटकात अंधश्रद्धेला खतपाणी घातलेले आहे, असे आपणाला मुळीच पहायला मिळणार नाही. नाटककार हा नकळत आपल्या नाटकाच्या माध्यमातून कलावंतावर आपल्या नाटकाचे संस्करण करीत असतो. म्हणजे नाट्यकलावंतावर अनेक नाटकांचे, अनेक नाटकातील भूमिकांचे नकळत संस्कार होत असतात. त्यामुळे नाट्यकलावंत हा भाबडा नसतो. नाट्यकलावंत हा अंश्रद्धाळू नसतो, कलावंताकडे एक विज्ञानदृष्टी निर्माण झालेली असते. कलावंत हा आस्तिकही असेल किंवा नास्तिकही असेल. परंतु तो अंधश्रद्धाळू निश्चित नसतो. नाटकांच्या वाचनामुळे, नाटकातील भूमिकेच्या पाठांतरामुळे तो विज्ञाननिष्ठ बनलेला असतो. कुठल्या भोंदूबाबावर किंवा चमत्कारावर त्याचा अजिबात विश्वास नसतो.

नाटकांच्या माध्यमातून लोकांच्या मनावरील अंधश्रद्धा दूर करणे शक्य आहे. ती कशी ते पहा..... फार वर्षापुर्वी मी मराठवाड्यात एका शाळेत नोकरी करीत होतो. त्या गावी एक भोंदूबाबा होता. तो आपल्या मंत्राच्या बळावर लिंबू पळवून दाखवित होता. मी व आमच्या शाळेतील सायन्स शिक्षक तिथे गेलो व त्याची लिंबू पळवून दाखविण्याची कला बारकाईने आत्मसात केली. आम्ही शिक्षकांनी चर्चा केली व निष्कर्ष असा काढला की, त्या लिंबामध्ये कुठलीतरी वस्तू घातलेली असावी. शिवाय तो लिंबू विस्तवाच्या जवळच ठेवत होता, म्हणजे लिंबाच्या आतील वस्तुचा व विस्तवाचा लिंबू पळविण्यापाठीगे कांहीतरी संबंध असावा, हे आमच्या लक्षात आले. आम्ही त्या भोंदूबाबाचे लिंबू हातात घेऊन पाहिले तेंव्हा आमच्या लक्षात आले की, लिंबामध्ये भोंदूबाबाने पाऱ्याची छोटी गोळी घातलेली होती. तो ते लिंबू विस्तवाजवळ ठेवत होता. त्यामुळे त्या लिंबामधील पाऱ्याची गोळी उष्णतेच्या संपर्कात आली की, प्रसरण पावत असल्यामुळे, लिंबू विस्तवापासून आपोआपच दूर पळत होते.


हा भोंदूबाबाचा अंधश्रद्धेचा प्रकार एखाद्या नाटकामधून लोकांच्या समोर आणता येतो व नाटकाच्या माध्यमातून लोकांमधील अंधश्रद्धा दूर करता येते.

जादू ही एक कला आहे. जादू ही कला सुद्धा नाट्यकलेतच मोडते. जादूगार शेवटी सांगतो ही एक हाताची व नजरेची कला आहे. हा चमत्कार नाही किंवा कुठली अंधश्रद्धा नाही. म्हणजे जादूगार हा एक नाट्यकलावंत असतो. तो समाजातील अंधश्रद्धा दूर करून लोकांमध्ये विज्ञानातील दृष्टीकोन निर्माण करीत असतो.

विज्ञानातील कांही चमत्कार नाटकामधून व जादूच्या प्रयोगामधून दाखवून लोकांमध्ये विज्ञानदृष्टीकोन निर्माण करायला नाट्यकला ही एक उपयुक्त कला आहे.

मराठीचे श्रेष्ठ व ज्येष्ठ कलावंत डॉ. श्रीराम लागू, कै. निळू फुले, सदाशिव आमरापूरकर, स्मिता तळवळकर अशा अनेक कलावंतांनी अंधश्रद्धा निर्मुलन करण्यासाठी काम केले. डॉ. श्रीराम लागू नाटकामुळेच मी असा बनलो; म्हणजे विज्ञानवादी, अंधश्रद्धेचा विरोधक व नास्तिक. डॉ. श्रीराम लागू समाजात जिथे जिथे जातात, तिथे उघड-उघड बोलतात, 'या जगात देव नाही'. नास्तिकवाद हे त्यांचे वैयक्तीक मत आहे. परंतु ते विज्ञानवादी आहेत हे मात्र निश्चित आहे.

नाट्यप्रशिक्षणाची आवश्यकता – नाटकाची आवड असणे हा उपजत गुण आहे! या गुणाला सादरीकरणाचा सराव मिळाला, तर तो कलावंत होतो! परंतु तो कलावंत लवकरात लवकर परफेक्ट (पूर्ण) होण्यासाठी त्याला नाट्यप्रशिक्षण आवश्यक आहे. नाटकांच्या सरावामधून जी गोष्ट कळायला १२ वर्षे लागतात, तीच गोष्ट प्रशिक्षणामुळे ताबडतोब कळते, म्हणून नाट्यप्रशिक्षण आवश्यक आहे. शालेयस्तरावर अभ्यासक्रमात नाट्यकलेचा समावेश असावा, असे आमचे मत आहे.


लोककला आविष्कार
सादर करताना नाट्य कलावंत



लघु नाटिका सादर करताना
नाट्य कलावंत

९४ व्या अ.भा. मराठी नाट्य संमेलनानिमित्त प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेस आमच्या

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. सोलापूर

प्रधान कार्यालय : २०७/८/९, गोल्डफिंच पेठ, सोलापूर-७
फोन नं.०२१७-२७२९४७१, २७२९४७२, २६२९४७४, फॅक्स-२६२९४७५
Email : dccblsol@bsnl.in, dccblsol@gmail.com

बँकेची संपत्तिक स्थिती दि. ३१/०३/२०१३ (आकडे कोटीत)

१	भाग भांडवल	रु. १४८.१४
२	निधी	रु. २९१.१८
३	ठेवी	रु. ३४७६.४५
४	घेतलेली कर्जे	रु. १००१.१८
५	दिलेली कर्जे	रु. ४०५५.३१
६	गुंतवणूक	रु. ८३३.७०
७	ढोबळ नफा	रु. ५८.७०
८	खेळते भांडवल	रु. ५१७१.९३

* आकर्षक व्याजदराच्या विविध बचत व मुदतठेव योजना.
* कोअर बँकिंग सुविधा उपलब्ध.
* RTGS व NEFT सुविधा उपलब्ध.
  IFSC Code : YESBOSDC001

अधिक माहितीसाठी बँकेच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधावा.

बबनराव बा. आवताडे
व्हाईस चेअरमन

दिलीप ब्र. माने
चेअरमन


के.व्ही. मोटे
प्र. सरव्यवस्थापक

व समस्त संचालक मंडळ





९४ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!



डॉ.मोहिते हॉस्पिटल

डॉ.पी.बी.मोहिते M.D.,D.G.O.
स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ञ
वेळ : स.११ ते ३ व सायं.६ ते ९

डॉ.सौ. रेखा मोहिते B.A.M.S.
वेळ : स.११ ते ३ व सायं.६ ते ९

कर्नल भोसले चौक, पंढरपूर.
फोन : ०२१८६-२२९९३९
मोबा.: ९४२२०६६३९५
नाव नोंदणीसाठी दूरध्वनी
9561153574

* सुसज्ज मॅनर्निटी व नर्सिंग होम. * प्रसुती व सिझेरियन सेवा. * कॅन्सर निदान व उपचार.
* स्त्री रोगावरील सर्व शस्त्रक्रिया. * वंध्यत्त्व निवारण. * दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया. * सरकारमान्य सोनोग्राफी सेंटर.
सरकारमान्य गर्भपात केंद्र. * काल्पोस्कोपी. * गरोदरपणातील चाचण्या व उपचार.
* सरकारमान्य कुटूंब कल्याण शस्त्रक्रीया केंद्र. * ॲडोलेसन्ट क्लिनिक : वयात येणाऱ्या मुलींच्या समस्या व उपचार.

हौशी कलाकारांची ग्रामीण रंगभूमी

- प्रा. नारायण घुले
मंगळवेढा

खेड्यांमधून नाटकाची आवड असणारी मंडळी एकत्र येऊन एखादे नाटक बसविण्याचा विचार करतात. अशी नाटके गावातील जत्रा, शाळेतील संमेलने, ग्रामीण नाट्यस्पर्धा एखाद्या संस्थेचा रौप्यमहोत्सव किंवा एखाद्या व्यक्तीच्या स्मरणार्थ बसविली जातात. पुढे अशी संधी मिळत गेली तर आपण मोठे कलाकार होऊ आणि सिनेमात किंवा टी. व्ही. मालिकेत कामं करून भरपूर पैसा मिळवू असा काहीतरी भाबडा विचार करून ही मंडळी नाटकाने झपाटलेली असतात. दरवर्षी कुठल्या न कुठल्या निमित्ताने नाटके बसवत असतात. लोकांना आपली कला दाखवत असतात. हे वर्षानुवर्षे चाललेले असते. परंतु त्यातील कोणताही कलाकार सिनेमात किंवा टी. व्ही. मालिकेत जात नसतो. हे करण्यामध्ये त्याला कसलीही अर्थप्राप्ती होत नसते. उलट त्याच्याच खिशाला चाट बसत असते. नाटकाच्या तालमी करण्यात दोन-दोन, तीन-तीन महिने वेळ घालविला जात असतो. सराव व पाठांतर करताना त्या त्रासाला कंटाळून पुढच्या वर्षी नाटकात काम करायचे नाही अशी भीष्म प्रतिज्ञा करीत असतो. अखेर हा सर्व मेळ घालून नाटक सादर केल्यानंतर दुसऱ्या दिवशी लोकांचे कौतुकाचे शब्द ऐकण्यासाठी त्याचे कान असुसलेले असतात. लोकांची वाहवा व कौतुक ऐकून पुढच्या वर्षी नाटकात काम करायचे नाही ही भीष्म प्रतिज्ञा तो केव्हाच विसरून गेलेला असतो. पुन्हा ४-६ महिने गेले की नवीन नाटकाच्या गप्पा सुरू होतात. थोडक्यात 'हौशी कलाकारांची ग्रामीण रंगभूमी' अशी असते.

*** ग्रामीण रंगभूमीवरचा दिग्दर्शक (सर्वेसर्वा) -**

नाटक बसवून ते सादर करेपर्यंत ज्या अनंत अडचणी असतात. त्या अडचणींना तोंड देत हे चाललेलं असतं. अगदी सुरूवातीला नाटकाचं दिग्दर्शन करायचे कोणी, इथून अडचणींना सुरूवात होते. यावर एकच तोडगा निघतो, ज्याने ही चळवळ जास्त दिवस चालवली आहे किंवा नाटक नावाच्या मंडळाचा मेळ घातला आहे तो दिग्दर्शक होतो. नाटकाच्या भूमिका वाटताना सर्वात चांगली भूमिका, भाव खाऊन जाणारी भूमिका, त्या नाटकातील मध्यवर्ती भूमिका दिग्दर्शक स्वत:कडे ठेवून घेतो. नंतर आपल्या जास्त जवळ असलेला त्याला नंबर

दोनची भूमिका देतो. राहिलेल्यांना कमी अधिक महत्त्वाच्या भूमिका नारळ फोडून खोबरं वाटावं तशा कलाकारांमध्ये वाटून टाकतो. भूमिका देताना त्याला ती भूमिका पेलेल का ? या भूमिकेला तो मॅच होईल का? असा विचार तो क्वचितच करत असतो. कधी कधी या भूमिका वाटताना रूसवे फुगवे सुरू होतात. मग ग्रामीण रंगभूमीवर नाटकाचा सर्वेसर्वा दिग्दर्शकच असतो. सुत्रधार, निर्माता ही पदं नाममात्र असतात. अशी पदं ज्याला भूमिका जमत नाहीत अशांना दिली जातात.

*** स्त्री भूमिकेबद्दल अडचण -**

भूमिका वाटप करत असताना दुसरी अडचण अशी की, नाटकातील स्त्री भूमिकेसाठी मुलीच मिळत नाहीत. एखादी मुलगी तयार होते. एक-दोन दिवस तालमीला येते आणि पुन्हा अचानक कुठे माशी शिंकते कुणास ठाऊक. परंतु ती प्रॅक्टीसला येणे बंद होते. घरूनच निरोप येतो, माझ्या भावाने मला नाटकात काम करण्यास बंदी घातली आहे. परंतु गोष्ट खरी की, सुज्ञ आई-वडील आपल्या मुलीला नाटकात काम करण्यास परवानगी देत नसतात. कारण त्यांना पक्कं माहित असतं की, ही नाटकवाली मंडळी रिकाम-टेकडी असतात, अशा कंपूमध्ये रोज दोन-दोन तास रात्री उशीरापर्यंत मुलीला तालमीसाठी पाठवणं हे योग्य नाही. त्यामुळे एखाद्या हायस्कूल किंवा कॉलेजमध्ये शिकत असलेल्या मुलीला नाटकात काम करण्याची इच्छा असली तरी तिचे आई वडील तिला परवानगी देत नाहीत. त्यामुळे शेवटी त्या पात्राला मॅच न होणारी मुलगी आई-वडीलांच्या परवानगीने कशी बशी स्विकारावी लागते. कधी कधी नाटकात तिच्या सौंदर्याची वर्णने करणारी वाक्यं ऐकत असताना विरोधाभास निर्माण होतो. एका नाटकात नायक नायिकेला म्हणतो, ''तुझ्या डोळ्याकडे पहात रहावे आणि डोळ्यातले तेज पित रहावे असे वाटते''. पण प्रत्यक्षात त्या नायिकेचे डोळे तिरळे असतात किंवा घुबडासारखे वरवरवलेले असतात. तसेच म्हाताऱ्या स्त्रीची भूमिका करायला मुली मिळवणं फारच अवघड. कारण त्या मुलीला भिती वाटत असते आपण म्हाताऱ्या स्त्रीची भूमीका केली तर लोक आपणाला म्हातारी म्हणतील!

काही वेळी नाटकात प्रियकर प्रेयसीचे किंवा नवरा बायकोचं काम करताना आमक्या पात्राची बायको किंवा प्रेयसी होणं मला मुळीच आवडत नाही, त्यामुळे माझा अभिनय मला चांगला करता येणार नाही असं सांगितलं जातं. माझ्या अनुभवात एकदा असं पहायला मिळालं की, नाटकात काम करणारा नायकच रूसून बसला. कशासाठी तर त्याला आवडणाऱ्या नाटकातल्या दुसऱ्या मुलीबरोबर काम करावयाचे होते. नाटकात भूमिका स्विकारत असताना आपली प्रेयसी कोण आहे किंवा आपला प्रियकर कोण आहे याला अधिक महत्त्व दिले जाते. भूमिकेला नाही म्हणणे म्हणजे ही ग्रामीण हौशी कलाकाराची व्यथा असते.

*** नाटकाच्या तालमी -**

पात्रांची निवड झाल्यानंतर नाटकाच्या तालमी कधी व कुठे घ्यावयाच्या यावर चर्चा चालते. रोजच्या तालमीला बरेच कलाकार वेळेत हजर रहात नसतात किंवा न सागंता दांड्या मारतात हे प्रकार सगळीकडे पाहायला मिळतात. त्यामुळे सर्व कलाकार एकत्र येऊन तालीम झालेली आहे असा दिवस दुर्मिळच असतो. मात्र बिचाऱ्या दिग्दर्शकाला दररोज नियमीत हजर रहाणं भाग असतं.

*** नाटकांसाठी लागणाऱ्या वस्तू (रेफ्रिज) -**

तालमी कशा बशा पार पडल्यानंतर प्रत्यक्ष नाटक ज्या दिवशी आहे त्या दिवशी कलाकारांची धांदल बघण्यासारखी असते. कारण नाटकासाठी लागणाऱ्या सर्व वस्तू अजून मिळालेल्या नसतात. कुणास साहेबी हॅट मिळालेली नसते. ऐतिहासिक नाटक निवडलं तर मग कालाकारांची अवस्था बघण्यासारखी होते. एकदा ऐतिहासीक नाटकात शिवाजी महाराजांसाठी जिरेटोप मिळाला नाही तेव्हा ऐनवेळी चक्क वासुदेवाची टोपीच वापरून काम भागवावे लागले. पण संपूर्ण नाटकात जिरेटोप नसल्यामुळे शिवाजी महाराज हे दारात सकाळी येणाऱ्या वासुदेवासारखेच दिसत होते. सर्व वस्तू मिळाल्या नाहीत, पात्रांचे पाठांतर नीट झालेलं नाही, प्रकाश योजना नीट नाही, संगीतकार अजून हजर

नाही अशा ढिगभर विवंचना दिग्दर्शकाला लागून राहतात आणि बिचारा हातपाय गाळून बसलेला असतो. त्यामुळे त्यादिवशी त्याच्या डोक्यात अक्षरशः किडे पडल्यासारखे झालेले असते. सर्वांच्या सूचना ऐकून घेवून अखेर तो वैतागून जातो. त्यामधून पुन्हा ऐन नाटकाच्या वेळी रुसवे फुगवे होत असतात. एखादा कलाकार ऐन नाटकाच्या वेळी रुसून बसतो. का तर दिग्दर्शक माझ्यावरच सारखे सारखे रागावतात म्हणून! शिवाजी हे सर्व सहन करून दिग्दर्शकाला स्वतःच्या भूमीकेचा, स्वतःच्या मेकअपचा, पोशाखाचा विचार करावयाचा असतो. त्याचप्रमाणे बऱ्याचवेळी या सगळ्या गदारोळात त्याचेही पाठांतर नीट झालेले नसते. कलाकाराच्या अगोदर दिग्दर्शकामध्ये नर्व्हसनेस निर्माण होतो. म्हणून मी नेहमी म्हणतो की, दिग्दर्शकाने नाटकात स्वतः भूमिका करण्याची हौस सोडावी.

*** सर्कशीतील रिंगमास्टरची भूमिका बजावणारा प्रॉम्पटर -**

या सर्व अडचणींवर कशी बशी मात करून नाटक एकदाचं सुरू होतं. नाटक सुरू झाल्यानंतर प्रॉम्पटर जो असतो त्याचा रुबाब औरच असतो. त्याच्यावर सर्वांची भिस्त असते. तोच मारक आणि तारक असतो. द्रोपदीच्या वस्त्रहरणात श्रीकृष्ण जसा धावून येतो, तस ऐन नाटकात संवाद नाही आठवले तर प्रॉम्पटर कलाकाराच्या मदतीला धावून येतो. तालमीच्या काळात दिग्दर्शक सराव मास्तराची भूमिका पार पाडत असतो. परंतु नाटक सुरू झाल्यानंतर प्रॉम्पटर मात्र सर्कशीतल्या रिंगमास्टराची भूमिका पार पाडत असतो. नाटक वेगात घ्यावयाचे की संथ गतीने ते प्रॉम्पटर ठरवायचे. त्याच्या इशाऱ्यावर सर्व काही चाललेलं असतं. एखाद्या कलाकाराला स्टेजवर कुचवायचे ठरविले तरी ते तो प्रॉम्पटर करू शकतो. एखाद्या कलाकाराची मुद्दाम भंबेरी उडवायची ठरविली तर तो ती उडवू शकतो. एका ठिकाणी मला असा अनुभव आला की, प्रॉम्पटर स्टेजवरच एका बाजूला खुर्ची टाकून बसलेला होता. नाटक सुरू झाल्यानंतर मला वाटलं ते नाटकातलंच पात्र आहे व ते खोलीत वाचत बसलं आहे. एक अंक झाल्यानंतर प्रॉम्पटर स्टेजवर का बसवला म्हणून विचारलं तर मला उत्तर मिळालं की, ''प्रॉम्पटर आड जागेत बसणं मान्य नव्हतं कारण आपल्या इशाऱ्यावर ते नाटक चाललं आहे हे प्रेक्षकांना कळलं पाहिजे असा त्याचा अट्टाहास होता आणि म्हणून तो स्टेजवर प्रेक्षकांना दिसेल असा बसलेला होता. त्याचा असा समज होता की, आपण गुरू वाल्मिक आहोत आणि समोर जे चाललेलं रामायण आहे ते आपल्या इशाऱ्यावर चाललेलं आहे. एका ठिकाणी तर प्रॉम्पटरचा आवाज इतका मोठा होता की, तो प्रॉम्पटींग करण्यासाठी तोंडासमोर माईकच घेवून बसला. असे का तर आपण प्रॉम्पटींग करत आहोत म्हणून हे नाटक चाललं आहे असं प्रेक्षकांना कळावं. तर ग्रामीण रंगभूमीवर असे कलंदर प्रॉम्पटर बऱ्याचवेळा पहायला मिळतात.

*** स्वतःचं अस्तित्त्व विसरणारा हौशी कलाकार -**

नाटकात काम करणारा कलाकार आपले अस्तित्त्व विसरून क्वचितच काम करीत असतो. नाहीतर मी स्वतः कोण आहे हे तो विसरायला तयारच नसतो. एके ठिकाणी एका नाटकात मला असं बघायला मिळालं की, एक कलाकार स्टेजवर आल्यावर विहीरीत वाकून बघत-बघत संवांद म्हटल्यासारखा वाटत होता. नंतर मी चौकशी केली की, असं का करतो? तर उत्तर मिळाले की, स्टेजच्या अगदी समोर त्याची बायको बसली होती म्हणून मधून-मधून स्टेजवरून वाकून तो आपल्या भूमिकेच्या प्रतिक्रिया बायकोच्या चेहऱ्यावर आजमावत होता, म्हणजे त्याला त्याच्या रिझल्टबद्दल फारच घाई झाली होती. भूमिकेत झोकून देवून काम करणारे कलाकार फार थोडे असतात. परंतु खेड्यातील नाटकात काम करणारे कलाकार हौस म्हणूनच काम करीत असतात. परंतु हौसी कलाकारामध्ये सुद्धा एखादा अभिजीत कलाकार असू शकतो.

*** ग्रामीण नाटकाची तांत्रिक बाजू (प्रकाश व संगीत) -**

बहुतांश कलाकारांना ग्रामीण नाटकात तांत्रिक बाजूची जाण अजीबातच नसते. परंतु काहीतरी तांत्रिक

बाजूचा विचार केला पाहिजे असा विचार करून दिग्दर्शक (सर्वेसर्वा) प्रकाश योजना आणि पार्श्वसंगीत देण्याचा काही वेळा प्रयत्न करतो. परंतु तसा प्रयत्न बऱ्याच वेळा हास्यास्पद ठरतो. प्रकाश योजना करताना फिक्कट प्रकाश कधी, लखलखीत प्रकाश कधी, स्पॉट कधी याचे तांत्रिक ज्ञान जुजबी असल्यामुळे ही प्रकाश योजना बऱ्याचवेळी सदोष होते. महत्त्वाच्या प्रसंगी एखाद्या पात्राला स्पॉट द्यावयाचा असतो. परंतु काही वेळी बाजूला गप्प उभा असलेल्या पात्रावर विनाकारणच स्पॉट दिला जातो व बोलणारे पात्र अंधारात चाचपडत असते असा प्रकार काहीवेळा घडत असतो. प्रेमाचा नाजूक हळूवार प्रसंग असेल त्यावेळी चक्क लखलखीत प्रकाश दिला जातो व भांडणाचा प्रसंग असेल त्यावेळी फिक्कट प्रकाश दिला जातो.

संगीताच्या बाबतीतही बऱ्याचवेळा संवादाच्या मध्येच लाऊड पार्श्वसंगीत दिले जाते. आपण जे संगीत देतो आहे ते पार्श्व आहे. हेच तो संगीतकार विसरून जातो आणि संवादाच्यावेळी लाऊडसंगत देवून संवाद खाऊन टाकतो. कारण प्रेक्षकांना चांगलं कळलं पाहिजे ना? की आमका आमका या नाटकाला संगीत देत आहे.

*** कलाकारांचा पोशाख व मेकअप -**

पोशाख मेकअपच्या बाबतीत फारच गमतीदार गोष्टी घडत असतात. ग्रामीण रंगभूमीवर घरगड्याचे किंवा नोकराचे काम करावयाला कोणीच कलाकार तयार नसतो. कारण स्वत:चा मी पणा न विसरता नाटकात काम करण्याची प्रबळ इच्छा असणारी मंडळी खूप असते. चूकुन नाईलाजस्तव घरगड्याची भूमिका करण्याची पाळी आलीच, तर तो कलाकार पोशाख व मेकअप असा करवून घेतो की, त्याच्यापुढे त्याच्या मालकाची भूमिका करणारे पात्र निस्तेज दिसले पाहिजे. एके ठिकाणी मला असे पाहायला मिळाले की, घरगड्याची भूमिका करणाऱ्या पात्राने धोतर व शर्ट असा परिधान केला होता की, तो घरगडी नसून पुढारी असावा असे दिसत होते. घरकाम करणाऱ्या नोकराणीची भूमिका करणाऱ्या मुलीला भरजरी शालू घालून सजवले जाते व तिचा मेकअप करण्यासाठी घरातून तिची आई, बहीणी, मैत्रिणी येतात आणि जितके सजवता येईल तितके सजवत असतात आणि परत आपल्या मुलीला दृष्ट लागू नये म्हणून गालाला काळं सुद्धा लावतात. भूमिका असते घरकाम करणाऱ्या बाईची! बऱ्याच कलाकारांना आपल्यापेक्षा जास्त वयाची भूमिका करणे आवडत नसते. आपल्या वयापेक्षा कमी वयाच्या भूमिका आवडत असतात. दिग्दर्शक काही वेळा आपल्या फार विश्वासू मित्राला म्हातारा असूनही नायकाची भूमिका देतो व एखाद्या तरुणाला म्हताऱ्याची भूमिका देतो. मला एका नाटकात अशा प्रकारचा मेकअप बघायला मिळाला की, नवरा तरुण वाटत होता व बायको म्हातारी वाटायची. उशीरा नाटकाच्या मध्येच एखादा प्रेक्षक आला, तर त्याला प्रथमदर्शनी ती दोघं मायलेकरं वाटत!

*** संवादफेक व अंगविक्षेप -**

नाजूक प्रसंगात संवाद नाजूक व रागाच्या प्रसंगात संवादाला लाऊड द्यावयाचा असतो. काही वेळा उलटे होते. प्रेमाचा सीन दाखवत असताना नायक घसा तुटेपर्यंत ओरडतो व भांडणाच्या वेळी नाजूक आवाजात भांडतो हे ऐकणाऱ्याला खटकते.

नाटकात माझ्या मते अंगविक्षेपापेक्षा संवाद फेकीकडे अधिक लक्ष दिले गेले पाहिजे. परंतु ग्रामीण रंगभूमीवर नेमके उलटे होत असते. संवाद फेकीपेक्षा अंगविक्षेप अधिक केले जातात. काही ठिकाणी कलाकार संवाद म्हणण्यासाठी माईकच्या जवळ येतो. संवाद म्हणून परत आपल्या जागेवर जावून उभा राहतो.

*** स्टेजवर वावर -**

संवादफेकीनंतर स्टेजवरचा वावर महत्त्वाचा आहे. बऱ्याच कलाकारांचा स्टेजवरचा वावर फारच कृत्रिम, नाटकी असतो. रोजच्या मनुष्य जीवनातील हालचालीचा अभ्यास असणं महत्त्वाचं आहे. एखाद्या माणसाला कुठे उभे राहताना थोडेसे पाय फाकून उभा राहण्याची सवय असते. स्टेजवर उभे राहताना सुद्धा विचार केला पाहिजे. चालताना प्रत्यक्षात रोजच्या जीवनात चालणे आणि स्टेजवर चालणे यात फरक आहे. संवाद म्हणत असताना तोंड प्रेक्षकांकडे असावे. दुसऱ्या पात्रांच्या संवादाचा प्रतिसाद आपल्या चेहऱ्यावर

प्रेक्षकांना दिसला पाहिजे. एक पात्र आपल्यामुळे झाकून जाणार नाही अशा ठिकाणी आपण उभं राहिलं पाहिजे. हातवारे करताना अतिरेक नको. काही वेळेला विनाकारणच दोन हात वर करून बोलले जाते. परमेश्वराला शरण जाताना, प्रार्थना म्हणताना किंवा आपल्यावर आभाळ कोसळलेलं आहे हे दाखवताना दोन हात वर केले जातात.

*** भूमिकेचा अभ्यास (पाठांतर) -**

कालाकाराची महत्त्वाची आणि जमेची बाजू म्हणजे त्याचे पाठांतर. पाठांतर चांगले असेल तरच आपण आपल्या भूमिकेवर हुकूमत गाजवू शकतो. भूमिकेत सहजता आणू शकतो. स्टेजवरचा वावर सहज करू शकतो. पाठांतर नीट नसेल तर कलाकारामध्ये आत्मविश्वास निर्माण होवूच शकत नाही. काही नवशिक्या कालाकारांना फाजील आत्मविश्वास असतो. तो स्वत:ला एकपाठी समजतो. पाठांतर नसेल तर भल्याभल्यां कालाकारांची बोबडी वळते. पाठांतरामुळे नाटकाच्या भाषेतील गूढअर्थ भावतात. त्यामुळे संवादफेक निश्चितच सुधारते. काही कलाकारांना प्रॉम्पटरच्या मदतीने आपण ऐनवेळी नाटक पुढे ओढून नेवू शकतो असा फाजील आत्मविश्वास असतो तो सर्वथा चुकीचा आहे.

*** नाट्यप्रशिक्षणाची गरज -**

नाट्य प्रशिक्षण आवश्यक आहेच परंतु नुसत्या प्रशिक्षणावर कलेमध्ये अत्युच्च पातळी गाठता येणार नाही. त्यासाठी त्या कलाकाराकडे उपजत कलागुण आवश्यक आहेत. उपजत कलागुण, नाट्य प्रशिक्षण, नाटकाचा अनुभव, रोजच्या मनुष्य जीवनाचे बारकाईने अवलोकन यांच्या जोरावर कलाकार आपली कला उत्कृष्टपणे सादर करू शकतो. कलेमध्ये अत्त्युच्च आनंद देऊ शकतो.

*** भोवतालच्या परिसराचे अवलोकन करण्याची सवय -**

कलाकारामध्ये रोजच्या माणसांच्या हालचाली, बोलणं, माणसांच्या तऱ्हा याचं बारीक अवलोकन करण्याची सवय असली पाहीजे. असा अभ्यास करण्याची कलाकारांना सवय असली पाहिजे. कलाकारांमध्ये परीश्रम घेण्याची तयारी असली पाहिजे. परिश्रमाशिवाय नाटक उभे राहात नाही. नाटकातलं परिश्रम पाहून काही हौशी कलाकार नाटक सोडून पळून जातात तर परिश्रमाची तयारी असली पाहिजे.

*** संतुष्ट कलाकार, असंतुष्ट कलाकार -**

कलाकार दोन प्रकारचे असतात, एक संतुष्ट कलाकार व दुसरा असंतुष्ट कलाकार. संतुष्ट कलाकार आपणाला जे कळतं ते पुष्कळ असा त्याचा समज असतो आणि त्या समजापोटी अहंकार निर्माण झालेला असतो. मी म्हणजे महान कलाकार अशी त्याची खुळचट कल्पना असते. परंतु असंतुष्ट कलाकार नेहमी अस्वस्थ असतो. आपणाला जे कळतं ते फार थोडं कळतं. अजून आपणाला बरंच काही करायचं आहे असा ध्यास त्याच्यामध्ये असतो. त्यामुळे तो असंतुष्ट असतो. डॉ. लागू सारखा अभिनेता एके ठिकाणी म्हणतो, 'मी माझ्या कलेवर कधीच संतुष्ट नसतो. मी जे करतो ते अजून फार अपूरे आहे असे मला नेहमी वाटते.' थोडक्यात कलाकारामध्ये गंड असता कामा नये. असेल तर कलाकाराची प्रगती थांबली असे खुशाल समजावे.

*** दिग्दर्शक कसा असावा -**

शेवटी कालाकार आणि दिग्दर्शक यातला फरक स्पष्ट होणे महत्त्वाचे. दिग्दर्शक हा भूमिका डोळ्यापुढे उभी करतो. त्याप्रमाणे तो भूमिका कलाकाराकडून वटवून घेतो म्हणजे भूमिका उभी करण्याची कल्पना दिग्दर्शकाची असते व ती कल्पना साकार करण्याचं काम कलाकाराचं असतं. थोडक्यात नाटककाराची कल्पना दिग्दर्शक जाणतो व कलाकारांना सांगतो. दिग्दर्शकाच्या कल्पनेचा अविष्कार म्हणजे अभिनय. ग्रामीण नाटकात दिग्दर्शक हा दिग्दर्शकाची भूमिका पार न पाडता सराव मास्तराची भूमिका पार पाडतो. हीच खरी ग्रमीण रंगभूमीची शोकांतिका आहे. जोपर्यंत ग्रामीण रंगभूमीला दिग्दर्शकाची भूमिका काय आहे हे जाणणारा दिग्दर्शक मिळत नाही तोपर्यंत रंगभूमी अशीच राहणार आहे.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाच्या उदघाटनप्रसंगी प्रास्ताविक करताना प्रमुख कार्यवाह दीपक करंजीकर.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाच्या उदघाटनप्रसंगी मनोगत व्यक्त करताना सांस्कृतिक मंत्री मा. ना. संजय देवताळे.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाच्या उदघाटनप्रसंगी भाषण करताना संमेलनाध्यक्ष मा. अरुण काकडे.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाच्या उदघाटनप्रसंगी मनोगत व्यक्त करताना सहकारमंत्री मा. ना. हर्षवर्धन पाटील.



९४ व्या अ.भा.मराठी नाट्य संमेलनास
सर्व सेवकांच्या वतीने
हार्दिक शुभेच्छा!



''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद''

रयत शिक्षण संस्थेचे

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय

पंढरपूर जि. सोलापूर

(NACC Accredited - Grade A (CGPA3.43))

प्राचार्य : डॉ. के. जी. कानडे (M.Sc.M.Phil., Ph.D.) व सर्व स्टाफ

९४ व्या अ.भा.मराठी नाट्य संमेलनास

हार्दिक शुभेच्छा!

९३ वर्षे चवीची

फोन : २२२२५८

संपूर्ण शाकाहारी

हॉटेल स्पेशल गोल्डन टी



रेस्टॉरंट व जेवण विभाग

सर्वोत्कृष्ट नाष्टा, उपवासाचे पदार्थ,
तसेच जेवणाची उत्तम सोय.

४०२सी/२ अ, वीर सावरकर मार्ग,
श्री क्षेत्र पंढरपूर जि. सोलापूर.

प्रसाद व्ही. गणपुले श्रीहरी व्ही. गणपुले

९४ व्या अ.भा.मराठी
नाट्य संमेलनास

हार्दिक शुभेच्छा!



मे. गजानन रामचंद्र रत्नपारखी ज्वेलर्स

24 कॅरेट K.D.M.

सोने-चांदीचे भव्य शोरूम

श्री. संदीप रत्नपारखी - मो.९८५०४१९८४१
श्री. जयदीप रत्नपारखी - मो.९८९०३५५३३२

चोखामेळा चौक, मंगळवेढा जि. सोलापूर

९४ व्या अ.भा.मराठी नाट्य संमेलनानिमित्त प्रकाशित
होणाऱ्या स्मरणिकेस सर्व सेवकांच्या वतीने
हार्दिक शुभेच्छा!



न्यू पाटील फार्मास्युटिकल्स अॅण्ड सर्जिकल्स

रिटेल व होलसेल औषधांचे विक्रेते

फोन : ०२१८६-२२५२८६, २२९९०९



९४ व्या अ.भा.मराठी नाट्य संमेलनानिमित्त
प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेस हार्दिक शुभेच्छा!

चिरंजीव
बाल रुग्णालय

भक्ती मार्ग, ब्लड बँकेजवळ, पंढरपूर मो. ९९७०५०४१९२

डॉ. श्रीकांत का. देवकते

एम.डी.(मुंबई) डी.सी.एच.(मुंबई)

बालरोग तज्ञ व नव अर्भक तज्ञ

- ॲडमिट करण्याची सोय.
- फोटो काढण्याची सोय (एक्स-रे)
- फोटोथेरपी (नव अर्भकाच्या कावीळीसाठी)
- इनक्यूबेटर
- सिरीयस पेशंटसाठी २४ तास सेवा
- प्रतिबंधक लस बी.सी.जी. दर १ व १५ तारखेस दिली जाईल.
- ट्रिपल, पोलिओ, गोवर, एम.एम.आर., कावीळ, टाईफाईड, मेंदूज्वर लस दररोज दिली जाईल.

९४ व्या अ.भा.मराठी नाट्य संमेलनास



रंगोली
परमीट रूम अॅण्ड बिअर बार


इंद्रप्रस्थ, स्टेशन रोड, पंढरपूर.

पंढरीभूषण जगविख्यात चित्रकार एम. एफ. हुसेन

- भारत गदगे, पंढरपूर

रंग रेषांचा सम्राट कलारसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारा आंतरराष्ट्रीय ख्यातीचा चित्रकार मकबुल फिदा हुसेन उर्फ एम. एफ. हुसेन यांच्या स्मृतीला अभिवादन...!

सर्वांपेक्षा वेगळी अशी चित्रकलेची शैली जोपासणारे आंतराष्ट्रीय ख्यातीचे जेष्ठ चित्रकार एम.एफ. हुसेन यांना जाऊन बघता बघता दोन वर्षे पुर्ण झाली.



हुसेन भारतीय चित्रकलेच्या क्षेत्रातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व होतं, त्यांना 'भारतीय पिकासो' असं संबोधलं जात होतं, त्यांच्या अचाट अफाट कामामुळे रंगरेषांचा सम्राट म्हणून ओळखले जात होते.

मकबुल फिदा हुसेन यांचा जन्म १७ सप्टेंबर १९१५ रोजी पंढरपूरात झाला. बालपणापासून त्यांना चित्रकलेची आवड. पण प्रत्यक्षात कोणत्याही आर्ट स्कूलमध्ये ते रमले नाहीत. थोडं कलेच शिक्षण इंदौरमध्ये चित्रकार देवळालीकर यांच्याकडे घेतलं आणि मात्र स्वत:च स्वत:चं कलाविश्व त्यांनी मोठ्या ताकदीनं उभं केलं. सुरवातीच्या काळात हुसेन यांनी खूप कष्ट घेतले. माझे मुंबईचे नातेवाईक परळे आण्णा यांच्यासमवेत मेट्रो टॉकीजमध्ये सिनेमाची पोस्टर पडदे रंगविले. नंतर मात्र स्व:तच्या जोरकस रेषांच्या शैलीमध्ये चित्रं रंगवली. अमाप पैसा मिळविला. त्यांच्या भोवती प्रसिध्दीचं एक वलय कायम टिकून राहिलं. भारतीय चित्रकलेत त्यांच स्थान अग्रभागी होतं.

सन १९४७ साली भारतीय चित्रकारांनी प्रोग्रेसिव्ह ग्रुप स्थापन केला. त्यात रझा, गाडे, बाकरे, फ्रान्सिस, न्यूटन, आरा यांच्याबरोबर हुसेन यांचाही महत्वाचा सहभाग होता. प्रत्येकाने आपआपल्या शैलीनुसार चित्रं रंगवली आणि नावलौकिक मिळवला.

घनवादी पिकासो आपणास ठाऊक आहे. पिकासोची चित्रं म्हणजे एक चमत्कार, या पिकासोने मकबुल फिदा हुसेन यांना प्रभावित केलं होतं. त्यांच्या चित्रांचा प्रभाव हुसेन यांच्यावर कायम राहिला. हुसेन यांनीही स्वत:ची अशी एक शैली निर्माण केली आणि कलारसिकांना ते सतत नवनवीन कलनुभव देत राहिले. देशात परदेशात महत्वाच्या ठिकाणी कलारसिकांच्या संग्रहात त्यांची चित्रे अमूल्य आहेत. त्यांचा फार मोठा चाहता वर्ग आहे. त्यांचं साधं

रेखाचित्र सहज उपलब्ध होत नाही. लिलावात सर्वात जास्त किंमतीला चित्रं घेतली जातात.

हुसेन यांच्या चित्रातली रेषा ठकळ, जोरकस, लयपूर्ण आणि जिवंत असते. त्यांच्या चित्रातील टाच मारणाऱ्या घोड्याचं जोरकस चित्रण त्यांच्या चित्राची शान वाढविणारं आहे. त्यांच्या चित्रांत प्रामुख्यानं मानवी कृती आढळतात. त्यांनी अनेक विषय अगदी सहजपणे हाताळले. सांस्कृतिक, सामाजिक, राजकिय, अशा सर्वप्रकारातील प्रसंगाचं, घटनांचं प्रभावी चित्रण केलेलं आहे.

गणपती, सरस्वती, दुर्गा अशा देव-देवतांची चित्रं त्यांनी रंगवली. आणीबाणीच्या काळात तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना समोर कल्पून दुर्गामातेची त्यांनी रंगविलेली चित्रं खूप गाजली आणि वादग्रस्तही ठरली. समीक्षकांच्या दृष्टीने ती उत्कट अभिव्यक्ती हुसेन त्यांनी चितारली होती. त्यांच रेखन जसं पूर्ण वास्तववादी नव्हतं, तसंच ते पूर्ण 'अबॅस्ट्रॅक्ट' ही नव्हतं. त्याच्या रेखनात सुंदर सादरीकरण होतं. त्यांची भव्य आकाराची दमदार चित्रं त्यांचं असामान्यत्व सिद्ध करतात.

हुसेन यांना आतापर्यंत अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. सन्माननीय कलावंत म्हणून ते राज्यसभेवरही होते. त्यांना पद्मश्री, पद्मविभूषण या किताबांनीही सन्मानित करण्यात आलं होतं. केरळ सरकारतर्फे दिल्या जाणाऱ्या 'राजा रविवर्मा' या पुरस्काराचेही ते मानकरी होते. त्यांना पंढरपूरच्या युवक बिरादरीतर्फे १९९५ साली 'पंढरीभूषण' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. त्याप्रसंगी त्यांनी श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिरात जाऊन दर्शन घेतले. मंदिरात त्यांनी काही चित्र रेखाटली. यावेळी उपस्थित कलारसिकांनी त्यांना 'विठू माझा लेकूरवाळा' हे चित्र रेखाटा अशी विनंती केली. त्यावर त्यांनी पंढरपूरचे चित्रकार भारत गदगे यांनी रेखाटलेले चित्र उत्तम आहे. माझी चित्र रेखाटण्याची पध्दत वेगळी आहे, असे सांगितले. अशा थोर कलावंताच्या संग्रही माझे मेटलचे पांडूरंगाचे पेटिंग आहे. त्या पेटिंग्ज पाहून त्यांनी असे उद्‌गार काढले होते, हमारे पिताजी इस टिन के दिये बनाते थे, तुमतो भगवान बना रहे हो' पुरस्कारप्रसंगी मी त्यांचे रेखांकन केले होते. त्यावर त्यांनी आशीर्वादपर स्वाक्षरीसुध्दा दिली आहे. त्यांच्या आठवणी आजही ताज्या आहेत.


• • •

अन् 'वस्त्रहरण' टळलं... !

नाटकाचा प्रयोग करताना चिकटवलेली मिशी, नेसलेलं धोतर कधी दगा देतील आणि प्रेक्षकांसमोर फजिती करतील हे काही सांगता येत नसतं.. 'वरचा मजला रिकामा' या नाटकाचा प्रयोग आम्ही खुल्या नाट्यगृहात सादर करीत होतो. नानामामा ही इरसाल भूमिका मी करीत होतो. एकपेक्षा एक धम्माल कंगोरे या भूमिकेला आहेत. मुळातच नाटकवेडा असलेला हा नानामामा या नाटकातही नाटकं करतो. कधी बाईच्या वेषात येऊन घरमालकाला फसवतो तर कधी भाडेकरूच्या मित्राचा खोटा बाप बनून घरमालकाला फसवतो...

नाटक रंगात आलेलं... नाटकाचा शेवटचा भाग सुरू होता... मी धोतर, कोट, नकली मिशा अशा गेटअपमध्ये पोपटचा बाप बनून लग्न जमविण्यासाठी येतो असा तो प्रसंग होता. मुलीच्या वडीलांकडून हुंड्याचा ॲडव्हॉन्स म्हणून काही रक्कम मी घेतलेली असते... मुलीचे वडील निघुन जातात मी त्या नोटा मोजतो पण पोपट आणि त्याचा मित्र दिगंबर हे त्या नोटा हिसकावून घेण्याचा प्रयत्न करतात आणि मग त्यातून धमाल होते. बरीच झटापट होते आणि प्रेक्षकातून हशा येतच राहतो. आमच्या प्रत्येक प्रयोगात हा प्रसंग चांगलाच रंगायचा पण त्या दिवशी मात्र काही वेगळंच होऊन बसलं होतं.. धोतरानं ऐनवेळी घात केला होता. मी सोफ्यावर बसलेला असतानाच काष्टा निसटल्याचं माझ्या लक्षात आलं... सोफ्यावरनं उठणं काही शक्य नव्हतं आणि उठणं तर गरजेचं होतं...

पोपट तावातावानं आला आणि माझ्या हातातल्या नोटा हिसकावून घ्यायला लागला. मी आपला बसून च विरोध करीत होतो. मी का उठेना हे त्याच्या लक्षात येईना. त्याला कळावं म्हणून मी गुपचूप त्याचा हात दाबत होतो पण तो मला आपला ओढतच होता. दिगंबराचीही (शिवराज सरनाईक) एंट्री झाली पोपट म्हणाला, 'अरे दिगू, नानामामा उठायला तयार नाहीत', त्यावर दिगू 'उठत कसे नाहीत?' असं म्हणत मला जोरानं ओढायला लागला मी जाम घाबरलो होतो. मी उठल्याबरोबर सगळं धोतर खाली येऊन रंगमंचावर माझं वस्त्रहरण होणार होतं. दिगू मला खेचणार तेवढ्यात मी त्याचाही हात दाबला. काहीतरी लोच्या असल्याचं लक्षात आलं आणि त्यानं माझा हात सोडला... 'जाऊ दे, नाही उठू दे,. आपल्याला नोटांशी मतलब' असं म्हणत त्यानं माझा नाद सोडला. पण नाटकाची मजा निघून जात असल्यानं पोपटनं काही आपला हट्ट सोडला नाही. शेवटी दिगूनं त्याला बाजूला ओढलं आणि कानात काही सांगितल्याचा अभिनय करीत त्याला समजावलं. तो गप्प झाला अन् माझं वस्त्रहरण टळलं !! – **अशोक गोडगे**



नृत्याविष्कार सादर करताना
पंढरीचे कलावंत


नृत्याविष्कार सादर करताना
नाट्य कलावंत
ढरपूर आयोजित
राठी
न
२०१



नाट्य पंढरीची वारी नाबाद ५०

- श्री. शशीकांत लावणीस,
सोलापूर.

यंदाचं नाट्यसंमेलन 'पंढरपूरला' होणार असं ऐकल्यापासून पावलांना नाट्यपंढरीची कशी 'माहेर-ओढ' लागली आहे. पन्नासएक वर्ष होऊन गेली 'तो' काळ सरल्याला. साठच्या दशकात तेंव्हा पंढरपूरातल्या 'खालच्या' कवठेकर हायस्कुलच्या प्रांगणात आम्ही 'तुझे आहे तुजपाशी', 'प्रेमा तुझा रंग कसा', 'घरांत फुलला पारिजात' अशा नितांत सुंदर नाटकांचा एका सिलसिलाच केला होता. निमित्त होतं स्टेट बँकेचं वार्षिक स्नेहसंमेलन!

आठवणींच्या चांदण्या होतात असं म्हणतात. आज वयाची सत्तरी चालू आहे. कॅलेंडरची पानं फडफडत मागे गेली आणि त्या चांदण्या मनांत लुकलुकायला लागल्या. १९६६-६८ चे ते दिवस - पंढरपूर गाव - तिथले सखे सोबती आठवायला लागले. स्टेशन रोडवरच्या 'चित्तरंजन' बंगल्यातला शशी गांधी, त्रिशला गांधी, डॉ. पद्माकर श्रीखंडे, डॉ. भोपटकर. गांधी रोडवरचं घोडके स्टेशनरी मार्ट हे पिटुकलं दुकान तर आमच्या संध्याकाळच्या गप्पांचा अड्डाच होतं! त्याच रोडवर पुढे बुलंद आवाजाचे मधू टोमके, दिलीप टोमके, यांचा तो फोटो स्टुडिओही आठवतोय. चौफाळ्यातल्या डॉ. काळे यांचा दवाखानाही आठवतोय. त्यांची मुलगी जया काळे हिनं 'बंडू वशिला लावतो' या एकांकिकेत माझ्याबरोबर 'स्नेहालतेची' भूमिका केली होती. सुनील दिक्षीत 'नानू' झाला होता. एरवी सोलापूरसारख्या जिल्ह्याच्या शहरातून जाणवणारी 'स्त्री' भूमिकांसाठीची अडचण पंढरपूरात अगदी त्याकाळी सुद्धा कधीच आली नाही. त्यावेळचे सिव्हील जज्ज श्रीमान गोळे यांच्या मिसेस व बहिर्णींनी आमच्या बरोबर नाटकात कामं केली होती. त्यामुळे बँकेच्या स्नेहसंमेलनाला मिळालेल्या रसिकांच्या 'तुफान' प्रतिसादालाही कधी वेगळा पोलीस बंदोबस्त बोलवावा लागला नाही.

तेंव्हा 'परवालपूरचा' गणपती हा भक्तांना पावणारा देव म्हणून पंढरीत लोकप्रिय झाला होता. 'चतुर्थीला' पंढरपूरपासून परवालपूर लांब असूनसुद्धा 'श्रीं'च्या दर्शनाला रांगा लागायच्या. नवस फेडण्यासाठी पितळेच्या घंटा, नारळांची तोरणं बांधली जायची. इथे एक आठवण सांगण्यासारखी आहे. 'कवठेकर हायस्कूल' मधला 'तुझे आहे तुजपाशी' चा प्रयोग! वसंतराव घोडके (त्यावेळचे मंडप कॉन्ट्रॅक्टर)यांनी उभा केलेला भव्य रंगमंच. शाम, काकाजी, जगन्नाथ ड्रायव्हर, भिकु माळी यांचा बुद्धीबळ खेळतानाचा प्रसंग चालू होता. भिकु माळ्यानं (नाना देशपांडे) शेर म्हटला,

''लुत्फ ए मैं, तुझसे क्या कहूँ जाहिद,
हाय कंम्बख्त तूने पी ही नहीं।''

आणि..... आणि तुफान पाऊस सुरू झाला. रंगमंचावरही गळायला लागलं. अंथरलेली पालं भिजली. आलेले हजारो प्रेषक 'ओलेचिंब' झाले. प्रयोग अर्थात् थांबवावा लागला. पण दुसऱ्या दिवशी परवालपूरच्या गणपतीला साकडं घालण्यासाठी आमची आरव्रवी टीम घेऊन आम्ही गेलो. ''देवा! आज तरी पाऊस नको पडू देरे!'' आणि देवानं गाऱ्हाण ऐकलं. दुसऱ्या दिवशी टिपूर चांदण्यात चंद्राच्या साक्षीनं 'तुझे आहे तुजपाशी' चा प्रयोग तुफान रंगला.

''शाम! अरे गाणं ऐकणं, सौंदर्याचा आस्वाद घेण्यात पाप वाटायचं कारणच काय? पाप बळजबरीत आहे, सक्तीत आहे. पारिणामांची जिम्मेदारी नाकारण्यात

पाप आहे. खुशीत पाप नाहीय.''

जीवन कसं जगावं हे सांगणारे पु. लं. च्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेले शब्द काकाजींच्या तोंडून ऐकताना रसिक मंत्रमुगध होऊन गेले होते. विशेष सांगायचं म्हणजे वसंतराव घोडकेंनी रंगमंचाच्या पुन्हा उभारणीसाठी एकही पैसा घेतला नव्हता.

आज त्या नाटकाच्या तालमीसाठी जागवलेल्या 'रात्री' आठवतात. पहाटेपर्यंत पार्श्वसंगीतासाठी केलेले रेकॉर्डिंग आठवतं. दुसऱ्या दिवशी पुन्हा सकाळी ताजेतवाने होऊन बँकेत हसतखेळत केलेली कामंसुद्धा आठवतात.

डॉ. लुकतुकेंची मुलगी 'मंगल', ॲड. ढवळसकरांची 'पमा', शशी गांधींच्या 'शीलावहिनी', कांता पुजारी, शोभा आजरेकर, सौ. तिळवणकर, सुरेखा पाटील, अश्विनी सहस्त्रबुद्धे अशा अनेक जणींनी पंढरपूरचा रंगमंच आपल्या अभिनयानं गाजवला आहे. सुनील दिक्षीत, सुभाष भाळवणकर, नाना देशपांडे, कै. अरुण देशपांडे, पाटसकर मामा, कै. मनोहर राजाध्यक्ष हे माझे सहकारी ! किती जणांची नांवं घ्यायची ? त्यावेळचे ब्लॅक अँड व्हाईट मधले फोटो काढून बघतो तेंव्हा मनाला उदासी येते आणि भरारीही!

रेल्वे मैदानावरती क्रिकेटची मॅच संपवून तेंव्हा नाटकाच्या तालमीला डॉ. येरम डोकवायचे. दवाखाना सांभाळत असताना रुग्णांपेक्षा नाटक-संगीत यामध्ये सहोदर बुडालेले डॉ. पद्माकर श्रीखंडे गप्पांचा अड्डा जमवायचे. नाटकातल्या करुण प्रसंगांना उठाव देणारे व्हायोलिनचे सूर काढण्यासाठी कुसुमताई आराध्ये यायच्या.

मला सर्वात कमाल वाटते 'भीमराव सुनगार' या माझ्या बँकेतल्या मित्राची. नाटकात स्पॉट्स्, डीमर या गोष्टी प्रकाशाची बाजू भक्कम करतात. पण मला सांगा, पंढरपूरात कुठले हो स्पॉट्स् आणि डीमर? तर या पठ्ठ्यानं पत्र्याच्या गोल डब्यांचे स्पॉट्स तयार केले आणि ओरिएंट फॅनच्या ऑसिलेटिंगचा वापर करून रंगमंचावर अंधार-उजेड केला. आमच्या नाटकात पहिल्या टाळ्या मिळायच्या भीमराव सुनगारच्या प्रकाश योजनेला. आणि मग नाटकाचा तिसरा अंक होईपर्यंत हंशा आणि टाळ्यांचा महापूरच लोटायचा. बा. रा. रत्नपारखी सर, भाळवणकर सर यांनी स्टेट बँकेच्या आम्हा साऱ्या कलाकारांचं जाहीरपणे अनेकदा कौतुक केलंच. कमलताई बडवे यांनी आमचा जाहीर सत्कार केलाच. दिग्दर्शक म्हणून शाल-श्रीफळ देऊन माझं केलेलं कोड कौतुक विसरता येणार नाही मला. अहा! स्टेशन रोडवरच्या ओ. के. हेअर ड्रेसर्सचा मालक सुद्धा प्रयोगाच्या दिवशी माझी दाढी घोटून घोटून आणि मनापासून करायचा. देवळाच्या मागे चहाच्या टपरीवर लाल गमशा डोक्याला बांधलेला एक भैय्या असायचा. आदल्या दिवशीचं आमचं नाटक पाहून खुशीत असलेला भैय्या आम्हा साऱ्यांना दुसऱ्या दिवशी फुकटात गरमा गरम 'कॉफी' पाजायचा. दत्त घाटावरचे 'अमृत टी हाऊस' चे मालक यशवंतराव खरे हे आमच्या प्रत्येक प्रयोगाला हजर असायचे. घाऱ्या डोळ्यांचे 'संघिष्ट' खरे अजून मला आठवतात. स्टेट बँकेचे स्नेहसंमेलन हा अरव्वया गावाचा विषय व्हायचा. दोन महिने नुसती धामधूम असायची. रिमांड होमच्या मदतीसाठी आम्ही 'घरात फुलला पारिजात' चे तिकिट लावूनही प्रयोग केले होते. या नाटकातल्या शोभा आजरेकरची 'चंद्रलेखा' आणि सुनील दिक्षीतची 'गृहस्थ' या भूमिका गाजल्या.

पाहता-पाहता आज पन्नास वर्षे झाली! रंगभूमीची ही वारी नाटकाची पालखी खांद्यावर घेऊन मी अजून चालतो आहे. मागे वळून पाहताना लक्षात येतं आपल्याला खूप मिळालं. अनेक पुरस्कार खात्यावर जमा झाले. अनेक सन्मानचिन्हं शोकेसमध्ये ठेवींच्या रूपानी घराची शोभा वाढवतायत्. शं. ना. नवरे, पु. ल. देशपांडे, विजय तेंडूलकर, अरुणा ढेरे, सुधा मुर्ती, राजन खान, चंद्रशेखर गोखले या मान्यवरांचा सहवास मिळाला. गुलजार (सिने दिग्दर्शक) यांचा सहवास श्रीमंत करून गेला. 'जीवन गौरव' पुरस्कारानं दोनदा सन्मानितही झालो.

परंतु मध्येच कधीतरी स्नेहसंमेलनाच्यावेळी स्टाफ कडून वर्गणी गोळा करताना चतुर्थश्रेणी वर्गाची वर्गणी स्वत:च्या खिशातून भरणारे, नाविन्याची आवड असलेले तेंव्हाचे शाखाधिकारी एस. एस. पळशीकर आठवतात. तेंव्हाचे सारे सखे सोबती आठवतात. आज कोणी इथे, कोणी तिथे अन् कोणी..... कोणी काळाच्या पडद्याआड-'तिसरा अंक' संपवून!

हं: S S S ते हि नो दिवस: गत: !

• • •

नाट्य भक्ती

- भारुड सम्राज्ञी, राष्ट्रपती सन्मानीत
सौ. चंदाताई तिवाडी, गोपाळपूर, ता.पंढरपूर

श्रीपंढरपूर क्षेत्री होत असलेल्या ९४ व्या नाट्य संमेलनाबाबत मान्यता मिळाली हे ऐकून खूपच आनंद झाला, श्री विठ्ठलाच्या नगरी मध्ये नाट्यकर्मी, रसिकप्रेमी, लेखक व साहित्यिक कलाकारांचे प्रथम स्वागत व अभिनंदन! अहो ज्या विठ्ठलाचे स्वरूपच ।। कानडा हो विठ्ठलू करनाटकू। तेणे मज लावियेला वेदूSS।। या शब्दात सामावलेले आहे, असा श्रीकृष्ण परमात्मा द्वारकाधीश स्वयंम पुंडलीकाच्या भेटीसाठी आतूर झालेला जेथे उभा आहे, त्याने काय थोडी नाटके केली? सर्व सामान्यांना ज्ञात असणारे, नाट्यलिलेचे चरित्र भक्तीरंगाने रंगलेली अभंग, गवळण, भारूड ही सुरेल सुरांनी सजवून बासुरीमधून बेभान करणाऱ्या आठवणी, संताच्या लेखणीतून साहित्य स्वरूपात प्रथम मराठी भाषेत प्राप्त झाली, ती संस्कृत पांडीत्यातून, कारण पहिली भारतीय नाट्य संस्कृती संस्कृत नाटकातून आढळते. मराठी नाटकं ही ज्या काळांमध्ये आणखी सुरू झालेली नव्हती, त्या काळामध्ये संत श्री एकनाथ महाराजांनी, लोक प्रबोधनासाठी, जे साहित्य मराठी भाषेत भागवत ग्रंथ, महाभारत ह्यांचा आधार घेऊन भारुडांची रचना केली व सोंगी नाट्यरंगातून पुरुषांनी स्त्रीपार्ट वठवून, साधारण जन माणसाच्या मनोरंजनाबरोबर आत्मचिंतनाचा व व्यवहारीकतेचा विचार पोहचवला, ते महाराष्ट्राचे आद्य नाटककार लेखक व श्रेष्ठ साहित्यिक म्हणून ज्याचे नांव आधी घेतले पाहिजे ते संत एकनाथ महाराज - असे मला माझ्या मनाने मांडावेसे वाटते, व्यासपीठ कोणतेही असो अथवा रस्त्यावरती उभे राहून पथनाट्याची भूमिका यातूनच निर्माण झालेली आहे. कारण गुणांचा अविष्कार व शब्दाला दर्जेदार धार मिळवून देणारे



महामहीम राष्ट्रपती सौ. प्रतिभाताई पाटील यांच्या समोर राष्ट्रपती भवन, दिल्ली येथे भारुड सादर करताना सौ. चंदाताई तिवाडी व कलाकार

हे वाङमय जर असेल तर लोकाभिमुख रंजक विचार ज्या नाटकातून दिले जातात, त्याच नाटकांच्या आठवणी मनात रुजून राहतात, व त्यांची पुन्हा पुन्हा पुनरावृत्ती व्हावीशी वाटते, मग कलावंत बदलले, नवी पिढी त्यात उतरत गेली तरी त्यांच्याच जुन्या पारंपारिक आठवणी मात्र तशाच राहतात. पुण्यातील बालगंधर्वची स्मृती व श्रीराम लांगूची काही नाटकं, आमच्या पिढीला पाहता आली, पण आज नवोदित कलाकारांनी सजवलेली हीच नाटके आजच्या पिढीला एक वेगळी दिशा देणारी आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील हे दुसरे नाट्य संमेलन असावे, कारण १९८८ साली सोलापूर येथील हरीभाई देवकरणच्या मैदानावरती भव्यदीव्य व्यासपीठावरती श्री. सुशीलकुमारजींनी



संगीत नाटक ॲकॅडमी तर्फे उपराष्ट्रपती डॉ. हामीद अन्सारी यांच्या शुभहस्ते सन्मान स्विकारताना भारुडकार सौ. चंदाताई तिवाडी.

रसिकांना ज्या नाट्याची मेजवानी दिली होती, त्याची आठवण आजही मला ताजेपण देते; कारण स्व. शाहीर विठ्ठल उमप, स्व. श्री. केशव बडगे यांच्या समवेत लोकनाट्याची झलक लोकसंगीतातून गर्जून गेली. जांभूळ अख्यान, शाहिरी झटका (लग्नाला चला तुम्ही लग्नाला चला) ह्या लोक गीतांनी बहरून गेलेली धुंदी अजूनही तशीच्या तशी आहे, आणि त्याच व्यासपीठावरती मुंबई विद्यापीठाचे लोककला अकादमीचे अध्यक्ष श्री. प्रकाशजी खांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली अकादमीच्या विद्यार्थ्यांना घेऊन, 'वेडी म्हणत्यात मला' हे भारुड सादर करण्याची संधी मिळाली. एकंदरीत नाट्य, अभिनय, गायन, नृत्य, प्रबोधन, संदेश यांचा अविष्कारच नाटक आहे, हे मला अनुभवता आले. म्हणून आज अनेक व्यासपीठांवरती दिग्गज नाट्यकला सादर झाल्या. त्या त्या नाट्यकर्मींच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या व्यासपीठावरती आम्हासारख्या पामरांना उभे राहता आले हे आमचे भाग्य व पूर्व संचीत पुण्याई म्हणावी लागेल.

भोपालच्या म. प्र. भारतभुवन नाट्यमंचची आठवण - तुलसी अकादमी तर्फे सांस्कृतिक मंत्री महोदयांकडून सन्मानित होण्याचे भाग्य, गडकरी रंगायतन ठाणे, कालीदास नाट्यगृह नाशिक, पु.ल. देशपांडे सभागृह, रवींद्र नाट्यमंदीर दादर, दामाणी नाट्य मंदीर, हुतात्मा स्मृती मंदीर सोलापूर, बालगंधर्व पुणे, संत ज्ञानेश्वर नाट्यमंदीर अमरावती अशा अनेक रंगभूमीला चरण स्पर्श करता आला त्या पवित्र रंगभूमीला मी त्रिवार वंदन करते, व पंढरपूर नगरीत होणाऱ्या ९४ व्या नाट्यसंमेनाला आणि ज्यांनी अथक प्रयत्न करून हे संम्मेलन खेचून आणले त्यांना मनापासून हार्दिक शुभेच्छा देते. धन्यवाद!

• • •



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानातील कार्यक्रमांचा आस्वाद घेताना मा.आ. भारतनाना भालके, रणजितसिंह मोहिते-पाटील, वसंतनाना देशमुख



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानातील कार्यक्रमांचा मनमुराद आनंद लुटताना उपविभागीय पोलीस अधिकारी मा. प्रशांत कदम साहेब.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानातील कार्यक्रमांचा आस्वाद घेताना सौ. जयश्रीताई भालके, सौ. भालके, व भगिरथदादा भालके.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाचा आस्वाद घेताना प्रांताधिकारी, तहसिलदार, उपविभागीय पोलीस अधिकारी.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाच्या समारोप प्रसंगी उपस्थित मान्यवर.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाच्या कार्याला तन-मन-धनाने वाहून घेतलेले पंढरपूर नाट्यपरिषद शाखेचे पदाधिकारी.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानातील कार्यक्रमांचा आस्वाद घेताना स्वच्छता व पाणीपुरवठा मंत्री मा. ना. दिलीप सोपल, जलसंपदा मंत्री सुनील तटकरे, मा. आ. गणपतरावजी देशमुख, मा. आ. दीपकआबा साळुंखे पाटील, मा. आ. भारतनाना भालके.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाच्या निमित्ताने आलेल्या नाट्यकलावंतांशी हितगुज करताना दै. पुढारीचे उपसंपादक नवनाथ पोरे.

९४ व्या अ.भा. मराठी नाट्य संमेलनानिमित्त प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेस हार्दिक शुभेच्छा!

श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पंढरपूर

SVERI

गोपाळपूर-रांजणी रोड, गोपाळपूर, पंढरपूर. मो. : ७७५५९९०२०१

E-mail- coe_pan@rediffmail.com Website : www.sveri.ac.in

Classes for TOFEL & German Language



GATE Classes on the Pattern of Hyderabad

१) कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर 'ए' ग्रेड इन्स्टिट्यूट (महाराष्ट्र शासन), इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) मानांकित व **ISO 9001:2008** प्रमाणित.

पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता : १) मेकॅनिकल इंजि. -१२० जागा, २) कॉम्प्युटर सायन्स अँड इंजि.- १२० जागा, ३) इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजि.- १२० जागा, ४) इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी-६० जागा, ५) सिव्हिल इंजि. ६० जागा. एम.ई.- मेकॅनिकल डिझाईन इंजिनिअरिंग-१८ जागा, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग-१८ जागा, सिव्हिल इंजिनिअरिंग स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग-१८ जागा, मेकॅनिकल इंजि.कॅड/कॅम-१८ जागा, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग-१८ जागा. एम.बी.ए.- ६० जागा.

२) कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलिटेक्निक), पंढरपूर

पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता : १) मेकॅनिकल इंजि.- १२० जागा, २) कॉम्प्युटर इंजि.- ६० जागा, ३) इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजि.-६० जागा, ४) इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी-६० जागा, ५) सिव्हिल इंजि.- ६० जागा, ६) इलेक्ट्रिकल इंजि.-६० जागा.

३) कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया मान्यताप्राप्त.

पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता :

बी.फार्मसी-६० जागा. एम.फार्मसी- १) फार्मास्युटिक्स-१८ जागा. २) क्वॉलिटी ॲश्युरन्स-१८ जागा. ३) फार्मास्युटिकल केमिस्ट्री-१८ जागा.

४) कॉलेज ऑफ फार्मसी (पॉलिटेक्निक), पंढरपूर. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया मान्यताप्राप्त.

पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता : डी.फार्मसी-६० जागा.

• भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर, मुंबई व राजा रामण्णा सेंटर फॉर ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी, इंदौर यांच्यामध्ये सामंजस्य करार. • रॅगींग मुक्त परिसर तसेच खाजगी शिकवणी मुक्त संस्कृती तरीही उत्कृष्ट निकालाची परंपरा. • त्याचबरोबर कॅम्पस् प्लेसमेंटमध्ये आघाडीवर असलेल्या महाविद्यालयांपैकी एक स्पेशली डिझाइन्ड • कम्युनिकेशन इम्प्रुव्हमेंट प्रोग्रॅम अँड स्पेशल ट्रेनिंग फॉर प्लेसमेंट.

• २०१२-१३ चे प्लेसमेंट ३०३ विद्यार्थी
• टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या मल्टी नॅशनल कंपनीमध्ये गेल्या तीन वर्षात १७३ विद्यार्थ्यांची निवड.

संस्थापक-सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी.रॉंगे सरांचे विशेष मार्गदर्शन

• अधिक माहितीसाठी संपर्क : ९५४५५५३८८८

College Strength

Sr.No.	Name of the Course	No of Intakes	Ph.D. Holders
1	Mechanical Engineering	40	03
2	Electronics & Telecommunication Engg.	35	05
3	Civil Engineering	19	02
4	Computer Science & Engineering & Information Technology	51	03
	Total	145	13

Recognized Ph.D. Research Centers

1) Ph.D. (Mechanical Engineering)
2) Ph.D. (Elect.& Telecommunication Engg.)
3) Ph.D. (Computer Science & Engg.)
4) Ph.D. (Civil Engineering)

Department of Atomic Energy (DAE) Outreach Center with 1024 mbps NKN (National Knowledge Network) Facility.

---

९४ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!



श्री. विश्वास अर्जुनराव बारबोले

माजी नगराध्यक्ष, बार्शी
अध्यक्ष - यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी

Sojar Logistics Pvt. Ltd.

Sojar Milk Barshi.

'पार्वती', कासारवाडी रोड, बारबोले फर्म, बार्शी जि. सोलापूर

दि पंढरपूर मर्चन्टस् को.ऑप. बँक लि.

लक्ष्मी पथ, महावीर नगर, पंढरपूर.
Email ID : pmcblppr@rediffmail.com
Ph. Fax : (02186) 227682 Manager : 227681

ठेवी १०९.६७ | कर्जे ७१.९७ | निधी १२.४३ | भाग भांडवल १.२० | नफा १.१०

एन.पी.ए. 0% ऑडिट वर्ग - अ

दामदुप्पट ठेव ८१ महिने (६ वर्षे ९ महिने) जेष्ठ नागरिक, सहकारी पतसंस्था/ सोसायट्या आणि पब्लीक ट्रस्ट यांचे ठेवींना प्रचलित व्याज दरापेक्षा 0.५0% जादा व्याज दर देण्यात येईल.

ठेवीवरील व्याज दर		कर्जावरील व्याज दर (द.सा.द.शे.)	
३० दिवस ते ९० दिवस	८.00%	नवीन घर बांधणी (नेम १ दरि अति सह)	१४.00%
९१ दिवस ते १८० दिवस	९.00%	सोनेतारण, बेटना रिसिट, वेअरहाऊस	१४.५0%
१८१ दिवस ते २७० दिवस	१0.00%	सरकारी कर्जरोखेतारण	
२७१ दिवस ते ३६५ दिवस	११.00%	सुरक्षित कर्जे, तारण कर्जे	१५.00%
३६६ दिवस व पुढे	१0.५0%	असुरक्षित कर्जे	
सेव्हिंग ठेव व्याज दर - ४ %		पगारतारण, जामीनतारण, कॅश क्रेडिट	१६.00%

सेव्हिंग ठेव खाते व्याज दर - 4 %

धनवर्धिनी योजनेत "लखपती व्हा"

दरमहा रु. १३00/- भरून ६0 महिन्यात रु. १,0२,६५३/- मिळवा
(आयकर TDS कपात लागू नाही) * नियम व अटी लागू

श्री. मारुती सुखदेव देशमुख, उपाध्यक्ष — श्री. राजेंद्र पवनलाल फडे, अध्यक्ष

सर्व मा. संचालक मंडळ

श्री. अतुल म. म्हमाणे व. व्यवस्थापक — सभासद वर्ग व कर्मचारी वृंद.

९४ व्या अ.भा. मराठी नाट्य संमेलनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!

अध्यक्ष-पंढरपूर तालुका काँग्रेस (आय) कमिटी



मा. श्री. प्रकाश (तात्या) पाटील



मुदत ठेव

एक वर्ष पुर्ण मुदतीसाठी मुदत ठेवीवर द.सा.द.शे.

१३% (सर्वांसाठी)

दामदुप्पट ठेव

एक वर्ष पूर्ण मुदतीसाठी मुदत ठेवीवर द.सा.द.शे.

७१%

(वार्षिक सरासरी व्याजदर १७%)

मासिक प्राप्ती ठेव

* मासिक प्राप्ती ठेवीवर १ वर्ष ९% व्याजदर
* २ वर्ष पूर्ण १०% व्याजदर
* ३ वर्ष ते ५ वर्षापर्यंत ११% व्याजदर देण्यात येईल.

सेव्हिंग्ज ठेव

* सेव्हिंग्ज ठेवीवर द.सा.द.शे. ७% व्याजदर

आवर्तक ठेव

* १ वर्ष पूर्ण द.सा.द.शे. ९% व्याजदर
* २ वर्ष पूर्ण द.स.द.शे. १०% व्याजदर
* ३ वर्ष पूर्ण ते पुढे द.सा.द.शे.११% व्याजदर

पिग्मी ठेव

* ७ महिने पूर्ण द.सा.द.शे. ४% व्याजदर
* १ वर्ष पूर्ण द.स.द.शे. ८% व्याजदर
* ३ वर्ष पूर्ण द.सा.द.शे.८% व्याजदर

शुभेच्छुक


संस्थापक/चेअरमन :- प्रकाश (तात्या) पाटील (तुंगत)

चेअरमन - कर्मयोगी एस.आर. परिचारक मल्टी-स्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. तुंगत
चेअरमन - कर्मयोगी सु.रा.परिचारक ग्रा.बि.शेती सह. पतसंस्था मर्या. तुंगत
अध्यक्ष - पंढरपूर तालुका काँग्रेस (आय.) कमिटी

*** संस्थेचा पत्ता ***

टिळक स्मारक मंदिर, शॉपिंग सेंटर, पहिला मजला, स्टेशन रोड, पंढरपूर - ४१३३०४.
फोन नं.- चेअरमन व मॅनेजर-२२२५११, ठेव विभाग-२२७८८४, कर्ज विभाग-२२२१५०, पिग्मी विभाग-२२७८८५

|| विनम्र अभिवादन ||



कर्मवीर औदुंबरआबा (अण्णा) पाटील

पंढरपूर तालुक्याचे भाग्यविधाते श्री विठ्ठल सह. साखर कारखाना लि. व
श्री विठ्ठल हॉस्पिटलचे संस्थापक, माजी आमदार,
कर्मवीर औदुंबरआबा पाटील
यांच्या १३ व्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन

श्री. विलासराव साळुंखे (उपाध्यक्ष) श्री. युवराज पाटील (अध्यक्ष)

सर्व विश्वस्त डॉक्टर्स व कर्मचारी वर्ग.
श्री विठ्ठल हॉस्पिटल, पंढरपूर

९४ व्या अ.भा. मराठी नाट्य संमेलनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!

श्री विठ्ठल खत कारखाना लि. कासेगांव

संस्थापक चेअरमन
श्री. वसंतराव दौलतराव देशमुख
(मा.सभापती, पंचायत समिती, पंढरपूर)

शिवप्रताप नागरी सह. पतसंस्था मर्या. पंढरपूर तालुका

चेअरमन
श्री. सिताराम गुंडीबा शिंदे

नटसम्राट - बालगंधर्व

श्री. आर. डी. पवार सर
प्राचार्य, श्री विठ्ठल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, वेणुनगर, गुरसाळे,
अध्यक्ष पुणे विभाग, मुख्याध्यापक महामंडळ, महाराष्ट्र राज्य

नाटकवेड्या मराठी माणसाच्या मनावर ज्यांनी आढळ स्थान निर्माण करून आजही ज्यांच्या नाट्यक्षेत्रातील कार्याला मानाचा मुजरा केला जातो असे नटसम्राट नारायण श्रीपाद राजहंस उर्फ बालगंधर्व म्हणजे मराठी नाट्य सृष्टीचे सोनेरी पान. कित्येक वर्षे ज्यांनी आपल्या वेगळ्या आणि मनाला भुरळ घालणाऱ्या नव्हे स्त्रीयांच्या सौंदर्याला लाजवेल अशी हुबेहुब स्त्रीयांची भूमिका सादर करून ज्यांनी स्त्रीभूमिकेची नाटकामधील उंची वाढविली असे बालगंधर्व नाट्यकलावंतांचे दीपस्तंभ आहेत.



लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने व त्यांनीच दिलेल्या प्रोत्साहनाने हा हिरा नाट्यक्षेत्रामध्ये केवळ चमकला नव्हे तर एका संपूर्ण युगामध्ये रंगभूमीवर एखाद्या सम्राटाच्या रुबाबात वावरला. लोकांनी त्यांचं गाणं, त्यांची कला डोक्यावर घेतली. राजहंस यांनी लहान वयात गायलेल्या केवळ एका गाण्यावरून लोकमान्य टिळकांनी त्यांची गुणग्राहकता जाणली. ताबडतोब टिळकांच्या तोंडून शब्द बाहेर पडले हा तर केवळ बालगंधर्वच आहे. दुसरे दिवशी केसरीमध्ये बातमी छापून आली. नारायण श्रीपाद राजहंस उर्फ बालगंधर्व आणि तेव्हापासून नारायणाला बालगंधर्व हे नाव एखाद्या पदवीसारखे मिळाले.

२६ जून १८८६ रोजी पुण्यात जन्मास आलेल्या नारायण यांनी नाट्यक्षेत्रामध्ये काम करण्याची मामाच्या मदतीने सुरूवात करून अनेक नाटकात गायन करून आपल्या गोड गळ्याने व अभिनयाने महाराष्ट्राची सीमा रेषा ओलांडून दक्षिणेत आणि उत्तरेत नाट्यप्रेमींना आनंदीत केले. लोकांनी त्यांना डोक्यावर घेतले. १८९४ मध्ये जळगांवच्या सरकारी शाळेत दाखल केल्या गेलेल्या पण शिकण्याची फारशी गोडी नसल्यामुळे त्यांचे गायन आणि अभिनय याकलेला मिळत असलेली दाद आणि त्या लहान वयातच अनेक नाटके पहायला मिळाली. त्यातच किर्लोस्कर नाटक मंडळीचे ''सौभद्र'' नाटक तसेच नाट्य कला प्रेमी आणि शाहू नगरवासी मंडळीची नाटकं पाहून ते या क्षेत्राकडे पूर्णतः आकर्षित झाले. संधी चालून येते म्हणतात

त्याप्रमाणे हा गुणी कलावंत शाहू महाराजांनी हेरला आणि मोठी ताकद, बळ, प्रोत्साहन आणि शाब्बासकीची थाप देवून वाढविला. वय वर्षे १७ असताना हा गोंडस, सुंदर मुलगा स्त्री भूमिका चांगल्या पद्धतीने करेल हा आत्मविश्वास असणाऱ्या किर्लोस्कर कंपनीमधील व्यवस्थापक शंकरराव मुजूमदार यांनी शाहू महाराजांच्या आदेशावरून नाटकात काम करण्याची संधी दिली. स्त्री भूमिकेची अत्यंत सुरेख एंन्ट्री घेत टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटामध्ये त्यांनी ''अजून खुळा हा नाद'' आणि ''काय पुरुष चळले बाई'' ही नटीच्या तोंडची दोन्ही गाणी उत्कृष्ट म्हंटली. किर्लोस्कर कंपनीला बालगंधर्वाने आकर्षित केले. आणि त्यांना वाटू लागले हा मुलगा नाटक कंपनीत आला पाहिजे. तो कंपनीचे नांव काढेल. झाले, लगेचच १९०५ साली एका शुभमुहूर्तावर नारायण श्रीपाद राजहंस उर्फ बालगंधर्व किर्लोस्कर नाटक मंडळीच्या बिऱ्हाडी नट म्हणून कामाला लागले.

हिरा अस्सल असला तरी त्याला पैलू पाडल्याशिवाय त्याचं तेज दिसत नाही, तो चमकतही नाही. देवल मास्तरांनी हे काम सुरू केलं. पुरुषाने स्त्रीचे काम हुबेहुब करणे तसे फारच कठीण. स्त्री हसते कशी, रडते कशी, लाजते कशी, कधी रागावते, आदर व्यक्त करते. मोठ्या माणसासमोर त्यांना मान देऊन कशी वागते. वेगवेगळ्या प्रसंगी तिचे हावभाव कसे असतात हे सगळे विशेष नारायणरावांना देवल मास्तरांनी बारकाईने समजावले, स्वतः करून, बोलून दाखविले आणि खानदानी स्त्री असो, कीर्तनातील असो, तमाम स्त्रीयांच्या सर्वच भूमिकेला नारायण यांनी अप्रतिम न्याय दिला. आणि नाट्यवेड्या रसिकांनी त्यांना डोक्यावर घेतले. सौभद्र आणि मूकनायक नाटकातील त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या. अत्यंत देखणे, सुंदर आवाज, ताल, सुर पक्का, नटलेली, सजलेली, सर्व लकबीसह हुबेहुब स्त्री पात्र सादर करणारी भूमिका पाहून स्वर्गातील गंधर्वांनी खाली येऊन गायन चालू केले आहे असेच वाटावे इतके देखणे व सुरेख.


नाट्यचार्य काकासाहेब खाडीलकर लिखित मानापमान नाटकाचा पहिल्या प्रयोगात मुंबईत साऱ्या बड्या मंडळींनी अत्यंत जाणीवपूर्वक भामिनीची भूमिका नारायणरावाला दिली. नाटकाला प्रचंड गर्दी. कधी नाटक चालू होणार याची फार मोठी उत्सुकता, कुतुहल. नाटकाची सारीच तिकीटे खपल्यामुळे प्रचंड गर्दी, थोड्याच वेळात नाटक चालू होणार आणि अत्यंत दुर्दैवी घटना घडली. बालगंधर्वांची छोटी मुलगी इंदू देवाघरी गेल्याची बातमी आली आणि सगळीकडे सन्नाटा पसरला. केवढा हा दुःखाचा प्रसंग बालगंधर्वाला रडू कोसळले. त्यांचे मित्र, गुरू, कंपनीत काम करणाऱ्या इतर सर्वांनाही खूप वाईट वाटलं पण करणार काय. अशा मनःस्थितीत बालगंधर्व तरी कसं काम करणार. सगळेजण त्यांनी धीर देत होते, शांत करीत होते, कंपनीचे व्यवस्थापक शंकररराव मुजूमदार म्हणाले नाटक पुढे ढकलूया. त्यांचा हा निर्णय ऐकताच बालगंधर्व म्हणाले ''झाले ते झाले नाटक बंद ठेवू नका'' अशा दुःखी परिस्थितीत बालगंधर्वांनी मानापमानाच्या पहिल्या प्रयोगात भामिनीची भूमिका कोणत्याही दुःखाची छटा न दाखविता आपल्या अभिनयातून जिवंत केली. गाणी अत्यंत सुंदर म्हंटली, असं म्हणतात की, नाही मी बोलत नाथा ही ओळ त्यांनी अनेकदा म्हंटली पण प्रत्येक वेळी म्हणण्याची तऱ्हा वेगळी.

बालगंधर्वांच्या जीवनामध्ये अनेक चढउतार आले, किर्लोस्कर कंपनी सोडावी लागली, गंधर्व नाटक मंडळीची ५ जुलै १९१३ साली स्थापना केली. फार मोठ्या साहसाने चालविली, कर्जाचा डोंगर झाला, कधी मध्ये खचले, पुन्हा मोठ्या जोमाने कामाला लागले, न दमता, न चुकता, न थकता मोठ्या कष्टाने अविरत नाट्य क्षेत्राशी प्रामाणिक राहून त्यांनी राज्यकन्येच्या भूमिकेप्रमाणेच राम गणेश गडकऱ्यांच्या सिंधूला न्याय देऊन जिवंत केले. नाटकातील भूमिकांनी स्त्रीयांना सुद्धा वेड लावलं. त्यांच्या वेषभूषांनी भारावलेल्या स्त्रीयांनी त्यांचे अनुकरण केले.

बालगंधर्व म्हणजे रंगभूमीवरचा चालता, बोलता, गाता इतिहास होता. त्यांच्या संगीतावर महाराष्ट्राच्या दोन पिढ्या पोसल्या आहेत. बालगंधर्वांसारखा कलावंत शतकात एकदाच जन्माला येतो. १५ जुलै १९६७ साली हा महान कलाकार, रंगभूमीचा सम्राट जगाचा निरोप घेवून कायमचा हरपला. पण पुन्हा असा बालगंधर्व होणे नाही.



स्वागताध्यक्ष माननीय आमदार भारतनाना भालके
उपस्थितांचे स्वागत करताना...





एकाच वेळी
३०० तबला वादक
वादन करताना...



सांस्कृतिक चेहऱ्यावर अपरिहार्यतेचा मुखवटा

- श्री. राजीव मुळ्ये

मराठी प्रेक्षक नाट्यगृहापासून दूर का गेला किंवा दुरावलेल्या प्रेक्षकाला नाट्यगृहाकडे परत कसं आणता येईल, या विषयावर काही वर्षांपुर्वी नाट्य संमेलनात परिसंवाद व्हायचे. सुदैवानं किंवा दुर्दैवानं अलीकडे ते होत नाहीत. सुदैवानं अशासाठी की 'मराठी प्रेक्षक म्हणजे नेमका कोण' या कधीच तोंड न फुटलेल्या चर्चेला पूर्णविराम मिळाला आणि नाटकवाल्यांना 'टार्गेट प्रेक्षक' ठरवून नाटक करणं सोपं झालं. दुर्दैवानं अशासाठी की निमशहरी भागात 'सांस्कृतिक केंद्र' म्हणून बांधल्या गेलेल्या बहुसंख्य नाट्यगृहांमध्ये सत्कार समारंभ, पंच्याहत्तरी, एकसष्ठी, मार्केटिंग कंपन्यांचे ब्रेन स्टॉर्मिंग सेशन असे इव्हेन्ट्सच जास्त होऊ लागले. क्वचितप्रसंगी संगीत सभा किंवा लावण्यांचे कार्यक्रम इतकंच काय ते 'सांस्कृतिक' उरलं. हे असं का घडलं, या प्रश्नाचं उत्तर शोधताना झटपट निष्कर्षाप्रत येण्यानं कुणाचंच भल होणार नाही. नाटकांच तर नाहीच नाही!

अनायसे जागतिकीकरण आता चांगलं रूजलंय आणि 'अपरिहार्य' हा अपयश झाकण्याचा हुकमी पासवर्ड आपल्याला मिळालाय. आपल्याला लाटेबरोबर वाहत जायचंय, हे निश्चित झालंय आणि आपण कुठून आलो याची चर्चा केवळ दैदीप्यमान इतिहास वगैरे सांगण्यापुरती उरलीय. हे सगळ्याच क्षेत्रांत घडलंय किंबहुना सर्व क्षेत्रांत जे घडलं, त्याचचं प्रतिबिंब सांस्कृतिक क्षेत्रात उमटलं. परंपरेचा दोर कापल्याखेरीज नवतेची घनघोर लढाई आपण जिंकूच शकणार नाही, अशी मानसिकता सगळीकडेच निर्माण झाली. बदल होत आहेत आणि त्यांना सामोरे जाण्यासाठी आपल्याला बदललंच पाहिजे; अन्यथा आपण अपयशाचे धनी होऊ, कॉम्पलेक्स नव्वदीच्या दशकात आपल्या मेंदूत घुसला. स्वत:ला बदलायचंय म्हणजे नेमकं काय करायचंय, हे कळायच्या आतच आपण बदलतो. 'सांस्कृतिक अभिसरण' या नावाखाली 'सांस्कृतिक संकट' व्यापारी मार्गानं

आपल्या माथी मारला गेला. बाजारपेठेला हवी तशी पैदास निर्माण करणारं हे क्लोनिंग युध्दपातळीवर झालं - होतय. काळाची गरज म्हणून आपण स्वत:वर इतकी आवरणं चढवून घेतलीत, की आपण मुळचे कसे आहोत, हे आता आपलं आपल्यालाही दिसू शकत नाही. आपण बदलायचं म्हणजे आपल्या सांस्कृतिक गरजाही बदलल्याच पाहिजेत, असा गंड निर्माण झाल्यामुळं आपण स्वत:ला स्वत:पासूनच खूप दूर घेऊन गेलो आहोत. आता हेच कसं 'अपरिहार्य' होतं आणि आहे, हे आपण स्वत:ला पटवून सांगतो आहोत.

इतका सगळा गोंधळ डोक्यात घेऊन आपण प्रत्येक क्षेत्रात वावरतो आहोत; काम करतो आहोत. हा गोंधळ जोपर्यंत आपण समजून घेत नाही; मान्य करत नाही, तोपर्यंत नाटकासारख्या समूहानं करण्याच्या आणि समूहानं पाहण्याच्या कलाप्रकारातील स्थित्यंतराबद्दल आपण काय बोलू शकणार? नाटक करणाऱ्या आणि पाहणाऱ्या दोन्ही समूहांमध्ये गोंधळलेपण आहे, हे अगदीच सोपं आणि सोयीचं विश्लेषण झालं. 'मराठी माणूस नाटकवेडा आहे.' हेही आपणच म्हणतो. दीडशे वर्षांची परंपराही तो सांगतो. हे दीडशे वर्षांच नाटकप्रेम अवघ्या पंधरा वर्षात पेट्रोलसारखं उडून गेलं की काय? या प्रश्नाच्या उत्तराचा शोध जितका प्रामाणिकपणे घेतला जाईल, तितक्या रंगभूमी आणि प्रेक्षक यांच्यातील नातं पुन्हा दृढ होण्याच्या शक्यता वाढतील. या उत्तराचा शोध वेगवगेळ्या पातळ्यांवर घ्यायला हवा. देशातील सामाजिक-अर्थिक स्थित्यंतरांच्या वेगापासून मानसिकतेतील बदलांच्या वेगापर्यंत अनेक पैलू तपासले जायला हवेत. या वेगाचा 'इंडस्ट्री'च्या केंद्रीकरणाशी असलेला संबंध ताडून पाहायला हवा. तरच आपण खऱ्या आणि उपयुक्त निष्कर्षापर्यंत पोचू शकू.

वर म्हटल्याप्रमाणं नव्वदीच्या दशकात काही समजायच्या आतच आपण स्वत:ला अंतर्बाह्य बदलून घेतलं. या बदलामागे व्यापारी शक्ती होत्या. खरं तर जागतिक आर्थिक प्रवाह, उत्तर आधुनिकतावाद हे सारं एकाच वेळी संपुर्ण देशभरात घुसलं; परंतु व्यापारी शक्तींपुढे आपण मराठीजन सांस्कृतिकदृष्ट्या अधिक क्षीण ठरलो, हे कटू वास्तव स्वीकारावं लागेल. सांस्कृतिक चेहरा बदलल्याखेरीज आपल्याला नवा लूक प्राप्तच होणार नाही, या कॉम्पलेक्सनं मराठी माणसाला ग्रासलं. बंगाली किंवा दाक्षिणात्य लोकांनी तुलनेनं आपली सांस्कृतिक वैशिष्ट्य अधिक कसोशीनं जपली. त्याचं प्रतिबिंब तिथल्या कलाप्रकारांत उमटलेलं दिसतं. तिथल्या पावलांना आजही देशी तालवाद्यांची ओढ आहे. आपल्याकडे मात्र ड्रमरची प्रतिष्ठा ढोलकीपटूला पूर्वीपासून नाही. अशा मानसिकतेचा जेव्हा नवतेशी संघर्ष होतो, तेव्हा लढण्याची शक्ती मुळातच कमी असते. आणि इथेच 'अपरिहार्य' हा पासवर्ड आपण आपल्या मेंदूला देऊन संघर्षातून सुटका करून घेतो. यालाच 'टिना सिन्ड्रोम' (टी आयएनए-देअर ईज नो अल्टर्नेटिव्ह) असं म्हणतात. या मानसिकतेची 'लिटमस टेस्ट' आपल्याला सहज घेता येईल. समाजपुरूषाचा सांस्कृतिक चेहरा जेव्हा अशा प्रकारे हरवू किंवा हरू लागता, तेव्हा दुसऱ्या बाजुनं खोट्या, बेगडी, उथळ, भपकेबाज, प्रदर्शनी, प्रतिकात्मक सांस्कृतिक अस्मिता जोर धरतात. शे-दीडशे टीव्ही चॅनेल घराघरात पोचलेले असूनही गावोगावी गर्दी खेचणारा लावणीचा 'आधुनिक' आवतार हे त्याचंच उदाहरण. पुर्वी लावणीचं नाव काढलं तरी 'शिव-शिव' म्हणणारा वर्ग आज लावणीचे खास महिलांसाठी स्वतंत्र शो भरवू लागला. राज्यभरात वाढणारी सांस्कृतिक ओसाडी नजरेआड करून मराठीचे आणि मराठी कलाविष्कारांचे झकपक उत्सव परदेशांत करून कृत्यकृत्य होणं हेही याच मानसिकतेच, प्रतिकात्मक अस्मितेचं ग्लोरिफाइड रूप! पाहणाऱ्यांच्या आणि सादरकर्त्यांच्या प्रवासाचं

आकलन होण्यासाठी प्रत्येकी एकेक उदाहरण या ठिकाणी पुरेसं आहे. दोघे एकमेकांपासून दूर होत गेले हेच यावरून दिसतं.

प्रेक्षक नाटकांपासून दूर गेला की नाटक प्रेक्षकांपासून दूर गेलं, हा प्रश्न कोंबडी आधी की अंड, या प्रश्नासारखा अंतहीन आहे. नाटकाच्या अर्थकारणाचा मुद्दा या बाबतीत प्रकर्षानं चर्चिला जात असला, तरी नाटकाच्याच नव्हे, तर संपुर्ण देशाच्या अर्थकारणाशी याचा संबंध आहे. नव्वदीच्या दशकानं देशाची अर्थिक फाळणी सुरू केली. याच काळात इंडस्ट्रीचं केंद्रीकरण आधिक मोठ्या प्रमाणावर झालं; कारण छोट्या-मोठ्या पडद्याची गरज वाढतच गेली. वाहिन्या वाढत गेल्या. चित्रपटनिर्मितीत आधुनिकता आणि वेग आला. अर्थातच या इंडस्ट्रीभोवती 'कच्चा माल' एकवटत गेला. 'आपण जेवढं देऊ त्यापेक्षा अधिक आपल्याला मिळालं पाहिजे' या मानसिकतेच्या वाढीचा कालखंड हाच 'छापून घ्यायचा' असं ठरवून इंडस्ट्रीभोवती पिंगा घालणाऱ्या कलावंतांना 'सेलीब्रिटी असल्याशिवाय नाटक चालत नाही.' या अवस्थेपर्यंत पोचलाय. सेलिब्रिटींना नाटकात घ्यायचं म्हणजे अर्थातच त्यांच्या तारखा सांभाळायच्या. मग मुंबई, ठाणे, पुणे आणि काही प्रमाणात नाशिक एवढ्यापुरतेच नाटकांचे दौरे मर्यादित झाले. दूरचे दौरे पूर्वीइतके राहिले नाहीत आणि अर्थातच भौगोलिकदृष्ट्या दूर असलेला नाट्यरसिक नाटकापासूनच दूर गेला. त्यानं टीव्हीचा पर्याय स्वीकारला, तर दोष कुणाचा?

नाटक करणाऱ्यांचं मात्र नेमकं उलट आहे. निमशहरी भागात नाटकांना पूर्वीसारखी गर्दी होत नाही. त्यामुळं प्रयोगांसाठी दौरे परडवडत नाहीत, असं त्यांचं म्हणणं आहे, तेही चूक नाही. स्थानिक पातळीवरचा कर, थिएटरचं भाडं, प्रवास हे सगळे खर्च आवाक्याबाहेर चाललेत, हेही खरं, परंतू नाटक करणं परवडत नाही, असं म्हणणाऱ्यांपेक्षा नाटक पाहणं परवडत नाही, असं म्हणणाऱ्यांची संख्या कितीतरी पटींनी अधिक आहे, त्याचं काय? पूर्वी ज्या उत्पन्नगटातल्या लोकांना नाटक पाहणं सहज परवडत असे, तो गट आज नाटक पाहू शकत नाही. वर उल्लेखिलेल्या आर्थिक फाळणीमुळं असंख्य नाट्यरसिक नाटकापासून दूर गेलेत. वाढत्या महागाईचा मर्यादित उत्पन्नाशी मेळ घालताना करमणूक ही अर्थातच दुय्यम गरज ठरते. शिवाय टीव्ही फुकटची करमणूक घरबसल्या देतो. असा वर्ग महानगरांपेक्षा निमशहरी भागांत अधिक आहे. आर्थिक फाळणीनं मध्यमवर्गातले मूठभर उच्चभ्रू वर्गात प्रवेशकर्ते झाले आणि बहुसंख्य कनिष्ठ मध्यमवर्गात ढकलले गेले. याच वर्गात नाट्यप्रेमी सर्वाधिक आहेत. पुर्वी खुल्या नाट्यगृहात घरची सतरंजी घेऊन जाऊन जमिनीवर बसून नाटक पाहणारे हे लोक आहेत. त्यांची पुढची पिढी आज स्वप्नातही नाटक पाहत नाही. तरीदेखील राज्याच्या कानाकोपऱ्यात नाटकाची आवड अजून बऱ्याच अंशी टिकून आहे; अन्यथा पुढची पिढी नाटकाकडे ढुंकून पाहणार नाही. अर्थात, नाट्यप्रेमाला इतिहास असलाच पाहिजे, असंही नाही. आयुष्यात कधीही नाटक न पाहिलेल्या व्यक्तीनं एकच नाटक पाहिलं आणि तो रंगभूमीच्या प्रेमात पडला, 'आता खूप नाटकं पाहायची' असं म्हणू लागला, अशीही आनेक उदाहरणं दिसतात. मुद्दा आहे हा वर्ग टिकवण्याचा; वाढवण्याचा!

कारण कोणतंही असो; सध्या महानगरांमध्ये केंद्रित झालेल्या नाट्यक्षेत्राचा विस्तार राज्यभर होणं, रसिकाश्रयाचा 'पाया' विस्तारणं आणखीही एका कारणासाठी अत्यंत गरजेचं आहे. मर्यादित प्रेक्षकवर्ग नजरेसमोर ठेवला गेल्यामुळं नाटके केवळ महानगरी विषयच घेऊन येऊ लागली आहेत. 'मागणी तसा पुरवठा' हा व्यावसायिक आचारधर्म असला, तरी बरीच मोठी मागणीच मुळात दुर्लक्षित राहतेय, याकडेही पाहायलाच हवं, परंतू चित्रपट, मालिका, नाटक अशी तिहेरी कसरत

सांभाळायची म्हंटल्यावर मर्यादित प्रेक्षकवर्ग गृहीत धरला जाणं अनिवार्य आहे. महानगरांमध्येही आता नाटकाला चांगलं बुकींग मिळत नाही, अशी ओरड सुरू झालीय. याचं कारणही अर्थातच विषयांमधला तोचतोपणा हेच आहे. एखादा सेलिब्रिटी निवडून मोट बांधायची आणि नाटक फिरवायचं, हा फॉर्म्युला दरवेळी यश देऊ शकणार नाही. शिवाय महानगरी विषय उर्वरीत राज्यात गैरलागू ठरतात. भलतीच कोंडी! निमशहरी आणि ग्रामीण भागातील प्रेक्षक दुर्लक्षित राहिले असले, तरी त्यांच्याविषयी फार कळवळून बोलावं, अशीही स्थिती नाही. या भागातील प्रायोगिक नाट्यचळवळीला तरी कुठे रसिकाश्रय लाभला? उदारीकरणाच्या लाटेनं ही चळवळही बऱ्याच अंशी धुऊन काढली. ज्या कलावंतांना खरंच काहीतरी करायचं आहे, त्यांना मुंबईची वाट धरण्यावाचून गत्यंतर उरलं नाही. उरलेले कलावंत रोजीरोटीच्या चक्रव्यूहात अडकले. चढत्या महागाईत पैशांच सोंग आणणं शक्य राहिलं नाही. खस्ता खाऊन शहीद होणाऱ्यालाच किंमत उरली नाही. लढून मरण्यापेक्षा तडजोडी करून जिवंत राहणारा यशस्वी मानला जाऊ लागला. धडपड करण्यातली, कष्टानं काही उभं करण्यातली गंमतच संपुन गेली. दुसऱ्या शब्दांत नाट्यचळवळीतली 'श्रमप्रतिष्ठा' संपत गेली. एकांकिका स्पर्धा करायच्या, क्लिक व्हायचं आणि लगेच मुंबई गाठायची, असाच क्रम सुरू झाला. मराठी माणसांच्या नाट्यप्रेमाची गंगा अशा रीतीनं 'रोजगार हमी योजने'ला जाऊन मिळाली. नाटकाचा भौगोलिक परीघ संकोचत गेला आणि बहुतांश मराठी भूभाग नाटकाला मुकला. या दुष्टचक्रातून सुटका नाहीच का? मुळात हे चक्र सुरू केलं? नाटकवाल्यांनी की प्रेक्षकांनी? या चर्चेत आता काहीच हशील नाही. दोघांमधल काहीसं विस्कळीत झालेलं नातं सांधणं अधिक महत्त्वाचं आहे. आपण असं म्हणू की हे सगळं परिस्थितीमुळं घडलं. परिस्थितीशी दोन हात करण्याचं सामर्थ्य ना प्रेक्षकांमध्ये होतं ना नाटकवाल्यांमध्ये. कारण आपल्याला लाभलेला प्रदीर्घ आणि समृध्द वारसा आपण बेगडी स्वरूपात केवळ मार्केटिंगसाठी वापरला. या मार्केटिंगचा काही जणांना काही काळासाठी निश्चित फायदा झाला; मात्र हे शाश्वत नाही. शाश्वत आहे कलावंत आणि प्रेक्षकाने नाट्यगृहापर्यंत आणि नाटकाने प्रेक्षकांपर्यंत पोचण्याचा हरतऱ्हेनं प्रामाणिक प्रयत्न करायला हवा.

चित्रपटासाठी अनुदान, करकपातीच्या योजना कलावंतांनी मंजुर करून घेतल्याच ना? मग नाटकाचे तिकीट दर कमी करण्याच्या दृष्टीनं सरकारवर दबाव आणायला काय हरकत आहे? ज्या गावात पुस्तकांचं दुकानच नाही, तिथं ग्रंथ महोत्सवाच्या माध्यामातून चार दिवसांत एक कोटीची पुस्तकविक्री होते. हे साताऱ्यासारख्या छोट्या शहरातलं ताजं उदाहरण आहे. याच धर्तीवर नाटकांचे महोत्सव का होऊ नयेत? नाट्यनिर्मात्यांच्या संघटनेनं गावोगावी स्थानिक संस्थांच्या मदतीनं प्रेक्षक परिवार योजना राबवण्याचा पर्यायही निवडता येईल. गावोगावच्या प्रायोगिक संस्थांनीही अडचणी सांगणं बंद करून आता पुन्हा कंबर कसायला हवी. नाटकं उभं करायला जितके अधिक कष्ट पडतील, तितका शेवटचा पडदा पडताना आनंद मिळतो, याचा अनुभव घ्यायला हवा. मराठी माणसाच्या नाटकवेडाचा, रंगभूमीच्या सुवर्णकाळाचा भांडवली उपयोग न करता तो सुवर्णकाळ पुन्हा आणण्याच्या दृष्टीनं सर्वांनी मिळून प्रयत्न केले, तर बरंच काही शक्य आहे. आपला मूळ सांस्कृतिक चेहरा मात्र न लाजता सोबत बाळगला पाहिजे. ते अवघड वाटलं, तर सगळंच अवघड आहे! जे घडेल ते 'अपरिहार्य... दुसरं काय!



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलनाच्या समारोपप्रसंगी विनय आपटे रंगमंचावर उपस्थित असलेले मान्यवर.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलनाच्या वेळी मोहन जोशी यांना त्यांचेच रेखाचित्र सुपुर्द करताना पंढरपूरचे प्रसिद्ध चित्रकार सौ.व श्री. भारत गदगे.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलनाच्या वेळी हितगुज करताना दिग्गज कलावंत रिमा लागू व लता नार्वेकर.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलनाच्या वेळी महत्त्वाच्या विषयावर चर्चा करताना संमेलनाध्यक्ष अरुण काकडे व नाट्य पंढरीचे वारकरी परिषदेचे प्रमुख कार्यवाह दीपक करंजीकर.



नाट्यसंमेलन स्थळाच्या प्रवेशद्वारावर नाट्यपालखीचे पुष्पवृष्टीने स्वागत करताना पंढरपूरच्या महिला भगिनी.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाच्या कार्याला वाहून घेतलेले स्वयंसेवक.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाच्या वेळी पंढरपूरचे चित्रकार भारत गदगे यांनी रेखाटलेले मोहन जोशी यांचे रेखाचित्र न्याहाळताना कलावंत.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाच्या वेळी बालकलाकारांना मार्गदर्शन करताना संमेलनाध्यक्ष अरुण काकडे.



९४वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन, पंढरपूर

अभि'नेते' सुशीलकुमार शिंदे

राजकारणी व्यक्ती नेहमीच अभिनय करीत असते, अशा आशयाची एक इंग्रजी म्हण आहे. मात्र, आपल्या महाविद्यालयीन जीवनात सुशीलकुमार शिंदे यांनी खरोखर अभिनय केला होता. त्यांचं शिक्षण रात्रशाळेत झाल्याचं सर्वश्रुत आहे. श्रीपाद कासेगांवकर या शिक्षकांनी त्यावेळी सुशीलकुमारांमधील नाट्यगुण हेरले. शाळेच्या गॅदरिंगमध्ये 'मुंबईची माणसं' हे नाटक बसवण्यात येत होतं. त्यात शांता ही नायिकेची भूमिका त्यांना देण्यात आली. त्यांचा गोरा रंग, घारे डोळे यामुळे त्यांना साहजिकच स्त्रीभूमिका मिळाली. तसंही त्या काळात नाटकात काम करायला मुलींची वानवा होती. पण, शांताच्या भूमिकेत सुशीलकुमारांनी जे रंग भरले, त्यामुळं पुढच्या काळातही त्यांना स्त्री भूमिका करण्याची संधी मिळाली. बाबूराव गोखल्यांच्या 'करायला गेलो एक' नाटकात त्यांनी गुलाबची भूमिका केली. तीही गाजली. पुढं 'बेबंदशाही' नाटकांत त्यांनी खंडोबल्लाळची भूमिका केली. पुरुष पात्राची भूमिका त्यांनी आपल्या रांगड्या अभिनयानं सार्थ केली.

'प्रेमा तुझा रंग कसा' या नाटकातल्या त्यांच्या अल्लड भूमिकेचा रसिकांच्या मनावर प्रभाव पडला. वसंत कानेटकरांचं हे एव्हरग्रीन नाटक आहे. त्या काळात महाराष्ट्रातील अनेक महाविद्यालयांच्या स्नेहसंमेलनात या नाटकाचे प्रयोग हमखास होत असत. 'वेगळं व्हायचंय मला' नाटकातही सुशीलकुमारांची भूमिका होती.

पण 'लग्नाची बेडी' या नाटकानं त्यांना महाराष्ट्रातील एका मोठ्या नाटककाराचं दर्शन घडवलं. आचार्य अत्रे हे त्यांचं नाव. 'लग्नाची बेडी' नाटकाचा प्रयोग प्रा. श्रीराम पुजारी यांनी आचार्य अत्र्यांच्या समोर ठेवला. अत्रे खूष झाले. त्यांनी सर्वच कलावंतांचं कौतुक केलं. सुशीलकुमारांच्या पाठीवर शबासकीची थाप मारून त्यांनी त्यांचा गौरव केला. प्रा. श्रीराम पुजारी यांनी शिंदे यांना उच्चार आणि संवाद फेकीबद्दल मार्गदर्शन केलं. जब्बार पटेल हे त्या काळात शिंदेंचे मित्र झाले.

पुढं सोलापुरात राज्य नाट्य स्पर्धेचे केंद्र स्थापित होण्यासाठी सुशीलकुमारांनी खूप प्रयत्न केले. त्यामुळे अजूनही सोलापूरात राज्य नाट्य स्पर्धा होत आहेत. २००८ साली सोलापुरात अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन झालं, त्यासाठी श्री. शिंदे यांनीच प्रयत्न केले होते. राष्ट्रपतींच्या हस्ते त्याचं उद्घाटन त्यांनी घडवून आणलं होतं. रंगकर्मींबद्दल असलेल्या त्यांच्या प्रेमाचं हे प्रतीकच म्हणावं लागेल. संगमेश्वर महाविद्यालयात 'मर्चंट ऑफ व्हेनिस' आणि 'दुसरा पेशवा' या कलाकृतींमुळं आचार्य भोगिशयना व डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचेही त्यांना मार्गदर्शन लाभले.

...

नाटकाचा फायदा!

साल असावं १९९५. मुंबईच्या रवींद्र नाट्य मंदिरात 'नाट्यपदार्पण'चे संचालक सुधीर दामले यांनी घेतलेल्या राज्यस्तरीय 'कल्पना एक, आविष्कार अनेक' या एकांकिका लेखन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ होता. यशवंत देव, मंगेश पाडगावकर, तत्कालीन सांस्कृतिक कार्यमंत्री प्रमोद नवलकर आणि सुशीलकुमार शिंदे रंगमंचावर होते. प्रमोद नवलकर भाषणासाठी उभे राहिले. ते स्वत: सांस्कृतिक मंत्री असताना त्यांनी सुशीलकुमार शिंदे यांचा उल्लेख 'सांस्कृतिक मंत्री' असा केला. श्री. शिंदे चकित झाले. त्यांनी हसत हसत नवलकरांकडे कटाक्ष टाकला. नवलकर पुढं म्हणाले, ' मी सध्या सांस्कृतिक मंत्री आहे. पण शिंदेसाहेब महाराष्ट्राचे कायमचे सांस्कृतिक मंत्री आहेत. त्यांची रसिकता, त्यांचा व्यासंग आणि वाचन यामुळं सांस्कृतिक मंत्री पदाला तेच शोभतात.....' मूळ नाट्यकलावंत असल्यानं सुशीलकुमार शिंदे यांची अभिरुची घडत गेली. उत्तम माणूस म्हणून झालेल्या जडणघडणीत नाटकाचा मोठा वाटा असल्याचं ते स्वत:ही मानतात.

अकलूजच्या राज्यस्तरीय लावणी नृत्यस्पर्धेची वाटचाल

- प्रा. सुभाष दळवी,
सचिव स.म. शंकरराव मोहिते-पाटील
जयंती समारंभ समिती,
शंकरनगर-अकलूज

स. म. कै. शंकरराव मोहिते पाटील यांचे अमृत महोत्सवी वर्ष १९९३ पासून स.म. शंकरराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समीतीच्यावतीने संस्थापक श्री. जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील उर्फ बाळदादा यांनी राज्यस्तरीय लावणी स्पर्धेची सुरवात केली. हा उपक्रम सुरू करण्यापूर्वी मा. बाळदादांनी जवळचे कार्यकर्ते व स.म.शंकराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समितीच्या सदस्यांपुढे या लावणीनृत्य स्पर्धा घेण्याचा विचार मांडला. सुरवातीला बऱ्याच जणांकडून नापसंती व्यक्त करण्यात आली. शेवटी हा विचार त्यांनी त्यांच्या मातोश्री कै. आक्कासाहेब यांच्याकडे मांडला त्यावेळी कै. आक्कासाहेब यांनी तु पुढे चलं मी तुझ्या पाठीशी आहे. हे चांगले कार्य आहे. असा सल्ला दिला. सुरूवातीला थिएटरमधील लावण्यांची माहिती घेतली असता कोणालाही पारंपारिक लावणी व त्या कशा सादर करावयाच्या याची माहिती नव्हती. कारण त्यावेळी हिंदी चित्रपट गीते ऑर्केस्ट्रा, डिस्को प्रकारच्या गाण्यांची मागणी रसिक प्रेक्षकामधून होत होती. त्यामुळे नाईलाजाने त्या कलावंताला देखील तशा प्रकारची कला सादर करावी लागत होती. ती अडचण लक्षात घेऊन मा. बाळदादांनी लावणी क्षेत्रातील जुने कलावंत वयस्कर झालेल्या लावणी सम्राज्ञी, जाणकार यांच्या सहकार्याने पठ्ठे बापूराव, होनाजी बाळ, सगनभाऊ, शाहीर प्रभाकर, फक्कड, रामजोशी यांच्या सारख्या पारंपारिक लावण्या एकत्रित केल्या. व त्या विविध थिएटर मधील लावणी कलावंताना पुरविल्या. अस्सल लावणी पारंपारिक पद्धतीने कशी सादर करावयाची लावणीचा अस्सल बाज पारंपारीक पध्दतीने कसा राखता येईल यासाठी मार्गदर्शन केले. पहिल्याच वर्षी लावणी स्पर्धेचे उद्घाटन खुद्द मातोश्री कै. आक्कासाहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्याकाळी लावणीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन वेगळा होता. कलाकार उपेक्षित होते. लावणी सादर करणे हे अप्रतिष्ठेचे समजले जायचे. लावणी ही अश्लिल, बिभत्स असते हा जो समाजाचा समज होता तो दूर करण्याचा प्रयत्न या स्पर्धेच्या माध्यमातून मा. बाळदादा यांनी केला. पहिल्याच वर्षी आपल्या पत्नी सौ. सुलक्षणादेवी मोहिते-पाटील यांना कार्यक्रम पाहण्यासाठी उपस्थित ठेवले त्यामुळे समिती सदस्य व कार्यकर्ते यांच्या घरच्या महिला देखील लावणी स्पर्धेला उपस्थित राहिल्या,

त्यामुळे लावणी कलाकारांना महिला प्रेक्षकांसमोर लावणी सादर करण्याचा संपूर्ण देशातील हा पहिलाच प्रसंग अनुभवता आला. उभ्या आयुष्यात पहिल्यांदाच महिला प्रेक्षकांसमोर लावणी सादर करताना त्यांना गहिवरून आले. त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले.

लावणी कलेला उत्तेजन मिळावे पारंपारिक लावणीचे जतन होऊन त्यामध्ये वृद्धी व्हावी नव कवींना उत्तेजन मिळावे. लावणी कलावंतांना सामाजिक प्रतिष्ठा मिळावी अस्सल मराठमोळी लावणी जिवंत राहावी म्हणून सहकार महर्षिंच्या अमृत महोत्सवी जयंतीचे औचित्य साधून १९९३ पासून गेली २१ वर्षे स.म. शंकरराव मोहिते-पाटील जयंती समितीच्यावतीने राज्य पातळीवर लावणी नृत्य स्पर्धेचे आयोजन केले जाते.

सन १९७५-७६ साली सहकार महर्षि शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील यांनी महाराष्ट्र राज्य तमाशा परिषदेचे अध्यक्ष असताना अकलूज येथे राज्यस्तरीय औद्योगिक, कृषी, पशू, दुग्ध, प्रदर्शनाच्या प्रसंगी राज्य पातळीवरील तमाशा महोत्सव भरविला, पूर्वी राजाश्रय लाभलेल्या या कलेला लोकाश्रय मिळवून दिला. वृद्ध तमाशा कलावंतांच्या मानधनाचा प्रश्न सरकार दरबारी मांडून त्यांना योग्य न्याय मिळवून दिला. त्या काळात तमाशाच्या तिकीट विक्रीवर असणारा कर(टॅक्स) त्यांनी सरकार कडून माफ करून घेतला. लावणी कलावंताच्या पाल्याची शिक्षणाची सोय व्हावी म्हणून परभणी येथे शाळा काढली. ती शाळा आजही त्यावेळच्या सुप्रसिध्द लावणी नृत्यांगना व स.म.शंकरराव मोहिते-पाटील पुरस्कार विजेत्या श्रीमती कमलाबाई जाधव (कळंबकर) या चालवित आहेत. त्यांच्या या कार्यात कै. रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील(आक्कासाहेब) यांचा सिंहाचा वाटा होता.

समितीच्यावतीने गेल्या १० वर्षांपासून कलाकारांच्या पाल्यासाठी इ.१ ली ते १२ वी पर्यंतचे शिक्षण निवास भोजनासह मोफत देण्याची व्यवस्था अकलूज येथे केली आहे. तर दर वर्षी स्पर्धेमध्ये सहभागी असणाऱ्या सर्व कलाकारांचा प्रत्येकी एक लाखाचा अपघाती विमा उतरविला जातो. त्यामुळे अपघातापासून संरक्षण मिळते. लावणी कलावंतांना दरवर्षी लावण्यांची गरज असते. त्यासाठी नव कवींना आवाहन करून त्यांच्याकडून लावण्या मिळवल्या जातात. दरवर्षी 'लावणीची लावण्य वेल' हा लावणी संग्रह प्रकाशित केला जातो व सर्व कलाकारांना तो विनामूल्य दिला जातो. त्यामुळे असंख्य नवकवी निर्माण झाले आहेत. लावणीचे असंख्य कार्यक्रम ग्रामीण भागाबरोबरच शहरीभागातही होऊ लागले आहेत. महाराष्ट्राचे वैशिष्ट्ये समजल्या जाणाऱ्या लावणीच्या विविध प्रकारची माहिती बऱ्याच कलाकारांना देखील नाही. इतर सर्वसामान्यांना तर त्या प्रकारची नावे देखिल माहिती नाहीत. त्यामुळे गेली ५ वर्षांपासून स्पर्धेचे विविध प्रकार, बैठकीची लावणी, छक्कड लावणी, नृत्य संगित, जुगलबंदी या प्रकारची माहिती सर्व सामान्यांपुढे ठेवण्याचा प्रयत्न स्पर्धेमधून केला जात आहे.

गेल्या २१ वर्षांतील प्रयत्नांची फळं म्हणजे आज लावणीचे कार्यक्रम सादर करण्यासाठी समाजातील सर्व स्तरांतील प्रेक्षकांकडून त्यातल्यात्यात महिला प्रेक्षकांकडून मागणी येवू लागली आहे. त्यांना महाराष्ट्रभर चांगला नावलौकिक मिळत आहे. एवढेच नव्हे तर पुणे, मुंबईमध्ये महिलांसाठी प्रयोग हाऊसफुल्ल होऊ लागले आहेत. लावणी कलावंताना चित्रपटामध्ये काम करण्याची संधी मिळत आहे. जानेवारी २००५ पासून स्टेजवरील व्यवसायीक कलाकारांनी मागणी केल्यामुळे त्यांना देखील या स्पर्धेमध्ये सहभागी केले जाते.

नाट्यपंढरी पंढरपूर येथे ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०१४ या कालावधीमध्ये ३ दिवस नाट्यसंमेलन होत आहे. तर लावणी पंढरी अकलूज येथे याच तारखांना २२ व्या राज्यस्तरीय लावणी स्पर्धा होत आहेत. हा एक दुग्धशर्करा योगच म्हणावा लागेल आणि समितीच्या वतीने १९९७ पासून लावणी क्षेत्रामध्ये भरीव योगदान दिलेल्या व लावणी कलावृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कलाकारांना दरवर्षी स.म.शंकरराव मोहिते-पाटील पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. यावर्षीतर चक्क नाट्यपंढरीतील सुप्रसिध्द ढोलकीपटू श्री गोविंद वनारे यांना हा पुरस्कार प्रदान केला जात आहे. हा एक कपीलाषष्टी योग म्हणावा लागेल.

पंढरपूरच्या पांडूरंगाच्या व अकलूजच्या अकलाई देवीच्या कृपेने लावणी नृत्य स्पर्धेची ही वाटचाल अशीच चालत राहील....



सोलापूरच्या रंगभूमीला समृध्द वारसा!

- रजनीश जोशी, सोलापूर

प्रदेश, भाषा, लोकजीवन आणि राहणीमान, लोकसंस्कृती, जनमानस, वातावरण, समृद्धी या सर्वांचा विचार करता मागच्या तीस वर्षात सोलापूर आणि परिसरातील ग्रामीण रंगभूमीचा विकास प्रचंड झाला आहे, असेच म्हणावे लागेल. कलावंतांची समज व अकलन या गोष्टी त्यासाठी महत्त्वाच्या आहेत; तरीही नाटकच करण्याची वृत्ती मुळ धरून असल्याने नाविन्यपूर्ण, कल्पक आणि मातीशी इमान राखणारे प्रश्न इथले कलावंत आपल्या रंगभूमी, नृत्य, एकपात्री नाट्यप्रयोग, हॉटेल, ड्रामा, रेडिओ ड्रामा किंवा श्रुतिका, पथनाट्ये, दुरचित्रवाणी वाहिन्यांसाठी केलेले प्रयोग, रंगभूमीविषयक प्रशिक्षण, रंगभूमीच्या विकासासाठी केलेले प्रयत्न, संगीत रंगभूमी, कामगार रंगभूमी, लोकनाट्ये, जलसे अशा सर्व प्रकारांचा परामर्श घेणे आवश्यक आहे. सोलापूरात शंभर वर्षांहून अधिक काळ नाटकांचे खेळ होत आहेत, रसिक ते पाहण्यासाठी गर्दी करत आहेत, असे चित्र आहे. कर्नाटक, आंध्रप्रदेशाच्या सीमेवरचा हा जिल्हा बहुभाषिक आहे. या सगळ्याचं मनोरम प्रतिबिंब सोलापूर आणि परिसरातील रंगभूमीत पडलं आहे. नाटके तीच पण त्यांची भाषा वेगळी, असं चित्र आरंभीच्या काळात होतं. कन्नडमधून मराठी आणि मराठी संगीत नाटकातून कन्नड व तेलगुतील प्रयोग असं आदान-प्रदान इथं झालं आहे. महाराष्ट्राच्या नाट्य इतिहासात सोलापूरचं योगदान या अर्थानेही वैशिष्ट्यपूर्ण आहे, यात शंका नाही. सोलापूरातील नाट्य कलावंतांची आणि नाट्यसंस्थांची वाढती संख्या आणि त्यांची प्रगल्भता पाहिली की विचार येतो हे सारे आले कुठून?

सोलापूरकर हे रसिक आणि नाटकाबद्दल प्रेम बाळगून असल्याची ख्याती पूर्वीपासून आहे. 'वत्सलाहरण' किंवा 'रामजन्म' यासारख्या नाटकांचे प्रयोग १८७४ साली झाल्याची नोंद येथे आढळते. सोलापूरातील जुन्या विठ्ठल मंदिरात करवीरकरांनी त्यांचे प्रयोग केले. १८९५ ते १९०० या पाच वर्षात सोलापूरात राज्यभरातील विविध नाट्यसंस्थांनी विविध ३५ नाटकांचे प्रयोग केले होते. इंग्लंडमधील 'ग्लोब थिएटर' मध्ये एकाच नाटकाचे प्रयोग अनेक महिने चालत असल्याच्या वार्ता आपल्याला ऐकून ठाऊक असतात, किंवा ॲगाथा ख्रिस्तीचं 'माऊस ट्रॅप' हे रहस्यप्रधान नाटक सतत ३६ वर्षे सुरू असून ते सादर करणाऱ्या नटांच्या तीन पिढ्या उलटल्याचं आपण जाणून आहोत. इंग्लंडमधील

करीत असत. स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीच करण्याची पध्दत सोलापूरात प्रथमच डॉ. दिवाडकरांनी रूढ केली. त्यामुळेही सोलापूरातील महिला कलावंतांमध्ये नाटकाची अभिरूची व आवड जोपासण्यास मदत झाली.

नाट्यलेखन

सोलापूरात नाटके लिहिणाऱ्यांमध्ये कवी रा. ना. पवार (कविराय रामजोशी), कुमार कोठावळे (मानलेली बहीण, शिंग फुंकीले राणी, महात्मा बसवेश्वर, मंगळसुत्र, दोन घडीचा डाव, माझा गाव माझी माणसे, गोकुळाचा गारूडी), अंबण्णप्पा शेडजाळे (बाजार, ओपन क्लोज) या जुन्या मंडळींचा समावेश आहे. पुण्या - मुंबईच्या स्पर्धेत होणारी किंवा व्यावसायिक रंगभुमीवर होणारी नाटके सोलापूरात सादर करण्याकडे इथल्या कलावंताचा कल आरंभीच्या काळात होता. तथापि, तंत्रामध्ये उणिवा आढळतायत हे कळताच इथल्या कलावंतांना झेपेल आणि आपल्याकडे असलेल्या कलावंत चमूचा अंदाज घेऊन नाटक सादर करण्याचा विचार दृढ झाला. त्यातून अनेक नवे नाटककार सोलापूरात उदयाला आले. विशेषतः नाट्यस्पर्धांच्या निमित्ताने त्र्यं. वि. सरदेशमुख, प्रा. चंद्रभूषण कुलश्रेष्ठ, व्यंकटेश कामतकर, अरविंद काणे, पांडूरंग काळे, अरूणकुमार इंगळे, लक्ष्मण काटे, सुरेखा शहा, विजया जहागिरदार, डॉ. अजीज नदाफ, लक्ष्मीनारायण बोल्ली, शरदकुमार एकबोटे, शिरीष देखणे, जयप्रकाश कुलकर्णी, निशीकांत ठकार, रजनीश जोशी, मंदार काळे, मुकुंद हिंगणे हे व इतर नाट्यलेखक प्रकाशात आले.

त्र्यं. वि सरदेशमुख यांच्या 'टाहो' नाटकाचे प्रयोग 'बखर एका राजाची' नावाने व्यवसायिक रंगभूमीवर सदाशिव अमरापूरकर, दिलीप व नीना कुलकर्णी यांनी केले. त्यांची 'थैमान', 'मग उरात एकच धडकी' ही नाटकेही उत्तम दर्जाची आहेत.

प्रा. कुलश्रेष्ठ यांनी 'हॉटेल ड्रामा' सारखा प्रयोग यशस्वी केला. इराण्याच्या किंवा तत्सम छोट्या-मोठ्या रेस्टॉरंटमध्ये चहा प्यायला बसलेले चार-पाच कलावंत एकाएकी नाटकातील संवाद म्हणायला लागत आणि पुढचा अर्धातास हॉटेलमधील ग्राहकही त्या विषयात रमून जात. मुंबईसारख्या महानगरात हॉटेलमध्ये येणाऱ्या ग्राहकांच्या मनोरंजनासाठी आर्केस्ट्रा ठेवण्याची पध्दत प्रचलित आहे. त्यातून प्रेरणा घेऊन प्रा. कुलश्रेष्ठांनी हा प्रयत्न केला. त्याचे विषय त्या त्या काळात चर्चेच्या ऐरणीचे असत. अरविंद काणे यांच्यासारख्या लेखकाने आर.के. लक्ष्मण यांच्या 'यू सेड इट' या टाइम्स ऑफ इंडियातील कार्टून्सवर आधारित नाटक लिहले होते. सोलापूरच्या 'नटराज' संस्थेने ते थेट आर. के. लक्ष्मण यांच्यासमोर सादर केले होते. पांडूरंग काळे यांचे 'हे झाड जगावेगळे' किंवा शिरीष देखणे यांनी चिं. त्र्यं. खानोलकरांच्या 'चाफा' किंवा 'कोंडुरा' या कथा कादंबऱ्यांचे केलेले नाट्यरूपांतर हा वेगळा अविष्कार होता. गिरीश कर्नाड, चंद्रशेखर कंबार यांच्यासारख्या कन्नड लेखकांनी लिहलेल्या नाटकांचे मराठीत उत्तम भाषांतर करून प्रा. निशिकांत ठकार यांनी निशिगंध नाट्य मंदिर संस्थेला आनेक नाटेक दिली. अरूण मेहता आणि त्यांच्या नाट्यसमुहाने ती ताकदीने सादर केली. शरदकुमार एकबोटे यांनी निसर्गातील आणि एकूणच मानवी व्यवहारातील गुढत्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न आपल्या 'माकडांचा न्याय', 'द रॉक', 'घनगर्भ डोह' या नाटकांतून केला आहे. राजा राजेशचंद्र, विद्याचंद्र होमकर, मारूती लाड या कलावंतांनी ते शिवधनुष्य पेलले. व्यंकटेश कामतकरांनी प्रामुख्याने बालनाट्ये लिहली. 'झाली काय गंमत', 'खरी कमाई' ही त्यांची बालनाट्ये गाजली. त्यांचा स्वतःचा कल संगीत नाटकांकडे अधिक होता. त्यांनी संत दामाजीच्या जीवनावरचे संगीत नाटक सादर केले. जयप्रकाश कुलकर्णी यांनी भगवान बुध्दांच्या जीवनावर नाटक लिहिले. शिवाय काही फ्रेंच नाटकांचा अनुवादही केला. मंदार काळे यांनी हिंदीतून मराठीत 'कोर्टमार्शल' केले. त्याचा प्रयोग राज्य नाट्यस्पर्धेच्या अंतीम फेरीत प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला. रजनीश जोशी यांनी नाटक-एकांकिका लेखनाच्या बाबतीत वेगळे काही करण्याचा प्रयत्न केला. मानवी नातेसंबंधातील गुंतागुंत हा त्यांच्या नाटकांचा विषय असतो. 'अतर्क्य', 'छेद', 'रूपक', 'खेळ', 'महाबिलंदर मस्तकलंदर' या त्यांच्या नाटकांतून हा विषय हाताळण्यात आला आहे. खलील जिब्रान यांच्या जेष्ठ रंगकर्मी लक्ष्मण काटे, आनंद खरबस, विजय कटके यांनीही स्पर्धेच्या निमित्ताने लेखन केले आहे.

सोलापूरातील प्रयोगशिलता

सोलापूरात संगीत रंगभूमीची एकखांबी धुरा वाहिली ती पद्माकर देव यांनी. श्रुतीमंदिर या त्यांच्या संस्थेतर्फे त्यांनी सोलापूरी संगीत नाटकांचा झेंडा अटकेपार लावला. दिल्लीत होणाऱ्या संगीत नाटकांच्या स्पर्धेत अनेक वर्षे पद्माकर देव आणि विद्याताई काळे यांनी पारितोषिकांची लयलूट केली. श्री. देव स्वतः गायक नट आहेत. त्यांनी माया मल्लापूर यांच्या साथीनं 'मानापमान', 'सौभद्र', 'स्वयंवर', ही संगीत नाटके द्विपात्री सादर केली. पाच अंकी नाटके तीन अंकी करण्याच्या काळात पद्माकर देव यांनी केलेला दोन पात्रातील नाटकांचा प्रयोग खरोखर अद्भूत होता. संगीत नाटक असं दोघांमध्ये सादर होऊ शकतं हेच उभ्या महाराष्ट्राला त्यांनी दाखवून दिलं. याशिवाय 'शारदा', 'शाकुंतल', 'मृच्छकटिक', 'एकच प्याला', 'अमृतसिध्दी', 'कान्होपात्रा' ही नाटके त्यांनी सादर केली. वेगवेगळ्या विषयांना स्पर्श करून ते उद्बोधक पध्दतीने मांडण्याचे कसब सोलापूरातल्या कलावंतांमध्ये खासच आहे. 'नाट्य आराधना' या संस्थेच्या माध्यमातून डॉ. वामन देगावकरांनी जे प्रयोग केले ते राज्यात सर्वत्र प्रशंसेस पात्र ठरले आहेत.'नाटककाराच्या शोधात सहा पात्रे', 'अकरा कोटी गॅलन पाणी','शांतता, कोर्ट चालू आहे', 'अशी पाखरे येती', 'सावल्या' ही त्यांनी दिग्दर्शित केलेली नाटके गाजली. विजय तेंडूलकर, अनिल बर्वे, चेतन दातार अशा प्रतिथयश लेखकांची नाटके डॉ. देगावकरांनी सादर केली आणि ती गाजली बांधणीच्या दृष्टीने पक्के नाटक आणि 'परफेक्ट कास्टिंग' हे डॉक्टरांच्या नाटकांचे वैशिष्ट्य होते.

शशिकांत लावणीस यांनीही सोलापूरातील वेगवेगळ्या नाट्यससंस्थासाठी उत्तमोत्तम नाटके सादर केली. 'षड्ज' (अच्युत वझे) 'आंधे अधुरे '(मोहन राकेश) 'डोंगर म्हातारा झाला'(अनिल बर्वे) हे त्याचे माईलस्टोन ठरावेत. 'कैरी'(जी.ए. कुलकर्णी) आणि 'बिचारे अप्पा बंड करतात'(विजय तेंडूलकर) या एकांकिका राज्यभरातील विविध स्पर्धांत गाजल्या. वसंत बापट यांच्या 'फूकर' या कवितेचे त्यांनी आहे त्या स्वरूपात केलेले नाट्यीकरण हा उत्तम प्रयोग होता. असेच वेगळे प्रयोग लक्ष्मीनारायण बोल्ली यांनी केले आहेत. त्यांनी तेलुगु बुर्रा कथा या फोक फॉर्ममध्ये 'संत वेमना' नाटक लिहले. भोगाकडून योगाकडे जाणाऱ्या संताचे जीवन कथेतून त्यांनी उलगडले. वगनाट्यात ज्याप्रमाणे वग-बतावणी असतात, तशी तेलुगुतील बुर्रा कथा त्यांनी मराठीत आणली. 'विरहिणी वासवदत्ता', 'वेमना' या नाटकांतून त्यांनी तेलुगु संस्कृतीचं दर्शन घडवलं. त्यांच्या नाटकांची भाषा मराठी पण कलावंत तेलुगु, मराठीचा त्यांना गंधही नव्हता. त्यासाठी श्री. बोल्ली तेलुगु लिपीत मराठी संवाद कलावंतांना देत. त्याचा आशय तेलुगुत समजावून सांगत आणि कलावंत नाटक मराठीतून सादर करीत. महाराष्ट्रात असा प्रकार अन्यत्र कुठे अभावानेच आढळेल. मराठी मुले कन्नड नाटके सादर करीत असल्याचा उल्लेख वर आला आहेच.

राजा बागवान, इसाक मनियार, डॉ. जी. एम पटेल यांनी उर्दू एकांकिका आणि नाटके सादर केली. या नाटक-एकांकिकांच वैशिष्ट्य म्हणजे त्यातील बरीचशी नाटके मराठीतून उर्दू किंवा हिंदीत भाषांतरीत केलेली असतात. उर्दू एकांकिकांचा चाहता वर्ग ध्यानात घेऊन राज्य सरकारनं सोलापूरात १९८० पासून उर्दु एकांकिका स्पर्धा घ्यायला सुरवात केली. त्यात पुन्हा मराठी कलावंत हिंदी-उर्दूचा लहेजा शिकून भूमिका करत. 'स्पार्टक्स' हे बादल सरकाराचं नाटक किंवा 'आधे अधुरे', 'मासूम'(निष्पापचं हिंदी रूप), 'गाना पंचरंगी तोतेका' (गाणं पंचरंगी पोपटाचं हिंदीत), 'षड्ज' (अनु. निशिकांत ठकार) अशा नाटकांचा उल्लेख करता येईल. सोलापूरात नेपथ्य, प्रकाशयोजनेचे वेगळे प्रयोगही झाले आहेत. फक्त ध्वनी आणि प्रकाशाचा वापर करून नाट्य आराधनाने 'अकरा कोटी गॅलन पाणी' या नाटकात खाणीत पाण्याचा लोंढा येऊन प्रचंड हाहाकार उडाल्याचा भास रंगमंचावर केला होता. नामदेव वठारे, दीपक देशपांडे, राजू मोडक, विष्णू संगमावर या मंडळींचे कर्तृत्व वादातीत आहे. पडदा उघडल्यावर 'नेपथ्याला टाळी' ज्याला म्हणतात, ते यांच्या बाबतीत खरे ठरते. पार्श्वसंगीतापासून पोशाखांपर्यंत अनेक प्रयोग सोलापूरकर कलावंत करीत आहेत. पुढेही करत राहतील. सोलपूर आणि परिसरातील रंगभूमी दिवसेंदिवस समृध्द होत चालल्याचेच हे शुभलक्षण आहे.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाच्यावेळी प्रसिद्ध अभिनेत्री व नाट्य कलावंत मुक्ता बर्वे यांच्या सोबत डॉ. रेखाताई मोहिते.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाप्रसंगी महसूलमंत्री मा. ना. नारायणराव राणे साहेब यांचे स्वागत करताना प्रमुख कार्यवाह सागरदादा यादव व इतर.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाच्या वेळी संमेलनाध्यक्ष मा. अरुण काकडे यांचा सन्मान करताना पंढरपूरच्या राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त भारुडकार सौ. चंदाताई तिवाडी.



९४ व्या अ. भा. मराठी नाट्य संमेलानाचे अध्यक्ष मा. अरुण काकडे यांच्याशी हितगुज करताना स्मरणिका समितीच्या सदस्या सौ.स्वाती जोशी

पंढरीचा 'शतकी' कलारंग...!

- अशोक गोडगे

अध्यात्मिक पंढरी अशीच ओळख विठ्ठलाच्या या पंढरीला आहे. साधुसंतांनी पावन केलेली ही भूमी आजही टाळमृदंगाच्या निनादात रमाताना दिसते. पंढरीला जशी अध्यात्मिक परंपरा आहे, भक्तीचा अलौकिक वारसा आहे तशीच ही पंढरी कलेचीही मोठी परंपरा जतन करीत आलेली आहे. कलेचा मोठा वारसाही याच पंढरीला आहे. आणि हा वारसा जतन करण्यासाठी कित्येकांनी आपली हयात खर्ची घातली आहे. अनेक वर्षांच्या मागणीनंतर पंढरीत आता नाट्यपरिषदेने ९४ वे नाट्यसंमेलन आयोजित केले आहे. पंढरीसाठी ही गौरवाची आणि अभिमानाची बाब आहे. साऱ्या कलावंतात तर चैतन्याची एक लहर आली आहे...

कळत नकळत विठ्ठलाची ही पंढरी 'कलानगरी' बनत चालली आहे, दूरदर्शन मालिका, चित्रपट या नव्या तंत्रातही पंढरीनं आपल्या पाऊलखुणा उमटविल्या आहेत. नाटक, संगीत, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात पंढरी कायम आघाडीवर राहीली आहे आणि याच पंढरीनं महाराष्ट्राला अनेक मोठे कलावंत दिले आहेत. जागतिक किर्तीचे चित्रकार मकबूल फिदा हुसेन हे याच पंढरीच्या मातीत जन्माला आले आणि त्यांच्या बालपणाची काही वर्षे इथेच गेली आहेत. नाटक-चित्रपट विश्वात ज्यांनी आपला दमदार ठसा उमटविला, ज्यांच्या नावाला कीर्ती वर्षानुवर्षे चिकटून राहिली ते नाट्य आणि चित्रपट कलावंत राजा गोसावी यांचही नातं या पंढरीशी जुळून आलं. राजा गोसावी हे मूळ औंध संस्थानच्या कुरोली या गावचे. पण आर्थिक हलाखीमुळे त्यांच्या वडीलांनी राजा, बाळ आणि नंदू या मुलांना घेऊन पंढरीचा आश्रय घेतला होता. राजा गोसावीसह पंढरीतून बाळ गोसावी, नंदू गोसावी, नरेन डोंगरे यांच्यासारखे कलाकार व्यावसायिक मराठी रंगभूमीवर रमले.



राजा गोसावी एम.एफ.हुसेन जब्बार पटेल

कलेची मोठी परंपरा पंढरीनं जपली असली तरी त्याचा लिखित स्वरूपात इतिहास उपलब्ध नाही, इकडून तिकडून वेचून जेवढी काही माहिती हाती आली त्याचांच आधार घेत पुढं जाण्याशिवाय पर्याय नाही. नाट्य कलावंत वसंत उत्पात यांनी काही वर्षांपूर्वी संकलित केलेली माहिती आता मोलाची ठरली आहे. तब्बल शंभर वर्षांच्या परंपरेचा आढावा घेताना कोणाचा उल्लेख राहून जाण्याची मोठी भिती आहे पण त्यामुळं कोणाचं मोठेपण कमी होणार नाही. गतकाळातील वैभवशाली परंपरा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणंही तितकंच गरजेच आहे. आणि त्यासाठी निमित्त आहे, ९४ व्या अखिल भारतीय नाट्यसंमेलनाचं!

पंढरीला जशी नाटकांची मोठी परंपरा आहे तशी संगीताचेही सूर आणि स्वर आजही पंढरीच्या क्षितीजावर आपलं अधिराज्य गाजवत आहेत. पं.जगन्नाथबुवा पंढरपूरकर यांनी पंढरीच्या संगीत क्षेत्राला अनमोल बहुमान मिळवून दिलेला आहे. विठ्ठलाच्या भक्तीत संगीत आणि गायन यांचा सुरेख संगम असतो, त्यामुळं संगीत क्षेत्रानंही आपला दबदबा कायमचा निर्माण केला आहे. चंदाताई तिवाडीचं भारूडही सर्वदूर पोहोचलं आहे. दत्तोपंत मंगळवेढेकरांचा उल्लेख हा तर या क्षेत्रातला आवश्यक भाग आहे.

पंढरीच्या संगीताचे सूर नेमके कधीपासून उमटत आहेत याची नेमकी माहिती उपलब्ध नसली तरी बरोबर १०० वर्षांपूर्वीपासून काही मोती हाती लागले आहेत. सन १९१४ च्या दरम्यान कै. नारायण थिटे आणि कै. नारायण मंगळवेढेकर यांनी 'धर्मार्थ महाराष्ट्र संगीत विद्यालय' स्थापन केले होते तर कै. हरिभाऊ आणि कै. बिंदूबुवा पंचवाडकर यांनी १९२१ साली 'सरस्वती गायन समाज' या संस्थेची स्थापना केली होती. १९४७ साली कु. दुर्गा पंचवाडकर यांच्या भावगीतांची रेकॉर्ड एच.एम. व्ही. कंपनीने काढली होती. पुढे 'पंढरपूर म्युझिक सर्कल', 'स्वरसाधना', 'लावणी मंडळ', अशा संस्था उदयास आल्या आणि त्यांनी संगीताची सेवा

केली. उत्पातांच्या लावणीने पंढरीचा झेंडा रोवलेलाच आहे, शंकर वनारेंच्या ढोलकीची थापही तेवढीच प्रसिध्द आहे. संगीताच्या विश्वात एकापेक्षा एक अनमोल असे अनेक अनेक हिरे चमकले. थोडक्यात त्यांचा परामर्शही घेणे केवळ अशक्य!

बाळासाहेब पंचवाडकर, काका पराते, शंकरबुवा भाकरे अशी कितीतरी नावं घेता येतील. बबनराव बडवे, अरूण जोशी, अरूण खडके, पुरूषोत्तम खडके, आर्दीनी पुन्हा 'स्वरसाधना' नव्य दमानं सुरू करून पंढरीला मेजवानी देण्याचं काम केलं. जागतिक किर्तीच्या अनेक कलावंतांनी पंढरीत आपले कार्यक्रम सादर केले. संगीताची ही सेवा पुढे जात राहिली. अरूण जोशी, दत्ता बडवे, रूद्रमणी मिठारी, दिलीप टोमके, रणदिवे गुरूजी, साहेबराव बेसुळके, ज्ञानोबा उत्पात अशा अनेकांचे योगदान पंढरीच्या संगीताला लाभत गेले. भजनाच्या माध्यमातूनही ही सेवा होत होती. शास्त्रीय संगीतही आत्मसात केलेले होते. काळाबरोबर जाणे हा तर पंढरीच्या कलाक्षेत्राचा मूळ गुणधर्म मानला जातो. प्रदीप जाधव, विनोद शेंडगे आर्दीनीही पंढरीचं संगीत पुढं नेण्याचा यशस्वी प्रयत्न केला. विनोद शेंडगे हे आज नव्या काळाच्या हातात हात घालून संगीताचे सगळे नियम जपत या रस्त्याने वाटचाल करीत आहेत. पंढरीचं हे संगीतविश्व इतक्या तोकड्या पध्दतीनं मांडता येणार नाही याची मला जाणीव आहे, अनेक अनमोल हिऱ्यांचा संदर्भ देणं अशक्य होतं, एवढी नामावली आहे. अनुल्लेख करण्यासारखे कोणीही नसताना सर्वांचा उल्लेख करीत नसल्यानं त्या सर्व कलावंतांचा आदर राखत मी येथे क्षमाही मागतो. पंढरीत १४ वे अ. भा. नाट्यसंमेलन होत आहे. त्यामुळं पंढरीची नाट्यपरंपरा सविस्तर मांडणे गरजेचे ठरते... चला तर मग, तिसरी घंटा झालेलीच आहे...! मुळात मराठी माणूस हाच नाटकवेडा आहे, पंढरीला त्यातून वेगळं असं करता येणार नाही. करमणुकीच्या नजरेने जरी अलीकडे मराठी नाटकांकडे पाहिलं जात असलं तरी पुर्वीच्या काळी समाजाला काही संदेश पोहोचविण्याचं काम मराठी नाटकांनी केलेलं आहे. पंढरीतूनही हा प्रयत्न तितक्याच जोमाने झालेला आहे.


कै. विठ्ठलराव मोहोळकर

साधारणपणे इ. सन १९२८ पासून पंढरीच्या नाट्यचळवळीची माहिती मिळते. त्यापुर्वीच्याही कालखंडात पंढरीत ही चळवळ सुरू असण्याची शक्यता नाकारता येत नाही, कारण मराठी नाटकांच्या उदयाचीच परंपरा फार जुनी आहे, नाटक हा प्रकार मराठी मनाला चांगलाच भावला आहे. करमणुकीचे पर्याय ज्या त्या काळानुसार बदलत गेले असले तरी नाटक हा प्रकार तसा सगळ्याच प्रकारांचा केंद्रबिंदू ठरलेला आहे. साहजिकच एकोणिसाव्या शतकातही ही चळवळ सुरू असावी. उपलब्ध माहितीनुसार १९२८ ते १९३३ च्या दरम्यान पंढरीत स्थापन झालेल्या 'विठ्ठल दरबार क्लब' नावाच्या संस्थेने पंढरीत कलाविष्कार सादर केला. विठ्ठलराव मोहोळकर यांनी त्याकाळी आपले काही नाट्यप्रेमी सहकारी जमा करून या क्लबची स्थापना केली. यात मुरलीधर देशपांडे, आपटे बंधू, कदम मास्तर, किसन माळी अशा काही सहकाऱ्यांचा समावेश होता. 'म्युन्सिपालटी', 'रावबहाद्दूर', 'समाजचित्र ' अशी काही नाटकं या क्लबनं सादर केली. विशेष म्हणजे स्थानिक निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर ही नाटकं तिकीट लाऊन दाखविली गेल्याचा संदर्भ आहे. पाटील थिएटरात (नंतर ते अरूण टॉकिज झाले) या क्लबने स्थानिक दोन निवडणूकांत आपले प्रयोग सादर केले आणि त्यात त्यांना अपेक्षित यश मिळालं. निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर हे प्रयोग झाले असले तरी ते प्रेक्षकांना मोफत दाखविले गेले नव्हते याची नोंद जाणीवपूर्वक घेणं गरजेचे आहे. पंढरीत सन १९२८ मध्ये स्थापन झालेल्या 'विठ्ठल दरबार क्लब' ने जी काही नाटकं सादर केली त्याला नाही म्हटलं तरी काहीसं वेगळेपण निश्चित होतं. कै. विठ्ठलराव मोहोळकरांनी आपल्या नाट्यप्रेमातून सहकाऱ्यांना सोबत घेत स्थापन केलेल्या या क्लबने आपली ओळख निर्माण केली होती. विशेष म्हणजे, मोहोळकर यांनीच 'रावबहाद्दूर' आणि 'समाजचित्र' ही नाटके लिहीली होती आणि पंढरीत सादर केली होती. साहजिकच या नाटकांतून स्थानिक व्यक्तीरेखा आणि संदर्भ उमटले असणार....!

कै. मोहोळकर लिखित 'रावबहाद्दूर' हे नाटक दिवाण बहाद्दूर परिचारक यांच्यावर आधारित असल्याचं सांगितलं जातं. पंढरीतीलच एका नामांकित व्यक्तीची नक्कल पंढरीतच सादर करणं आणि ती यशस्वी होणं ही तशी अवघड बाब. पण हा प्रयत्नही या क्लबने केला. या नाटकातील आपली नक्कल जशीच्या तशी केल्याने दिवाण बहाद्दूर परिचारक संतापले आणि नाट्यगृह सोडून संतापाने निघून गेले असे सांगितले जाते. प्रेक्षक मात्र या हूबेहूब व्यक्तीरेखेवर जाम खूष होते. दिवाण बहाद्दूरांना आपली नक्कल भले आवडली नसली तरी पण त्यांनी नाटक बंद करण्याचा प्रयत्नही केला नाही की अन्य

प्रकारे विरोधही केला नाही. त्याकाळातही हा मनाचा मोठेपणाचा नाही का!

याच क्लबनं सादर केलेलं 'समाजचित्र' हे नाटक चक्क जातीभेद नष्ट करण्याचा विचार देणारं होतं. या नाटकात विविध जातीच्या व्यक्तिरेखा होत्या आणि त्या त्या व्यक्तिरेखा सादर केल्या. केवळ नाटकांतून जाती निर्मूलनाचा संदेश देण्यापुरता हा क्लब थांबला नाही तर विठ्ठल मंदिराच्या महाद्वारात संत चोखामेळा यांच्या समाधीजवळ सर्व जातीच्या कलावंतांनी एकत्र बसून भोजन केले आणि हा प्रयोग सादर केला होता. स्त्री भूमिकेसाठी त्या काळी स्त्री मिळणे अशक्यच! त्याकाळी पंढरीतील किसन माळी आणि आपटे बंधू स्त्री भूमिका सुंदरपणे करीत असत. प्रेक्षकांना ही कामं मनापासून आवडतही असत.

पंढरीत 'विठ्ठल दरबार क्लब' ने काही काळ रंगभूमीवर आपली छाप पाडली परंतू त्यानंतर 'हनुमान नाट्य मंडळ' या नाट्यसंस्थेचा उदय झाला. सन १९४० मध्ये शाहीर सावंत आणि त्यांच्या काही सहकाऱ्यांनी या संस्थेची स्थापना केली. मोठ्या तडफेने या मंडळींनी 'सवता सुभा', 'करीन ती पूर्व', 'स्वतंत्र युध्द' अशी काही नाटकं रंगभूमीवर सादर केली. या नाटकांतून ही मंडळी समर्थपणे अभिनय करीत असत.



कै. सुभद्राबाई जोशी



कै. गंगाधरपंत जोशी

त्याकाळी या संस्थेने अकलुज येथेही एक प्रयोग सादर केला.

पंढरीत 'महाराष्ट नाटक मंडळ' स्थापन झाले आणि एकापेक्षा एक सरस नाटकं पंढरीच्या प्रेक्षकांना पहायला मिळू लागली. भगवानराव कदम यांनी आपले सवंगडी सोबत घेत या मंडळाची स्थापना केली. 'लग्नाची बेडी', 'बेबंदशाही', 'वार्ताविहार', असे सरस नाटकांचे प्रयोग पंढरीत सादर होऊ लागले. शिंदे पेंटर, गोमेवाडीकर पेंटर, आप्पासाहबे वासकर, गंगाधरपंत जोशी, स्वामी पेंटर. श्रीनिवास लवंगकर, मुललीधर देशपांडे, आदी कलावंतांनी आपला अभिनय प्रेक्षकांपुढे आणला आणि प्रेक्षकांनीही त्याला मनस्वी दाद दिली. लवंगकर, गोमेवाडीकर आणि देशपांडे हे यावेळी स्त्री भूमिका करीत होते. या काळात नगरशेठ कै. दत्तोपंत कवठेकर यांनी 'आश्रय' दिला आणि त्यांच्या अर्थसहाय्यामुळं ही नाटकं रंगमंचापर्यंत येण्यास मदत झाली. या मंडळाने 'घराबाहेर' हे नाटक थेट विजापूरात सादर करून एक प्रकारे सिमोल्लंघनच केलं.

पहिल्यांदाच अवतरली 'स्त्री अभिनेत्री'!...

पंढरीतील 'महाराष्ट्र नाटक मंडळाचा' चांगलाच दबदबा निर्माण झाला असतानाच याच मंडळात काम करणाऱ्या काही कलावंतांनी स्वतंत्रपणे 'सर्वोदय नाट्य मंडळ' स्थापन केले आणि नव्या जोमाने पंढरीत नाटकांचे प्रयोग सुरू झाले. नरूमामा कुलकर्णी, किसन माळी, विठ्ठलराव थिटे, गोमेवाडीकर पेंटर, बापूसाहेब देशपांडे आदींच्या सहभागातून स्थापन झालेल्या या 'सर्वोदय' ने 'झाशीची राणी', 'वऱ्हाडाचा पाटील', 'आगऱ्याहून सुटका', 'अशीच एक रात्र येते', 'शिवसंभव' अशी नाटकं रंगमंचावर आणली... यावेळी मात्र पंढरीच्या या नाट्यचळवळीत एक परिवर्तन झालं होतं. या कालखंडापर्यंत नाटकातून स्त्री भूमिका पुरूषांनाच करावी लागत होती, या संस्थेने मात्र स्त्री भूमिकेसाठी महिला कलावंतांना रंगमंचावर सादर केले. महिला कलावंत नाटकात दिसण्याची ही बहुधा पंढरीतील पहिलीच वेळ असावी. सुभद्राबाई जोशी, चंद्राबाई बेळगावकर अशा काही स्त्री कलावंतांनी रंगमंचावर काम करण्याचं धैर्य दाखवलं आणि पंढरीच्या प्रेक्षकांना त्यांचा अभिनय पहायला मिळाला. महिला सामाजिक बंधनात अडकलेल्या अशा कालखंडात कै. सुभद्राबाई जोशी, चंद्राबाई बेळगावकर यांनी धाडस दाखवलं आणि पंढरीच्या रंगभंचावर पहिल्यांदाच पाऊल ठेवलं....

साधारणपणे याच दरम्यान सोनबा सासवडे, भगवानमास्तर कुलकर्णी अशी काही नावे जोमाने चर्चिली जाऊ लागली होती. 'अरूण नाट्य मंडळ' या संस्थेच्या माध्यमातून सोनबा सासवडे यांनी पंढरीच्या कलाक्षेत्रात आपली वेगळी आणि दमदार ओळख निर्माण केली. भगवानमास्तर कुलकर्णी, गोमेवाडीकर पेंटर, मुरलीधर देशपांडे इत्यादी कलावंताना सोबत घेत 'डॉ. कैलास' या नाटकाचा दमदार प्रयोग सादर केला आणि पंढरीतील अभिनय क्षमतेचा एक शिक्काच उमटविला. अन्यही काही दर्जेदार नाटके सादर करून या मंडळींनी आपला प्रभाव कायम केला.

बहरली पंढरीची रंगभूमी!

विविध नाट्यसंस्था पंढरीत बहरल्या असतानाच आणि प्रेक्षकांना एकापेक्षा एक करमणूकीची मेजवानी मिळत

असतानाच कलावंतही उदयास येत होते. साधारणपणे सन १९४५ ते १९५१ दरम्यानच्या काळात भाऊसाहेब तारे, बंडोपंत तारे आणि किसन तारे या बंधूनी रंगभूमीसाठी मोलाचे योगदान दिले. 'संशय कल्लोळ' सारखी नाटकेही या मंडळाने सादर केली. या मंडळात बंडोपंत हेच स्त्री भूमिका करीत.

सन १९४६ मध्ये स्थानिक हौशी मंडळींनी चक्क 'कवडी चुंबक' सारखं मोठं नाटक बसवलं. गणपतराव अभंगराव, शंकरराव देवधर, सबनीस, डॉ. माशाळकर आदी मंडळींनी हे नाटक सादर केलं आणि शाब्बासकीही मिळवली. डॉ. माशाळकर यांच्या धर्मपत्नीही या नाटकात अभिनय करीत होत्या. नाटकांत एक वेगळी प्रतिष्ठा होती हे स्पष्ट करणारं उदाहरण यापेक्षा अधिक काय असणार?

'मेळा' संस्कृतिनं आलं परिवर्तन

साधारणपणे सन १९५० पासूनच मेळा हा प्रकार रूढ होण्याची चिन्हे निर्माण झालेली होती. पंढरीच्या नाट्यचळवळीची परंपरा जेवढी मोठी आहे तेवढंच या परंपरेत या मेळ्यांनाही स्थान आहे. पंढरीत अशा मेळ्यांची सुरवात बाबूराव अन्नदाते यांनी केली आणि पुढे ती चांगलीच फोफावली आणि लोकप्रियही झाली. त्याकाळी राष्ट्रसेवा दल



कै. मधुकर टोमके



जालिंदर वाडेगांवकर

मेळे सादर करीत होते आणि करमणूकीच्या माध्यमाचा वापर करून समाज परिवर्तनाचं काम केलं जात होतं. सेवादलाच्या माध्यमातून राजाभाऊ मंगळवेढेकर यांनी आपल्या काही सहकाऱ्यांना सोबत घेत गणेशोत्सवाचं औचित्य साधत मेळे सादर करून मेळ्यांचा हा भार अनेक वर्षे आपल्या खांद्यावर वाहिला आणि पंढरीची कलात्मकता जपून ठेवली. पंढरीतील जुन्या जाणत्या मंडळींना आजही या मेळ्यांची आठवण आहे.

पंढरीत मेळ्यांना चांगले दिवस आलेले होते. 'श्रीकृष्ण मेळा', मुलींच्या सहभागासाठी 'श्री सरस्वती मेळा', 'श्री शारदा मेळा' अशा प्रकारचे अनेक मेळे अस्तित्वात आले होते. या मेळाव्यांमधून नाट्य तर असायचं पण भावगीत, देशभक्तीपर गीते, भक्तीगीत यासह नृत्यही असायचं. अधूनमधून विनोदाची फोडणी देण्यासाठी अभिनय नकलाही सादर होत. याच काळात शंकर वनारे आणि वसंतराव बडवे यांचा 'आदर्श संगीत मेळा' चांगलाच नावारूपाला आला होता.

इरसाल नाटकांचा 'गावरान' रंग!

'मेळा' या कलाप्रकाराची लोकप्रियता पंढरीत चांगलीच निर्माण झाली असली तरी हा प्रकार दिर्घकाळ टिकला नाही. जेमतेम पाच सहा वर्षांनंतर हा प्रकारही काळाच्या पडद्याआड गेला आणि पंढरीत ग्रामीण नाटकांचा एक सुवर्णकाळच अवतरला. प्रारंभीच्या काळात दर्जेदार, सामाजिक, ऐतिहासिक नाटकं पंढरीच्या रंगमंचावर आली होती. प्रेक्षकांनी ती स्विकारलीही होती. मेळाव्याच्या प्रभावानंतर या नाटकाच्या प्रयोगाला मरगळ आली असली तरी सन १९५६ च्या काळानंतर ग्रामिण नाटकांचं एक दमदार युग आलं आणि या नाटकांनी प्रेक्षकांच्या मनावर जबरदस्त मोहिनीही घातली. जालिंदरबापू वाडेगांवकर आणि कै. मधुकरदादा टोमके या कलावंतांचा मोठा दबदबा या नाटकांनी निर्माण केला आणि पंढरीत एवढ्या दमदार अभिनयाचे कलावंत आहेत याचीही पावती या नाटकांनी पंढरीच्या रंगभूमीला दिली. बापूदादांच्या या जोडीनं पंढरीचा रंगमंचच वैभवाच्या शिखरावर नेला.

तमाशापटाचा हा कालखंड होता. परंतू याच दरम्यान वाडेगांवकरांनी आणि टोमके दादांनी प्रेक्षकांना आपल्या नाटकांकडे खेचून घेतलं. या मंडळींचे 'दसरा उजाडला ' हे नाटक अभूतपुर्व गाजले.जुन्या पिढीतील अनेक रसिकांना आजही या नाटकाची आठवण होते. गणेशोत्सवाच्या पाश्वभूमीवर एकापेक्षा एक सरस आणि दमदार ग्रामिण नाटकं सादर होत होती. आणि प्रेक्षकांची केवळ गर्दी नव्हे तर झुंबडही उडत होती. वाडेगांवकर आणि टोमके दादा यांची रूबाबदार व्यक्तीमत्वे आणि दमदार अभिनय अनेक वर्षे ग्रामिण ढंगाच्या प्रेक्षकांना भुरळ पाडत राहिला. पुढे या दोन्ही मातब्बर कलावंतांनी अनेक सामाजिक नाटकांतूनही अभिनय केला. त्याकाळी रूपेरी पडद्यावरही आपल्या अभिनयाची छाप या कलावंतांनी सोडली. त्या काळात चित्रपटात काम करणारे मधुकरदादा टोमके आणि जालिंदर वाडेगांवकर यांनी पंढरीच्या कलाविश्वात अतुलनिय भर घातली. दोघांचीही भारदस्त व्यक्तीमत्वं, माईकशिवायही शेवटच्या प्रेक्षकापर्यंत जाणारा आवाज, नजरेतली भेदकता आणि रंगमंचावरील सफाईदार वागणं.... पंढरीतील नाट्यपरंपरेत हे दोघे मानाचे

स्तंभ ठरले आहेत.

कै. प्र.शं.गळीतकर हे ढंगदार नाटकं लिहीत आणि हे कलावंत त्याल तितक्याच दमदारपणे सादर करीत. शिवाजी सागर, ज्ञानोबा शिंदे, मोहना काळे आदींची साथ त्यांना मिळत होती. या मंडळींनी ग्रामिण नाटकांचा एक काळ जबरदस्त गाजवला. नव्हे धुमाकूळच घातला म्हणा ना...! या काळाचा अस्त होतेवेळी मलाही यातील काही नाटके पहायला मिळाली आहेत. काय ती संवादफेक.... काय तो अस्सल 'गावरान ' अभिनय....! सगळंच काही बिनतोड.... लाजवाब!!

नवयुगाची ही तर नांदी!


गोविंद (मास्टर) भातलवंडे

प्रेक्षकांच्या मनावर पगडा असलेल्या 'ग्रामिण' नाटकांचा बहर ओसरत असतानाच साधारणपणे १९६० नंतर पंढरीत पुन्हा एकदा नाट्यचळवळ उफाळून आली. या चळवळीचे एक नवे युगच जन्माला येऊ पहात होते. सामाजिक, कौटुंबिक, फार्सिकल अशा सगळ्याच प्रकारांतीलनाटकांचा हा जमाना आलेला होता आणि एकेक नवनवीन कलावंत आणि संस्था उदयास येऊ लागल्या होत्या. कलेचा प्रसार आणि नवनविन कलावंतांचा उदय करण्यात पंढरपूर महाविद्यालयाचा (हल्लीचे कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय) मोठा हातभार लागला. या महाविद्यालयाने असंख्य विद्यार्थ्यांतील कलावंत जागे केले आणि त्यांनीच पंढरीची चळवळ सशक्त केली.

१९६० साली पंढरीत सुरू झालेल्या या महाविद्यालयात दरवर्षी होणाऱ्या स्नेहसंमेलनाच्या निमीत्ताने दर्जेदार नाटकं बसवली जायची. साहजिकच नाट्यप्रेमी किंवा अभिनयाची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आयताच वाव मिळाला. महाविद्यालयाच्या माध्यमातून कलाविष्कार सादर करणाऱ्यांची यादी भली मोठी आहे. त्या सर्वांचा नामोल्लेख करणं केवळ अशक्य आहे. दशरथ शिंदे, बापू जोशी, बाळू देठे अशा काही मंडळींनी अनेक सामाजिक नाटकं गाजवली. अशोक गरड, राजन ओंकार, जीवन पाटील, आप्पा चव्हाण यांनीही आपली ओळख निर्माण केली.

गुणी अभिनेता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वसंत उत्पात यांनी शिवाजी विद्यापीठ नाट्यस्पर्धेत 'करायला गेलो एक' या नाटकातील भूमिकेबद्दल अभिनयाचे दुसरे पारितोषिक मिळवले, सह कलावंतांनाही अन्य पारितोषिकं मिळाली. वसंत उत्पात, दिलीप टोमके, प्रफुल्ल मांगले, रमेश टोणपे, शोभा कुलकर्णी, विजया वाघमोडे आदींची मैफल मस्त जमली होती. विशेष म्हणजे कोल्हापूरात झालेल्या या स्पर्धेच्या परीक्षकात नामवंत अभिनेते चंद्रकांत मांढरे यांचा सहभाग होता.

बहरले रंग... उठले तरंग !

महाविद्यालयाचा रंगमंच गाजऊन बाहेर पडणारे कलावंत बाहेरच्या जगातही शांत बसले नाहीत, त्यांनी त्यांची धडपड सुरूच ठेवली. वसंत उत्पात, आनंद उत्पात आदी सहकाऱ्यांनी 'सह्याद्रि नाट्य मंडळ' स्थापन केले. महाविद्यालयात छान जमलेलाच हा ग्रुप होता. त्यांनी महाविद्यालयात गाजवलेली नाटकंच पुन्हा सादर केली आणि पंढरीतील प्रेक्षकांनी ती तिकीट काढून पाहिली. कोणा ना कोणा संस्थेच्या मदतीसाठी ही नाटकं पंढरीत सादर झाली. १९७० ते १९८० या दशकात तर पंढरीच्या नाट्यचळवळीला बहर आला होता.

कलेसाठी प्रचंड परिश्रमाची तयारी असणारा गोविंदराव भातलवंडे यांच्यासारख्या हुरहुन्नरी कलावंत नव्या दमाने आणि नव्या जोमाने समोर आला होता. आजही ते 'मास्टर' या नावाने ओळखले जातात. कलेसाठी झपाटून गेलेल्या गोविंदरावांनी 'पाटलाची चावडी'', ''लाख भानगडी'','' कसा भरू मी हिरवा चूडा'', ''मला काही सांगायचंय'', ''नको ते वैर, नको तो खंजीर'', ''थांबा नाथ, मी ओवाळीते'', अशी अनेक नाटकं पंढरीच्या रंगमंचावर सादर केली. ही सर्व नाटकं भातलवंडे यांनीच लिहली होती. या नाटकांतून मधुकर टोमके, विनय बडवे, दिलीप टोमके, विजय जोशी, लाला गांडुळे, वसंत लकडे, हरिष जाजारे, लकप्पा गवळी, प्रभा काळे, छाया काळे, शोभा गुरव आदी कलावंतांनी आपल्या समर्थ अभिनयाचं दर्शन पंढरीला दिलं. प्रेक्षकांना ही नाटकं विनामुल्य पहायला मिळाली होती. परंतू संतोष शहा, विठ्ठल अधटराव, सुरेश गुजर अशा मंडळींनी आपला मदतीचा हात दिला होता. पंढरीची रंगभूमी अवघी बहरून निघू लागली होती. गोविंदराव भातलवंडे हे नाटक लिहीत, नाटकातून अभिनय करीत आणि पुढे पुढे तर हे सगळं सांभाळत नेपथ्य साकार करणं ही त्यांची एकट्याचीच जबाबदारी बनली होती. कुठेही न थकता, कसलीही कुरबुर न करता त्यांचं हे काम चालू राहिलं.

पंढरीच्या परंपरेत नाटकांचे विविध प्रवाह येत होते, जो तो काही नवे करण्यासाठी धडपड करीत होता. पदरमोड

करूनही जे काही करता येईल ते केले जात होते. कित्येक वर्षांपूर्वी सादर झालेली 'लस्ट' ही एकांकिका आजही पंढरीच्या प्रेक्षकांच्या आणि नाट्यप्रेमींच्या स्मरणात आहे. विवेक घळसासी, वसंत उत्पात, विजय जोशी, राम गोकाककर, प्रभा काळे आदी कलावंतांनी तर 'काळे बेट लाल बत्ती' हे प्रा. मधुकर तोरडमल यांचे नाटक मोठ्या दिमाखात सादर केले होते. त्याकाळी राज्य नाट्य स्पर्धेत पहिले आलेले हे नाटक हातात घेण्याचे धाडस करून ते यशस्वीही केले होते.

'नाट्यपंढरी' ची 'विजयश्री'

सन १९७१-१९८० च्या कालखंडात पंढरीच्या रंगभूमीवर नवनवे प्रयोग होत असतानाच १९७५ साली 'नाट्यपंढरी' ही नाट्यसंस्था निर्माण झाली. मधुकरदादा टोमके, प्र.शं. गळीतकर, वसंत लकडे, दत्ता इंगोले, हरिष जोजारे, अरूण जवळे, लकप्पा गवळी अशी काही मंडळी या संस्थेत होती. 'कन्या सासुराशी जाये' हे नाटक प्रेक्षकांच्या चांगलंच स्मरणात राहिलं. 'मी कळी गुलाबाची', 'फुलाला सुगंध मातीचा' अशी काही नाटकं या संस्थेने सादर करून शाब्बासकीची थाप मिळवली. 'मास्तर' या नावाने अखेरपर्यंत परिचित असणारे भगवानराव कुलकर्णी हे या नाटकांचे दिग्दर्शन करीत होते. त्यांच्या दिग्दर्शनात अत्यंत काटेकोरपणा होता. त्यांच्या 'फळी' वर बसून गप्पा



चांदणे शिंपीत जा या नाटकांत अशोक गोडगे,विनय बडवे

मारतानाही मला अनेकदा ते जाणवत होते. दुष्काळ निधीसाठी या संस्थेने पंढरीच्या बाहेर पडून सोलापूर, सांगोला अशा ठिकाणी 'फुलाला सुगंध मातीचा' या नाटकाचे प्रयोग करून बांधीलकीचा हातही दिला.

काळ बदलत होता, संकल्पना बदलत होत्या. अनेकांना नाटकांची गोडी लागली होती तर अनेकांना आपणही अभिनय करावा असे मनापासून वाटत होते. त्यात काही गैरही नव्हतं पण एकाच नाटकांत किती जणांना संधी मिळणार? त्यातूनच विजय जोशी यांच्या पुढाकाराने 'विजयश्री' ही नाट्यसंस्था उभी राहिली. या संस्थेने जिल्हाभर गणेशोत्सवात धुमाकूळच घातला होता. गळीतकरांच्या लेखणीतून उतरलेलं इरसाल नाटक आणि रांगड्या कलावंतांनी आणलेली अफलातुन धमाल... सगळंच काही और होतं... विजय जोशी दिलीप टोमके, मुरलेंद्र शेटे, सुभाष भिंगे, प्रकाश महाजन, सतीष कळसकर, मोहन गवळी, दत्ता बडवे, कालिदास देशमुख आदींनी या संस्थेला हातभार लावलेला होता.

गळीतकर लिखित ग्रामिण ढंगाची इरसाल नाटकं या संस्थेचे कलाकार मोठ्या खुबीने सादर करीत होते, त्यातील 'टोपी रोख, डोकं उदार' या नाटकाने तर जिल्ह्यातील गणेशोत्सवात धम्माल आणली होती. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी 'जाणता राजा' सारख्या महानाट्याचं आव्हान पेललं होतं, स्थानिक कलावंतांना हे अशक्यप्राय होतं तरीही पंढरीच्या कलावंतांनी हे आव्हान पेललं होतं, 'विजयश्री संस्कार भारती' यांनी १९९६ च्या शिवजयंतीसाठी सुमारे १२५ कलावंतांना घेऊन 'जाणता राजा' चे काही भाग सादर करण्याचाही बहुमान मिळवला होता.

क्षितीजावर उधळले 'नवरंग'!

हरिनामाच्या गजरानं दुमदुमणारी पंढरी वर्षानुवर्षे आपली अध्यात्मिक परंपरा जोपासत असतानाच कळत नकळत पंढरीची नाट्यचळवळ सतत 'पुढचं पाऊल' टाकत होती. काही कलावंत आणि दिग्दर्शक चांगलेच नावारूपालीही आलेले होते, सोनबा सासवडे यांच्या नावाचा तर चांगलाच दबदबा निर्माण झाला होता. त्याच्या पहिल्या पुण्यतिथीचं निमित्त साधून पंढरीत एका नाट्यस्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. 'सह्याद्रि' या नाट्य मंडळाने 'करायला गेलो एक ' तर ' विजयश्री' ने 'फुलला सुगंधा मातीचा' हा प्रयोग या स्पर्धेत सादर केला होता. विविध मंडळांनी या स्पर्धेत आपली नाटकं सादर केली होती. त्यानंतर अशा स्पर्धा पंढरीत झाल्या नाहीत.

कवठेकर हायस्कूलच्याच रंगमंचावर सन १९९४ साली पंढरीत पहिले सावरकर साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. यावेळी सावरकरांच्या विविध नाटकांतील काही प्रवेश स्थानिक संस्थानी सादर केले होते. हा करण्यात आले होते. यावेळी सावरकरांच्या विविध नाटकांतील काही प्रवेश स्थानिक संस्थानी सादर केले होते. स्वा. सावरकर लिखित 'संन्यस्त खड्ग' चे सादरीकरण वसंत आणि आनंद उत्पात

यांनी सादर केलं तर उजनीचे अभियंता श्री.पाठक यांच्या पत्नी यांनी 'उत्तरक्रिया' चे तर बंडू सबनीस आणि त्यांच्या पत्नी तसेच प्रभाकर देशपांडे यांनी 'उःशाप' चे सादरीकरण केले.'नाट्य अभिनेते' विनय बडवे दिग्दर्शित 'सागरा प्राण तरमळला' या नाटकांचा सारांश 'मृत्यूंजय' या नाटिकेद्वारे सादर केला होता. बंडू महाजन यांनी सावरकर साकारले होते, यावेळी ब्रिटीश वार्डनची भूमिका केली होती. नंतर आम्ही 'मृत्यूंजय' हे सांगली येथे आणि नंतर पंढरपूरातही सादर केले. पंढरीच्या क्षितीजावर रंगभूमीच्या या नवरंगाची उधळण झाली होती.

वेगळ्या वाटेने जात काही तरी भव्यदिव्य साकार करणं हा पंढरीच्या नाट्यचळवळीचा आत्माच होता. बापूसाहेब राजबिंडे, प्रभाकर देशपांडे, भिकोबा मिरजकर, बटोबा माळी, सुभाष भिंगे या मंडळींनी तर 'रायगडाला जेंव्हा जाग येते' हे ऐतिहासिक नाटक करणं ही काही सामान्य बाब नव्हती. पण काही झालं तरी ही 'पंढरीची' चळवळ होती.

राज्य नाट्यस्पर्धेतही पंढरीचं 'कौतुक'!

पंढरीच्या नाट्यसृष्टीचा दबदबा चांगलाच वाढलेला होता, त्यास सातत्याने भर पडतच होती अणि पंढरीच्या



सागरा प्राण तळमळला या नाटकांत अशोक गोडगे, उत्तम आढमिले, रवी इंगोले, शिवराज सरनाईक.. सावरकर साहित्य संमेलनातील प्रयोग

कलावंतांनी आपलं अभिनय सामर्थ्य केंव्हाचं सिद्ध केलं होतं. महाराष्ट्र शासनाच्या राज्य नाट्य स्पर्धेतही पंढरीच्या काही नाट्य संस्थानी सहभाग घेतला आणि या परीक्षेतही कौतुकाची थाप या कलावंतांच्या पाठीवर पडली. मुक्तपणे प्रयोग करण्याची सवय असलेल्या पंढरीच्या कलावंतांनी शासनाच्या नाट्यस्पर्धेचीही चव अनुभवली. काही भल्या-बुऱ्या अनुभवासह कौतुकाचा वर्षाव झाला. यात 'नाट्य अभिनव', 'रसिक मंडळ' अशा काही मंडळांचा आवर्जून अल्लेख करावा लागेल. 'नाट्य अभिनव' या संस्थेने तर चक्क 'नटसम्राट' सारखे महानाट्य या स्पर्धेत नेले. नटसम्राट नाटकाला हात घालण्याचं धैर्य भल्याभल्यांना होत नाही पण विनय बडवे यांनी 'जगन्नाथाचा रथ' ओढण्याचा निर्धार केला आणि हा प्रयोग स्पर्धेत सादर केला. किती विघ्ने, किती संघर्ष..! मी या नाटकांत भूमिका केली आहे, त्यामुळे सगळ्यांचा साक्षीदार आहेच. नाट्यसमिक्षकांनी या प्रयोगाचे कौतुक केले. विनय बडवे यांनी साकारलेली गणपतराव बेलवलकरांची भूमिका अतुलनियच होती.

पंढरीतील हुरहुन्नरी कलावंत प्रभाकर देशपांडे यांनीही या स्पर्धेत 'अग्निपंख' हे नाटक रसिक मंडळाच्या वतीने सादर केले होते, त्यालाही परीक्षक आणि प्रेक्षकांनी दाद दिली तर नाट्य समिक्षकांनी मुक्तपणे या नाटकाचा गौरव केला. शिवराज सरनाईक, मंगेश गांगवे, अशोक गोडगे, महेंद्र गणपुले, सीमा चांदेकर, निता अघटराव पुरंदरे आदी कलावंतांनी याच स्पर्धेत 'वरचा मजला रिकामा' हे फर्सिकल नाटक सादर केले. स्पर्धेच्या या प्रयोगात तर मुख्य भुमिका करणाऱ्या कलाकाराने ऐनवेळी दगा दिला होता. नेहमीच्या भूमिका सोडून प्रत्येक कलाकाराला ऐनवेळी वेगळ्या भुमिका कराव्या लागल्या होत्या. रात्री ९ वाजाता प्रयोग असताना जवळपास सगळ्याच कलाकारांच्या बदललेल्या भूमिका त्यांना रात्री ८ वाजता सांगण्यात आल्या होत्या आणि भूमिका सरकवत शेवटच्या छोट्या पान भूमिकेपर्यंत मेळ घातला गेला होता. सोलापूरचे द. श्री. पैठरकर यांनी ऐनवेळीही एक छोटीशी भूमिका करण्याची तयारी दर्शविल्यामुळे हा प्रयोग स्पर्धेत सादर होवू शकला होता. अशा परिस्थितही हशा आणि टाळ्या यांनी हुतात्मा स्मृतीमंदीर दुमदुमले होते. प्रयोग संपला तेंव्हा आमच्या प्रत्येकांच्या डोळ्यात पाणी होते. पंढरपूरच्या कलावंतांची जिद्द आणि संघर्ष करीत यश मिळविण्याची तयारी या नाट्यस्पर्धेच्या प्रयोगांतून वारंवार दिसून आली होती.

'नाट्य अभिनव' ने चढविला कळस!

पंढरीच्या नाट्यचळवळीचा पाया भक्कम झालेला होता. आणि त्यावर 'नाट्य अभिनव' या संस्थेने कळस चढवला असं म्हटलं तर मुळीच वावगं ठरणार नाही. मुंकुंदराव परिचारक, दिपक पंढरी, सुरेश गुजर, विनय बडवे, गोविंद भातलवंडे आदींनी काहीतरी वेगळं करण्याच्या हेतूनं 'अभिनव' च्या माध्यमातून पंढरीच्या नाट्यचळवळीची पताका महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यात पोहोचवली. मी या संस्थेचा एक भाग होतो आणि त्यामुळे मला या संस्थेचा प्रवास

अनुभवायला मिळाला. अनंत अडचणी, एक रामस्यापूर्ती होईपर्यंत दुसरी उभी! खडतर प्रवासातही ही संस्था पुढेच जात होती आणि पंढरीला अभिमान वाटावा असे काम करून दाखवित होती. पंढरीत असे छोटे मोठे काम केले असल्याचे दिसून येते.

'नाट्य अभिनव' ने सादर केलेली नाटकं ही सामान्य नव्हती. 'विषामृतातील माया', 'हा स्वर्ग सात पावलांचा', 'नाथ हा माझा', 'थॅंक्यू मिस्टर ग्लॅड' 'नटसम्राट', 'गुड बाय डॉक्टर', 'दिवा जळू दे सारी रात', 'चांदणे शिंपीत जा', 'सागरा प्राण तळमळला', 'तरूण तुर्क म्हातारे अर्क', 'शांतेच कार्ट चालू आहे', अशा प्रकारची अनेक नाटकं सादर केली. एकेका नाटकाचे अनेक प्रयोग राज्याच्या विविध भागात केले आणि पंढरीची नाट्यपताका राज्यभरात दिमाखाने फडकवली. बडवे यांच्यासह गोविंद भातलवंडे, अशोक गोडगे, शिवराज सरनाईक, मोहन नेर्लेकर, हणमंत सराफ, माधवी कुलकर्णी, अशोक ब्रम्हे, राम गोकाककर, दयानंद सुपेकर वगैरे कलावंत हे या संस्थेचे नेहमीचे कलाकार होते. पंढरीतील अन्य कलावंतही या संस्थेच्या नाटकांमधून अधूनमधून दिसत. कु. निर्मला गिंगे, प्रा. रत्नमाला कुलकर्णी, हिरा काळे, निता अघटराव-पुरंदरे अशा अनेक स्त्री कलावंतींनीही अभिनवच्या रंगमंचावर आपल्या अभिनयाचं सुंदर दर्शन दिलं. पुणे दौरा असो की कोकण दौरा... कधीही त्यांनी कुरबुर केली नाही की कसली तक्रार केली नाही. ही संस्था म्हणजे एक कुटुंबच बनलं होतं. सोलापूरला हुतात्मा स्मृतीमंदिरात आमचा 'चांदणे शिंपीत जा' चा प्रयोग पहायला दस्तूरखुद्द राजा गोसावी उपस्थित होते. प्रयोगानंतर ते म्हणाले होते, 'यापुढे आपण मिळून प्रयोग करू' सगळं काही ठरण्याच्या आधीच राजा गोसावी अनंताच्या प्रवासाला निघून गेले आणि ही इच्छा अपुरीच राहिली.

यशवंत दत्त, चित्तरंचन कोल्हटकर, वसंत शिंदे यांच्यासारख्या अनेक जेष्ठ कलावंतांनी 'नाट्य अभिनव' चे भरभरून कौतुक केले होते. प्रतिकुल परिस्थितीत या संस्थेने आपले कार्य नेटाने चालू ठेवले, गणेशोत्सवाच्या काळात तर या संस्थेचे प्रयोग ठराविक ठिकाणी ठरलेलेच असायचे. अनेक संस्थांच्या मदतीसाठी 'नाट्यअभिनव' ने प्रयोग करून सामाजिक बांधीलकीही जोपासली. या संस्था या संस्थेनेच मराठी चित्रपटसृष्टीलाही कलावंत दिले. एकंदर या संस्थेने पंढरीच्या नाट्यचळवळीला कळस चढवला हेच खरं!

मंद झाले तेज सारे...!

नाट्यचळवळीची गौरवशाली परंपरा जोपासत निघालेली असतानातच गेल्या काही वर्षापासून पंढरीच्या नाट्यसृष्टीला मरगळ आली. प्रकाशमान रंगभूमीचं तेज मंदावल गेलं. त्याला कारणं अनेक असली तरी आज पंढरीच्या या विश्वात कसलीच हालचाल पहायला मिळत नाही. नाटकांना 'आश्रय' मिळेनासा झाला. दुरदर्शन संचात मान अडकाऊन बसलेले प्रेक्षक नाटकाचं तिकीट काढायला तयार नाहीत. निर्मितीचा खर्च वाढत गेला आणि मान अडकाऊन अभिरूची बदलत गेली. आम्हीही दुरदर्शन मालिका, चित्रपट यात रमलो आणि हळूहळू नाटक हा प्रकारच पंढरीपासून दुरावला.

कलाकरांचा व्हावा तेवढा सन्मान पंढरीत झाला नाही. गेल्या काही वर्षांपासून सहकार शिरोमणी वसंतदादा काळे प्रतिष्ठान मात्र कला, क्रिडा, कृषी साहित्य अशा विविध घटकांसाठी पुरस्कार देते आणि उचित सन्मान करते. कलाकारांचा हा बहुमान मोलाचा वाटतो. कला विभागातील पहिला 'कलाभूषण' हा पुरस्कार मिळण्याचं भाग्य मलाच मिळालं. स. शि. वसंतदादा काळे साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम अविरतपणे सुरू आहे. कलाकारांना कुणीतरी शाब्बासकीची थाप पाठीवर टाकावी असं वाटत असतं. त्यातूनच कलावंतांना उभारी मिळते.

पंढरीची नाट्यचळवळ एवढी विविधतेने नटली असली, परंपरा समृध्द केली असली तरी अंतर्गत राजकारण, हेवेदावे, धूसफूस असे प्रकारही त्यात होते आणि ते असणारही! पण त्यामुळे चळवळ कुठं थांबली नाही हे विशेष! काही खटके उडाले की, नवी संस्था निघायची. शिवराज सरनाईक यांनीही अशाच वादातून 'नाट्य प्रतिभा' ही संस्था स्थापन केली होती आणि 'दिवा जळू दे सारी रात' या नाटकाचा प्रयोग सादर केला होता. माझीही एक भूमिका या नाटकात होती. त्यानंतर आम्ही 'वरचा मजला रिकामा' या नाटकाचे अनेक प्रयोग विविध ठिकाणी केले होते. महेंद्रकुमार गणपुले, शिवराज सरनाईक, मी (अशोक गोडगे) आणि मंगेश गांगवे असा हा ग्रुप मस्त जमला होता.

प्रेमकुमार भोसले, रेवन माने, लक्ष्मण धायगुडे, शाहिर नंदकुमार पाटोळे, मुरलेंद्र शेरे, प्रभाकर देशपांडे, बंडू सबनीस, वसंत उत्पात, किसन सिंगण, सुभाष चव्हाण अशा अनेक कलाकारांचेही योगदान आहे. गतकाळातील रंगतरंगात काही नावं विस्मरणात गेली असतील, शिवाय सर्वांचाच उल्लेख इथं अशक्यच! देशपांडे यांनी 'पाटलाला नेशिवलं लुगडं' या एकपात्री प्रयोगाचाही प्रयत्न केला होता. महेंद्र गणपुले यांनी मात्र आपल्या कलेची पताका कायम

फडकावत ठेवली आहे. 'मिमिक्री' या कलाप्रकारात गणपुले यांनी राज्यभर आपल्या 'हास्यनगरी' ने प्रेक्षकांना हसवत ठेवले. 'मिमिक्री कलावंत' म्हणून राज्यातील ज्या काही प्रमुख कलाकारांची नावे घेतली जातात त्यात गणपुले यांचं नाव आजही आघाडीवर आहे. विनय बडवे यांनी सुमारे २५ वर्षे अथक परिश्रम घेत नाट्यचळवळीचा गाडा पुढे नेला पण नंतर मात्र पंढरीची नाट्यसृष्टी पडद्याआड जाऊ लागली. नाट्यसंमेलनाच्या निमित्ताने अजूनही तिला धुमारे फुटावेत अशीच अपेक्षा! विझवले दिवे पुन्हा पेटवता येतील... पंढरीचा रंगमंच पुन्हा प्रकाशमय होईल... पाहू या आता याच घडीची वाट...

संकलन सहकार्य-
विक्रम बिस्किटे, विठ्ठलराव नागटिळक,
सौ. स्वाती जोशी (आराध्ये)



सन-१९७५
नाट्य-पंढरी निर्मित **चांदणे शिंपीत जा** या प्रयोगामधील कलाकार
उभे डाविकडून-सुरुबाला टोमके.कै.मधुकर टोमके.कै.दत्ता इंगोले.कै.विजय जोशी.
श्री विवेक घळसासी.कै.वसंत लकडे.श्री अरुण जवळे.श्री रुद्रमणी गिठारी.व प्रशांत कुलकर्णी
बसलेले डाविकडून-श्रीमती मंदाकिनी टोमके.छाया काळे.हेमा जोशी.कै.दादा म्हमाने
कै.बापु राजबिंडे.श्री बाळासो बुरजे.कै.बाळासो पंचवाडकर.व श्री हरिष जोजारे.



नाट्य अभिनव पंढरपूर या संस्थेच्या प्रवासातील काही साक्षीदार... विनय बडवे, गोविंद भातलवंडे, अशोक गोडगे आदींचा हा आठवणींचा ठेवा....





"मी कळी गुलाबाची" या नाटकामध्ये लकाप्पा गवळी, सिनेतारका हेमसुवर्णा, मधुकर (दादा) टोमके



सुयोग चित्र निर्मीत 'सोनाराचं टोचल कान'या चित्रपट प्रसंगी डाविकडून सिनेअभिनेत्री उषा चव्हाण,मधुकर दादा टोमके(ईन्सपेक्टर),निर्माते,सिनेअभिनेते बिळु फुले.



नाट्यपंढरी या संस्थेचे कलाकार हरिष जोजारे, कै. मधुकर (दादा) टोमके, कै. भगवान मास्तर कुलकर्णी, अरुण जवळे, श्री. भिंगे, मुरलेंद्र शेटे, किसन शिंगण, मधु गोरे




भक्तीची सत्वपरीक्षा चित्रपटातील नायक अशोक गोडगे.... एक भूमिका पण दोन छटा...



मी कळी गुलाबाची-- या नाट्यप्रयोगातल्ये कै.वसंत लकडे.सिनेकलाकार हेमसुवर्णालह कै.मधुकर(दादा)टोमके

पंढरपूरचे नाट्य लेखक कै. डॉ. विठ्ठल हरी मोहोळकर यांचे हे अति दुर्मिळ असलेले १९३३ सालचे सामाजिक नाटक ''रावबहाद्दूर सनातने अर्थात शुद्धीसंघटन'' तत्कालिन परिस्थिती पारतंत्र्याची होती आणि स्वातंत्र्याइतकेच समाजामध्ये आधुनिक विचारांचा प्रसार होणे, सामाजिक सुधारणा होऊन स्पृश्यास्पृश भेद नष्ट होणे समाजहिताचे होते. त्याची अत्यंतिक तळमळ या नाटकाच्या पात्रांची नावे व नाटकातील संकल्पना, पात्र संवाद यावरून दिसून येते. त्याच नाटकातील वानगी दाखल डॉ. मोहोळकर यांच्या हस्ताक्षरातील पान.



मा.ना.श्री.सुशिलकुमारजी शिंदे साहेब

(गृहमंत्री - भारत सरकार)

यांनी विविध नाटकात सादर केलेल्या भुमिका























९४वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन, पंढरपूर



अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद शाखा पंढरपूर
उदघाटनप्रसंगी जीवनगौरव पुरस्कार स्विकारताना बंडोपंत महाजन बडवे.



अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद शाखा पंढरपूर
उदघाटनप्रसंगी जीवनगौरव पुरस्कार सन्मान चिन्ह.



पंढरपूरच्या हौसी कलाकारांना मार्गदर्शन करताना जेष्ठ कलावंत डॉ. श्रीराम लागू.



उपमुख्यमंत्री मा. ना. विजयसिंहजी मोहिते-पाटील व वसंत प्रतिष्ठान पंढरपूरचे संस्थापक मा. कल्याणराव काळे यांच्या शुभहस्ते कलाभूषण पुरस्कार स्विकारताना अशोक गोडगे.



कन्या सासुराशि जाये - या नाट्य प्रयोगामध्ये
मधुकर(दादा) टोमके व भगवानराव कुलकर्णी मास्तर



पारंपारिक नाट्याविष्कार
सादर करताना कलावंत


नाट्यविष्कार सादर
करताना कलावंत
अखिल भारतीय मराठी
नाट्यसंमेलन
पंढरपूर २०१४

किस्से नाटकातले

- अशोक गोडगे

तुमचं चालू द्या.....

काही वर्षापुर्वी सारवर कारख्यान्यांच्या गणेशोत्सवात दहा दिवस चांगले कार्यक्रम सादर होत होते. या काळात किमान चार ते पाच प्रयोग आम्हाला कोणत्या ना कोणत्या सारवर कारखान्यावर करायला मिळायचे. एका कारखान्याच्या गावांत (कारखान्यावर नव्हे) आम्ही नाटकाचा प्रयोग सादर करीत होतो. (गावाच्या नावाचा मुद्दामच उल्लेख टाळाला आहे) प्रेक्षकांची तुंबळ गर्दी होती. नाटक सुरू होण्यास जरासा विलंब होत होता. पण प्रेक्षक नाटक पाहण्यास उत्सुक होते.

तिसरी घंटा झाली, पडदा आणि नाटक सुरू झालं, नाटकाला रंग चढायच्या आधीच वेगळाच रंग आला. रंगमंचावर आम्ही कलावंत आपापल्या भूमिका साकार करीत असतानाच काही स्थानिक 'कलाकार' मंडळी रंगमंचावर आली आणि त्यांनी माईकचा ताबा घेतला. काय होतंय ते कळायच्या आत या मंडळींनी त्यांचे संवादही सुरू केले. विशेष म्हणजे त्यांच्या हातात लाठ्या काठ्या अन् प्रत्येकजण झिंगलेला...! आम्ही थोडसं मागे जात रंगमंचाच्या एका कोपऱ्यात 'बळीच्या बकऱ्यासारखे' उभे ! काहींना हा नाटकाचा भाग आहे असंही वाटलं असेल कदाचित! दारू पिलेल्या या गावगुंडांनी माईकवर कोणाला तरी आव्हान द्यायला सुरूवात केली. 'कुठं लपून बसलाय? कवापास्न हुडाकतोय. मर्द आसला तर म्होरं या.. आज दाखिवतोच तुम्हाला इंगा..' असं काही तावातावानं बोलत हे गावगुंड स्थानिक पातळीवरच्या युध्दाचं रणशिंग फुंकत होते. आम्ही आपलं भेदरलेल्या सशासारखे !

ज्या कोणाला दम, धमक्या द्यायच्या होत्या त्या देऊन झाल्यावर गावगुंडांनी आमच्याकडे पाहिलं... एवढा वेळ रागात असणारी ही मंडळी जाता जाता आमच्याकडं पाहून मात्र हसरा चेहरा करून म्हणाली, 'तुमचं चालू द्या!' प्रेक्षकांतला गलका शांत झाल्यावर आम्ही पुन्हा प्रयोग सुरू केला.. पुन्हा नव्यानं नाटक रंगात येत होतं. प्रेक्षकही मघाचा सगळा प्रकार विसरून नाटकांत रमले होते. आमच्या मनात मात्र भिती तशी होतीच. तेवढ्यात आणखी पण नवे काही गावगुंड 'कलाकार' रंगमंचावर आले आणि त्यांनी माईकचा ताबा घेतला. पहिल्यांदा आलेल्या गावगुंडांचे हे प्रतिस्पर्धी होते. 'कुणाच्या बा ला आम्ही भेत न्हाय, आम्हाला हुडाकता कशाला? आरं हे बगा आलोय म्होरं, काय करायचं ते करून घ्या...! असं प्रतिआव्हान त्यांनी माईकवर दिलं. आमची पुन्हा तीच अवस्था .. इथं आता प्रयोग करण्यात काही अर्थ नव्हता पण अर्ध्यावर सोडताही येत नव्हता. जाता जाता पुन्हा या गावगुंडांनीही आम्हाला प्रेमानं सांगितलं, 'तुमचं चालू द्या...! अशा परिस्थितीत आमचं काय चालणार? कप्पाळ !!



तुझे आहे तुजपाशी - डावीकडून शशीकांत लावणीस, अरुण देशपांडे, मंगल तुकतुके, सुरेखा पाटील (१९६५)



घरात फुलला पारिजात - शशीकांत लावणीस आणि शोभा आजरेकर

धोतर द्या की राव माजे....!

'वरचा मजला रिकामा' या नाटकाचा प्रयोग अकलूजच्या खुले नाट्यगृहात आयोजित करण्यात आला होता. आयोजकानं जाहिरात चांगली केल्यानं अकलूज परिसरातून मोठ्या संख्येनं प्रेक्षक आलेले होते. हे नाटक आमचा हातखंडा असल्यानं प्रत्येक प्रयोग रंगत होता. प्रयोग सुरू होण्यापूर्वी आयोजकांनी एक छोटेखानी कार्यक्रम त्याच रंगमंचावर घेतलेला असल्याने आम्हाला तयारीला थोडासा जास्त वेळ मिळालेला होता. रंगभूषा करून आम्ही आपापल्या भूमिकेचे कपडे परिधान करीत असतानाच धोतर विसरल्याचं लक्षात आलं. आता ऐनवेळी काय करायचं हा मोठा प्रश्न ! त्या शिवाय चालणारच नव्हतं... माझ्या चेहऱ्यावर तणाव..!

माझा सहकलाकार शिवराज सरनाईक.. अशा कठिण प्रसंगात अनेकदा त्याची हुशारी कामी आलेली. त्यानं मला शांत रहायला सांगितलं आणि पाच दहा मिनिटात त्याने एका धोतर घातलेल्या व्यक्तीला आत आणलं. नाटक पहायला आलेल्या धोतरवाल्या प्रेक्षकाला माझी पँट दिली आणि त्याचं धोतर नेसून मी रंगमंचावर गेलो. हा प्रेक्षक रंगमंचाच्या डाव्या बाजूच्या अंधारात उभा होता पण रंगमंचावरून मला तो दिसत होता. पँट घातल्याने तो लाजत होता. मी माझी पहिली एक्झिट घेऊन आत गेलो तसा तो तरातरा आला आणि धोतर मागू लागला. आता आली का पंचाईत! शिवराजनं त्याला नेमकं काय सांगितलं होतं कुणास ठाऊक... बरं तो आला तेंव्हा शिवराज रंगमंचावर ...मी थोडं थांबायला सांगितलं. शिवराजची एक्झिट झाल्यावर तो आत येताच सगळा प्रकार त्याच्या लक्षात आला. त्यानं त्याला बाजूला घेऊन काहीतरी समजावलं... पुन्हा तो बाहेर गेला.

मी रंगमंचावरून मागे आलो की तो आत यायचा... असं सतत घडत होतं. शिवराज प्रत्येकवेळी त्याला शांत करीत होता तर मी त्याला चुकवत होतो. नाटक संपत आलं, सुदैवाने माझी शेवटची एंट्री होती पण त्याचा विश्वास नव्हता. मी रंगमंचावर गेलो तर हा मागून येऊन पुन्हा समोरच्या कोपऱ्यात उभा... बराच अस्वस्थ झालेला होता. त्याच्यासोबत आलेली त्याच्या गावाकडची माणसं निघायच्या तयारीत होती पण याला धोतरामुळं जागा सोडता येत नव्हती. अखेर वैतागून तो काहींसा रंगमंचासमोर आला आणि प्रेक्षकांतूनच मोठ्यानं ओरडला, 'धोतार द्या की राव माजं...' प्रेक्षकांतून हशा उसळला. वेळ मारून नेण्यासाठी मीही म्हटलं, 'काय माणसं हाईत हो? पँटवाली माणसंबी दुसऱ्याच्या धोतराला हात घालत्यात'... पुन्हा हशा पिकला. मी एक्झिट घेतली. तो पुन्हा समोर उभा.. धन्यवाद म्हणत त्याची सुटका केली... आणि माझीही सुटका झाली एकदाची !



घरात फुलला पारिजात - शशीकांत लावणीस, सुनील दिक्षीत व शोभा आजरेकर (१९६६)

तरीही ती हसलीच.....

नाटक कुठलंही असो, भूमिका कोणतीही असो, मला एक वेगळ्या प्रकारे एंजॉय करण्याची सवयच लागलेली आहे. नाटकाच्या दृष्टीने ती चुकीची असली तरी मी रंगमंचावर सतत असंच करीत आलो आहे. हीच सवय चित्रपटातही कायम राहिली. कॅमेऱ्याला पाठमोरा असलो की, ठरलेल्या डॉयलॉगऐवजी मी काहीतरी गंमतीचा संवाद म्हणतो आणि दिग्दर्शकांसह सगळेच हसत सुटतात. माझ्या एका दिग्दर्शकाला तर याची सवयच झालीय.

चित्रपटात हे खपून जातं तसं नाटकांत अवघड असतं. 'चांदणे शिंपीत जा' या नाटकात मी पोलिस कमिशनर सदानंदाची भूमिका करायचो. हा अधिकारी तसा शिस्तीचा. प्रेमळ पण गंभीर प्रवृत्तीचा. स्वत: अविवाहित पण मित्रांच्या कुटुंबावर मनापासून प्रेम करणारा...! एक गुणी अभिनेत्री माधवी या नाटकांत माझ्या मित्राच्या मुलीचं काम अत्यंत गंभीरपणे करीत असायची. तशी ती एरवीही शांत शांतच असायची. या माधवीची रंगमंचावर गंमत करायचं मी ठरवलं.. नाटकातला प्रसंग अत्यंत गंभीर... प्रेक्षकांपर्यंत हा तणाव गेलेला. दहावीत शिकलेल्या प्रमिलनं आत्महत्या केल्याची बातमी पोहोचलेली.. या बातमीने मी, माधवी रडतो आहोत तर तिचे कठोर वडील दिनानाथ विनोबा काही सोयरसुतक नसल्याप्रमाणे स्थितप्रज्ञ आहेत. असा सगळा प्रसंग तणावाचा आणि रडारडीचा... अशा वेळी मी रडतरडत हळूच माधवीजवळ गेलो आणि प्रेक्षकांना कळणार नाही. अशा पध्दतीनं तिला 'काय गं धुरपे, रडतीयास व्हय?'असं म्हणालो. गंभीर प्रसंग असल्यानं हसायला बंदी होतीच पण माधवीला हसू आलं आणि बिचारीनं आपला चेहरा लपवत हसू दिसू दिलं नाही...

पुढच्या प्रत्येक प्रयोगात या प्रसंगावेळी मी हेच करायचो आणि तिची अवघड अवस्था व्हायची. विनोबा माझ्यावर रागवायचेही... एका प्रयोगावेळी विनोबा आणि माधवीनं गंभीरपणे याबाबत सांगितलं आणि मीही असं करायचं नाही हे ठरवून टाकलं. प्रयोग सुरू झाला आणि तो प्रसंग आला. सगळी रडारड, दु:खाचे वातावरण.. मीही डोळ्यातलं पाणी पुसत माधवीकडं पाहिलं... मी आज काहीही बोललो नव्हतो पण ती आठवण येऊन माधवी फिस्सकन हसलीच..! आज काही घडणार नव्हतं म्हणून ती बेसावध होती पण तो प्रसंग आला की 'धुरपे' ची आठवण येऊन ती हसली आणि यावेळी तिला हसू लपवताही आलं नाही... ! गंभीर प्रसंगाचं गांभिर्य नष्ट झालं होतं...!



कल्ल्या बेरड च्या भूमिकेत भारदस्त व्यक्तीमत्त्व मधुकर (दादा) टोमके.

फ्लॅश काही पडेना... पोरीला काही सोडेना....!

अतिउत्साही आणि नवख्या कलावंतांची रंगमंचावर अनेकदा धमाल होत असते. विशेषत: महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनाच्या वेळी सादर होणाऱ्या नाटकांतून तसे प्रसंग अनुभवायला मिळत असतात. नाटकांतून काम करण्याची हौस दांडगी असते पण ऐनवेळी पळता भुई थोडी होते. एंट्रीच्या वेळेला टेंशन घेऊन अंगात सणसणीत ताप भरलेले हौशीही पहायला मिळालेले आहेत. तसं फोटोसाठी नाटक जागीच थांबवणारे बहाद्दरही आपली आठवण कायम ठेऊन जातात. काही वर्षापूर्वी नाटकातल्या प्रसंगाच्या फोटोंना वेगळे महत्त्व होते आणि असे फोटो सहजासहजी मिळणंही कठीण होतं.

'नटसम्राट' नाटकाच्या तालमी सुरू होत्या. तालमी पहायला अनेकजण येत होते. यात एक तरूण व्यापारीही असायचा. तालमी पाहून त्याला नाटकाची गोडी लागली होती. माणूस तसा मनमोकळा, शांत स्वभावाचा. त्यानं आग्रह धरला आणि त्याला सुधाकराची भूमिका मिळाली. मन लावून तालमी करू लागला. त्याच्या पत्नीचं, नलूचं काम करणारी मुलगीही स्थानिकच. या नाटकाचे तसे अनेक प्रयोग यापूर्वी झाले होते पण काही कलाकरांत बदल असलेला पहिला प्रयोग पंढरीतच होता. तालमीही छान झालेल्या होत्या.

या नवख्या कलावंताने प्रयोगाला खास फोटोग्राफरला निमंत्रण दिलेले होते. नाटकातल्या कुठल्या कुठल्या प्रसंगाचे फोटो घ्यायचे याची त्याला चांगली कल्पना दिलेली होती. त्यात एका प्रसंगात सुधाकरला नलू बिलगते, यावेळचा फोटो आवर्जून घेण्याचे सक्त आदेशच फोटोग्राफरला मिळालेले होते. अपेक्षेप्रमाणे तो सीन आला आणि या कलाकाराचे सगळे लक्ष फोटोसाठी गेले. त्याने नलूच्या खांद्यावर हात ठेवले, ती त्याला बिलगली पण फोटो काही निघालाच नाही. नाटक आहे तिथचं थांबलेलं, फोटोसाठी पोज देऊन रंगमंचावर ही पात्र स्थिर झालेली. ऐनवेळी कॅमेऱ्यात काही बिघाड झालेला असल्यानं फ्लॅश काही पडत नव्हता. फ्लॅश पडेपर्यंत नलूला सोडायचंच नाही असा जणू त्यानं विडाच उचललेला होता. ही सगळी कसरत पाहून प्रेक्षक हसू लागले होते. नलूचं काम करणारी मुलगीही गोंधळली होती आणि फोटोग्राफर बिचारा आपला नवा प्रयत्न करीतच होता पण फ्लॅश काही पडत नव्हता. प्रेक्षकांचा गलका हळू हळू वाढत गेला... काही इरसाल प्रेक्षकांना 'सोड.. सोड.. ' असा आवाच केला पण तो काही केल्या जागचा हलत नव्हता, नाटकही स्तब्ध झालं होतं... अखेर एकदाचा फ्लॅश पडला आणि अडकलेलं नाटक पुढं सुरू झालं...!



स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा पंढरपूर नाट्य महोत्सव १९६४

खरोखरच पोट भरलं.....


'गुड बाय डॉक्टर' हे नाटक घेऊन आम्ही कोकणच्या दौऱ्यावर गेलो होतो. रात्री प्रयोग आणि दिवसभर कोकाणची सैर यामुळं आम्ही सगळेच कलावंत जाम खुषीत होतो. पहिला प्रयोग फोंडा इथं होता. प्रवास मोठा असल्यांन आदल्या दिवशीच निघायचं नियोजन होतं, त्यामुळं सगळे कलावंत आणि बाकीचे सहकारी एकत्र जमले. आम्हाला नेणारी गाडी मात्र काही केल्या येत नव्हती. गाडीची वाट पहात सगळे झोपी गेले. पहाटे कॅव्हातरी गाडी आली आणि मग आमची आवराआवर सुरू झाली.

कोल्हापूरच्या जवळपास जाण्याआधीच गाडीत काही बिघाड झाला... मध्येच फार वेळ गेला. प्रयोगाच्या वेळेपर्यंत पोहोचणं कठीण दिसू लागलं होतं. सगळ्यांच्या पोटात कावळे घिंगाणा घालत होते पण त्यासाठी वेळ नव्हता. गाडीच्या वरच्या बाजूस रंगमंचाचा सेट होता आणि ड्रायव्हरची कुरकुर सारखीच सुरू होती. पुढे घाट लागल्यावर तर त्यानं कासवगतीनंच गाडी धेतली. वरच्या सेटमुळं गाडीचा बॅलन्स रहात नाही अशी त्याची तक्रार होती. आमचं सारं लक्ष घड्याळाकडं होतं. उशिर झालेला होता, प्रयोगाचं काय होणार याची धास्ती होती. भुकेनं सगळेच व्याकुळ होते पण परिस्थिती ती नव्हती. कसेबसे फोंडा इथल्या नाट्यगृहावर पोहचलो. आमच्या आधी नाट्यगृह प्रेक्षकांनी भरलेलं होतं. विनाविलंब नाटक सुरू करणं आवश्यक होतं. खाण्यापिण्याचं नाव काढणंही कठीण होऊन बसलेलं होतं.

घाईघाईने सेट लावला गेला आणि प्रयोग सुरू झाला. प्रत्येकालाच कडकडून भूक लागलेली होती पण पर्याय नव्हता. आता जे काही असेल ते प्रयोगानंतरच ! मी मात्र आतल्या आत समाधानी होतो. या नाटकात मी मुनीमजी ही भूमिका करीत होतो. साईभक्त मुनीमजीचा उपवास असल्यानं त्यांना नाटकातील एका प्रसंगात फळे दिली जायची. नाटकांत हा दुसराच प्रवेश होता. ठरल्याप्रमाणं सगळं झालं. बाईसाहेबांनी मला फळं आणून दिली. नेहमी एक केळं आणि अर्ध सफरचंद दिलं जायचं पण यावेळी मी जादा देण्याबद्दल आधीच सांगून ठेवलं होतं. त्याप्रमाणं पुरेशी फळं दिली गेली होती. प्रसंगाच्या निमित्तानं का होईना पण मी चांगलाच ताव मारला. त्यातच बाईसाहेबांनी नाटकात नसलेला संवाद म्हटला, 'मुनिमजी, आणखी हवी आहेत का फळं?'... मी गालातल्या गालात हसत म्हटलं, 'नको बाईसाहेब, खरोखरच पोट भरलं'... जाम भूक लागलेली होती आणि फलाहारानं चांगलाच आधार मिळाला होता. बाकीच्यांना मात्र प्रयोग संपण्याची वाट पहावी लागली होती.



नाटकामधील एका प्रसंगामध्ये मधुकर (दादा) टोमके व इतर कलावंत.



'करून गेलो गाव'
नाट्य प्रयोग सादर करताना


स्वादिष्ट भोजनाचा
आस्वाद घेताना

९४ व्या अ.भा.मराठी नाट्य संमेलनास

हार्दिक शुभेच्छा!





नानचंद गांधी यांचे

मे. नवजीवन नानचंद गांधी

सोने-चांदीचे अद्ययावत भव्य दालन !

हॉटेल ऐश्वर्या बिल्डिंग, सावरकर पथ, पंढरपूर. फोन : २२४४५० विस्तारीत ३३३





राहण्याची सर्वोत्तम सोय.....

हॉटेल ऐश्वर्या

शुध्द शाकाहारी

सावरकर पथ, पंढरपूर.

फोन : २२४४५०, २२६५५०, २२६१८०.

९४ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन पंढरपूर

।। नाट्य संमेलन यशस्वी करण्यासाठी राबणारे पंढरपूरचे शिलेदार ।।



रामा निळे



गिरीष इंदापूरकर



चैतन्य फुगारे



सुधीर घोडके



सुजीत मोरे



हृषीकेश जाधव



शरद राजगुरू



सोमनाथ शिंदे
8975463812
9665586101

दर्लिंग ग्राफिक्स

आकर्षक व नाविन्यपूर्ण छपाईचे विश्वसनीय ठिकाण

लग्नपत्रिका | बिलबुक | फोर कलर प्रिंटींग | बुक वर्क | व्हिजीटींग कार्ड | जॉब वर्क

जुन्या बसस्टँड समोर, पंढरपूर, जि.सोलापूर ४१३ ३०४.
email : darlinggraphics@yahoo.in